म. ग्रं. सं. ठाणे.
विषय इतिहास
सं. क्र. ४६४

REFBK-0002132
REFBK-0002132

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथमाला

ग्रंथ पहिला

# संस्कृत वाङ्मयाचा त्रोटक इतिहास

क्र. 2132

लेखक

REFBK-0002132 एलएल्. बी.

महाभारत उपसंहार ( २ ) श्रीकृष्ण चरित्र ( ३ ) श्रीरामचरित्र
( 1 ) Epic India ( 2 ) Mahabharata a criticism
( ३ ) Riddle of the Ramayana ( 4 ) History of medieeval Hindu India

आणि

( १ ) संक्षिप्त महाभारत ( २ ) संक्षिप्त रामायण या ग्रंथांचे कर्त्ते यांनीं लिहिला

किंमत दीड रुपाया

हें पुस्तक महादेव सखाराम दाते, यांनीं आपल्या वैद्यक पत्रिका छापखाना घ. नं. १२२ शनवार पेठ पुणें येथें छापिलें व तें
चिंतामण विनायक वैद्य यांनीं पुणें येथें
प्रसिद्ध केलें,

सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें राखून ठेवले आहेत.

# प्रस्तावना.

——:o:——

टिळक महाविद्यालयांत ' संस्कृत वाङ्मयाचा इतिहास ' या विषयावर दोन वर्षें जीं मी व्याख्यानें दिलीं, त्या व्याख्यानांवरून हा ग्रंथ तयार केला आहे. याला मुख्य आधार मॅकडोनेलच्या ' संस्कृत वाङ्मयाचा इतिहास ' या पुस्तकाचा आहे हें सहजच आहे. पण त्यांत अन्य ग्रंथांवरून हो थोडथोडी माहितीची भर घातली आहे. विशेषत: मूळ संस्कृत वैदिक ग्रंथ, सर्वानुक्रमणी, चरणव्यूह वगैरेतून माहिती वैदिक ग्रंथां संबंधानें जास्त दिली आहे. आणि सर्वांत मोठा फरकाचा अधिक विषय म्हटला म्हणजे वैदिक वाङमय, महाभारत रामायण व कालिदास यांच्या कालांसंबधानें पाश्चात्य विद्वानांचा व आपल्याकडील विद्वानांचा मोठा फरक असल्यानें त्यांच्या कालांसंबंधानें जास्त विवेचन केलें असून लो. टिळक दीक्षित राजवाडे प्रभृतींची व माझीं मतें विस्तारानें यांत मांडलीं आहेत.त्यामुळें हा ग्रंथ जरी लहान आहे, तरी त्यांत संकलित माहिती आपल्या दृष्टीची वाचकांस मिळेल.ग्रंथ टिळकमहाविद्यालयांतील विद्यार्थ्यांकरितां याच ऑक्टोबर मध्यें प्रसिध्द करण्याची जरूरी असल्यानें तो छापण्यांत, किंबहूना लिहून काढण्यांतही घाई झाली यामुळें कित्येक चुका त्यांत राहून गेल्या असतील.विद्वान वाचक त्या माझे नजरेस आणतील तर मी त्यांचा फार आभारी होईन.आणि द्वितीय आवृत्तीच्या वेळीं त्याचा मला फार उपयोग होईल.

याशिवाय या ग्रंथांत त्रोटक माहिती आहे ती उत्तरोत्तर विस्तृत देण्याचा माझा विचार आहे.किंबहुना एकेक विषयावर तत्तद्विषयनिष्णातांकडून माहितीनें भरलेले एकविषयक निबंध ( monograms )लिहून घेऊन

ते परिशिष्ट रूपानें यास जोडण्याचाही माझा विचार आहे. तात्पर्य, या वेळीं जरी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या व इतर विद्यार्थ्यांकरितांच हा लहानसा ग्रंथ काढला आहे, तरी पुढें हा ग्रंथ विद्यार्थ्यांसच नव्हे तर सामान्य जिज्ञासु व विद्वान वाचकांसही वाचण्यालायक होईल. तसा तो थोडक्याच अवधींत होवो अशी ईश्वरापाशीं प्रार्थना करून ही अल्पशी प्रस्तावना पुरी करतों.

पुणें, आक्टोबर ५ सन १९२२
आश्विन शु. १५ शके १८४४

**चिंतामण विनायक वैद्य.**

# अनुक्रमणिका.


उपोद्धात ... ... ... ... ... १

भाग पाहिला—श्रुतिकाल ... ... ... ...

ऋग्वेद ... ... ... ... ... ७

ऋषि ... ... ... ... ... १५

छंद ... ... ... ... ... ... १७

देवता ... ... ... ... ... २०

विनियोग ... ... ... ... ... २४

सामवेद ... ... ... ... ... २५

यजुर्वेद ... ... ... ... ... २७

अथर्ववेद ... ... ... ... ... ३१

ब्राह्मणें ... ... ... ... ... ३५

उपनिषदें ... ... ... ... ... ४३

वेदांगें—कल्प ... ... ... ... ... ४८

शिक्षा ... ... ... ... ... ५१

छंद, निरुक्त ... ... ... ... ... ५२

इतर किरकोळ ग्रंथ ... ... ... ... ५३

ज्योतिष ... ... ... ... ... ५४

पाणिनि ... ... ... ... ... ५७

समारोप ... ... ... ... ... ६६

भाग दुसरा—स्मृतिकाल ... ... ... ... ७०

महाभारत ... ... ... ... ७२

पुराणें ... ... ... ... ८४

रामायण ... ... ... ... ९४

महाकाव्यें ... ... ... ... ११०

कालिदास ... ... ... ... ११४

अन्य कवि ... ... ... ... १२९
गद्य काव्यें ... ... ... ... १३१
स्फुटकाव्यें ... ... ... ... १३३
नाटकें ... ... ... ... १३४
कल्पित कथा वगैरे ... ... ... ... १३८
तत्त्वज्ञान ... ... ... ... १४०
पूर्वमीमांसा ... ... ... ... १४३
उत्तरमीमांसा ... ... ... ... १४७
पांचरात्र व पाशुपत ... ... ... ... १५१
बौद्ध व जैन तत्त्वज्ञानें ... ... ... ... १५३
सांख्य ... ... ... ... १५५
योग ... ... ... ... १५७
न्याय व वैशेषिक ... .. ... ... १५८
भाग तिसरा—भाष्यकाल. ... ... ... ... १६३
धर्मशास्त्र अथवा कायदा ... ... ... १६४
इतिहास ... ... ... ... १६६
व्याकरण ... ... ... ... ... १६७
कोश ... ... ... ... ... १६९
अलंकारशास्त्र ... ... ... ... ... १७०
गणित व ज्योतिष ... ... ... ... १७०
वैद्यक ... ... ... ... ... १७३
संगीत व शिल्प वगैरे कला ... ... ... १७४

# शुद्धिपत्र.

—:o:—

( काना, वेलांटी, अनुस्वार वगैरेच्या लहान चुका दिल्या नाहीत. )

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २ | १६ | वेद | संहिता. |
| १४ | ४ | आपधर्म | आर्यधर्म. |
| १८ | ७ | अष्टी | अष्टि. |
| २१ | ५ | एकेकाच | एकाच. |
| ३१ | १३ | अँडव्हॅन | ॲथर्व्हॅन. |
| ४१ | १८ | ब्राह्मणांत | या ब्राह्मणांत. |
| ४२ | २४ | विषयास | ब्रह्मविषयास. |
| ५० | २१ | ९०० | ५०० |
| ५२ | १२ | परंतु | कारण. |
| ५३ | १६ | वेदाची | ऋग्वेदाची. |
| ” | २३ | वेदाच्याच | वेदांच्या. |
| ६१ | २ | ...नीयचे | ...नीचे. |
| ६२ | ७ | निखसितांनां | निरवसितानाम्. |
| ” | २१ | सुत्रम | सूत्र. |
| ” | ३६ | प्रात्यप्रधिः | प्रात्यप्रथिः |
| ६३ | २ | पाणीनी | पाणिनि. |
| ६३ | ६२ | प्राचान् | प्राच्याम्. |
| ६४ | १३ | काव्यग्रंथ | कर्मग्रंथ. |
| ७१ | १२ | त्यांत जवळ जवळ १ स्मृतिकालीन वाङ्मयांत जवळ जवळ ९ | |
| ७३ | ९ | मुळांत झालें | उत्पन्न झालें. |
| ” | १० | इ. स. पू. २०० | इ. स. ४०० |
| ” | १३ | इ. स. पू. ५०० | इ. स. ५० |
| ७९ | ८ | मूळ रोमन | मुख्य रोमन |

| | | | |
|---|---|---|---|
| ८० | १७ | अट्टशुला | अट्टशूला |
| ८१ | १५ | आहे ? आहेत ) | आहे ), आहेत. |
| ,, | २२ | अर्धमस | अर्धसम |
| ८२ | ७ | महाभारत | मूळ महाभारत |
| ९० | २ | असल्यानें तीं | झालीं आहेत. |
| ,, | २६ | १८ पुराणें | १८ उपपुराणें |
| ९३ | १३ | ' घुसडले गेले ' याचे पुढें १८ व्या ओळींतील ' तसेंच भागवतांतही घुसडले गेले असावे ' हे शब्द वाचावे. | |
| ९४ | ७ | पुराणांनंतर | मूळ पुराणांनंतर |
| ,, | १४ | मत्य | मत्स्य |
| ,, | १८ | कूकूर्म व स्क (१७) स्कंद | कू (१७) कूर्म व स्क (१८) स्कंद |
| ९७ | २५ | वाङ्मनकर्मभिः पूत्यु | वाङ्मनःकर्मभिः पत्युः |
| १०१ | २३ | माधवासु । | मधवत्सु । |
| १०२ | १५ | महाभारांत | महाभारतांत |
| १०३ | १३ | पद्धति | माहिती |
| १०६ | २३ | रामायणापूर्वी | मूळ रामायणापूर्वी |
| १०९ | ५ | वाल्मीकिक...रूपका | वाल्मीकीचा रूपक |
| ,, | २२ | दाक्षिणा त्यांचा | दाक्षिणात्यानाम् |
| १११ | १६ | चर्चा | चर्चा व्हावी |
| ११९ | २३ | ( ३ ) | ( २ ) |
| १२१ | ४ | उरपूर | उरअऊर |
| १३० | १३ | नबचरित्रात्मक | नलचरित्रात्मक |
| १३१ | १० | कवीच्या | कवीचें |
| १३९ | १६ | | इतिहास |
| १४१ | ४ | उपनिषत्कालीं सांख्य | उपनिषत्कालीं |
| १४३ | २४ | पूर्वमीमांसा | उत्तरमीमांसा |
| ,, | २५ | त्याचप्रमाणें अगदीं | असावें त्याचप्रमाणें |
| १४४ | ६ | बाद रामायणाची | बादरायणाची |
| ,, | १२ | कसून | असून |

| | | | |
|---|---|---|---|
| ,, | २५ | शब्दप्र | शब्दावर |
| १४७ | ११ | बौद्धिक | बौद्ध |
| १५८ | ७ | तत्वज्ञानाचा | या तत्वज्ञानाचा |
| १५९ | १८ | विवेचनांत | विवेचन |
| ,, | २५ | वात्ययनांचें | वात्स्यायनाचें |
| १६१ | १ | ( हेडिंग ) | सांख्य—न्याय |
| ,, | १ | मतें, संस्थापक | मतसंस्थापक |
| ,, | १४ | संस्कृत | संस्कृत ग्रंथ |
| ,, | १५ | मतें | १८ मतें |
| ,, | १८ | १५०) अगर पृ. ३० | १५० अगर पृ. ३० ) |
| १६२ | १३ | बौद्धा | बोधि |
| ,, | शेवटची | तबत्दीधिती | तत्वदीधिति |
| १६३ | ५ | ओघ | ओघ वरून |
| १६४ | ८–९ | ४००–९०० | ५००–६०० |
| १६७ | १३ | सुकत संकीर्तनादि | सुकृतसंकीर्तनादि |
| १७१ | १७ | शतकांत | शतकांतल्या सिद्धांत ग्रंथांवरून |
| १७४ | १८ | त्याच भाणें | त्याचप्रमाणें. |

# पुरवणी.

पृष्ठ १३६ चे शेवटीं—

कालिदासाचीं आणखीं दोन नाटकें प्रसिध्द आहेत. त्यांपैकीं विक्रमोर्वशीय बरें आहे. मालविकाग्निमित्र कमी प्रतीचें आहे, पण तें ऐतिहासिक असल्यानें अतिशय महत्वाचें आहे. पुष्पमित्राचा पुत्र अग्निमित्र हा विदिशा ( भेलसा ) नगरींत त्याच्यातर्फे कारभार पाहात असतां विदर्भ देशाच्या राजाशीं त्याचा कांहीं बेबनाव झाला इत्यादि कथा त्यांत असून ही बारीकसारीक माहिती कालिदास पुष्पमित्र व अग्निमित्र यानंतर लवकरच झाला असेल तरच त्यास असेल; नाहीं तर पुढें ५०० वर्षें त्याचा काल मानल्यास त्यास माहीत असणें असंभवनीय दिसतें असें प्रो. शि. म. परांजपे यांनीं प्रतिपादन केलें आहे तें योग्य आहे.

पृष्ठ १५९ चे शेवटीं—

न्याय व वैशेषिक सूत्रांवर भाष्य लिहिणारा वात्स्यायन यास पक्षिलस्वामी असेंही नांव आहे. दिङ्नाग ( बौध्द ) मतास खोडून काढण्यास उद्योतकरानें न्यायवार्तिक ग्रंथ लिहिला, त्यास धर्मकीर्तीनें उत्तर दिलें. धर्मकीर्तीचीं मतें वाचस्पतिमिश्रानें १० व्या शतकांत न्यायवार्तिकतात्पर्यटीका लिहून खोडून काढलीं. ( Max muller )

## नीति अ॰ राज्यशासन

पृष्ठ १६२

या विषयावर स्मृतिकाळांत बरेच ग्रंथ झाले असावे. कौटिल्याचें अर्थशास्त्र हल्लीं उपलब्ध झालें आहे तें अत्यंत महत्त्वाचें असून त्यांत चंद्रगुप्तकालीन राज्यकारभाराची विस्तृत माहिती आहे. महाभारतांत बृहस्पतिनीति व शुक्रनीति यांचा उल्लेख आहे. हल्लीं शुक्रनीति उपलब्ध आहे. कामन्दकीनीति हाही एक ग्रंथ उपलब्ध आहे. कामन्द चाणक्याचा शिष्य मानतात हा ग्रंथ इ. स. पू. दिसतो. चाणक्यनीतिसारहि प्रसिद्ध आहे.

# संस्कृत वाङ्मयाचा इतिहास

२१३२

## उपोद्घात.

### संस्कृत वाङ्मयाचे तीन भाग.

(१) श्रुतिकाल (२) स्मृतिकाल (३) भाष्यकाल,

आर्यसंस्कृतीचें नीट ज्ञान होण्यास संस्कृत वाङ्मयाचा चांगला अभ्यास केला पाहिजे; पण आश्चर्य असें कीं, या वाङ्मयाचा अभ्यास आमच्यापेक्षां पाश्चात्य लोकांनीं जास्त केला आहे. जर्मनींत तर संस्कृत भाषेचा व्यासंग फार दांडगा आहे. इंग्रज लोकांत देखील तो बराच आहे. पण पाश्चात्य लोक आमच्या संस्कृतीचे नसल्यानें आमच्या वाङ्मयाकडे ते त्यांच्या दृष्टीनें पाहतात. ते लोक जरी अतिशय चोकस व शोधक बुद्धीचे असले तरी त्यांस पुष्कळ वेळां खरी माहिती नसल्यानें त्यांच्याकडून ढोबळ चुक्याहि होतात, यांत मुळींच आश्चर्य नाहीं. शिवाय ग्रंथांवरून एखादें अनुमान काढावयाचें तें तो सर्व ग्रंथ निःपक्षपातबुद्धीनें वाचून काढावें लागतें. या नियमाचा भंग केल्यानेंहि चुकी होणें साहजिक आहे. अलीकडे आपल्याकडील विद्वान् लोक या विषयाकडे लक्ष्य देऊं लागले आहेत. त्यांतील बुद्धिवान् लोकांस काय करतां येईल हें पुढील गोष्टीवरून दिसून येईल. लो० टिळक यांनीं ऋग्वेदाचा

अभ्यास करून 'Arctic Home in the Vedas' हें पुस्तक लिहिलें तेंव्हां सर्व जगाचे नेत्र दिपून गेले. असो.

संस्कृत वाङ्मयाचा इतिहास जगांतील सर्व वाङ्मयापेक्षां प्राचीन आहे. संस्कृत वाङमयांतील पहिला ग्रंथ म्हणजे ऋग्वेद होय. ऋग्वेदाचा काल लोकमान्यांच्या मतें इ. स. पु. ५०००–३००० हा होय. एका युरोपियन पंडितानें 'It is the babbling of the childhood of humanity' असें ऋग्वेदाविषयीं आपलें मत दिलें आहे. पण माझें मत असें आहे कीं ऋग्वेद हा काव्यदृष्ट्या व तत्वज्ञानदृष्ट्या अतिशय सुंदर ग्रंथ आहे. इतक्या वर्षांनंतर हल्लीं देखील तत्वज्ञानाची मजल ऋग्वेद व उपनिषदें यांच्या पुढें गेली नाहीं.

संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासांतील पहिला भाग श्रुतिकाल हा इ. स. पू. ५००० ते ८०० पर्यंतचा होय. यांत वेद, ब्राह्मण, उपनिषदें, सूत्रें वगैरे निर्माण झालीं. वेद हे मंत्रमय असून ब्राम्हणें ह्मणजे वेदावरील टीकात्मक ग्रंथ होत. धर्मशास्त्रांत वेद व ब्राह्मण या दोहोंस मिळून वेद हें नांव देण्यांत येतें. वेद हे अपौरुषेय असून परमेश्वरानें ते ऋषींच्या तोंडून वदविले असा भारतीय आर्यांचा विश्वास आहे. वेदांच्या ब्राम्हणांतच उपनिषदें येतात; व यानंतर सूत्रग्रंथ येतात. श्रौतसूत्रांत यज्ञयागासंबंधाची माहिती आहे. गृह्यसूत्रांत वागणुकीसंबंधीं नियम व धर्मसूत्रांत इतर सामान्य माहिती आहे. या सर्वांस वैदिकग्रंथ म्हणतात. हें सर्व वाङ्मय इ. स. पू. ५००० ते ८०० पर्यंत निर्माण झालें असें माझें मत असून युरोपियन पंडित मात्र हा काल इ. स. पू० २००० ते ३०० इतका अलीकडे लोटतात. पाणिनि हा इ. स. पु.

८०० च्या सुमारास झाला. पाणिनीनंतर संस्कृत भाषा मृत झाली. जी भाषा बायका व अडाणी लोक यांच्या बोलण्यांत प्रचलित असते तिला मी जिवंत भाषा म्हणतों. गौतमबुद्ध इ. स. पू. ५०० च्या सुमारास झाला, तेव्हां त्यानें लोकांस केलेला उपदेश संस्कृत भाषेंत नव्हता. यावरून त्यावेळीं ती भाषा जिवंत नसावी असें दिसतें. संस्कृत नाटकांत उच्च दर्जाच्या स्त्रियांच्या तोंडांतसुद्धां संस्कृत भाषा नाहीं यावरून हेंच अनुमान निघतें. पाणिनीनें आपल्या व्याकरण ग्रंथांत भाषेचे दोन प्रकार मानले आहेत. वैदिक भाषा त्यावेळीं फार जुनी झाली असून लोकांच्या बोलण्यातून ती नष्ट झाली होती. पण पाणिनीनें जेथें 'भाषायाम्' असें म्हटलें आहे तेथें त्याचा अर्थ 'लोकांच्या बोलण्याच्या भाषेंत' असा आहे; पाणीनीनंतर संस्कृत भाषा पंडितलोकांच्या वादविवादांतच राहिली. पाणिनीपर्यंतच्या वाङ्मयास वैदिक वाङ्मय म्हणतां येईल व हाच श्रुतिकाळ मानतां येतो.

श्रुतिकालापुढील संस्कृत वाङ्मयाच्या कालास 'स्मृतिकाल' (epic period) असें नांव देतां येईल. हा इ. स. पू. ८०० पासून इ. स. ६०० पर्यंतचा होय. या कालांतील मुख्य ग्रंथ म्हणजे महाभारत व रामायण हे होत. या दोन्ही ग्रंथांचीं मूळ स्वरूपें फार लहान असुन तीं या पूर्वींच तयार झालीं असलीं पाहिजेत. बौद्धधर्म ऊर्जितावस्थेस आल्यानंतर धर्माच्या चढाओढीनें म्हणून या ग्रंथांचा बराच विस्तार होऊन वैदिक धर्माच्या उत्तेजनार्थ त्यांस आर्यधर्मप्रतिपादक अशीं हल्लींचीं स्वरूपें प्राप्त झालीं. महाभारत हा ग्रंथ इ. स. पू ३००–२५० पर्यंत तयार झाला असुन त्यास स्मृतिच म्हणतात. रामायण इ. स० पू. १०० च्या

अभ्यास करून 'Arctic Home in the Vedas' हें पुस्तक लिहिलें तेव्हां सर्व जगाचे नेत्र दिपून गेले. असो.

संस्कृत वाङ्मयाचा इतिहास जगांतील सर्व वाङ्मयापेक्षां प्राचीन आहे. संस्कृत वाङमयांतील पहिला ग्रंथ म्हणजे ऋग्वेद होय. ऋग्वेदाचा काल लोकमान्यांच्या मतें इ. स. पु. ५०००–३००० हा होय. एका युरोपियन पंडितानें 'It is the babbling of the childhood of humanity' असें ऋग्वेदाविषयीं आपलें मत दिलें आहे. पण माझें मत असें आहे कीं ऋग्वेद हा काव्य-दृष्ट्या व तत्वज्ञानदृष्ट्या अतिशय सुंदर ग्रंथ आहे. इतक्या वर्षा-नंतर हल्लीं देखील तत्वज्ञानाची मजल ऋग्वेद व उपनिषदें यांच्या पुढें गेली नाहीं.

संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासांतील पहिला भाग श्रुतिकाल हा इ. स. पू. ५००० ते ८०० पर्यंतचा होय. यांत वेद, ब्राह्मण, उपनिषदें, सूत्रें वगैरे निर्माण झालीं. वेद हे मन्त्रमय असून ब्राम्हणें ह्मणजे वेदावरील टीकात्मक ग्रंथ होत. धर्मशास्त्रांत वेद व ब्राह्मण या दोहोंस मिळून वेद हें नांव देण्यांत येतें. वेद हे अपौरुषेय असून परमेश्वरानें ते ऋषींच्या तोंडून वदविले असा भारतीय आर्यांचा विश्वास आहे. वेदांच्या ब्राम्हणांतच उपनिषदें येतात; व यानंतर सूत्रग्रंथ येतात. श्रौतसूत्रांत यज्ञयागासंबंधाची माहिती आहे. गृह्यसूत्रांत वागणुकीसंबंधीं नियम व धर्मसूत्रांत इतर सा-मान्य माहिती आहे. या सर्वांस वैदिकग्रंथ म्हणतात. हें सर्व वाङ्मय इ. स. पू. ५००० ते ८०० पर्यंत निर्माण झाले असें माझें मत असून युरोपियन पंडित मात्र हा काल इ. स. पू० २००० ते ३०० इतका अलीकडे लोटतात. पाणिनि हा इ. स. पु.

८०० च्या सुमारास झाला. पाणिनीनंतर संस्कृत भाषा मृत झाली. जी भाषा बायका व अडाणी लोक यांच्या बोलण्यांत प्रचलित असते तिला मी जिवंत भाषा म्हणतों. गौतमबुद्ध इ. स. पू. ५०० च्या सुमारास झाला, तेव्हां त्यानें लोकांस केलेला उपदेश संस्कृत भाषेंत नव्हता. यावरून त्यावेळीं ती भाषा जिवंत नसावी असें दिसतें. संस्कृत नाटकांत उच्च दर्जाच्या स्त्रियांच्या तोंडांतसुद्धां संस्कृत भाषा नाहीं यावरून हेंच अनुमान निघतें. पाणिनीनें आपल्या व्याकरण ग्रंथांत भाषेचे दोन प्रकार मानले आहेत. वैदिक भाषा त्यावेळीं फार जुनी झाली असून लोकांच्या बोलण्यातून ती नष्ट झाली होती. पण पाणिनीनें जेथें 'भाषायाम्' असें म्हटलें आहे तेथें त्याचा अर्थ 'लोकांच्या बोलण्याच्या भाषेंत' असा आहे; पाणीनीनंतर संस्कृत भाषा पंडितलोकांच्या वादविवादांतच राहिली. पाणिनीपर्यंतच्या वाङ्मयास वैदिक वाङ्मय म्हणतां येईल व हाच श्रुतिकाळ मानतां येतो.

श्रुतिकालापुढील संस्कृत वाङ्मयाच्या कालास 'स्मृतिकाल' (epic period) असें नांव देतां येईल. हा इ. स. पू. ८०० पासून इ. स. ६०० पर्यंतचा होय. या कालांतील मुख्य ग्रंथ म्हणजे महाभारत व रामायण हे होत. या दोन्ही ग्रंथांचीं मूळ स्वरूपें फार लहान असुन तीं या पूर्वींच तयार झालीं असलीं पाहिजेत. बौद्धधर्म ऊर्जितावस्थेस आल्यानंतर धर्माच्या चढाओढीनें म्हणून या ग्रंथांचा बराच विस्तार होऊन वैदिक धर्माच्या उत्तेजनार्थ त्यांस आर्यधर्मप्रतिपादक अशीं हल्लींचीं स्वरूपें प्राप्त झालीं. महाभारत हा ग्रंथ इ. स. पू ३००-२५० पर्यंत तयार झाला असुन त्यास स्मृतिच म्हणतात. रामायण इ. स० पू. १०० च्या

सुमारास झालें असावें. या पुढील या कालांतील ग्रंथ ह्मणजे विशिष्ट स्मृतिग्रंथ होत. स्मृतींतून वेदाचीच तत्वें सोप्या व संकलित भाषेंत ग्रथित केलीं आहेत. यांतील पहिली मनुस्मृति ही इ. स. पू. १०० च्या सुमारास हल्लींच्या स्थितींत तयार झाली असावी. मनु हा पहिला धर्मशास्त्रप्रवर्तक होय. त्यानें सांगितलेले नियम संकलित व विस्तृत करून हल्लींची मनुस्मृति तयार झाली आहे. यानंतर याज्ञवल्क्यस्मृति इ. स, ३०० च्या सुमारास झाली असावी. संस्कृत वाङ्मयांतील प्रधान कवि जो कालिदास तो इ. स. पू. ५७ च्या सुमारास होऊन गेला. तत्वज्ञानाचीं सर्व सूत्रें याच कालांतील आहेत. या कालांतील महत्वाचा भाग ह्मणजे सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा व उत्तर मीमांसा हीं षड्दर्शनें होत. आर्यसंस्कृतींतील महत्वाचें तत्वज्ञान या ग्रंथांतून सांठविलेलें असून त्यांत पूर्णचर्चात्मक विचार केलेला असल्यामुळें पाश्चात्य लोक देखील त्यांना अतिशय मान देतात. या स्मृतिकालाच्या वेळीं संस्कृत भाषा शिष्ट लोकांच्या तोंडीं जिवंत असून या वेळेस तयार झालेलें वाङ्मय आप्त वाङ्मय समजलें जातें.

संस्कृत वाङ्मयेतिहासाचा यापुढील व शेवटचा भाग म्हणजे इ. स. ६०० ते १४०० पर्यंतचा होय. या भागास आपण ‘भाष्यकाल’ असं नांव देऊं. कारण या कालांत नवीन स्वतंत्र असे ग्रंथ निर्माण न होतां जुन्या ग्रंथांवरच टीका व भाष्यें लिहिलीं गेलीं. इ. स. १२००–१३०० च्या सुमारास हिंदी राज्यें नष्ट होऊन मुसलमानी अमल स्थापन झाला व देशांतील शिष्ट लोक सुद्धां संस्कृत बोलेनासे झाले. त्यामुळें यानंतर संस्कृत वाङ्मय म्हणण्यासारखें उत्पन्न झालें नाहीं. मुसलमानांपूर्वींच्या हिंदी राज्यांतील सनदा, हुकूम वगैरे संस्कृतांतच होत असत, मराठी, बंगाली वगैरे

प्राकृत भाषा इ. स. ८०० च्या सुमारास उत्पन्न होऊन इ. स. १२०० च्या सुमारास जोमांत आल्या. निरनिराळ्या प्राकृत भाषांतून आप्त ग्रंथ होण्यास इ. स. १२०० नंतर सुरवात झाली. उदाहरणार्थ, मराठींतील पहिला उत्तम ग्रंथ जो ज्ञानेश्वरी, तो इ. स. १३०० च्या सुमारास लिहिला गेला. यानंतर संस्कृत वाङ्मय तयार होणें बंदच झालें, असें म्हटलें तरी चालेल. सायणाचार्यांचें वेदभाष्य स्वतंत्र हिंदी राज्यांत इ. स. १४०० च्या सुमारास तयार झालें आहे. याज्ञवल्क्यस्मृतीवरील उत्तरचालुक्य राजांचा दिवाण विज्ञानेश्वर याची टीका मिताक्षरा इ. स. ११०० च्या सुमाराची आहे.

महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी व पैशाची या प्राकृत भाषा अगदीं संस्कृतलगतच्या आहेत. ज्यांना संस्कृत समजत असे अशांनाच त्या समजत. प्राकृत पालींत बौद्धधर्माचें प्रारंभींचें वाङ्मय आहे हें खरें. पण पुढें संस्कृत भाषेंत बौद्धधर्मांतील महायानपंथाचें वाङ्मय झालें तेंही फार मोठें व माननीय आहे. नागार्जुन हा महायानपंथाचा संस्थापक असून इ. स. १५० च्या सुमारास कनिष्क राजाच्या कारकीर्दींत हा पंथ स्थापन झाला. तिबेट व चीन या देशांतील लोक याच पंथाचे आहेत. त्यांनीं बौद्ध संस्कृत ग्रंथांचीं आपल्या भाषांतून भाषांतरें केलीं. चिनी प्रवासी हुएनत्सांग यानें हिंदुस्थानांतून पुष्कळ संस्कृत ग्रंथ स्वदेशांत नेऊन तेथें त्यांचीं भाषांतरें करविलीं. ब्रह्मदेश, सीलोन वगैरेकडे हीनयानपंथाचा बौद्धधर्म आहे. त्यांतील संस्कृत वाङ्मय थोडें आहे. आप्त बौद्धवाङ्मय मुख्यतः स्मृति काळांतील आहे.

जैन धर्माचें देखील पुष्कळ वाङ्मय संस्कृतांत आहे. जैनांचे धार्मिक ग्रंथ मूळ मागधी भाषेंत आहेत. ' ॐ नमःसिद्धं ' हा मंत्र

मूळ जैनांचा असून त्यांनीं त्याचें मागधी भाषेंत 'ओनामासिधं' असें रूपांतर केलें आणि हेंच सर्व लोकांच्या तोंडीं हल्लीं आहे. पण जैनांचें अलीकडील वाङ्मय संस्कृत भाषेंतच पुष्कळ झालें. जैन पंडितांचे अलीकडील वादविवाद हिंदु पंडितांशीं चांगले झाल्यानें त्यांचें वाङ्मय संस्कृत भाषेंतच आहे. कारण स्याद्वादादि विवाद जोरदार संस्कृत भाषेंतच चांगले होऊं शकतात. जैन पंडित अलीकडे फार विद्वान् झाले. जैन पंडित हेमचंद्र यानें पाणिनीप्रमाणें संस्कृताचें व्याकरणही तयार केलें व कोशही केला. हें जैन वाङ्मय मुख्यतः भाष्यकालांतील आहे.

संस्कृतभाषेंत भौतिकशास्त्र नाहीं असा कित्येकांचा आक्षेप आहे. या आक्षेपाचा फोलपणा अलीकडे निदर्शनास येऊं लागला आहे. तत्व-ज्ञानांचा विचार प्रारंभीं हिंदुस्थानांतच सुरू झाला हें मात्र सर्व लोक कबूल करतात. गणितशास्त्रदेखील प्राचीनकाळीं हिंदुस्थानांतच उत्पन्न झालें. अंकगणित तर हिंदुस्थानांत फार प्राचीन काळापासून होतें असें 'राशिं जानामि' या नारदांच्या छांदोग्योपनिषदांतील वाक्या-वरून सिद्ध होतें. राशि याचा अर्थ अंकगणित होय. बीजगणितांत ग्रीक लोकांपेक्षां हिंदी लोकांची प्रगति अधिक होती आणि भूमि-तिशास्त्रांतही जगाच्या मागें हिंदी लोक नव्हते. वैद्यशास्त्र देखील मूळ हिंदुस्थानांतीलच असून चरकग्रंथ इ. स. १५० च्या सुमाराचा आहे, म्हणजे कनिष्काच्या वेळचा आहे असें म्हणतात. अरबी लोकांनीं त्याचें भाषांतर केलें व त्यानंतर तें शास्त्र इटली देशांत गेलें. यासंबंधाचें जास्त सविस्तर विवेचन पुढें येणारच आहे. त्याच-प्रमाणें ज्योतिःशास्त्रावरील ग्रंथही अनेक झाले असून ते सन्मान्य आहेत व त्यांचीं भाषांतरें अरबींत होऊन तें ज्ञान पश्चिमेकडे गेलें आहे. हे सर्व शास्त्रीय ग्रंथ स्मृतिकालांतले म्हणजे इ. स. पू. ५०० ते इ. स.

८०० पर्यंतचे आहेत व यांच्यावरचे टीकात्मक ग्रंथ भाष्यकालांतले होत. अशा रीतीनें संस्कृत वाङ्मयाच्या कालाचे तीन मोठे विभाग पडतात. (१) श्रुतिकाल (२) स्मृतिकाळ व (३) भाष्यकाल. पहिल्या काळांत संस्कृत भाषा बहुजनसमाजांत बोलली जात होती, दुसऱ्यांत केवळ पंडितच ती बोलत असत व तिसऱ्यांत ती पंडितही थोडीच बोलत. आतां आपण प्रत्येक कालांतील मुख्य वाङ्मयाचा सविस्तर विचार करूं.

---

# (१) श्रुतिकाल.

## ऋग्वेद.

ऋग्वेद हा संस्कृत वाङमयांतील पहिला ग्रंथ, अर्थात् त्याचा शिरोभाग असून आर्यधर्माचें तें उगमस्थान आहे. इतिहासदृष्ट्याहि तो ग्रंथ सर्वांत जुना असल्यानें त्यास अतिशय महत्त्व आहे. ऋग्वेद-रचनेचा प्रारंभकाल इ. स. पू. ५००० च्या सुमाराचा आहे. ऋषींनीं देवांच्या स्तुतिपर जीं पद्यें केलीं तीं सूक्तें होत. ज्या कालानुक्रमानें तीं तयार झालीं, त्या अनुक्रमानें तीं ऋग्वेदांत नाहींत. ऋग्वेदाची व्यवस्था महर्षि व्यास यांनीं केली. (वेदान्विव्यास यस्मात्सः। आदि-महाभारत). पाश्चात्य विद्वानाच्या मतें ऋग्वेदाचा रचनाकाळ इ. स पू. २००० ते १००० आहे, तर लो. टिळकांच्या मतें तो इ. स. पू. ५०००—३००० आहे. ऋग्वेदाच्या भाषेवरून, त्यांतील इतिहासावरून आणि त्यांतील कल्पनांवरून निरनिराळ्या सूक्तांच्या रचनेंत इतका काल गेला असावा असें दिसतें. जुने कवि आणि नवे कवि असे शब्द ऋग्वेदांतही येतात. त्यांतल्या त्यांत नव्या व जुन्या कल्पनांचें मिश्रण आपणांस आढळतें.

बहुतेक सर्व ऋग्वेदाचीं सूक्तें आर्यलोक पंजाबांत आल्यानंतर तयार झालीं असावीं असें दिसतें. तरी देखील कांहीं सूक्तें ते सिंधुनदीच्या पलीकडे असतांना रचलीं गेलीं असावींत. 'ऋक्' याचा अर्थ 'ईश्वराची स्तुति' ती करणारे ते 'ऋषि'. ऋग्वेदांतील सूक्तांचे कर्ते ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य या तीनही वर्णांचे आहेत. हे ऋषि परमेश्वराच्या किंवा देवतांच्या ध्यानांत निमग्न असतांना त्यांना स्फूर्ति होऊन त्यांच्या तोंडून त्यांच्या स्तुतिमय मंत्र निघाले, तींच सूक्तें. अशा स्थितींत असल्यामुळेंच ऋषींना उत्तम पद्यरचना सुचली. कांहीं सूत्रांत 'मन्त्रकृतो वृणीते' असा प्रयोग आढळतो, यावरून पहिल्यानें ऋषि हे मंत्रकर्ते अशी कल्पना होती असें दिसतें. पण पुढें त्यांना मंत्रद्रष्टे अशी संज्ञा मिळून वेद अपौरुषेय असें ठरलें, आणि तें वरील अर्थानें खरेंहि आहे. हे ऋषि म्हणजेच आपले पूर्वज होत. आपण दररोज आपल्या गोत्रांतील अशा मंत्रद्रष्ट्या ऋषींचा प्रवररूपानें उच्चार करीत असतों. हे प्रवर ऋषी म्हणजे एक-मेकांचे पुत्रपौत्रादि वंशज असतात. पाश्चात्यांच्या मतानें बायबलाच्या अनुरोधानें सृष्ट्युत्पत्ति इ. स. पू. ६००० वर्षांच्या सुमारास झाली. भूगर्भशास्त्र (Geology) वरून ती लाखों वर्षांपूर्वी झाली असें ठरतें. वेद म्हणजे हिंदुस्थानांतील अति प्राचीन बुद्धिमत्तेचे निदर्शक मनोरे होत. जगांतील सात महदाश्चर्यांपैकीं इजिप्त देशांतील मनोरे (Pyramids) हें एक आश्चर्य (wonder) आहे. त्याचप्रमाणें हिंदुस्थानचे बौद्धिक मनोरे (Intellectual Pyramids) म्हणजे आमचे वेदग्रंथ होत. इजिप्तचे मनोरे ज्याप्रमाणें आज इतक्या वर्षां-नंतर जसेच्या तसेच कायम आहेत, त्याचप्रमाणें आमच्या ब्राह्म-णांनीं वेद आज तागायत कायम ठेविले आहेत. त्यांत पाठभेद बिलकुल नाहींत. इतकेंच नव्हे, तर उदात्त, अनुदात्त स्वरित अशा

तऱ्हेचे स्वर ( ठसके ) वेदकालीं उच्चारांत होते, तसेच ते आजही कायम राहिले आहेत. याबद्दल ब्राह्मणवर्गाचें आपण अभिनंदनच केलें पाहिजे. ब्राह्मणांस वेदांबद्दल अतिशय आदर असल्यामुळेंच वेद कायम राहिले आहेत, पाश्चात्य लोकहि हें पाहून आश्चर्यानें थक्क होतात. पाणिनीनें या स्वरांबद्दलचे नियम सांगितले आहेत. अशा तऱ्हेचे ठसके प्राचीन ग्रीक भाषेंतही होते. इंग्रजी भाषेंतील accents हें त्यांचेच स्वरूप आहे. हल्लींच्या संस्कृत भाषेंत मात्र हे स्वर राहिले नाहींत. ते वेदकालांत नष्ट झाले.

भारतीय युद्धाचा काल माझ्या मतें इ. स पू. ३१०१ हा होय. ऋग्वेदसूक्तांची हल्लींची मांडणी करणाऱ्या महर्षि व्यासांचाही काल हाच होय. त्यांच्या पूर्वीं निरनिराळ्या ऋषींनीं निरनिराळीं सूक्तें केलीं होतीं. पण तीं निरनिराळ्या कुळांत पसरलेलीं होतीं. व्यासांनीं त्यांची व्यवस्थित मांडणी केली. ऋग्वेदांत त्यांतल्यात्यांत जुन्या व नव्या ऋषींचा उल्लेख आहे यावरून व्यासांच्या पूर्वीं कित्येक वर्षें ऋग्वेदरचना होत असावी असें दिसतें. 'अग्निमीळे पुरोहितम्' हें जरी अगदीं पहिलें सूक्त असलें तरी तें अगदीं नवीन आहे असें त्याच्या भाषेवरून दिसतें, पण हीहि भाषा पुढें दुर्बोध झाली. पाणिनीच्या वेळीं ऋग्वेदाचा काय अर्थ आहे याचा नक्की उलगडा होत नव्हता. ऋग्वेदाचा अर्थ समजण्याकरिता पदें, क्रम वगैरेची व्यवस्था झाली, आणि तीं पदें जशींच्या तशींच न फिरवितां कायम रहावीं म्हणून जटा, घन वगैरे म्हणण्याची पद्धत सुरू झाली.

यज्ञयागास सुद्धां ईशस्तुतीचें अधिक महत्व असल्यानें पहिल्यानें ऋग्वेद उत्पन्न झाला. ऋग्वेद हा सर्व स्तुतिपर असून पद्यमयच आहे. यानंतर यज्ञक्रिया अति महत्त्वाची पण भानगडीची झाल्यामुळें

यजुर्वेदाची उत्पत्ति झाली असावी. यज्ञक्रियेचा विषय आंत ग्रंथित झाल्यामुळेंच अयुर्वेदांत बरेंच गद्य आहे. ऋग्वेदाच्या पद्यमय सूक्तांत स्वरसौष्ठव साधल्यामुळें साहजिक लोकांची तीं गाण्याकडे प्रवृत्ति झाली, आणि ईशस्तुति गानरूपानें होणें साहजिक असल्यानें सामवेदाची उत्पत्ति झाली. व्यासांनी तीनही वेद सुव्यवस्थित मांडले, ऋग्वेदाच्या १० व्या मंडलांतील पुरुषसूक्तांत तीनही वेदांचा उल्लेख आहे. यावरून पुरुषसूक्त बऱ्याच उशिरानें उत्पन्न झालें असावें. या म्हणण्यास हा एक आधार आहे, त्याचप्रमाणे ऋग्वेद व्यवस्थेपूर्वीच म्हणजे व्यासाच्यापूर्वीं यजु व साम या दोहोंची उत्पत्ति झाली असली पाहिजे. आर्यलोकांत प्रथमतः वर्णभेद मुळींच नव्हता असें नाहीं, पण पंजाबांत ते आल्यावर तो जास्त व्यक्त स्वरुपांत आला. पूर्वी पाश्चात्य लोकांप्रभाणें थोडीशी वर्गवारी होती. पण पुढें अनार्यांचा शूद्रवर्ण सामिल झाल्यानें चातुर्वर्ण्य उत्पन्न झालें. पुरुषसूक्तांत या चातुर्वर्ण्याचा उल्लेख आहे. तथापि हेंहि सूक्त व्यासांच्या पूर्वीचें आहे, अर्थात् ही व्यवस्था निदान इ० स० पू. ३००० वर्षांइतकी जुनी आहे.

पाश्चात्य लोकांच्या मतें दर २०० वर्षांनीं भाषेंत फेरबदल होतात- त्याबरोबरच व्याकरण शास्त्राचेंहि नियम बदलत असतात. ऋग्वेदांत अशी निरनिराळीं भाषेचीं स्वरूपें आढळतात यावरून ऋग्वेदाचा रचनाकाल १००० वर्षांचा साधारणपणें पाश्चात्यांनीं ठरविला आहे, 'देवाः' याबद्दल 'देवासः' 'देवैः' याबद्दल 'देवेभिः' अशीं रूपें आपणास वैदिक वाङ्मयांतच आढळतात. पाश्चात्य लोकांच्या मतें वैदिक भाषा व पाणिनीच्या वेळची संस्कृत भाषा यांत भाषेच्या दृष्टीनें १००० वर्षांनीं ( २०० वर्षांनीं भाषा बदलते या नियमानें ) जितका फरक पडावा त्यापेक्षां जास्त

फरक नाहीं; यामुळें वेदकाल व पाणिनि यांत फक्त १००० वर्षांचेंच अंतर ते धरतात. परंतु २०० वर्षांनीं भाषेंत बदल होतो या नियमालाही अनेक अपवाद आहेत. पाणिनीच्या वेळीं संस्कृत भाषेचें उत्तम व्याकरण व कोश निर्माण झाल्यामुळें व भाषेला एक प्रकारचा स्थिरपणा प्राप्त झाल्यानें पाणिनीनंतरच्या भाषेंत वरील इतक्या जलदीनें बदल झाला नाहीं हें आपण पाहतों. तेव्हां पाणिनीच्या पूर्वींही व्याकरण व कोश उत्पन्न झाल्या-मुळें भाषा बदल होण्यास जास्त काळ लागणें साहजिकच आहे. ही गोष्ट लक्ष्यांत घेतली असतां वेदकाल व पाणिनि यांत कमींत कमी २००० वर्षांचें तरी अंतर मानण्यास हरकत नाहीं, पाश्चात्य पंडित पाणिनीला इ. स. पू. ३०० चा मानतात; आणि वेद-रचनेचा शेवटचा काल इ. स. पू० १००० मानतात, पण पाणिनि बुध्दपूर्व असून इ० स० पू० ८०० च्या सुमारास मानला पाहिजे हें पुढें येणारच आहे आणि वेदरचनेचा शेवटचा काल इ० स० पू० ३८०० मानण्यात चूक नाहीं असें वाटतें.

वर सांगितलेंच आहे कीं, प्रथम तीन वेद होते. या तीन वेदांपैकीं श्रेष्ठ कोणता असा वाद केव्हां केव्हां ऐकूं येतो. वास्तविक ऋग्वेद व यजुर्वेद या दोहोंचे कर्ते ऋषी निराळे नाहींत; ऋग्वेदांत पद्यमय ईशस्तुति व यजुर्वेदांत यज्ञक्रियेसंबंधी गद्यमय मंत्र एवढाच दोहोंत मुख्य फरक आहे. साम वेदांतील बहुतेक मंत्र ऋग्वेदांतूनच घेतलेले आहेत, स्वतंत्र असें मंत्र त्यांत अगदींच थोडे आहेत. तेव्हां अमुक वेद मोठा हें म्हणण्यांत अर्थ नाहीं. श्रीमद्भगवद्गी-तेच्या मतानें साम वेदच श्रेष्ठ आहे; ( वेदानां सामवेदोऽसि ) यांत ऋग्वेद मोठा कीं यजुर्वेद मोठा हें भांडणच तुटलें. तेव्हां ऋषि हे मंत्रद्रष्टे कीं मंत्रकर्ते या प्रश्नाप्रमाणेंच हाहि वाद निरर्थकच

आहे. तथापि जेथें जेथें वेदाचा नामानिर्देश होतो तेथें तेथें ऋग्वेदाचे नांव प्रथम येतें, यावरून ऋग्वेद हा प्राचीनतम आहे हें अधिकस्पष्ट होतें. येथें ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, वेद हा शब्द प्रारंभा पासून प्राचीन नाहीं. व्यासांनीं हा शब्द बनविला असावा. वेद हा शब्द उपनिषदें व ब्राह्मण यांतून आला आहे.

ऋच् धातूचा अर्थ पूजा करणें, स्तुति करणें असा आहे. यावरून ऋचा या शब्दाचा अर्थ स्तुतिपर ( एकच ) कविता असा होतो. अशा १०।२० ऋचांचें एक पद्य त्यास सूक्त असें नांव मिळालें. १०।२० सूक्तांचा एक अनुवाक, अनेक अनुवाकांच एक मण्डल, अशीं १० मण्डलें ऋग्वेदांत आहेत. ही ऋग्वेदाची मूळची मांडणी व्यासकृत आहे असें दिसतें. वेदपठण करणाऱ्या ब्राह्मणांनीं आपल्या सोयीकरितां ऋग्वेदाचे निराळे विभाग पाडले आहेत, अष्टक, अध्याय, वर्ग असे त्यांनीं अनुक्रमानें विभाग केले आहेत, हे विभाग व्यासप्रणीत नसावे. आठ वर्षांत सर्व ऋग्वेद साधारणतः पाठ होतो, व दररोज एक वर्गाची संथा देतां येते या दृष्टीनें हे भाग केलेले आहेत, १ लें व १० वें मण्डल यांत निरनिराळ्या ऋषींचीं सूक्तें ग्रथित केलीं आहेत, व ९ व्या मंडलांत पवमान-सूक्तें आहेत, म्हणजे सोमरस काढतांना निरनिराळ्या ऋषींनीं जीं सूक्तें म्हटलीं, त्या सर्वांचें एके ठिकाणीं संकलन केलेलें आहे. आणि २।३।४।५।६।७।८ या मंडलांतून अनुक्रमें गृत्समद, विश्वामित्र, गौतम, अत्रि, बार्हस्पत्यभारद्वाज, वशिष्ठ व कण्व या ऋषींचीं अगर त्यांच्या वंशजांचीं सूक्तें मुख्यतः ग्रथित केलीं आहेत. ऋग्वेदांतील देवता, सूक्तें, ऋचा, छंद, ऋषि वगैरेबद्दल निरनिराळ्या आचार्यांनीं ग्रंथ लिहिले आहेत. आणि कात्यायनानें ( इ. स. पू. २०० ) सर्वानुक्रमणिका केली त्यावरून आपणांस कोणत्या ऋषींचीं

कोणतीं सूक्तें आहेत हें समजतें. ऋचांची संख्या, ऋषि, देवता, छंद, विनियोग या सर्वांचा सूक्त म्हणण्यापूर्वी उच्चार केला तरच तो मंत्र फलदायी होतो अशी आपली श्रद्धा आहे. व्यासाच्या वेळीं लेखन-कला नसावी यामुळें त्यावेळीं वेद लिहून ठेविले नसावेत; पण या-मुळें पुढें वेद लिहूनच ठेवूं नयेत अशी समजूत झाली. वेदांत पाठ-भेद नाहीं तरी कालौघानें प्रवचनभेद निर्माण झाला व त्यामुळेंच शाखाभेदाची उत्पत्ति झाली. ऋग्वेदाच्या शाखा थोड्या म्हणजे २१ आहेत. चरणव्यूह हा ग्रंथ या शाखा वगैरे सांगण्या-साठीं निर्माण झाला, ऋग्वेदाच्या शाकल, बाष्कल, मांडूकेय, आश्वलायन व शांखायन अशा पांच प्रमुख शाखा होत्या, हल्लीं शाकलशाखाच तेवढी अवशिष्ट असून बाकीच्या लुप्त झाल्या आहेत, शाखा उत्पन्न झाल्यानंतर कर्माचा भेद उत्पन्न झाला व तो सांग-ण्याकरितां सूत्रांची उत्पत्ति झाली, प्रत्येक शाखेचें वेगवेगळें सूत्र झालें, पण शाकलशाखेचें सूत्र हल्लीं नसल्यानें त्या शाखेचे लोक आश्वलायनसूत्र घेतात.

ऋग्वेदांत एकंदर १०२५ सूक्तें असून पहिल्या व १०व्या मंड-ळांत सारखींच म्हणजे १९१ सूक्तें आहेत. एकंदर ऋचांची संख्या १०५८० एक चतुर्थांश इतकी आहे, ‘ऋचां दशस-हस्राणि ऋचां पञ्चशतानि च । ऋचामशीतिः पादश्चैतत्पारायण-मुच्यते ॥ चरण व्यूह ). ऋचांतील एका शब्दाबद्दल दुसरा त्याच अर्थाचा शब्द घातला तरी तो चालत नाहीं, इतकी शब्दाची पवित्रता मानली आहे. ऋग्वेदांत इतके छंद आहेत, त्या प्रत्ये-काच्या इतक्या ऋचा आहेत वगैरे गोष्टींची मोजणी झाल्यामुळें इतकेंच नव्हे, तर ऋग्वेदांतील एकंदर अक्षरांचें देखील मोजमाप झाल्यामुळें ( अक्षर संख्या ४३२००० आहे ) त्यांत आजपर्यंत

कोणताही फेरफार झाला नाहीं अगर पदरचे शब्द कोणास घुसडून देतां आले नाहींत, हें उघड आहे.

आर्यधर्म, पारशी धर्म, बौद्धधर्म, जैनधर्म, ज्यू धर्म, ख्रिस्ती धर्म व महंमदी धर्म असे जगांत ६।७ मुख्य धर्म असून, यांपैकीं प्राचीनतम आर्यधर्म होय. याचा मुख्य धर्मग्रंथ म्हणजे ऋग्वेद. दुसरा पारशीधर्म, यांचा धर्मसंस्थापक झरतुष्ट्र हा असून यांच्या धर्मग्रंथाचें नांव झेंद अवेस्ता असें आहे. ऋग्वेदांत ज्यांचा ' असुर म्हणून उल्लेख आहे, ते पारशीलोक असावेत. आपण ज्यांना 'देव ' म्हणतों, त्यांना ते 'अहु (सु) र' म्हणतात व राक्षसांना ते देव म्हणतात. आपल्या ऋग्वेदांतील कांहीं ऋचा व झेंद अवस्त्यामधील पुष्कळ ऋचा यांचे फार साम्य आहे. यावरून त्या ऋचा आर्यलोक उत्तर-ध्रुव प्रदेशांत असतांना तयार झाल्या असाव्या व नंतर आर्यांची फाटाफूट होऊन कांहीं इराणांत व कांहीं हिंदुस्थानांत आले असावे असें अनुमान निघतें. ग्रीक इतिहासकारांच्या लेखांप्रमाणें झरतुष्ट्र हा (इ. स पू. २०००–२५००) व्यासांच्या पाठीमागून कित्येक शतकानीं झाला.* व्यासांनीं ऋग्वेदाची जशी रचना केली, तशीच झरतुष्ट्रानें झेंद अवेस्त्याची रचना केली. (झेंद हा शब्द संस्कृतात छंद असा आहे) तिसरा बौद्ध धर्म, यांचा धर्मग्रंथ त्रिपीटक बुद्धानें उपदेशिलेली तत्त्वें त्यांच्या शिष्यांनीं तीन ग्रंथांत (तीन पेटींत) लिहून ठेविलीं आहेत. चौथा ख्रिस्तीधर्म याचा धर्मग्रंथ बायबल ख्रिस्तानें केलेला उपदेश यांत त्याच्या निरनिराळ्या शिष्यांनीं लिहून ठेविला आहे. आपल्याकडे ज्याप्रमाणें ऋषि हे मंत्रद्रष्टे कीं

* जरतुष्टाला हल्लींचे पाश्चात्य इतिहासकार याहून बराच अलीकडचा मानतात, अर्थात ते वेदानाहि अलीकडचे मानतात.

मंत्रकर्ते असा वाद होता, त्याचप्रमाणें बायबला संबंधीं दिसतो. मॅथ्यू, जॉन वगैरे निरनिराळ्या गॉस्पेलांचे कर्ते आहेत. बायबल मूळ हिब्रू भाषेंत लिहिलेलें असून पद्यमय आहे. ऋग्वेदांतील सूक्तें व ऋचा यांप्रमाणें त्यांतही चाप्टर आणि व्हर्स अशी रचना आहे, एकाद्या विधानास आधार द्यावयाचा असल्यास give chapter and verse असा शब्दप्रयोग इंग्रजीत करतात. पाचवा महंमदी धर्म, त्याचा धर्मग्रंथ कुराण यांत मात्र निरनिराळ्या ऋषींचीं वचनें एकत्र केलेली नाहींत. महंमदाला ईश्वरी प्रेरणा होऊन त्याला जे मंत्र मिळाले ते त्यानें कुराणांत लिहून ठेवले अशी मुसलमानांचीही समजूत आहे. या मंत्रांना 'आयत' असें नांव आहे. तात्पर्य, ईश्वरप्रणीत शक्ति प्रत्येक धर्मांत त्या त्या धर्मग्रंथकर्त्याला मानली जाते, हें योग्यच आहे.

## —ऋषि—

'यस्य वाक्यं स ऋषिः।' या वचनाप्रमाणें ज्यानें वेदांतील ऋचा केल्या आहेत तो ऋषि असें ठरलें आहे. ऋग्वेद व झेंद अवेस्ता या दोन धर्मग्रंथांवरून आर्यांचें मूलस्थान उत्तर ध्रुवाजवळ होतें, हें लो. टिळकांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. १०००० वर्षांपूर्वी सतत हिमवृष्टि झाल्यामुळें (icyperiod) आर्यांची पांगापांग झाली. त्यांत कांहीं कुळें हिंदुस्थानांत आलीं. तीं कुळें त्यांतील मुख्य ऋषींच्या नांवावरून ओळखिलीं जात असत. कश्यप, अत्रि, वसिष्ठ, भरद्वाज, विश्वामित्र, गौतम व जमदग्नि हे मूळ सप्तर्षि आपल्या कुळांसह हिंदुस्थानांतील होत. हे सात व आठवा अगस्त्य असें ८ गोत्रप्रवर्तक ऋषि होत. सूक्तकर्ते ऋषि म्हणजे केवळ ब्राह्मणच नव्हते. क्षत्रिय व वैश्यांनीं देखील कांहीं सूक्तें केलीं आहेत, व

त्यांनाही ऋषिच म्हणतात. यामुळें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिघांनाही वेदाचा अधिकार आहे.

नित्यपरिपाठांत येणारा जो गायत्रीमंत्र, तो विश्वामित्र या क्षत्रिय ऋषीनें केला आहे, वत्सप्रिभालंदन हा वैश्य असून त्याचीं हीं सूक्तें आहेत. भृगु; अंगिरस, वसिष्ठ व कश्यप हे सप्तर्षीच्याहि पूर्वीचे प्रसिद्ध चार ऋषी होते. असें महाभारतांत म्हटलें आहे. हीं मुख्य कुळें असली पाहिजेत. ज्यांचे पूर्वज नक्की माहीत नाहींत, त्यांची उत्पत्ति कश्यपा पासून लाविण्यांत येत असते. एकाद्या ऋषीच्या ह्मणजे मंत्रकर्त्याच्या पिढींतलि प्रसिद्ध पुरुषापासून गोत्र मानले जातें. ( विश्वामित्रऋषीच्या संततींपैकीं कताच्या गोत्रांतील तो कात्यायन.) वर जे ४ ऋषि सांगितले, तेच प्रथम हिंदुस्थानांत आले असावे, व त्यांची पुढें वर सांगितल्याप्रमाणें आठ कुळें झालीं असावीं. या प्राचीन ४ गोत्रप्रवर्तकांत भृगुऋषी हामुख्य असून त्याचें नांव गोत्रांच्या यादींत प्रथम सांगितलेलें असते ' महर्षाणाम् भृगुरहम् ' असें भगवंतानीं गीतेंत म्हटलें. तें यामुळेंच आहे याच्या खालोखाल अंगिरस ऋषी. याचे दोन वंश गौतम व भरद्वाज. भृगु व अंगिरस या दोघांचींही नांवें सप्तर्षींत नाहींत. जमदग्नि हा भृगूच्या वंशांतील होता. हिंदुस्थानांत प्रथम सूर्यवंश व नंतर चंद्रवंश आला. सूर्यवंशाचे ऋषि वसिष्ठ व चंद्रवंशाचे आत्रि होते. ऋग्वेदाच्या ८ व्या मंडलांत चन्द्रवंशांतील राजांचीं बरीच नांवें आहेत. ययातीच्या ५ पुत्रांचीं नांवें एका सूक्तांत आहेत. प्रवरपरंपरा ही शिष्यपरंपरा नसूनें वंशपरंपरा आहे. वंशांत दत्तक घेतल्यानें समावेश होऊं शकतो.

ऋग्वेदांत सूर्यवंशी क्षत्रियांना भारत अशी संज्ञा आहे व सूर्यवंशी भरत राजावरूनच हिंदुस्थानास भरतखंड असें नांव मिळालें. मनूच्या वंशांत भरत या नांवाचा जो चक्रवर्ति राजा झाला, त्याच्यावरून

भारत हें नांव पडलें आहे. ( तेनेदं भारतं स्मृतम् असें पुराण वचन आहे, ) दुष्यंतपुत्र भरताच्या नांवावरून नव्हे. वसिष्ठाच्या सूक्तांत भारताचा उल्लेख आहे. पाश्चात्य पंडितांनीं या दोघां भरतांचा घोटाळा केला आहे. दाशराज्ञ या नांवाचें वसिष्ठाचें सूक्त आहे. त्यांत दाशराज्ञ युद्धाचें वर्णन आहे. हें युद्ध ऐतिहासिक आहे. तें परुष्णी नदीच्या काठीं पंजाबांत झालें. गंगेपासून पश्चिमेकडे अनुक्रमें सर्व नद्यांचीं नांवें एका सूक्तांत सांगितलीं आहेत. ( इमं मे गंगे इ०). त्या प्राचीन भरत देशांत हें युद्ध सूर्यवंशी व चंद्रवंशी यांत झालें. युद्धांत भरतांचा म्हणजे सूर्यवंशीयांचा पराभव होणार होता, पण वसिष्ठानें इंद्राची स्तुति केल्यामुळें तो टळला, असें त्यांत वर्णन आहे. कांहीं सूक्तें निरनिराळ्या ऋषींच्या ऋचा मिळून बनविलेलीं आहेत. ९ व्या मंडळांतील एका सूक्तांत सप्तर्षींचीं नांवें एका ठिकाणीं आहेत, यावरून ते समकालीन असावे असें अनुमान निघतें. अंगिरस कुलाचें वर्णन झेंद अवस्त्यांतही आहे, यावरून सर्व आर्यलोक एके ठिकाणीं असतांना या कुलाची प्रसिध्दि होती असें दिसतें. पुरूरवस् व उर्वशी यांचा संवाद एका सूक्तांत आहे. कांहीं ठिकाणीं जेथें ऋषीचें नांव नक्की माहीत नाहीं, तेथें अशा रीतीनें त्यांत वर्णिलेल्या पुरुषाचें नांव सूक्तास क्वचित प्रसंगीं दिलेलें आहे असें म्हणावें लागतें. बाकी बहुधा सर्व ऋषींचीं म्हणजे सूक्तकर्त्यांचीं नांवें विश्वसनीय आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## —छंद—

' यदक्षरपरिमाणं तच्छन्दः ' असें छंदाचें लक्षण सांगितलें आहे. ऋग्वेदकालीं ऱ्हस्वदीर्घाचा नियम झाला नव्हता. हल्लीचे संस्कृत छंद वैदिक छंदांपासून झाले आहेत. पण संस्कृत पद्यरचनेंत गण, मात्रा

वगैरे जीं बंधनें आहेत, तीं वैदिक संस्कृतांत नाहींत. ' मय रस तज भन लग संमितम् ' हें छन्दःशास्त्राचें पहिलें सूत्र वैदिक सूक्तांस लागू नाहीं. ऋग्वेदांत पुढीलप्रमाणें छंद आहेत:—

( १ ) गायत्री, ( २ ) उष्णिक्, ( ३ ) अनुष्टुप् ( ४ )बृहती, ( ५ ) पंक्ति, (६)त्रिष्टुप्, (७ ) जगती, ( ८ ) अतिजगती, ( ९ ) शक्करी, ( १० ) अतिशक्करी, ( ११ ) अष्टी, ( १२ ) अत्यष्टि, ( १३ ) धृति व ( १४ ) अतिधृति.

पहिल्यांत म्हणजे गायत्री छंदांत २४ अक्षरें आहेत व पुढील छंदांतून अनुक्रमें ४।४ अक्षरें वाढत गेलीं आहेत. अक्षरांचें प्रमाण जरी वर लिहिल्याप्रमाणें आहे, तरी एकादे वेळीं एकादें अक्षर कम-जास्त होतें. गायत्री छंदांत ३ पाद आहेत. कमींत कमी ३ पायांवर वाटेल ती वस्तू उभी राहूं शकते, यावरूनच ही कल्पना सुचली असावी. वरीलपैकीं पहिले ७ छंद महत्वाचे आहेत. कात्यायनीं सर्वानुक्रमणीकेप्रमाणें ऋग्वेदाची मोजदाद छंदासंबंधानें पुढीलप्रमाणें आहे:——*

---

* शाकल्यदृष्टे पदलक्षमेकं सार्धंच वेदे त्रिसहस्रयुक्तम् ।
शतानि चाष्टौ दशकद्वयंच पदानि षट् चेति हि चर्चितानि ॥

म्हणजे १५३८२६ पदें चर्चित आहेत. आणि ' एकं शतसहस्रं सप्तशतानि चर्चापदानि चान्यानि चत्वारि ' म्हणजे ११०७०४ चर्चापदें दुसरीं असें येथें सांगितलें आहे. यांची बेरीज घ्यावयाची की, काय तें समजत नाहीं. याबद्दल शंका म्हणून हा विषय टीपेंत उल्लेखित केला आहे.

| ऋचा | छंद | ऋचा | छंद |
|---|---|---|---|
| २४५१ | गायत्री (अक्षरें २४) | १७ | अतिजगती (५२) |
| ३४१ | उष्णिक् ( „ २८) | १९ | शक्करी (५६) |
| ८५५ | अनुष्टुप् ( „ ३२) | ९ | अतिशक्करी (६०) |
| १८१ | बृहती ( „ ३६) | ६ | अष्टि (६४) |
| | | ८४ | अत्यष्टि (६८) |
| ३१२ | पंक्ति ( „ ४०) | ३ | धृति (७२) |
| ४२५३ | त्रिष्टुप् ( „ ४४) | १ | अतिधृति (७६) |
| १३४८ | जगती ( „ ४८) | १७ | द्विपदा (२२) |
| ६ | एकपदा | | |

शिवाय बार्हत प्रागाथ, काकुभ या मिश्रछंदांच्या अनुक्रमें १९४ व ५५ अशा ऋचा असून अन्य छंदांच्या २५१ ऋचा सांगितल्या आहेत व येथें एकंदर बेरीज १०४०२ होते. सर्वांत जास्त ऋचा त्रिष्टुप् छंदाच्या असून, त्याच्या खालोखाल गायत्रीच्या, त्याच्या खालोखाल जगतीच्या आहेत. अनुष्टुप् छंदाचा चौथा नंबर येतो. पुढील वाङ्मयांत ३२ अक्षरांचा अनुष्टुप् व ४४ अक्षरांचा त्रिष्टुप या छंदांस महत्त्व आलें.

पिङ्गलाचें छंदःशास्त्र वैदिक व लौकिक दोन्हीं वृत्तांसंबंधानें आहे. छंद हा वैदिक शब्द आहे. वृत्त या शब्दांत जो धातु आहे (वृत् to turn) तोच verse (verto, I turn) या इंग्रजी शब्दांत आहे. वाल्मीकीला आद्यकवि म्हणण्याचें कारण त्यानें एकदोन ऱ्हस्वदीर्घांचे नियम गृहीत धरून वृत्तास गोडपणा आणून वैदिक अनुष्टुप् लौकिक भाषेत आणिला हें होय.

त्रिष्टुप् या छंदास ४ पाद असून प्रत्येक पादांत ११ अक्षरें

असतात. एकंदर सूक्तांत जो छंद असेल, त्यापेक्षां निदान निराळा छंद शेवटच्या ऋचेंत घालण्याचा प्रघात ऋग्वेदांत दिसतो. आणि त्यावरून संकृत वाङ्मयांतही हा नियम आला आहे. रामायणापासून तों अलीकडील नैषधादि सर्व महाकाव्यांतील प्रत्येक सर्गाच्या शेवटीं छंद बदलतो. त्रिष्टुप् छंदापासून लौकिक संस्कृतांतील इन्द्रवज्रा व उपेन्द्रवज्रा हीं वृत्तें आलीं आहेत. शक्करी हा छंद सामवेदांत फार आला आहे. संस्कृतांतील प्रत्येक पादांत १४ अक्षरें असलेलें वसन्ततिलका हें वृत्त याच छंदापासून निर्माण झालें असावें. झेंदअवेस्ता या ग्रंथांतही त्रिष्टुप् छंद फार आल्यामुळें, तो पार्शियन लोकांस बराच पसंत असावा असें दिसतें. व्यास हा संस्कृत व वैदिक वाङ्मयांतील दुवा असल्यामुळें गण, मात्रा वगैरे बंधनें त्याच्याकडून पुष्कळ वेळां पाळली गेलीं नाहींत हें आपण भगवद्गीतेंतील व महाभारतांतील अनेक श्लोकांत पाहतों.

## —देवता—

'क्षित्यन्तरिक्षद्युस्थानाः अग्निर्वायुःसूर्यः' अशा तऱ्हेनें तीन स्थानांच्या तीन देवता मुख्य मानल्या आहेत. 'ॐकार' ही सर्वांमिळून एक देवता मानली आहे. सर्व देवतांचें एकीकरण करण्याची प्रवृत्ति प्राचीन भारती आर्यांत होती असें यावरून दिसतें. सूर्य हें परमात्म्याचें दृश्य तेजस्वी स्वरूप साहजिकच कल्पिलें आहे. पाश्चात्यांच्या मतें ऋग्वेदांतील देवता म्हणजे निसर्गाच्या विविध शक्ति होत. सर्व देव हीं एकाच परमात्म्याची स्वरूपें ही कल्पना ऋग्वेदकालींच, परंतु उत्तरकालीं झाली. इन्द्र या देवतेच्या स्तुतिपर ऋग्वेदांत सर्वांत अधिक सूक्तें आहेत, पृथ्वीवर (भूः) वसु, अन्तरिक्षांत (भुवः) रुद्र, व आकाशांत (स्वः) आदित्य या मुख्य देवता आहेत. आदित्यांत

सूर्याचा, रुद्रांत वायूचा, व वसूंत अग्नीचा अंतर्भाव होतो. ८ वसु, ११ रुद्र, १२, आदित्य, १ इंद्र व १ प्रजापति मिळून ३३ देवता बृहदारण्यांत सांगितल्या आहेत. एकंदर जगाचा चालक महानात्मा आहे. ऋग्वेदकालीं एकेकाच देवाची कल्पना ( monotheism ) होती. (एकं सद्विप्रा बहुधा आमनन्ति । इन्द्रं यमं मातरिश्वानमाहुः । ) आणि पुढें सर्व सृष्टि देवरूपी आहे ही समजूत ( Pantheism ) झाली. ( सर्वं खल्विदं ब्रह्म ). ऋग्वेदांत विशेषतः इन्द्र सूर्य, अग्नि, प्रजापति, पर्जन्य, विश्वेदेवाः, अश्विनीकुमार, उषस्, वरुण, यम, सोम या देवता मुख्य आहेत. निरनिराळ्या भूप्रदेशांतून पांगलेल्या आर्यांच्या देवता पुष्कळशा सारख्या आहेत. देव हा शब्द दिव् या धातूपासून निघाला असून बहुतेक सर्व भाषांतून जवळ जवळ सारखाच आहे. पारशी लोकांत देवास राक्षस समजतात. वरुण ही देवता सर्व आर्यलोकांत आहे. ऋत व सत्य ( law and order ) यांची अधिष्ठात्री देवता ही आहे, खोटें बोलूं नये म्हणून वरुणाची शपथ घालीत असत. इंद्र ही शक्ति अथवा सामर्थ्य याची देवता आहे. अति प्राचीन काळीं इंद्रदेवता नसावी. कारण इतर आर्य लोकांत ही देवता सांपडत नाहीं.

वेदांत इंद्राला निरातिशय महत्व दिलें आहे. पौराणिक ग्रंथांतून इंद्राचें हें वर्चस्व नाहींसें झालें. शक्ति व उपभोग यांची ही अधिष्ठात्री देवता असल्यानें तत्वज्ञानाच्या विचाराच्या वेळीं तिला फाटा मिळाला. इंद्राला स्वर्गलोकचा राजा बनवून ‘ विष्णोर्यत्परमं पदम् ’ ‘ अग्निर्वैदेवानामवमो विष्णुः परमः ’ अशा रीतीनें विष्णूला पुढें श्रेष्ठत्व मिळालें. हा श्रेष्ठकनिष्ठत्वाचा भाग उत्तर वैदिककालांत अस्तित्वांत आला. उपनिषत्कालांत शिव व विष्णु अशा मोक्षाच्या दोन देवता ठरल्या. शिव ही उग्र व विष्णु ही सौम्य

देवता ही कल्पना वेदामध्येंच आहे. ( रोदयतीति रुद्रः ) रुद्रांत शिव व आदित्यांत विष्णु अंतर्भूत होतो. इन्द्राग्नी, द्यावापृथिवी, मित्रावरुणौ, अग्नीषोमौ अशा देवतांच्या जोड्याही वेदांत स्तविल्या आहेत. रोमन लोकांतील Jupiter, ग्रीक लोकांतील Zeus आणि ऋग्वेदांतील द्यौष्पतिः या देवतांत बरेंच साम्य आहे. बायबलांत जुहोवा असें परमेश्वराचें नांव आहे तें ऋग्वेदांतील यव्ह म्हणून ईश्वरास संबोधिलें आहें, त्या शब्दावरून निघालें आहे, असें लोकमान्यांनीं दाखविलें आहे.

ऋग्वेदांतील उषस ही देवता विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. सूर्योदयापूर्वीं आकाशांत जो एक प्रकाशाचा पुंज दिसतो, त्यावर ‘ उषस् ’ या देवतेची कल्पना केली आहे. उषेच्या सूक्तांत कविकल्पना अगर पौराणिक कल्पना नसून हा ध्रुव प्रदेशांत प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसणारा देखावा आहे. या देखाव्याचें अत्युत्कृष्ट वर्णन ऋग्वेदांत केलेलें आपणांस आढळतें. अशा तऱ्हेचा देखावा अर्थातच आपल्याकडे उष्णकटिबंधांत दिसत नसून ध्रुव प्रदेशांत दिसतो, व यावरून आर्यांचें मूल वसतिस्थान उत्तर ध्रुव प्रदेशांत होतें. असें लो० टिळकांनीं आपल्या ग्रंथांत सिध्द केलें आहे. या उषावर्णनांतील लोकमान्यांनी दाखविलेल्या ठळक ठळक गोष्टी पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत.

( १ ) सूर्योदय प्रत्यक्ष होण्यापूर्वीं उषःप्रकाशाचे कित्येक दिवस जातात.

( २ ) उषा देवतांना नेहमीं अनेकवचनीं संबोधिलें आहे व त्यांची संख्या ३० वर्णिली आहे.

( ३ ) हे ३० भाग भिन्न नसून एकास एक लागलेले अविभाज्य असेच वर्णिले आहेत.

( ४ ) ते क्षितिजाभोंवतीं सारखें फिरत राहून २४ तासांच्या अंतीं एकाच ठिकाणीं येतात.

या उषावर्णनावरून आर्यांची मूळ वस्ती ध्रुव प्रदेशांत होती हा लोकमान्यांनीं काढलेला सिद्धान्त बहुतेक अबाधित असून तो सर्वसंमत झाला पाहिजे.

उत्तरध्रुवप्रदेशांत सूर्य, तारे वगैरे डोक्यावर येत नसून क्षितिजाभोंवतीं फिरतात यामुळें पृथ्वी आपल्या डोक्याभोंवतीं रुमाल गुंडाळीत आहे अशा तऱ्हेची कल्पना पाश्चात्यांची आहे. उषस् निघाल्यापासून सूर्य दिसेपर्यंत दरम्यानच्या वेळच्या ध्रुवाजवळील आर्यभूमींत ३० दिवस जात असावेत [ उषस्‌चा जितक्या वेळांत १ फेरा पूर्ण होतो, तितक्या वेळास तेथें दिवस अशी संज्ञा दिली जाई हें उघड आहे. ]

सूर्य या देवतेचीं मित्र, सूर्य, सवितृ व पूषन् अशीं चार स्वरूपें मानलीं आहेत. पर्शियन लोकांतही ' मिथ्र ' या नांवाची देवता आहे. विष्णु हेंही सूर्याचेंच एक स्वरूप मानलें आहे. सूर्याचीं किंवा विष्णूचीं जीं तीन पदें मानलीं आहेत, तीं अनुक्रमें उदयस्थान, मध्यान्हस्थान, व अस्तस्थान हीं होत, हिमप्रलयाचा काल साधारणपणें इ. स.पू. १०००० पर्यंत धरतात व ऋग्वेदाचा प्रारंभकाल इ. स. पू. ४००० हा धरतां येईल, त्यामुळें पंजाबांत येण्यास आर्यलोकांस सुमारें ६००० वर्षें लागलीं असें मानतां येईल.

अश्विनौदेवता याही ऋग्वेदांत प्रसिध्द आहेत. हे दोन तारे आहेत असें सांगितलें आहे, केव्हां सकाळीं व केव्हां सायंकाळीं दिसणाऱ्या शुक्राच्या ताऱ्यावर ही कल्पना केली असावी असें कित्येक पाश्चात्य विद्वान् म्हणतात पण तें चुकीचें आहे;कारण शुक्राचा तारा एकच आहे.

शिवाय आश्विनशस्त्र [ शस्त्र म्हणजे स्तुतिपर सूक्त ] म्हणण्यास पहाटेस सुरवात करून ते उषस् दिसेपर्यंत संपवावें असें सांगितलें आहे. शस्त्र पुरें झाल्यावर देखील जर उषस्चें दर्शन झालें नाहीं, तर सर्व ऋग्वेद म्हणावा असें यास्क मुनीनें मागाहून सांगितलें आहे. यामुळें या देवता सायंकाळीं दिसणें शक्य नाहीं. या देवता उत्तम वैद्य आहेत असें वर्णन असून त्यांनीं च्यवनाला म्हाताऱ्याचें तरुण केलें व एका कन्येचा पाय तुटला असतां त्यांनीं तिला लोखंडाचा पाय लावून दिला असें ऋग्वेदांत वर्णन आहे. आश्विनौ हे समुद्रांत संकटांत सांपडलेल्याचें रक्षण करतात असेंहि वर्णन असून, भृज्यु नांवाचा राजा पाश्चात्यांस जिंकण्याकरितां समुद्रांतून जात असतां संकटांत सापडला व त्यानें यांची स्तुति केल्यानंतर आपली नाव पाठवून यांनीं त्याचें संरक्षण केलें असें एका सूक्तांत सांगितलें आहे. यावरून ऋग्वेदकाळीं लोक समुद्रयानांत चांगलेंच प्रवीण होते असें सिद्ध होतें. अर्थात् हा समुद्र म्हणजे पंजाब सिंधला लागून असलेला अरबी समुद्र होय. इ. स. पू. ३१०० च्या वेळीं भारती आर्य या समुद्रावर जात होते असें दिसतें. प्राचीनकाळीं आर्यांची सुधारणा पुष्कळ उन्नत स्थितीची ऋग्वेदावरून दिसते. * इतर सामाजिक वगैरे बाबींची ऋग्वेदकालीन माहिती येथें देण्याची अवश्यकता नाहीं.

## —विनियोग—

ऋग्वेदांतील सूक्तांचे किंवा ऋचांचे विनियोग कोणत्या ठिकाणीं करावयाचे म्हणजे कोणत्या यज्ञांत किंवा वैदिक क्रियेंत कोणत्या वेळीं

---

* तुटलेल्या पायाच्या ठिकाणीं लोखंडी पाय लावण्याची कल्पना या गोष्टीची साक्ष देईल.

किंवा इतर प्रसंगीं करावयाचे यास विनियोग असें म्हणतात आणि याब द्दलचे निश्चय पाचीन काळापासून झाले आहेत. तो शौनकोक्त ऋग्विधान इत्यादि ग्रंथांत सांगितलेला असतो. सूक्तांच्या देवतांवरून किंवा ऋचांच्या अर्थावरून असा विनियोग साहजिकपणें निश्चित करतां येतो हें उघड आहे, परंतु कित्येकदां तसें होत नसून निरनिराळ्या प्रसंगीं ऋग्वेदाच्या ऋचांचा विनियोग करावा लागतो व तो करतात. त्याची लिंगें म्हणजे चिन्हें विशिष्ट असतात. तीं लिंगें क्वचित प्रसंगीं चमत्कारिक वाटतात एवढें येथें सांगितलें असतां पुरें आहे.

## —सामवेद—

अगदीं प्रथम ऋग्वेद, सामवेद व यजुर्वेद असे तीनच वेद होते. आणि ऋग्वेद हाच सर्वांत प्राचीन आहे. पण ऋग्वेदानंतर आधीं सामवेद झाला कीं यजुर्वेद ? गीतेंत व पुरुषसूक्तांत ( म्हणजे खुद्द ऋग्वेदांत ) ऋक्-साम-यजु अशीच अनुक्रमणिका आहे. ऋग्वेदाच्या काल इ. स. पू. ५००० ते ३००० असून त्यांत दोहोंचाही उल्लेख आहे. ऋग्वेदाचें स्तुति हें लक्षण असन सामवेदाचें गान हें लक्षण आहे. ईशस्तुति करतांना गायनाची इच्छा होणें स्वाभाविक आहे. गाणें हें भक्तीचें अंग प्राचीन कालापासून ठरलेलें आहे. ऋग्वेदाची ऋचा गाऊन देवाची स्तुति करण्याची जरूर भासली व त्यामुळें सामवेदाची उत्पत्ति ऋग्वेदाच्या लगतच झाली असावी असें वाटतें. यज्ञामध्यें तीन ऋत्विजांची जरूर मुख्यतः लागते ते होता, अध्वर्यु, व उद्गाता हे असून ते अनुक्रमें ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांचें कार्य करतात. अमरकोशांतही ऋक्-साम-यजु- असाच अनुक्रम आहे. उपनिषदांत मात्र ऋक् यजुः-साम असा पुष्कळवेळां अनुक्रम आला आहे. तिन्ही वेदांची बांधणी व्यासांनींच केली

आहे. ' वेदानां सामवेदोस्मि ' असें म्हणून गीतेंत भगवंतांनीं सामवेदास महत्व दिलें याचें कारण माझ्या मतें असें आहे कीं, श्रीकृष्ण हे फार गानप्रिय होते. ते व यादव यांनीं ' छालिक्यगान ' नांवाचें पुष्कळ लोकांनीं एकदम म्हणण्याचें गान नवीन शोधून काढलें. असें हरिवंशांत वर्णन आहे. याशिवाय श्रीकृष्ण सामवेदी होते असें छांदोग्यांत (प्र. ३ खं. ४७) घोर आङ्गिरस ऋषीनें 'कृष्णाय देवकीपुत्राय' एक उपदेश केला असें वर्णन आहे. सामवेदावरून एक गोष्ट आपणांस स्पष्ट दिसते ती ही कीं, वेदकालीं भारतीय आर्यलोक सुधारलेले होते. कारण सुधारलेल्या लोकांशिवाय गाणें शक्य नाहीं. सामाचें गान ३ स्वरांतच होतें, परंतु प्रत्येक साम किंवा ऋचा निरनिराळ्या ७ सुरांपैकीं एका स्वरांत म्हणजे प्रथमस्वर निरनिराळा धरून म्हणावी असें छापील पुस्तकावरून दिसतें. तीन स्वरांचे आंकडे १,२,३ असे नेहमीं पुस्तकांत दिलेले असतात.

छांदोग्योपनिषदांत सामगानाची फार तारीफ केली आहे. सामवेदांत ' ओम् ' चें फार महत्व आहे. ' ॐ ' या ध्वनीचा सूर स्थिर लावण्याचे कामीं प्रारंभीं उपयोग होत असावा. ॐ या अक्षरास पुढें परब्रह्मस्वरूप प्राप्त झालें. सामवेदांत ऋग्वेदांतील ज्या ऋचा घेतल्या आहेत त्या बहुतेक ८ व्या व ९ व्या मंडलांतील ( पवमानसोम) असून त्या मधून मधून उचलून घेतल्या आहेत. सामवेदांत एकंदर १५४९ ऋचा असून बहुतेक ऋग्वेदांतील आहेत, व स्वतंत्र अशा फक्त ७५ च आहेत. सामवेदाचे एकंदर १००० भेद मानले असून त्यांतील ७ मुख्य आहेत व हल्लीं दोनच उपलब्ध आहेत. या शाखांचीं नांवें राणायनीय व कौथुम अशीं असून, राणायनीय शाखेचे लोक महाराष्ट्रांत व कौथुम शाखेचे लोक गुजराथेंत आढळतात. दोन्ही शाखांच्या

पाठांत फारसा फरक नाहीं. राणायनीय शाखेवर सायणाचार्यांचें [इ स. १४०० ] भाष्य असून नैगेय या शाखेचा ऋषिदेवता-अनुक्रमणी वगैरेचा ग्रंथ उपलब्ध आहे. सामवेद संहितेचे २ भाग असून त्यांस आर्चिक [ ऋचां समूहः ) असें नांव आहे. पूर्वाचि-कांत सहा प्रपाठक आहेत आणि प्रत्येक प्रपाठकांत १० दशती ह्मणजे १० ऋचांचीं १० सूक्तें आहेत म्हणजे १०० ऋचा आहेत; पण कांहीं सूक्तांत कमीजास्ती ऋचा आहेत असें दिसतें. सहाव्या प्रपाठकांत असें नसून त्यांत सूक्तेंही १० पेक्षां अधिक आहेत आणि सुक्तांत ऋचाही १० पेक्षां जास्त छापील पुस्तकांत आहेत. उत्तरार्चिकाला हा दशतींचा नियम मुळींच लागू नाहीं. त्यांत ९ प्रपाठकें आहेत. अग्नि, सोम व इंद्र या देवतांच्या स्तुति मुख्यतः सामवेदांत आहेत. शतपथ ब्राम्हणाच्या वेळीं पाहिल्या आर्चिकाची रचना हल्लींच्या प्रमाणेंच होती असें त्यांतील उल्लेखावरून दिसतें. शतपथ ब्राह्मणाचा व व्यासांचा काल जवळजवळच ( इ. स. पू. ३००० ) असल्यानें सामवेदाची व्यवस्था व्यासांनींच केली या विधानास हा एक पुरावा आहे.

## —यजुर्वेद—

यजुर्वेदाचे दोन भेद आहेत. शुक्लयजुर्वेद व कृष्णयजुर्वेद अशीं त्यांचीं नांवें आहेत. त्यापैकीं कृष्णयजुर्वेद हा जुना आहे. त्याचीच तैत्तिरीयसंहिता मुख्य होय. शुक्लयजुर्वेद हा याज्ञवल्क्यप्रणीत असून त्याला वाजसनेयिसंहिता असें नांव आहे. महाभारतांतील शांति-पर्वांत (अध्याय ३१९) शुक्लयजुर्वेदच्या उत्पत्तीसंबंधानें कथा आहे*

* शांतिभूतं च मां दृष्ट्वा भगवानाह भास्करः। प्रतिष्ठास्यति ते वेदः सखिलः सोत्तरो द्विज ॥१०॥ कृत्स्नं शतपथं चैव प्रणेतासि द्विजर्षभ ॥ ततः शतपथं कृत्स्न सरहस्यं ससंग्रहम् । चक्रे सपरिशेषं च हर्षेण परमेण ह ॥ मिषतो देवलस्यापि ततोर्धं कृतवानहम्॥ स्ववेदं दक्षिणायार्थे विमर्दे मातुलेन ह ॥ दश पञ्च च प्राप्तानि यजूंष्यर्कान्मयानघ ॥

व्यासांनीं आपल्या शिष्यांस वेद व महाभारत शिकविलें; त्यांपैकीं वैशंपायन नांवाच्या शिष्याचा भाचा व शिष्य याज्ञवल्क्य हा होता. या गुरुशिष्यांचें एके दिवशीं भांडण होऊन वैशंपायनानें याज्ञवल्क्यास ' माझा यजुर्वेद टाक ' असें सांगितलें व याज्ञवल्क्यानें तो रागानें तावडतोब ओकून टाकला. तो निखाऱ्याप्रमाणें जळजळीत होता. त्याचें पुनर्ग्रहण करण्याकरितां वैशंपायनाच्या इतर शिष्यांनीं तित्तिरि पक्ष्याचें रूप घेऊन ते निखाऱ्यासारखे वेद गिळले, म्हणून त्यांच्या संहितेस तैत्तिरीयसंहिता असें नांव पडलें. आतां याज्ञवल्क्याजवळ वेद न राहिल्यानें तो सूर्याकडे गेला व त्याची स्तुति करूं लागला. सूर्य प्रसन्न होऊन त्यानें त्यास आपल्या घोड्यावर बसण्यास सांगितलें व त्याला वेद शिकविला ( सूर्यानें घोड्याचें रूप घेऊन वेद शिकविला अशी दुसरी कथा आहे. ) म्हणून या संहितेस वाजसनेयिसंहिता म्हणूं लागले. सदर कथेंत ऐतिहासिक भाग असा दिसतो कीं, गुरुशिष्यांचें भांडण झाल्यामुळें याज्ञवल्क्यानें वेदाची नवीन रचना केली. यावरून शुक्लयजुर्वेदाची रचना व्यासांपासून तिसऱ्या पिढींतील, व्यासांचा व भारतीय युद्धाचा काल इ. स. पू ३१०० हा असल्यानें इ पू. ३००० च्या सुमाराची असावी असें दिसतें. यजुर्वेदाच्या मंत्रांस ऋषि, देवता, वगैरे लागतातच. यजुर्वेदाची उत्पत्ति यजनक्रियेसाठीं असल्यानें त्यांतील पुष्कळ मंत्र गद्यमय आहेत. कृष्णयजुर्वेद बहुतेक गद्यमय आहे. एक चतुर्थांश इतकेंच काय तें त्यांत पद्य आहे. यजुर्वेदाच्या मंत्रांत केवळ स्तुतिच नसून त्यांत यज्ञक्रियेची माहिती आहे म्हणून त्यास यजुः ही संज्ञा मिळाली. साम हा शब्द साधु या अर्थीं आहे. ऋग्वेदांतील गायनाला लागले तेवढे मंत्र सामवेदांत घेतले आहेत. शुक्ल व कृष्ण यजुर्वेदाच्या ब्राह्मणांस दक्षिणेचा अर्धा अर्धा हिस्सा होतो. जनक

राजाकडे याज्ञवल्क्यानें आपला दक्षिणेवरील हक्क शाबीत करून वैशंपायनापासून अर्धी दक्षिणा घेतली व तेव्हांपासून हा वाटणीचा प्रघात पडला अशी कथा महाभारतांतच आहे.

शुक्लयजुर्वेदाच्या रचनेंत एक विशेष असा आहे कीं, तैत्तिरीय संहितेप्रमाणें मंत्र व ब्राम्हण रूपी भाग हीं एके ठिकाणीं मिश्रित नसून त्यांत केवळ मंत्रच दिले आहेत आणि त्यावर टीकात्मक विवरण शतपथ ब्राम्हणांत वेगळें काढले आहे. त्यांतील ज्योतिषविषयक पुढील विशेष० उल्लेखावरून कै० शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं त्याचा काल इ. स. पू. ३००० च्या सुमाराचा ठरविला आहे, व तो बहुतेक अभेद्य आहे. शुक्लयजुर्वेद हा इतर वेदांच्या मानानें अर्वाचीन असून त्याचें ब्राम्हण सर्वांत जुनें आहे. कारण तें मंत्रसंहितेबरोबरच निर्माण झालें व इतरांचीं ब्राम्हणें संस्कृत भाषेंतील स्वर नाहींसे झाल्यावर उत्पन्न झालीं. शुक्लयजुर्वेदांत म्हणजे वाजसनेयि संहितेंत तैत्तिरीय संहितेपैकींच पुष्कळसे मंत्र असून थोडे निराळे आहेत. सूर्यानें याज्ञवल्क्यास १५ मंत्र नवीन दिले अशी महाभारतांत कथा आहे. वाजसनेयि संहितेचे मंत्र सामवेदाप्रमाणें कांहीं विशिष्ट स्वरांत म्हणावे लागतात. * हे स्वर षडज वगैरे सात आहेत. यजुर्वेदांत कुरु या देशाचें फार वर्णन आहे, यावरून तो तेथें तयार झाला असावा असें दिसतें. कृष्ण यजुर्वेदाच्या कठ व तिची उपशाखा कापिष्ठल या शाखांचे लोक पंजाब व काश्मीर

---

* उदात्तादि स्वर याही वेदाला आहेत; पण त्यांची म्हणण्याची पद्धत निराळी असते. याशिवाय छापील पुस्तकांत गाण्याच्या सप्त स्वरांपैकीं कोणता तरी एक गांधारपञ्चमादि स्वर प्रत्येक ऋचेला असतो असें लेखी पुस्तकांतून दिलेलं आहे.

या देशांत ग्रीक लोकांच्या वेळीं होते. पहिली कठ शाखा काश्मीरांत आहे. मैत्रायणी ही दुसरी महत्वाची शाखा नाशिकाच्या उत्तरेस व विशेषतः नर्मदा तीरीं सांपडते. या शाखेचें जुनें नांव कालाप असें आहे. पतंजलीच्या वर्णनावरून कठ व कालाप या दोन्ही शाखा उत्तरेस फार प्रसृत असून गांवोगांव ज्ञात होत्या. तैत्तिरीय संहिता मुख्यतः दक्षिण हिंदुस्थानांत आहे. या संहितेची आपस्तंब ही मुख्य शाखा असून हिरण्यकेशी शाखाहि महत्वाची आहे. तैत्तिरीय संहितेंत ७ कांडें ४४ प्रपाठक, ६५१ अनुवाक असून पद संख्या ११०२९३ इतकी आहे.

वाजसनेयि संहितेचे ४० अध्याय असून शेवटचा अध्याय ईशावास्योपनिषद् आहे. संहितेंत ग्रथित उपनिषद् हें एक आहे; दुसरीं उपनिषदें ब्राम्हणांतर्गत आहेत. या संहितेला स्वर आहेत; तसे दुसऱ्या कोठेंही नाहीत. या संहितेच्या माध्यंदिन व काण्व अशा दोन प्रमुख शाखा असून उत्तरहिंदुस्थानांतील बहुतेक क्षत्रिय लोक माध्यंदिन शाखेचे आहेत. या संहितेंत अश्वमेध व पुरुषमेध यांचीं विशेष वर्णनें आहेत. यांतील १८ अध्याय जुने असून पुढील मागूनचे असावे असें दिसतें. कारण शतपथांत प्रारंभींच्या या १८ अध्यायांवर विस्तृत विवरण आहे. यजुर्वेदांत रुद्राची स्तुति जास्त आहे. सुप्रसिद्ध रुद्राध्याय हा यजुर्वेदांतीलच आहे. ३० व्या अध्यायांत हिंदुस्थानांतील मिश्र जातींचें वर्णन आहे असें मॅकडोनेल म्हणतो, तें बरोबर दिसत नाहीं. त्यांत सूत रथकारादि निरनिराळ्या धंद्यांचा उल्लेख आहे, उपजातींचा नाहीं. यजुर्वेद हा एकंदरींत यजनक्रियेसंबंधीं असून अग्निहोत्र दर्शपूर्णमासासंबंधी त्यांत जास्त वर्णन आहे. यजुर्वेदाची भाषा जवळजवळ ऋग्वेदासारखीच आहे; ती लौकिक

( classical ) संकृतसारखी नाहीं. ऋग्वेदांतील ७०० ऋचा वाजसनेयिसंहितेंत आहेत. ऋग्वेदांत ब्रह्म याचा अर्थ 'स्तुति' असा आहे तर यजुर्वेदांत 'स्तुतीपासून उत्पन्न होणारें सामर्थ्य' असा त्या शब्दाचा अर्थ झाला आहे. कांहीं यजुर्वेदी मंत्राचा—विशेषतः आहुति टाकतांना म्हणावयाच्या मंत्राचा अर्थ लागणें शक्य नाहीं इतके ते गूढ स्वरूपाचे ( mystic ) आहेत.

## —अथर्ववेद—

अथर्ववेद हा उपनिषत्कालीं निर्माण झाला. त्याचे कांहीं मंत्र पूर्वींहि अस्तित्वांत होते, पण एकंदर सर्व बांधणी पुढें झाली. अथर्ववेदांत यज्ञक्रियेचा बिलकुल संबंध दिसत नाहीं. जारणमारणादि क्रियाचे मंत्र त्यांत आहेत. विवाहविधि वगैरे संबंधाचेही कांहीं मंत्र त्यांत आहेत. 'अॅडॅव्हॅन' या फारसी शब्दाशीं अथर्व या शब्दाचें साम्य आहे. मागी हे पारशांतील मांत्रिक लोक होते. अथर्वाबद्दल 'अथर्वांगिरसः' असा शब्दप्रयोगहि येतो.

अथर्ववेद हा व्यासांनीं जुळविलेला नाहीं असें ऐतिहासिक दृष्टया म्हणता येतें.त्यातील कांहीं मंत्र कदाचित् पूर्वींही वापरले जात असतील. छांदोग्योपनिषदांत या वेदाचा उल्लेख असल्यामुळें तो त्यापूर्वीं झाला असावा असें दिसतें. विष्णुपुराणांत व्यासांनीं चारी वेद जुळविले असें म्हटलें आहे. त्यांनीं आपल्या चार शिष्यांस चार वेद शिकविले. पैलास ऋग्वेद, वैशंपायनास यजुर्वेद, जैमिनीस सामवेद व सुमंतु यास अथर्ववेद शिकविला असें त्यांत म्हटलें आहे. पण याला विरुध्द असें विधान महाभारतांत सांपडतें. महाभारताप्रमाणें व्यासानीं सर्व शिष्यांस सर्व वेद शिकविले. एकंदरींत व्यासांच्या वेळीं अथर्ववेद हल्लींच्या संहितास्थितींत नव्हता असें दिसतें. श्रावणीच्या

संस्कारांत आपण प्रत्येक वेदाची पहिली ऋचा म्हणत असतों. ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद यांच्या पहिल्या ऋचा अनुक्रमें, 'अग्निमीळे पुरोहितम्' 'इषेत्वोर्जेत्वा०' व 'अग्न आयाहि वीतये०' अशा आहेत व त्या तशा म्हणण्यांत येतात. पण यानंतर अथर्ववेदाच्या प्रारंभींची म्हणून 'शंनोदेवी०' ही जी ऋचा म्हणण्यांत येते, ती हल्लींच्या प्रसिध्द असलेल्या अथर्ववेदाच्या प्रारंभीं नाहीं. पुष्कळ वैदिकांस मीं यासंबंधीं विचारलें, पण मला समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं. कदाचित् अथर्ववेदाच्या लुप्तशाखेचें तें आद्यवाक्य असेल; म्हणजे पिप्पलाद शाखेचें जें एकच पुस्तक भूर्जपत्रावर लिहिलेलें काश्मिरांत सांपडलेलें आहे, त्याच्या प्रारंभीं तें असेल.

अथर्ववेदाच्या एकंदर ९ शाखा चरणव्यूहांत सांगितल्या आहेत. त्यांपैकीं पिप्पलाद व शौनक या दोनच शाखांच्या संहिता हल्लीं उपलब्ध आहेत. पिप्पलाद शाखेचे लोक थोडेच सांपडतात; शौनक शाखेचे लोक त्या मानानें जास्त आहेत. वैशंपायनाचा भाचा याज्ञवल्क्य व त्याचा भाचा पिप्पलाद असें पुराणांतून वर्णन आहे. पिप्पलादानें कदाचित् या वेदाची जुळणी केली असेल. ती कोणी केली हें निश्चयानें सांगता येत नाहीं. शौनकी शाखेचे लोक आपल्याकडे बरेच आहेत. या शाखेच्या संहितेंत २० कांडें, ३४ प्रपाठक, १११ अनुवाक, ७३१ सूक्तें व ५८४९ ऋचा आहेत. यांपैकीं सुमारें १२०० ऋचा ऋग्वेदांतीलच असून त्या बहुतेक १।८।१० या मंडलांतून घेतलेल्या आहेत. या वेदाचा १/६ भाग गद्यांत आहे, २० कांडांपैकीं पहिलीं १३ कांडें त्यांतल्यात्यांत जुनीं दिसतात. त्यांतून जारणमारणादि मंत्र आहेत. १४ वें कांड विवाहकांड असून त्यांतील सर्व ऋचा ऋग्वेदांतील आहेत, १५ वें कांड व्रात्यकांड या नांवाचें आहे. 'व्रात्य' या शब्दाचा या वेदांतील अर्थ 'ब्रह्म'

असा आहे. ( स्मृतींत त्या शब्दाचा ‘ संस्कारहीन’ असा अर्थ असून, त्यापासूनच मराठींत त्या शब्दास ‘ खोडसाळ ’ असा अर्थ आला आहे. ) २० व्या कांडांत यज्ञक्रियेशीं संबंध जोडण्याकरितां सोमयागाचें वर्णन असून त्यांतील सर्व ऋचा ऋग्वेदांतून अक्षरशः घेतल्या आहेत.

पाश्चात्य पंडितांच्या चिकित्सक बुद्धीला या वेदाचें फार महत्त्व वाटतें. स्कॅन्डिनेव्हियन लोकांत जारणमारणादि क्रियांचे जे मंत्र आहेत, त्यांची व अथर्ववेदांतील मंत्रांची भाषा पुष्कळ सारखी असून त्यांत अर्थसाम्यही बरेंच आहे, असें एका पंडितानें म्हटलें आहे. अशाप्रकारें ऐतिहासिक दृष्टया ते या वेदास जास्त महत्व देतात.

पूर्वीं यज्ञांत ऋग्वेदी होता, सामवेदी उद्गाता व यजुर्वेदी अध्वर्यु अशी तीन वेदांची व्यवस्था होती; पुढें अथर्ववेद झाल्यानंतर त्याचाही एक प्रतिनिधि यज्ञांत असावा म्हणून ब्रह्मा हा अथर्ववेदी असावा असें मानलें गेलें. याचें कार्य निव्वळ देखरेखीचें आहे. पूर्वीं द्विजांचे निरनिराळे भेद वेदांवरून नसावे, सूत्रें निर्माण झाल्यानंतर व यज्ञ श्रावणी वगैरे विधि त्या त्या सूत्रांप्रमाणें होऊं लागल्यानंतर द्विजांत ऋग्वेदी वगैरे भेद झाले असावे. पतंजलीच्या महाभाष्यांत या अथर्ववेदास सर्व वेदांत ऋग्वेदापेक्षाही श्रेष्ठ स्थान दिलें गेलें, त्यांतही अथर्ववेदाचें प्रारंभींचें वाक्य ‘ शंनो देवी० ’ असें दिलें आहे, यावरून पतंजलि अथर्ववेदी असावा असा तर्क होतो. अथर्ववेदाला ब्रह्मवेद, अथर्वांगिरसः अशीं देखील नांवें येतात. अथर्व म्हणजे पवित्र मंत्र (holy charms) व अंगिरस् म्हणजे चेटूक (witchcraft) असे अर्थ एकानें सुचविले आहेत, पण मला ते मान्य नाहींत. ‘ भृग्वंगिरसः’ असेंही नांव कांहीं ठिकाणीं आढळतें. ब्रह्मवेद हें नांव गृह्यसूत्रांत आलें आहे. अथर्ववेदांत सूक्ताचे ऋषि व देवता

दिल्या नाहींत हें विशेष आहे, ऋग्वेदांतून जे मंत्र घेतले आहेत, त्यांचेही ऋषि दिले नाहींत; अथर्ववेदाचीं उपनिषदें पुष्कळ आहेत. अथर्ववेदांतील विषय कसाही असला तरी त्याबद्दल लोकांत द्वेष होतासें दिसत नाहीं. चेटुक [ Sorcery ) याला वेदांत ' यातु ' असा शब्द आहे, यावरून पुढे राक्षसांना ' यातु-धान ' असें नांव मिळालें असावें. ' यातु ' चा उपयोग करणें वाईट असें शतपथ ब्राम्हणांत म्हटलें आहे. अथर्ववेदाचा यज्ञाशीं संबध येत असल्यानें श्रौतसूत्रांत त्याचा उल्लेख येत नाहीं. राजाचा पुरोहितही अथर्ववेदी अर्थात मांत्रिक असावा अशी स्थिति पुढें आली आहे.

अथर्ववेदाची रचना कोणीं केली हें जसें सांगतां येत नाहीं, तसेंच ती कोठें झाली असावी हेंही अनिश्चितच आहे. गांधार व बाल्हीक या देशाचा उल्लेख त्यांत आहे. १९ व्या कांडांत नक्ष-त्रांचीं नांवें त्यांत आहेत, त्यापेक्षां तैतिरीयसंहितेंतील नांवें फार जुनीं आहेत. व्याकरणाच्या दृष्टीनें अथर्ववेदाची भाषा ऋग्वेदा-नंतरची व ब्राम्हणांच्या पूर्वीची दिसते. अथर्ववेदाच्या कांहीं ऋचा जुन्या असल्या तरी त्यांची जुळणी ऋग्वेदाच्या ब्राह्मणांपर्यंत झाली नसावी असें दिसतें.

अथर्ववेदांत तापाला ' तक्मन् ' असें नांव आहे. या वेदांत मंत्राबरोबर रोगांवर कांहीं वनस्पतींचाही उपयोग करण्यास सांगि-तलें आहे. यामुळें वैद्यशास्त्राचें मूळ अथर्ववेदांतच असावें असें दिसतें.

## —ब्राह्मणें—

ब्राह्मण हा शब्द ब्रह्म या शब्दापासून निघाला आहे. ब्रह्म या शब्दाचा मूळचा अर्थ स्तुति किंवा ऋचा असा आहे, व त्यावरून पुढें ब्रह्म म्हणजे सामर्थ्य, वैदिक सामर्थ्य, आणि पुढें वेद असा अर्थ झाला. वेदांचें ज्यांत विवेचन केलें आहे ते ब्राह्मण अशी ब्राह्मण शब्दाची व्युत्पत्ति देतां येईल. ब्राह्मणांचा काल इ. स. पू. ८०० पासून इ. स. ५०० पर्यंतचा आहे, असा पाश्चात्य पंडितांचा निश्चय आहे. परंतु हा समज चुकीचा असून इ. स. पू. ३००० पासून २००० पर्यंत ब्राम्हणांचा काल आहे, असें माझें मत आहे.

प्राचीन संस्कृत वाङमयांतील ग्रंथाचे काल ठरवितांना कालनिर्णयाचे ५ टप्पे आहेत व ते बहुतेक मजबूत आधारांनीं निश्चित आहेत.

( १ ) भारतीय युद्ध इ. स. पू. ३१०१
( २ ) शतपथ ब्राम्हण " ३०००
( ३ ) महिन्यांचीं चैत्र वैशाख इत्यादि नांवें प्रचारांत आलीं इ. स. पू. २०००
( ४ ) वेदांगज्योतिष इ. स. पू. १४००
( ५ ) ज्योतिषांत राशींचा शिरकाव इ. स. पू. १५०

शतपथ ब्राम्हणाचा काल इ.स.पू. ३००० जो वर दिला आहे, तो शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं 'कृत्तिका वै प्राच्यै दिशो न च्यवन्ते' या शतपथांत आलेल्या वाक्यावरून गणित करून काढलेला आहे. आणि अद्यापपर्यंत हा काल कोणीही खोडून काढलेला नाहीं. कित्येक लोक कृत्तिका थेट पूर्वेस उगवत होत्या ही एक प्राचीनकाळीं पाहिलेली परिस्थिति शतपथांत स्मृतिरूपानें

आलेली आहे असें म्हणतात. परंतु शतपथ ब्राम्हणाचे वेळीं ऋषि नक्षत्रें आकाशांत पाहून प्रत्यक्ष परिस्थितिप्रमाणें अग्न्याधान करीत असत. तेव्हां कृत्तिका थेट पूर्वेस आकाशांत नसतांही कृत्तिका पूर्वेस उगवतात असें म्हणणें शतपथ ब्राम्हणांत येणें शक्य नाहीं. तेव्हां शतपथाचा इ स. ३००० हा काळ निश्चित होय. त्याचप्रमाणें वेदांगज्योतिषाचा काळ इ. स. १४०० हाहि 'प्रपद्येते श्रविष्ठादौ सूर्याचन्द्रमसावुदक्' या त्यांतील वाक्यावरून शं. बा. दीक्षित यांनी ठरविला आहे. श्रविष्ठा ह्मणजे धनिष्ठा नक्षत्राच्या आरंभीं सूर्यचंद्रांचें उत्तरायण होत असे ही गोष्ट गणितास आधार घेऊन हल्लींच्या परिस्थितीशीं ताडून हा काळ ठरविला आहे. प्रो. मॅक्समुल्लर यानें आर्चडीकन प्रॅट या पाश्चात्य ज्योतिषाकडून गणित करवून हा काळ केव्हां येतो याची जांच करविली. परंतु त्यासही इ. स. पू. ११०० पेक्षां अलीकडे या उदगयन स्थितीस आढतां आलें नाहीं. असें असूनही पाश्चात्य पंडित वेदांगज्योतिषास अलीकडचें मानतात आणि प्राचीन स्मृतीवरून हें वाक्य त्यांत लिहिलेलें आहे असें प्रमाण पुढें आणतात. पण हा ग्रंथ निवळ कादंबरीवजा किंवा इतर प्रकारचा असता तर हें प्रमाण पुढें आणतां आलें असतें. परतु ज्योतिषविषयक ज्ञान सांगण्याकरितां प्रवृत्त झालेला ग्रंथ आकाशांत निराळी स्थिति असताना 'प्रपद्येते श्रविष्ठादौ' असें ह्मणेल हें शक्य नाहीं.

तेव्हां वेदांगज्योतिषाचा काल निश्चित आहे. राशि हिंदुस्तानांत इ. स. पू. ४०० च्या सुमारास आल्या असें दीक्षित यांचें मत आहे, पण मी राशि ग्रीक लोकांपासून घेतल्या असें निश्चित मानतों, आणि ग्रीकांचा व आमचा संबंध इ. स. पू. १५० च्या सुमारास त्यांचें राज्य येथें स्थापित झाल्यानें पक्का झाला यावरून

इ. स. पू. १५० ही अगदीं अलीकडची मर्यादा आहे. अर्थात् ज्या ग्रंथांत राशींचा उल्लेख आहे ते सर्व ग्रंथ इ. स. पू. १५० च्या अलीकडचे आहेत हें निश्चित होय.

वरील विचारसरणीनें पाहतां शतपथ ब्राह्मण इ. स. पू. ३००० येथपासून ब्राह्मणरचना सुरू होऊन ती वेदांगज्योतिषाच्या पूर्वीच म्हणजे इ. स. पू. १४०० च्या पूर्वीच पूर्ण झाली असली पाहिजे. अर्थात् मीं वर दिलेला इ. स. पू. ३०००—२००० हाच ब्राह्मणांच्या रचनेचा योग्य काल आहे.

हीं सर्व ब्राह्मणें गद्यमय असून त्यांत मुख्यत्वेंकरून यज्ञक्रियेचें वर्णन आहे. तथापि हें वर्णन सांग व साद्यंत नाहीं. ब्राह्मणांत विधीशिवाय अर्थवादही पुष्कळ आहे. निरनिराळ्या प्रकारच्या गोष्टी सांगून एकाद्या क्रियेची स्तुति करणें हा अर्थवादाचा हेतु असतो, म्हणून त्यास स्तावक असेंही म्हणतात. ब्राह्मणांत मधून-मधून गाथाही येत असतात. या गाथा जुन्या गोष्टींचें स्मरण रहावें म्हणून त्या ज्यांत थोडक्यांत वर्णिल्या आहेत अशीं अनुष्टुप् वृत्तांतलीं पद्यें आहेत. उदाहरणार्थ, ‘ मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन्गृहे० ’ इत्यादि गाथा आहे. या गाथा वेदकालीन व वेदोत्तरकालीनही असल्या पाहिजेत. भाट लोकांमध्येंही अशा प्रकारच्या गाथा म्हणजे हिंदी दोहे देण्याचा सांप्रदाय अजूनही आहे.

ब्राह्मणांच्या उत्तरभागास आरण्यक म्हणतात. ‘ आरण्यक ’ शब्दाचा अर्थ ‘ अरण्यास योग्य ’ किंवा ‘ वानप्रस्थ मनुष्याविषयीं ज्यांत विचार आहेत ते ’ असा करतात, परंतु हा अर्थ माझ्या मतें बरोबर नाहीं. पाणिनीनें ‘ आरण्यक ’ या शब्दाचा अर्थ ‘ अरण्यांत राहणारा ( रानटी ) मनुष्य ’ एवढाच दिला आहे, यावरून पाणिनीच्या वेळीं ब्राह्मणांच्या उत्तरभागास आरण्यक ही संज्ञा

मिळाली नव्हती असें वाटतें. ऋग्वेदी लोक 'अरण' ही संज्ञा वापरतात. आणि अरणांचा समूह म्हणजे आरण्यक असा अलीकडे शब्द झाला असावा, असें मला वाटतें. आरण्यकांतील ज्या भागांत ब्रह्माचा विचार केलेला असतो त्यांस–आणि हे भाग बहुतेक शेवटचे असतात–उपनिषदें म्हणतात.

ऋग्वेदाचीं हल्लीं तीन ब्राह्मणें उपलब्ध आहेत. जैमिनी, कौषीतकी व ऐतरेय, हीं ब्राह्मणें सर्वांत अलीकडचीं आहेत. आणि त्यांतल्यांत्यांत ऐतरेय ब्राह्मण अगदीं अलीकडचें म्हणजे इ. स. पू. २००० च्या सुमाराचें आहे. ऐतरेय या नांवावर कोटि करून कांहींनीं पुढील कथा दिली आहे. हा ऋषि 'इतरायाः' म्हणजे 'शूद्रायाः पुत्र' होता. याचें नांव महीदास असें होतें. दास या शब्दावरूनही तीच गोष्ट निघते. हा अतिशय बुद्धिमान् होता. परंतु त्यास इतर ब्राह्मण मानीनात. तेव्हां त्यानें ऐतरेय ब्राह्मण केलें. परंतु ही सर्व गोष्ट वेडसर आहे. महीदास ऐतरेयाचें नांव छांदोग्योपनिषदांत आलें आहे (प्र. ३ समु १६ 'सह षोडशं वर्षशतमजीवत्) यावरून ऐतरेय ब्राह्मण छांदोग्यापूर्वीचें ठरतें.

ऐतरेय ब्राह्मणाचीं ५ अरणें आहेत. आणि त्यांत ऐतरेयोपनिषत्‌ही आहे. कौषीतकी ब्राह्मण बरेंच मोठें आहे. आणि त्यांत कौषीतक्युपनिषद् आहे. त्यास शांखायन अशीही संज्ञा आहे. त्यांत सोमयज्ञाचें मुख्य वर्णन आहे. यावरून तें ऐतरेय ब्राह्मणाच्या पहिल्या पंचिकेच्या (५ अध्यायांच्या) नंतरचें असावें असा अंदाज करतात. जैमिनीय ब्राह्मणाविषयीं विशेष माहिती नाहीं. ऐतरेय व कौषीतकी ब्राह्मणांत कुरुपांचालांच्या देशाचें वर्णन विशेष आहे. आणि कौषीतकी ब्राह्मणांत असा उल्लेख आहे कीं, उत्तरेकडचे लोक भाषाशास्त्रांत प्रवीण असतात. ऐतरेयांत आलेली शुनःशेपाची कथा प्रसिद्ध आहे.

शुनःशेपाची कथा म्हणजे हरिश्चंद्रानें वरुणास देऊं केलेल्या आपल्या पुत्राबद्दल एक ब्राह्मणपुत्र शुनःशेप याचा मेध करण्यास प्रारंभ केला तेव्हां शुनःशेपानें वरुणाची स्तुति करून आपली सुटका करून घेतली ही होय.

यजुर्वेदाचे कृष्णयजुर्वेद व शुक्लयजुर्वेद असे जे दोन भेद आहेत, त्यांपैकीं कृष्णयजुर्वेदाचीं २ ब्राह्मणें आहेत. एक पंचविंश व दुसरें तैत्तिरीय. या २ ब्राह्मणांच्या भाषेवरून तीं फार जुनीं आहेत, असा पाश्चात्य विद्वानांचा सिद्धांत आहे. परंतु मागें सांगितल्याप्रमाणें शतपथ ब्राम्हण हें फार जुनें असून तें याज्ञवल्क्यानें केल्यानंतरच इतर वेदांचीं ब्राह्मणें उत्पन्न झालीं असा माझा तर्क आहे. याप्रमाणें पंचविंशति व तैत्तिरीय अशीं कृष्णयजुर्वेदाचीं दोन ब्राह्मणें उत्पन्न झालीं. कृष्णयजुर्वेदाची जी कठशाखा त्या शाखेस हल्लीं उपलब्ध ब्राह्मण नाहीं. त्यांतील कांहीं भाग काठक म्हणून तैत्तिरीय ब्राह्मणांत येतात. कृष्णयजुर्वेदाच्या मैत्रायणि शाखेचें एक उपनिषद् आहे. कठ व मैत्रायणि शाखेंत ब्राह्मण स्वतंत्र नसून संहितेंतच ब्राह्मणांचा भाग आलेला आहे.

शुक्लयजुर्वेदाचें शतपथ ब्राह्मण प्रसिद्ध आहे. यास १०० अध्याय असल्यामुळें शतपथ ही संज्ञा प्राप्त झाली आहे. याचे दोन भेद आहेत. माध्यंदिन शाखेचें व कण्व शाखेचें. माध्यंदिन शाखेंत १४ कांडें आहेत व कण्वशाखेंत १७ आहेत. पहिल्या नऊ कांडांत वाजसनेयि संहितेच्या १८ अध्यायांवर बारखी टीका आहे. आणि हा भाग सर्वांत जुना असला पाहिजे. बाराव्या कांडास मध्यम अशी संज्ञा आहे यावरून नंतरचीं कांडें निराळीं मानीत असावे. शेवटचें कांड म्हणजे आरण्यक होय आणि त्यापैकीं सत्रा अध्याय हें बृहदारण्यकोपनिषद् होय. ६ पासून १० पर्यंतचीं कांडें शांडिल्यकांडें

म्हणून प्रसिद्ध आहेत. व त्यांत याज्ञवल्क्याचें नांव नाहीं. त्यांत आलेल्या लोकांचीं नांवें गांधार, शाल्व, केकय हीं असून हे वायव्येकडील लोक आहेत. बाकीच्या कांडांत याज्ञवल्क्य हाच मुख्य ऋषि असून हिंदुस्तानच्या पूर्वेकडील म्हणजे कोशल, विदेह, सृंजय या लोकांचीं नावें विशेष आहेत. शांडिल्यकांडाचा कर्ता निराळा असावा असें वाटतें. शतपथ ब्राह्मण काळीं कुरुपांचाल हीच ब्राह्मण क्षत्रियांचा मुख्य भूमि होती. यांत जनमेजय या कुरुराजाचें नांव आलें आहे, व आरुणि हा आचार्य पांचाल होता असें स्पष्ट सांगितलें आहे. अयोध्या, विदेह, मिथिला येथपर्यंत मध्यदेशाच्या पूर्वेस वैदिक धर्म पसरला होता आणि विदेहराज जनक याच्या दरबारीं कुरुपांचालांतील ब्राह्मण वादविवाद करीत असत. यांपैकीं मुख्य आरुणि याचा शिष्य याज्ञवल्क्य होता हें सांगावयास नकोच. शतपथामध्यें विदेहांत अग्नि वसति झाल्याचा कथाभाग आहे. विदेघ ( विदेह याच पूर्वरूप ) येथील राजा माठव आणि त्याचा पुरोहित, गौतम, राहूगण हे प्रथम सरस्वतीतीरावर असून तेथून अग्निवैश्वानर पूर्वेकडे चालला तेव्हां त्याच्यामागून माठव आणि गौतम हे निघाले ते सदानीरानदीपर्यंत आले. त्याच्या पलीकडे अग्नि गेला नाहीं अशी कथा आहे. याच्या पूर्वेकडील भाग जंगली असून जमीन फार सुपीक आहे. माठव विदेघ यानें 'मी कोठें राहूं ? ' असें विचारलें, तेव्हां त्यानें 'या नदीच्या पूर्वेकडे रहा असें उत्तर दिलें. ' "अद्यापहि सदानीरा ही नदी कोसल व विदेह यांच्या दरम्यानची सीमा आहे." असें शतपथांत म्हटलें आहे.

कोसलविदेहांतच बौद्धधर्माचा प्रथम प्रचार झाला हें प्रसिद्ध आहे. तेव्हां त्यासंबंधानें शथपथ ब्राम्हणांत कांहीं उल्लेख आहे कीं

काय असें पाहतां, अर्हत्, श्रमण व प्रतिबुद्ध असे तीन शब्द त्यांत सांपडतात. पण बौद्धधर्मात त्यास जो अर्थ आहे तो त्यांत नाहीं. आसुरि या आचार्याचें नांव त्यांत आलें आहे, आणि आसुरि हें नांव एका सांख्य आचार्याचेंही आहे. तथापि माझ्या मते हे दोन्ही आसुरी एकच नव्हत. मात्र यांत सांगितलेला जनमेजय हा महाभारतांतिलच जनमेजय होय असें मला वाटतें. हा पांडवांचा पणतू असून या ब्राम्हणांत पांडवांचें नांवही नाहीं या गोष्टीवर पाश्चात्य पंडित असा तर्क बांधतात कीं, पांडव व भारतीय युद्ध हीं काल्पनिक आहेत. परंतु हा उल्लेखाभावावर केलेला तर्क न्यायशास्त्रास सोडून आहे. उल्लेख नसला म्हणजे ती गोष्ट झालीच नाहीं किंवा त्यावेळीं नव्हती असा तर्क करणें चुकीचें आहे, जोंपर्यंत उल्लेख आलाच पाहिजे असें ग्रंथाच्या स्वरूपावरून निश्चित नाहीं तोंपर्यंत. ब्राह्मण ग्रंथ मुख्यतः यज्ञासंबंधाचे असल्यानें पांडवांचा व भारतीय युद्धाचा उल्लेख त्यांत आलाच पाहिजे असें नाहीं. असो. उर्वशीपुरूरवा आणि दुष्यंतशकुन्तला यांच्या कथा यांत उल्लिखित आहेत. त्याहून महत्त्वाची कथा म्हणजे पृथ्वीप्रलयाची आणि त्यांतून मनु बांचल्याची कथा ब्राम्हणांत आली आहे. भरतखंडांतील वाङ्मयांत हा पहिलाच उल्लेख दिसतो. याचा अथर्ववेदांतही उल्लेख आहे व अवेस्‌यांतही आहे. बायबलांतही याचा उल्लेख असून तेथें मनूऐवजीं ‘ नोहा ’ असें नांव आहे.

शतपथ ब्राम्हण हें या रीतीनें अतिशय महत्त्वाचें आहे. त्यांत अनेक महत्त्वाचे उल्लेख आहेत. तथापि तें अलीकडचें आहे असें मानतां येणार नाहीं. त्यांतील भाषा सरळ आहे. तरी त्याचा काल प्राचीन मानण्यास हरकत नाहीं.

सामवेदाचीं मुख्य दोन ब्राह्मणें प्रसिद्ध आहेत. एक ताण्ड्य महाब्राम्हण व दुसरें तलवकार अगर जैमिनीय ब्राम्हण. दुसरें अद्याप छापलें गेलें नाहीं. तथापि त्याचें उपनिषद् प्रसिद्ध आहे. या ब्राम्हणांत आचार्यपरंपरा वगैरे बऱ्याच गोष्टी दिलेल्या आहेत. केनोपनिषद् यांतीलच आहे. ताण्ड्य महाब्राम्हणांत २५ अध्याय आहेत. म्हणून यास पंचविंश असेंही म्हणतात.सोमयागाविषयीं यांत विशेष माहिती आहे. आणि हे यज्ञ कित्येक वर्षे चालणारे असे देखील यांत वर्णिले आहेत. सरस्वती व दृषद्वती या नद्यांवर केलेल्या यज्ञांची यांत बारीक माहिती आहे. यांतच व्रात्यस्तोमाचा उल्लेख आहे. या यज्ञानें संस्कारभ्रष्ट आर्यांचा पुन्हा संस्कार होऊं शकतो. यांत कौषीतकी शाखेच्या लोकांचा विशेष द्वेष दृष्टीस पडतो ही सांगण्यासारखी गोष्ट आहे. या पंचविंशाचेंच षड्विंश ब्राम्हण म्हणून पुढचें टोंक असून त्यांत २६ वा अध्याय आहे, त्यासच अद्भुत ब्राम्हण म्हणतात.यांत नानाप्रकारचीं अशुभ चिन्हें,उदाहरणार्थ देवता स्फुटण अगर देवतांचें हसणें, नाचणें, घाम सुटणें इत्यादि अपशकुन व त्यांचे वाईट परिणाम टाळण्याकरितां उपाय सांगितले आहेत. तांड्यब्राम्हणाचा कर्ता तंडिऋषि यानें शंकराची आराधना करून ग्रंथकर्तृत्वाचें मोठेपण मिळविलें अशी कथा महाभारतांत अनुशासन पर्वांत आली आहे. तो बहुधा हाच तांड्यब्राम्हणाचा कर्ता तंडि असावा. छान्दोग्य हें सामवेदाचें आणखी एक ब्राम्हण आहे, पण त्यांत यज्ञाबद्दल विशेष माहिती नाहीं. त्याचा शेवटचा भाग म्हणजे प्रसिद्ध छान्दोग्योपनिषद् होय. सामवेदाचीं आणखी लहान लहान ब्राम्हणें आहेत पण तीं विषयास धरून नाहींत. सामविधान यांत तांत्रिक विचार आहे, आणि संहितोपनिषद यांत ऐतरेय आरण्यकाप्रमाणें सामवेद कसा म्हणावा याविषयीं माहिती सांगितली आहे. सामवेदाच्या

ब्राम्हणांत निरनिराळ्या सामांवर रूपकें करून केलेलीं वर्णनें आढळतात. याशिवाय महत्त्वाची अशी कांहीं ऐतिहासिक माहिती दिलेली आढळते.

अथर्ववेदाचें गोपथ ब्राम्हण प्रसिद्ध आहे, पण त्याचा अथर्वसंहितेशीं विशेष संबंध नाहीं. हें सर्वांत अलीकडचें आहे, आणि तें बहुधा वैतान सूत्रानंतर लिहिलेलें आहे. यांत शतपथ व ऐतरेय ब्राम्हणांतील उतारे घेतले आहेत. ब्रम्हा (यज्ञांतील मुख्य ऋत्विज) आणि अथर्ववेद यांची स्तुति विशेष आहे, शिवाच्या पूजेवर विशेष भर आहे. कौषितकि ब्राम्हणांतूनही यांत उतारे घेतले आहेत. तसेंच पंचविंश ब्राम्हणांतूनहि घेतले आहेत. यावरून हें ब्राम्हण सर्वांत अलीकडचें असावें असें दिसतें.

## —उपनिषदें

उपनिषद् ह्मणजे गुरूजवळ बसून प्राप्त करून घेण्याचें ज्ञान असा साधारणपणें अर्थ करतात पण तो मला मान्य नाहीं. समित्पाणि शिष्यानें श्रोत्रिय व ब्रम्हनिष्ठ अशा गुरूजवळ राहून उपनिषद्विद्या शिकावी असें मुण्डकोपनिषदांत वर्णन आहे. तरी पण एवढ्याकरूनच असा अर्थ असेल असें निश्चयानें म्हणतां येत नाहीं. वेदाला 'निषद' असें नांव आहे. त्याच्याजवळचा अगर पुढचा जो भाग तें उपनिषद असा माझ्या मतें या शब्दाचा अर्थ असावा. ब्राह्मणाच्या अंतीं आरण्यक व आरण्यकाच्या शेवटीं उपनिषद् अशी रचना आहे. उपनिषदांस 'वेदान्त' अशीही संज्ञा आहे. त्याचा अर्थ 'वेदाच्या शेवटीं झालेली रचना' यापेक्षां 'वेदांतील तत्त्वांचा निश्चय करणारी रचना' (अंत—निश्चय) असा अधिक संभवतो. उपनिषदें म्हणजे वेदाचें उत्तमांग अगर शिर असेंही कांहीं ठिकाणीं वर्णन आहे. प्रत्येक उपनिषदांत अतिशय गूढ असें

तत्त्वज्ञान सोप्या सरळ शब्दांत सांगितलें आहे. तें इतक्या सुंदर व वक्तृत्वपूर्ण भाषेंत सांगितलें आहे कीं, उपनिषदांसारखें वाङ्मय हिंदुस्थानांतच काय, पण कोणत्याही देशांत झालें नाहीं. ईशावास्योपनिषद हा शुक्लयजुर्वेदाचा भाग असून पद्यमय आहे. कठ व मुण्डक हींही पद्यमय आहेत. बाकी सर्व उपनिषदें गद्यमय आहेत. हें सर्व गद्य वक्तृत्वपूर्ण आहे. प्रत्येक वेदास ब्राह्मण आणि त्याचा भाग उपनिषद् असें आहे. अशा तऱ्हेनें प्रत्येक वेदाचें एकेक उपनिषद मुख्य आहे. एकंदर उपनिषदांत दहा उपनिषदें प्रमुख व जुनीं आहेत तीं पुढील प्रमाणें श्लोकांत सांगतां येतील:—

ईशकेनकठप्रश्ना मुण्डकं माण्डूक्यं तथा ।
तैत्तिरीयमैतरेयं छान्दोग्यं बृहदारणम् ॥

या सर्वांतून ब्रह्माचें वर्णन उत्तम प्रकारें केलें आहे. हीं उपनिषदें आपापलीं विशिष्ट मतें प्रस्थापित करणारीं नसून ऋषींचें वेदांतमत निश्चित करणारीं आहेत. या उपनिषदांचा काल इ. स. पू. २००० पर्यंतचा आहे. एकंदर उपनिषदांची संख्या ११२ आहे आणि त्यांपैकीं शेवटचीं इ. स. १६०० पर्यंत तयार झालीं आहेत. सांख्यशास्त्राचा उगम माझ्या मतें दशोपनिषदांनंतरचा व भगवद्गीतेच्या पूर्वीचा (कारण भगवद्गीतेंत ठिकाठिकाणीं सांख्यशास्त्राचा उल्लेख आहे.) म्हणजे इ. स. पू. २००० व १५०० यांच्या दरम्यानचा आहे, कारण दशोपनिषदांत सांख्यशास्त्राचें नांव नाहीं किंवा त्यांतील मताचा उल्लेख नाहीं. तीन गुण व चोवीस तत्त्वें हा सांख्यमताचा मुख्य भाग आहे, व यांचा उल्लेख दशोपनिषदांत नाहीं. पण काहींचें मत याच्या उलट आहे. कठोपनिषदांत महत् व सत्व असे शब्द आले आहेत, तथापि हे सांख्यशब्द नाहींत व त्रिगुणांचा अगर २४ तत्त्वांचा तर त्यांत कोठें उल्लेख नाहीं.

ऋग्वेदाचें मुख्य उपनिषद् ऐतरेय हें असून कृष्णयजुर्वेदाचें तैत्तिरीयोपनिषद आहे. त्याचप्रमाणें यजुर्वेदाच्या मैत्रायणी शाखेचें मैत्रायणीयोपरिषद निराळें आहे. दशोपनिषदांनंतरचें ऋग्वेदाचें कौषीतक्युपनिषद हें महत्त्वाचें असून श्रीमच्छंकराचार्यांनीं देखील त्यांतून आधार घेतले आहेत. कृष्णयजुर्वेदाचें दुसरें महत्त्वाचें श्वेताश्वतरोपनिषद् आहे पण तें दशोपनिषदांच्या अलीकडचें आहे. अलीकडील उपनिषदांतून शिव व विष्णु यांत भेद दाखविला आहे. ज्यांत शिव व विष्णु व त्यांचे अवतार यांचे उल्लेख आहेत तीं उपनिषदें अलीकडचीं समजावीं. उपनिषदांतील वेदांतविद्या शिव व विष्णु यांत भेद दर्शवीत नाहीं. दशोपनिषदांचा ' ज्ञानान्मोक्षः ' ह च सिद्धांत ठरलेला आहे. असो; सामवेदाचें छांदोग्योपनिषद हें मोठें असून तें छांदोग्य ब्राह्मणांतीलच आहे. शुक्लयजुर्वेदाचें बृहदारण्यकोपनिषद हें सर्वोत्कृष्ट आहे. एकंदर सर्व उपनिषदांत छांदोग्य व बृहदारण्यक हीं उत्तम असलीं, तरी त्यांतल्या त्यांत बृहदारण्यक हें पहिल्या प्रतीचें आहे. हें वाचीत असताना भारतीयांनाच आनंद होतो असें नाहीं, तर मॅकडोनेलसारख्या इंग्रज पंडिताचीही तीच स्थिति होते अशी त्यानें कबुली दिली आहे.याचीं तीन कांडें असून त्या प्रत्येकाचे दोन अध्याय आहेत.पहिल्या व दुसऱ्या कांडांतयाज्ञवल्क्याची व त्याच्या पत्नीची गोष्ट दुबार आली असून त्यांत बरेंच शब्दसाम्य आहे. यावरून या उपनिषदाचे निरानिराळे भाग निरनिराळ्या ऋषींनीं तयार केले असून ते एके ठिकाणीं जुळविले गेले असावे असें दिसतें. या प्रत्येक कांडाच्या शेवटीं वंश आहे. तो अर्थात् तीनदां आला आहे आणि निरनिराळा आहे. उपनिषद्विद्येचे आचार्य व त्यांचे वंश यांत सांगितले असल्यामुळें हा भाग ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाचा आहे. पण या भागावर भाष्य नसून एकाही वैदिकाकडून

मला त्याचें स्पष्टीकरण अद्याप मिळालें नाहीं. पहिल्या कांडाचें मधुकांड असें नांव असून दुसऱ्याचें याज्ञवल्क्यकांड असें नांव आहे. या उपनिषदाचा प्रारंभ अश्वमेधाच्या रूपकापासून आहे. मेध्य अश्वाचें शिर म्हणजे उषस अशा प्रकारचें रूपक त्यांत असून त्याचें ज्ञान करून घेणें म्हणजेच अश्वमेध करणें होय असें त्यांत सांगितलें आहे. शुक्लयजुर्वेदांत अश्वमेध व पुरुषमेध यांसंबंधीं माहिती विशेष आहे. त्या यज्ञांस कंटाळून गेलेल्या विद्वान् आचार्यांनीं ज्ञानमार्ग स्वीकारला असावा असें दिसतें. वेदांतील कर्मकांडाचे व उपनिषदांतील ज्ञानकांडाचे आचार्य निरनिराळे आहेत, हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. दुसऱ्या कांडांत याज्ञवल्क्य व जनक यांचे उत्कृष्ट संवाद आहेत. या उपनिषदासारखा उत्तम ग्रंथ पृथ्वीवर दुसरीकडे असेल असें वाटत नाहीं. आत्म्याच्या संसरणाची कल्पना वैदिक संहितेंत थोडी आहे, पण छांदोग्य व बृहदारण्यक या उपनिषदांतून ती स्पष्ट आहे. छांदोग्यांत 'ॐ' चे फार महत्व असून पुष्कळ वेळां त्यावर चांगलीं रूपकें केलीं आहेत. सामवेदांतील तलवकाराचें तलवकारोपनिषद् आहे, त्यासच पुढें केनोपनिषद् हें नांव मिळालें.

अथर्ववेदाचीं पुष्कळ उपनिषदें आहेत. त्यांत प्रश्नोपनिषद्, मुण्डकोपनिषद व जाबालोपनिषद् हीं मुख्य आहेत. प्रश्नोपनिषद् हें पिप्पलाद शाखेचें आहे. मुंडक म्हणजे संन्यासी व त्यांचें उपनिषद तें मुंडकोपनिषद असा अर्थ आहे. मांडूक्य हें लहान उपनिषद अथर्ववेदाचेंच असून त्यांत 'ॐ' काराचें विशिष्ट तऱ्हेचें वर्णन आहे. 'अल्लोपनिषद' हें अकबरास श्रेष्ठत्व देण्याकरतां कोणी लिहिलेलें असून तें त्यानें अथर्ववेदासच चिकटविलें आहे.

शेवटीं हें सांगणें जरूर आहे कीं, माण्डूक्योपानिषद् हें लहान असलें तरी त्यास गौडपादाच्या कारिकांनीं महत्त्व आलें आहे. गौडपादाचा शिष्य गोविंद व गोविंदाचा शंकर अशी समजूत आहे या कारिकांत गौडपादानें माण्डूक्यावर स्पष्टीकरण केलें असून पुढें आपला मायासिद्धांत दिला आहे, व याच आधारावर शंकराचार्यांनीं आपलें मत बनवून तें सर्व दशोपानिषदांस, गीतेस व सूत्रांस लावून दाखविलें आहे.

वेदांगज्योतिषाचा काल इ. स. पू. १४०० हा आपण मागें ठरविलाच आहे. आणि या आधारानें ज्योतिषविषयक उल्लेखांवरून मैत्रायणीयोपनिषदाचा काल लोकमान्यांनीं गीतारहस्यांत (पान ५४७) इ. स. पू. १८८० ते १६८० च्या दरम्यानचा ठरविला आहे. मैत्रायाणीयोपनिषद हें दशोपनिषदांपैकीं नाहीं, व त्यांत छांदोग्यादि उपनिषदांतील उतारे घेतले आहेत. यावरून दशोपनिषदांचा काल इ. स. पू. २००० पर्यंतचा जो आपण ठरविला आहे, त्याला ही गोष्ट उपोद्बलक ठरते.

औपनिषदिक तत्त्वज्ञान क्षत्रियांनींच काढलें असून ब्राह्मण यज्ञयागादि कर्मांत गुंतले होते असें कांहीं पाश्चात्यांचें मत आहे. आणि यास छांदोग्योपनिषदाचा आधार देण्यांत येतो. काहीं ब्राम्हण अश्वपति या क्षत्रिय राजाकडे जाऊन त्यांनीं आपणास ब्रह्मविद्येचा उपदेश करण्यास सांगितलें, अशी छांदोग्यांत कथा आहे. पण एवढ्याच आधारावरून औपनिषदिक विद्या ब्राह्मणांची नसून क्षत्रियांची आहे असें म्हणणें योग्य नाहीं. यास प्रत्युत्तर म्हणून बृहदाण्यकांतील याज्ञवल्क्य जनक संवाद त्यांचेपुढें टाकतां येईल. असो. त्यावेळीं ब्राह्मण व क्षत्रिय हे दोन्हीही वर्ण वेदाचा व त्यांतील तत्त्वज्ञानाचा

अभ्यास करण्यांत सारखेच तन्मय व अधिकृत असत, ही एकच गोष्ट यावरून सिद्ध होते.

## वेदांगें.

इतका वेळपर्यंत आपण वाङ्मयाच्या अपौरुषेय भागाविषयीं म्हणजे वेदाविषयीं विचार केला. उपनिषदें देखील वेदांतच अंतर्भूत होतात. 'मंत्रब्राह्मणयोर्वेद नाम' अशी वेदाची व्याख्या असून ब्राह्मणांचा भाग आरण्यकें व आरण्यकांचा भाग उपनिषदें होत. आतां पौरुषेय भागाविषयीं विचार करूं. उपनिषदांनंतर वेदांगें निर्माण झालीं. हीं ६ आहेत. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष.

## कल्प.

यांतील मुख्य भाग कल्प, कल्पसूत्रें अगर सूत्रें हा होय. यांत तीन प्रकार आहेत. श्रौतसूत्रें, गृह्यसूत्रें, व धर्मसूत्रें. यांचा जेथें आधार देण्यांत येतो, तेथें 'इति श्रुतिः' असें म्हणत नसून 'इति स्मृतिः' असेंच म्हणण्यांत येतें. श्रौतसूत्रें हीं सर्वांत जुनीं आहेत. ब्राह्मणांत यज्ञयागाचें वर्णन एकतंत्री नसून मधूनमधून सुचेल तसें दिलें आहे. पण श्रौतसूत्रांत तें सुव्यवस्थित रीतीनें दिलें आहे. ब्राह्मणांतील यज्ञक्रियेचें सविस्तर वर्णन यांत आहे. पाश्चात्यांच्या मतें वेदांगांचा काल इ. स. पू. ५००–२०० हा आहे. माझ्या मतें तो इ. स. पू. १८००–८०० असा आहे. वेदांगज्योतिषाचा इ. स. पू. १४०० हा काल ठरलेला आहे हें पुढें येईल. या वेदांगज्योतिषाच्या निश्चित कालामुळें पाश्चात्यांनीं ठरविलेला वेदांगांचा काल लंगडा पडतो. वेदांगांपैकीं पाणिनीचें व्याकरण हें मीं सर्वांत शेवटचें धरतों, व त्याचा काल माझ्या मतें इ. स. पू. ८०० हा आहे. हें विस्तारानें पुढें सांगण्यांत येईल. प्रत्येक

वेदास जसें एक किंवा अनेक ब्राह्मण, त्याचप्रमाणें एक अगर अनेक श्रौतसूत्रेंही लागलीं आहेत. शाखा हा शब्द ब्राह्मणांवरून पडलेला असून चरण हा शब्द कल्पसूत्रांवरून पडला आहे. 'न पृच्छेद्गोत्रचरणे' असें एका स्मृतींत वचन आहे. ऋग्वेदाचीं आश्वलायन व शांखायन अशीं दोन श्रौतसूत्रें आहेत. दुसऱ्या सूत्राचे लोक उत्तरहिंदुस्तानांत जास्त असून पहिल्याचे दक्षिण हिंदुस्तानांत जास्त आहेत. आश्वलायनसूत्र हें ऐतरेय ब्राह्मणाचें आहे. हा आश्वलायन शौनकाचा शिष्य होता. सामवेदाचीं मशक, लाट्यायन व द्राह्यायन अशीं तीन सूत्रें आहेत. शुक्लयजुर्वेदाचें कात्यायनसूत्र शतपथ ब्राह्मणास धरून आहे. कृष्णयजुर्वेदांतील—तैत्तिरीयशाखेचीं—आपस्तंब, हिरण्यकेशिन्, बौधायन व भारद्वाज अशीं चार सूत्रें आहेत. हिरण्यकेशीसूत्र अपुरें असल्यानें त्या शाखेचे लोक आपस्तंबसूत्र घेतात म्हणून हिरण्यकेशी ब्राह्मणांस आपण आपस्तंब म्हणतों. मैत्रायणी शाखेचीं मानव व वैखानस अशीं दोन श्रौतसूत्रें असून, त्यांपैकीं पहिलें छापलें आहे व दुसरें छापून प्रसिद्ध झालें नाहीं. अथर्ववेदाचें वैतानसूत्र आहे.

वाङ्मयाचा हा कल्पसूत्रांचा भाग यज्ञक्रियावर्णनपर असल्यानें विशेष चित्ताकर्षक नाहीं. अग्न्याधानांत स्थंडिलाचा आकार कसा असावा, त्याला किती विटा लागतील वगैरेचें वर्णन करण्याच्या कारणानें भूमितिशास्त्र प्राचीन काळीं आपल्यांत उत्पन्न झालें आहे. हा भाग शुल्वसूत्रांत आहे. भूमितिशास्त्र प्रथम ग्रीक लोकांत निर्माण झालें अशी इतके दिवस पाश्चात्यांची कल्पना असल्यानें त्यांस या गोष्टीचें आश्चर्य वाटतें.

श्रौतसूत्रांत गृह्यकर्माविषयीं माहिती नसल्यानें त्याकरतां गृह्यसूत्रें निर्माण झालीं. ऋग्वेदाचीं शांखायन, आश्वलायन व शांभव्य अशीं

तीन गृह्यसूत्रें असून सामवेदाचीं गोभिल (हें फार मोठें आहे) व खादिर अशीं दोन आहेत. शुक्लयजुर्वेदाचें पारस्कर या नांवाचें गृह्यसूत्र आहे. याज्ञवल्क्यस्मृति याच्या आधारानें केलेली आहे असें पाश्चात्यांचें मत आहे. कृष्णयजुर्वेदाचीं आपस्तंब, हिरण्यकेशि, बौधायन, मानव, भारद्वाज, काठक, वैखानस अशीं सात गृह्यसूत्रें असून अथर्ववेदाचें कौशिक हें आहे. मानवधर्मसूत्रांत चार विनायकांची भक्ति सांगितली असून पुढें या विनायकांचें एका गणपतींत रूपांतर झालें. गृह्यसूत्रांत विशेषतः संस्काराचे नियम आहेत. हे संस्कार त्यांत ४० दिले आहेत आणि हल्लीं आपण १६ मानतों. गृह्यसूत्रांच्या होमहवनक्रिया आवसथ्य म्हणजे वैवाहिक अग्नीवर होत असतात.

गृह्यसूत्रांत राजधर्म, वारसाचे हक्क वगैरे कायद्याच्या गोष्टी येत नसल्यानें त्या सांगण्यासाठीं धर्मसूत्रें निर्माण झालीं. यांपैकीं फक्त तीनच शिल्लक राहिलीं आहेत. यांत इतर धर्मसूत्रांतील आधार घेतले असल्यामुळें पूर्वीं बरींच धर्मसूत्रें असावीं हें स्पष्ट दिसतें. हल्लीं शिल्लक असलेलीं तीन तैत्तिरीय शाखेस धरून आहेत. यांपैकीं गौतमधर्मसूत्र हें मुख्य असून दुसरीं दोन आपस्तंब व हिरण्यकेशि यांचीं आहेत. बौधायन व वसिष्ठ यांचींही धर्मशास्त्रें आहेत. धर्मसूत्रें व धर्मशास्त्रें यांच्याच आधारानें पुढें स्मृतिग्रंथ निर्माण झाले.

वसिष्ठ व गौतम यांच्या धर्मसूत्रांचा काळ इ. स. पू. ९०० सुमाराचा निश्चित होतो. पूर्वीं मनूचेंही धर्मशास्त्र असावें व त्यावरूनच हल्लींची मनुस्मृति तयार झाली असावी. शंखलिखितांचें धर्मसूत्र होतें व त्यावरून शंखलिखित स्मृति झाली आहे.

या धर्मशास्त्रांत दिलेले नियम किंवा विधि ब्राह्मणांनी नवीन कल्पिलेले नसून ते आर्यलोकांत फार प्राचीन काळापासून चालत

आलेले आहेत असे दिसतें. आर्यलोक पूर्वी एके ठिकाणीं असतां ज्या चाली त्यांच्यांत होत्या त्या, ते निरनिराळ्या ठिकाणीं फांकले तरी त्यांच्यांत कायम राहणें साहजिक आहे. आमच्याकडील सोम पारशी लोकांत होम या नांवानें प्रसिद्ध आहे. आमच्याकडे उपनयनसंस्कारांत मौंजीबंधन असतें, त्याप्रमाणें पारशांतहि आहे. युरोप व आशिया खंडांतील आर्य एके ठिकाणीं असतां त्यांच्यांत प्रचलित असलेल्या चाली हल्लीं दोन्हीकडे आपणांस सारख्याच आढळून येतात. अग्नींत आहुति दिली असतां ती देवांस पोंचते हा समज, लाजाहोमाचा संस्कार, सप्तपदीचा संस्कार, दोन लांकडें घांसून अग्नि उत्पन्न करण्याची तऱ्हा या गोष्टी जशा हिंदुस्थानांत होत्या व आहेत, तशाच त्या रोमन लोकांत प्रचलित होत्या. एकाद्या बांधकामाच्या पायांत मनुष्य अगर दुसरा एकादा सजीव प्राणी यांचा बलि दिल्याशिवाय त्या कामास यश येत नाहीं ही समजूत दोन्हीकडील समाजांत दिसते. स्थंडिल, वेदी वगैरे बांधतांना असाच पूर्वी एकादा पशु अगर खुद्द मनुष्य यांचें डोकें पायांत घालीत असत.

## शिक्षा.

शिक्षा, छंद, व्याकरण व निरुक्त हीं वेदांगें वैदिक भाषेविषयीं विचार करणारीं असल्यानें संलग्न आहेत. शिक्षेंत वेदाचा उच्चार. पठण, त्यांतील अक्षरें, उच्चार, स्वर यांचा विचार केला आहे, ' संधियुक्त ' असाही ' संहिता ' या शब्दांतून एक अर्थ निघतो. पूर्वी कांहीं ऋचांतून संधि केलेले नसावे, व व्यासांनीं वेदाची मांडणी करतांना संधि करून संहिता तयार केल्या, असें एक मत आहे, व तें मान्य करण्यासारखें आहे. संहितेचा उच्चार, त्यांतील संधि व पदपाठ हीं सांगणारें प्रत्येक शाखेचें निरनिराळें प्रातिशाख्य

आहे. हीं प्रातिशाख्यें पाणिनीच्या पूर्वीचीं आहेत. प्रतिशाख्यांवरूनच पाणिनीस वैदिक संधींचे नियम सांगतां आले. ऋग्वेदाचें प्रातिशाख्य आश्वलायनांचा गुरु शौनक यानें केलें आहे. अथर्ववेदाचेंही एक प्रातिशाख्य आहे. यजुर्वेदान्तर्गत तैत्तिरीय संहितेचें प्रातिशाख्य आहे, ते एकाचेंच नसून वीस आचार्यांचें आहे. वाजसनेयि संहितेचें प्रातिशाख्य कात्यायनप्रणीत असून त्यानें शौनक हा पूर्वीचा आचार्य असें म्हटलें आहे.

## छंद.

श्रौतसूत्रांतच छंदासंबंधीं निराळा विचार केला आहे. पिंगलाचें छंदःशास्त्र हें वेदांग समजतात. पण वेदांगांत त्याचा अंतर्भाव कां करण्यांत येतो हें मला समजत नाहीं. परंतु लौकिक वाङ्मयांतील छंदांचाच त्यात मुख्य ऊहापोह केलेला आहे.

आदिमध्यावसानेषु यरता यान्ति लाघवम् ।
भजसा गौरवं यान्ति मनौ तु गुरुलाघवम् ॥

याप्रमाणें त्यांत गण सांगितले आहेत. हे गण पुढील लौकिक वाङ्मयांत आले. पूर्वी वैदिक पद्यरचनेंत गण नव्हते. वैदिक ग्रंथांतील छंद सांगणारे पूर्वी दुसरे ग्रंथ असावे. ऋग्वेद प्रातिशाख्यांत, शांखायनसूत्रांत व त्याचप्रमाणें सामवेदाच्या निदानसूत्रांत छंदांचा विचार केला आहे. कात्यायनाच्या सर्वानुक्रमणींतहि छंदांचा विचार केला आहे.

## निरुक्त

निरुक्त ग्रंथ यास्काचा आहे. निरुक्त म्हणजे प्रत्येक शब्दाची व्युत्पत्ति सांगणें. 'निःशेषेण उक्तिः' अशी निरुक्त शब्दाची व्याख्या कांहींनीं केली आहे ती मला पसंत नाहीं. त्या शब्दांतूनच त्याचा

अर्थ काढणें असा निरुक्त शब्दाचा माझ्या मतें अर्थ होतो. निघंटु (कोश) वर यास्काचा निरुक्त ग्रंथ रचला आहे. निघंटूंत समानार्थी शब्द दिले आहेत. त्यांच्या अनुरोधानें शब्द घेऊन त्या शब्दांचा तसा अर्थ कां झाला याचा विचार करणें म्हणजे निरुक्त होय. प्रत्येक शब्दांत मूळ धातु आहे, व त्यावरून त्या शब्दास तो विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे हा निरुक्ताचा मुख्य सिद्धांत होय व तो अलीकडे बहुतेक मान्य झाला आहे. ऋग्वेदांतील ऋचा निरुक्तांत मधून मधून 'इत्यपि निगमो भवति' म्हणून दिल्या आहेत.

## इतर किरकोळ ग्रंथ.

परिशिष्ट म्हणजे पुरवणी. गृह्यपरिशिष्ट, सूत्रपरिशिष्ट हीं बरींच अलीकडचीं आहेत. विवाह वगैरे संस्कारांचेही प्रयोग पुष्कळ निघाले आहेत. कांहीं कारिकाही झाल्या आहत. निरनिराळ्या अनुक्रमणी मात्र फार प्राचीन व उपयुक्त आहेत. कात्यायनाच्या सर्वानुक्रमणींत निरनिराळ्या सूक्तांचे छंद, ऋषि, देवता वगैरे सांगितल्या असून त्यांत वेदाची सूक्तसंख्या, ऋचांची संख्या, पद संख्या, अक्षर संख्या वगैरे सर्व तऱ्हेनें मोजदाद केली आहे. शिवाय छंदोनुक्र .णी, आर्षानुक्रमणी, अनुवाकानुक्रमणी अशा निरनिराळ्या अनुक्रमणी आहेत. बृहद्देवता हा ग्रंथ अलीकडे सांपडला असून तो फार उपयुक्त आहे. त्यांत सूक्तांच्या देवतांची माहिती असून अनेक सूक्तांची कथाही दिलेली आहे. प्रत्येक परिशिष्टांत प्रवराध्याय असतो, त्यावरून प्रत्येक गोत्राचे प्रवर आपणांस समजतात. चरणव्यूह हा अलीकडचा ग्रंथ असून त्यांत वेदाच्याच चरणांसंबंधीं माहिती दिली आहे.

वेदावरील सायणाचार्यांच्या भाष्यामुळें वेदाचा अर्थ आपणांस लागतो. यापूर्वी देखील कांहीं भाष्यें असावीं, व त्यांचा समावेश सायण भाष्यांत झाला आहे. इ. सनाच्या चौदाव्या शतकांत

विजयनगरास बुक्क राजा राज्य करीत असतां त्या राज्यांत सायण हा दिवाण होता. त्याचा भाऊ माधव ऊर्फ विद्यारण्य हा पुढें शृंगेरी मठाचा शंकराचार्य झाला. सायण हा इ. स. १३८७ त वारला आणि त्यानें आपलें ग्रंथ बुक्क (इ. स. १३५०–७९) व त्याच्या पुढील राजा हरिहर (इ. स. १३७९–९९) या दोन राजांच्या कारकीर्दींत लिहिले. याप्रमाणें वैदिक वाङ्मयाचा इतिहास सायणाचार्यांपर्यंत नेऊन ठेवणें इष्ट आहे.

## ज्योतिष.

वेदांगज्योतिष हा ग्रंथ लगधानें केला आहे असें म्हणतात ऋग्वेद व यजुर्वेद या दोन वेदांचें हें अंग आहे; आणि दोघांच्या ग्रंथांत फारसा फरक नाहीं. यजुर्वेदाचे ज्योतिषांत कांहीं श्लोका जास्त आहेत, व कांहीं थोडे पाठभेद आहेत. या ग्रंथांतील सर्व श्लोकांचा अर्थ अद्याप लागला नाहीं. दुर्बोध असे १३ श्लोक असून त्यापैकीं तिहींचा अर्थ लोकमान्यांनीं लावला आहे पण अद्याप लोकमान्यांनीं लावलेले अर्थ प्रसिद्ध झाले नाहींत. या वेदांगज्योतिषाचा काल निश्चित रीतीनें इ. स. पू. १५०० असा ठरवितां येतो हें मागें सांगितलेंच आहे, आणि याच काळामुळें एकंदर वैदिक वाङ्मयाच्या काळासंबंधानें आपणांस निश्चित अनुमानें काढतां येतात. पाश्चात्य लोक या वेदांगास इ. स. पू. ५०० च्या सुमारास घालतात व त्याप्रमाणें इतर वैदिक वाङ्मयाचे काल ठरवितात. आपल्यास त्याहून बरींच वर्षें मागें वेदांगासंबंधानें जावें लागतें.

या वेदांगांत ' पंचसंवत्सरमयम् ' असें युग प्रथम कल्पिलें आहे. वैदिक कर्मक्रियेस ज्योतिषाची फार जरूरी आहे हें उघड आहे. कारण अमावास्या, पौर्णिमा, दक्षिणायन, उत्तरायण इत्यादि

कालांच्या अनुरोधानें ठरविलेले यज्ञ वैदिककालीं होत असल्यानें सूर्यचंद्रांची गति मुख्यतः आकाशांत पाहण्याची वैदिक लोकांत प्रवृत्ति झाली असावी व ज्योतिषाचा अभ्यास झाला असावा. नक्षत्रविद्या म्हणून छांदोग्योपनिषदांत ज्योतिषाचा उल्लेख आहे. सूर्यावरून ऋतुमान बदलतें व वर्ष हा कालविभाग उत्पन्न होतो. चंद्रावरून पौर्णिमा अमावास्या उत्पन्न होऊन मासविभाग ठरतो. परंतु सूर्य आणि चंद्र यांच्या गतींनीं उत्पन्न होणारे हे कालविभाग दोन्हीही आम्हीं भारतीय आर्य मानीत असल्यानें एका कालगणनेंत कसे आणावे याची प्राचीनकालीं मोठी पंचाईत पडली असावी, आणि हे एकत्र करतांना पांच वर्षांचें एक युग त्यांनीं मानलें असावें. वैदिककालीं वर्षाची पूर्ण माहिती नसून ठोकळ रीतीनें वेदांगज्योतिषांत ३६६ दिवसांचें वर्ष मानलें. प्राचीन लोकांत ३६० दिवसांचें साधारण वर्ष मानून कमीअधिक दिवस घालण्याचा प्रघात होता असें दिसतें. पारशी लोकांत पांच दिवस अधिक घालतात हें प्रसिद्ध आहे. इजिप्शियन लोकांत ३६५$\frac{1}{4}$ दिवस ही वर्षाची व्याप्ति ठाऊक असून १४६१ वर्षांचें एक युग ( Cycle ) मानीत असत. आपल्याकडे पांच वर्षांचें युग मानलें आहे हें ३६६ दिवसांच्या अनुरोधानें चांद्र महिन्यापेक्षां १२ दिवस वाढले असून पांच वर्षांनीं बरोबर दोन महिने अधिक घालतां येतात. म्हणजे पांच वर्षांनीं एक संबंध ऋतु मागें ढकलावा लागतो. अशा प्रकारची व्यवस्था प्रारंभीं झाली असावी आणि भीष्माच्या महाभारतांतील वाक्यांत ‘ पंचमे पंचमे वर्षे द्वौ मासा उपजायते ’ असें म्हटलें आहे तें या प्राचीन परिस्थितीवरून असावें असें माझें मत आहे. म्हणजे पांच वर्षे चांद्रमास मानून २ महिने सौरवर्षाशीं जुळून येण्याकरितां एकदम अधिक घालण्याचा सांप्रदाय त्यावेळीं असावा. वेदांगज्यो-

तिषांत दर अडीच वर्षांनीं एक आधिक महिना घालण्याचा हिशेब दिला आहे. म्हणजे वेदांग ज्योतिषाचे वेळीं अधिक श्रावण व अधिक माघ असे दोन अधिक महिने अडीच वर्षांना ठरलेले होते. पांच संवत्सरांचें युग ही कल्पना वैदिक आहे व त्या वर्षांचीं नांवें इदावत्सर, संत्वसर परिवत्सर वगैरे ठरलीं होतीं तीं वैदिक वाङ्मयांत येतात. हें युग कृतयुगादि चार युगांच्या कल्पनेहून भिन्न आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कृतादि चतुर्युगाची कल्पना वैदिकच आहे. कारण ऐतरेय ब्राम्हणांत ' कलिः शयानो भवति ' वगैरे श्लोक आहे. त्याचप्रमाणें भगवद्गीतेंत ' चतुर्युग सहस्राणि ' हें वचन आलेलें आहे. पण या युगाचीं वर्षे किती हें त्या वेळीं नक्की ठरलेलें नसावें असें वाटतें.

वेदांगज्योतिषाची पद्धत २७ नक्षत्रांवर बसलेली आहे. प्राचीन काळा भारतीय आर्यांत बारा राशींची कल्पना नव्हती; ती आपल्याकडे मागून आलेली आहे. वैदिक ज्योतिष सत्तावीस नक्षत्रांवर बसलेलें आहे. आणि सूर्यचंद्रांची गति या सत्तावीस नक्षत्रांच्या अनुरोधानें दिलेली असते. अठ्ठाविसावें नक्षत्रही कल्पिलेलें आहे. वेदांगज्योतिषांत दक्षिणायनउत्तरायणाचा दिवस काढण्याचीही पद्धत दिली आहे. यज्ञक्रियेसंबंधीं विषुवदिनाचीही महती आहे; व तो दिवस काढण्याची पद्धति माहीत असणेंही जरूर होतें. वेदांगज्योतिषकालीं किंवा तत्पूर्वीं प्राचीसाधनही भारतीय आर्यांस ठाऊक होतें, यांत आश्चर्य नाहीं. कारण ईजिप्शियन लोकांस पिरामिड बांधतेवेळीं प्राचीसाधन ठाऊक होतें असें सिद्ध झालें आहे. आणि त्याप्रमाणें तें खाल्डियन लोकांसही माहीत होतें. तेव्हां भारतीय आर्यांस तें प्राचीनकाळींच माहीत असल्याचें नवल नाहीं. मात्र पंचतारा म्हणजे बुध, शुक्र, मंगळ, गुरु व शनि या पांच ग्रहांची

माहिती जरी त्यावेळीं होती तरी त्यांच्या चारांची म्हणजे नक्षत्रांतून गतीची गणितानें काढण्याची पद्धति वेदांगज्योतिषकालीं माहीत नव्हती असें दिसतें.

## पाणिनि.

पाणिनीच्या कालासंबंधीं २ पक्ष आहेत. पाश्चात्य लोक तो इ. स. पू. ३०० च्या सुमाराचा मानतात व मी तो इ. स. पू. ८०० च्या सुमाराचा मानतों. बृहत्कथासरित्सागरांत पाणिनि व कात्यायन या दोघांची एक कथा आहे, त्यांत ते दोघे समानकालीन मानले आहेत. पण हा ग्रंथ इ. स. ११०० च्या सुमाराचा आहे. या ग्रंथाचें मूळ स्वरूप पैशाची भाषेंत इ. स. ६०-७० च्या सुमारास तयार झालें. पण हल्लीं तें उपलब्ध नाहीं. पाणिनीच्या ग्रंथावर कात्यायनानें वार्तिक करून थोडी जास्त माहिती दिली आहे. यावरून बृहत्कथासरित्सागरांतील कथा बनविली आहे. कालिदास व भवभूति, विक्रमादित्य व शालिवाहन अशा प्रसिद्ध व्यक्तींबद्दल अशा समकालीनत्वाच्या गोष्टी बनलेल्या आहेत. पाणिनीनें यवनांचा उल्लेख केला आहे, अर्थात त्यास यवनांची माहिती होती, व म्हणून तो अलेक्झँडर (इ. स. पू. ३००) नंतर झाला असें पाश्चात्यांचें मत आहे. पाणिनि नंतर कात्यायन, व्याडीचा संग्रह व नंतर पतंजलि असा अनुक्रम लक्ष्यांत घेतला असतां पाणिनीस इ. स. पू. ३०० चा मानण्यांत अयुक्तता उत्पन्न होते. व्याडि यानें 'संग्रह' नांवाचा एकलक्षात्मक ग्रंथ केला आहे आणि रामायणांत मारुतीस व्याकरण 'ससूत्रवृत्तिससंग्रहम्' येत होतें असें वर्णन आहे व रामायणाचा काल इ. स. पू. १०० च्या सुमाराचा आहे. यावरून पाणिनि इ. स. पू. ३०० च्या बराच पूर्वी झाला असला पाहिजे हें निश्चित होय. पतंजलीचा काल इ. स. पू. १५०,

कात्यायन इ. स. पू. ३०० आणि त्याच्यापूर्वी बराच पाणिनि असें दिसतें.

पाणिनीच्या सूत्रांत वैदिक भाषेस 'छन्दासि' व लौकिक भाषेस इति भाषायाम् ' असें म्हटलेलें असतें. म्हणजे पाणिनीच्या वेळीं संस्कृत भाषा लोकांच्या बोलण्यांत होती, पाणिनीनंतर ती फक्त पंडितांच्या बोलण्यांत शिल्लक राहिली. बुद्धाच्या वेळीं संस्कृत भाषा मृत म्हणंजे जनसमूहाच्या बोलण्यांतून नष्ट झाली होती, व म्हणून त्यानें आपला उपदेश पाली भाषेंत केला. पण पाणिनीच्या वेळीं संस्कृत भाषा बोलण्यांत होती हें स्पष्ट दिसतें. पाणिनीस प्राकृत भाषा माहीत नाहींत. बुद्ध इ. स. पू, ५०० च्या सुमाराचा आहे व यावरून पाणिनि बुद्धाच्या बराच पूर्वी म्हणजे इ. स. पू. ८०० च्या सुमाराचा असावा असें मानण्यास हरकत नाहीं.

अलेक्झँडरची हिंदुस्थानावर स्वारी होण्यापूर्वी कित्येक शतकें यवन लोक अफगाणिस्थानांत राहिले होते असें अलक्झँडरचा इतिहास लिहिणाऱ्या ग्रीक इतिहासकारांनीं लिहून ठेवलें आहे. अलेक्झँडरपूर्वी कित्येक शतकें ते तेथें राहिले होते असें त्यांनीं स्पष्ट म्हटलं आहे. अफगाणिस्तानांत आल्यावर त्यांची भाषा थोडीशी बदलली यवन म्हणजे मूळचे आयोनियन (Ionion) लोक. हे पूर्वी स्मर्नाच्या आसपास राहात असत. ते अफगाणिस्थानांत राहिले असल्यामुळें व पाणिनी हा पंजाबचा रहिवासी असल्यामुळें त्याला यवनी भाषा व लिपी अवगत असणें अशक्य नाहीं व यवनांच्या उल्लेखावरून तो अलेक्झँडरनंतर झाला असला पाहिजे असें म्हणतां येत नाहीं. यावरून हा आक्षेप पाणिनीचा काल इ. स. पू. ८०० असें म्हणणारांस बाधक होत नाहीं हें दिसून येईल.

गोल्डस्टिकर या जर्मन पंडितानें पाणिनीच्या कालासंबंधानें बरेंच लिहिलें आहे. तो म्हणतो, ' निर्वाणोऽवाते ' असा पाणिनीनें निर्वाण शब्दाचा अर्थ दिला आहे. बुद्धकालीं निर्वाण या शब्दास मोक्ष असा जो अर्थ आला तो पाणिनीच्या वेळीं नव्हता यावरून पाणिनि बुद्धापूर्वींच झाला असला पाहिजे असें ठरतें. पाणिनि हा अतिशय विद्वान असल्यानें तो अर्थ द्यावयाचा राहिला असें म्हणतां येत नाहीं.

दुसरें, पाणिनीनें यास्काचा उल्लेख केला आहे. तो निरुक्तकर्ता यास्कच घ्यावयाचा कीं काय हा प्रश्न उपस्थित होऊं शकेल. पूर्वीं आडनांवें नसल्यानें वंशजांस मूळ पुरुषाच्या गोत्र नांवानेंच ओळखलें जात असे. निरुक्तांत व्याकरणाच्या कांहीं संज्ञा दिल्या आहेत व त्यांचा अर्थही सांगितला आहे. पाणिनीनें त्या संज्ञा अर्थ न सांगतां वापरल्या आहेत. उ० उपसर्गाचा अर्थ पाणिनीनें दिला नाहीं. यावरून पाणिनि यास्कानंतर झाला असें अनुमान गोल्डस्टिकरनें काढलें आहे. अर्थात् पाणिनीस बुद्धापूर्वीं व यास्कानंतर घातलें पाहिजे.

गोल्डस्टिकरचीं वरील मतें बरोबर आहेत; पण त्याचीं कांहीं इतर मतें चूक वाटतात. पाणिनीनें ' आरण्यक ' शब्दाचा अर्थ ' अरण्यांत राहणारा मनुष्य ' असा एकच दिला आहे. ब्राह्मणग्रंथांच्या भागास आरण्यक अशी जी संज्ञा आहे तो अर्थ त्यानें दिला नाहीं. यावरून पाणिनि आरण्यकें व अर्थात् उपनिषदें यांच्या पूर्वींचा असला पाहिजे म्हणजे दशोपनिषदें पाणिनीच्या नंतरचीं असलीं पाहिजेत असें सदर पंडित म्हणतो. पण तैत्तिरीय वगैरे शब्दांची पाणिनीनें व्युत्पत्ति दिली आहे, यावरून सदर ग्रंथ पाणिनीनंतर झाले असें म्हणण्यापेक्षां त्या ग्रंथांस आरण्यक अशी संज्ञा पाणिनीनंतर मिळाली हेंच म्हणणें सयुक्तिक दिसतें.

पाणिनीचें ‘ पुराणप्रोक्तेषु ब्राह्मणकल्पेषु ’ (४–३–१०५) असें एक सूत्र आहे. शाट्यायनानें केलेलें ब्राह्मण तें ‘ शाट्यायनिः ’ हें त्याचें उदाहरण आहे. पण याज्ञवल्क्याचें तें याज्ञवल्कं असा प्रयोग होतो. याज्ञवल्क म्हणजे शतपथ ब्राह्मण. याचा काल इ. स. पू. ३००० हा निश्चित ठरलेला आहे. वरील सूत्रावरून पाणिनि शाट्यायनास पुराण म्हणजे जुना मानतो पण याज्ञवल्यास तो पुराण मानीत नाहीं, अर्थात् तो याज्ञवल्क्याचा समकालीन अगर त्याच्या नंतर थोड्याच दिवसांनीं झाला असावा असें गोल्डस्टिकर अनुमान काढतो. खरें पाहिलें असतां पाणिनीनें वरील नियमास याज्ञवल्क हें रूप अपवाद म्हणून द्यावयास पाहिजे होतें. पण त्यानें त तसें दिलें नाहीं. कात्यायनानें मात्र आपल्या वार्तिकांत ‘ याज्ञवल्कादिषु प्रतिषेधो वक्तव्यः ’ असें स्पष्टीकरण अगर दुरुस्ती केली आहे. पतंजलीनें आपल्या महाभाष्यांत असा प्रतिषेध घालण्याची जरूर कां पडली असा प्रश्न उपस्थित करून ‘ तुल्यकालत्वात् ’ असें त्याचें उत्तर दिलें आहे. तरीपण कोणाशीं तुल्यकालत्व हा प्रश्न अर्धवटच राहतो आणि त्याचें उत्तर कय्यटानें ‘ शाट्यायनस्य ’ असें दिलें आहे. गोल्डस्टिकरचें म्हणणें असें कीं, पाणिनि हा याज्ञवल्क्यास पुराणप्रोक्त मानीत नव्हता म्हणजे पाणिनीच्या वेळीं शतपथब्राह्मण हें ‘ पुराण ’ म्हणजे जुनें मानलें जात नव्हतें. त्याचें हें म्हणणें पतंजलि व कय्यट यांनीं खोडून काडलेंच आहे. पण माझें यास वरील आक्षेपाच्या उत्तराप्रमाणेंच उत्तर आहे, व तें असें कीं, याज्ञवल्कं हें रूप पाणिनीच्यावेळीं प्रचलित नसून तें त्याच्यामागून भाषेंत प्रचलित झालें असावें. पाणिनीची चूक किंवा विस्मृति असें म्हणण्यापेक्षां ‘ याज्ञवल्कं वाजसनेयं ’ हें रूप पाणिनीनंतर पण कात्यायनापूर्वी प्रचारांत आलें असेल, व म्हणून कात्यायनाचे व पाणि-

नांचे दरम्यान बरेच वर्षांचें अन्तर असलें पाहिजे. वरील विवेचनावरून कांहीं कल्प व ब्राह्मणें हीं दोन्ही पुराणप्रोक्त झालीं होतीं हें स्पष्टच दिसून येतें.

गोल्डस्टिकरनें आणखी मुद्दे दिले आहेत ते असे; सांख्य, योग, मीमांसा वगैरे शब्द हल्लींच्या अर्थानें पाणिनीनें व्युत्पन्न केले नाहींत यावरून तो सांख्ययोगमीमांसाशास्त्रांपूर्वी झाला असावा. 'जैमिनिकडार' असें नांव एका सूत्रांत झालें आहे. पण हा जैमिनि मीमांसासूत्रकार नव्हे. जाति व व्यक्ति असे दोनच भेद पाणिनि दाखवितो, तर गौतम आणखी एक आकृति त्यांत घालतो, यावरून तो गौतमपूर्व असला पाहिजे. विशेषापासून तें वैशिषिक असा अर्थ पाणिनीनें वैशेषिक शब्दाचा केला नाहीं, यावरून तो वैशेषिक तत्त्वज्ञानाच्या पूर्वीचा असावा असें दिसतें. 'कार्षक' म्हणजे कृषि करणारा व 'कारि' म्हणजे हातधंदा करणारा असे शब्द पाणिनीनें दिले आहेत, पण ते शब्द हल्लीं भाषेंत नाहींत. उणादि सूत्रें, गण, धातुपाठ हे पाणिनीच्या पूर्वीचे, त्यानें केलेले, कीं त्याच्या नंतरचे हा एक प्रश्न आहे. उणादि सूत्रें पाणिनीच्या पूर्वी शाकटायनानें केलीं असें म्हणतात. तीं पाणिनीनंतरचीं आहेत असें गोल्डस्टिकर म्हणतो. धातुपाठ व गण हेही त्याच्यानंतरचे असावे असें तो म्हणतो. पण ते पाणिनीच्यानंतर तयार झालेले असणें संभाव्य नसून त्यानेंच केले असावे असें मला वाटतें. असो, याशिवाय आणखी कांहीं गोष्टी पाणिनीविषयीं सांगण्यासारख्या आहेत. पाणिनि हा केवळ वैदिक भाषेचें व्याकरण न देतां लौकिक संस्कृत भाषेचेंही देतो. पिंगळाच्या ग्रंथांत वैदिक छंदांविषयीं थोडेंच वर्णन असून त्याला जसें वेदांगांत घालण्यांत येतें, तीच गोष्ट पाणिनीचीं

सुमारें ¼ सूत्रें वैदिक व्याकरणाचीं असल्यामुळें त्यासही लागू पडतें. याजबद्दल पुढें जास्त उल्लेख येईल.

'कुमारश्रमणादिभ्यः' असें एक पाणिनीचें सूत्र आहे. यांतील श्रमण हा शब्द बौद्धांच्या श्रमणांस उद्देशून आहे असें वाटण्याचा संभव आहे, पण हा शब्द बुद्धपूर्व वाङ्मयांतील असून बौद्धांनीं तो तेथून घेतला आहे. 'शूद्राणामनिरवसितानाम्' असें एक सूत्र आहे. यावरून कित्येक शूद्र त्यावेळीं बहिष्कृत नव्हते असें दिसतें. कांहीं नगरांची नांवें 'पुत्रान्त' आहेत असें एका ठिकाणीं म्हटलें आहे, पण तेथें स्पष्ट पाटलिपुत्राचा उल्लेख नाहीं. यामुळें त्यास पाटलिपुत्राच्या स्थापनेनंतरचा म्हणजे ( इ. स. पू. ४०० नंतरचा ) मानण्याची आवश्यकता नाहीं. पाणिनीच्या ग्रंथावरून त्यांच्या वेळीं हयात असलेलें बरेंचसें वाङ्मय आज नष्ट झालेलें आहे असें दिसतें. 'पाराशर्यशिलालिभ्यां भिक्षुनटसूत्रयोः' असें एक सूत्र आहे. यावरून ( पाराशरी हा शब्द संस्कृतात संन्यासी या अर्थी आहे. ) पाराशर्याचें भिक्षुसूत्र त्यावेळीं असावें, पण तें हल्लीं उपलब्ध नाहीं. वेदान्तसूत्रापूर्वीं हें असावें. असा कांहींचा व माझा तर्क आहे. त्याचप्रमाणें शिलालीच्या नटसूत्राचें नांव देखील हल्लीं ठाऊक नाहीं. हल्लीं नाट्यशास्त्राचा पहिला कर्ता भरत अशी समजूत आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्या सूत्रांत उल्लेखित असलेलीं कर्मन्दाचें भिक्षुसूत्र व कृशाश्वाचें नटसूत्र हीं देखील हल्लीं उपलब्ध नाहींत.

देशांतील लोकांच्या नांवावरून त्या देशाच्या राजाचें नांव साधण्याची पद्धत पाणिनीनें सांगितली आहे. येथें सांगितलेलीं कित्येक नांवें महाभारतांत देखील नाहींत.* यावरून महाभारतापूर्वीं बराच पाणिनि झाला असावा असें दिसतें.

---

* प्रात्यग्रथिः कालकूटि सौरमस वगैरे.

भाषेच्या दृष्टीनें प्राच्य व उदीच्य असे दोन भेद पाणीनी-कालीं झाले होते. तो तक्षशिला नगरीचा म्हणजे मध्यभागांतील असल्यामुळें दोन्ही प्रकार त्याला अवगत होते. दक्षिणेकडील लोकांच्या नांवांची सिद्धि पाणिनीनें केलेली नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांचा उल्लेखही त्यानें केला नाहीं, व कात्यायनानें तो केला आहे यावरून डॉ. भांडारकर यांनीं पाणिनीच्या वेळीं दक्षिणेंत आर्य लोकांची वसति नव्हती, व कात्यायनाच्या वेळीं ती झाली होती असें अनुमान काढलें आहे, तें बरोबर आहे कात्यायनाचे वेळीं (इ. स पू. ३०० हिंदुस्थानावर अलेक्झँडरची स्वारी याच सुमारास झाली) दक्षिणेची माहिती संपूर्ण होती. अलेक्झँडर हा विद्वान असून त्यानें आपल्या बरोबर सर्व प्रकारचे विद्वान लोक आणले होते, त्यांत इरॅटॉस्थॅनीस हा भूगोलशास्त्रज्ञही होता. त्यानें हिंदुस्थानच्या किनाऱ्याची लांबी दिली आहे; तींत व हल्लीं ज्ञात असलेल्या लांबींत २५।३० मैलांचेंच अंतर असेल. ही माहिती त्यास पंजाबांतच मिळाली. यावरून सर्व हिंदुस्थानचें किती सूक्ष्मज्ञान त्या वेळीं होतें हें आपणांस दिसून येईल. ही गोष्ट फार महत्वाची आहे. यावरून पाणिनीस अलेक्झँडरच्या बराच पुर्वीः म्हणजे ५०० वर्षें घालण्यास मुळींच हरकत नाहीं. बुध्दाच्या वेळीं (इ. स. पू. ५०० ) अपरान्त, राष्ट्रिक हे दक्षिणेंतील देश माहीत होते व पाणिनि त्यांचा उल्लेख करीत नाहीं, यावरून तो बुद्धाच्या पूर्वीचा असला पाहिजे. 'हैहेपूर्वे प्राचान्' असें एक सूत्र आहे. प्राच्य लोक हांक मारतांना 'हैहे' या संबोधनाचा उपयोग करतात असा त्याचा अर्थ आहे. यावरून सामान्य जनसमूहाच्या बोलण्यांत संस्कृत भाषा पाणिनीच्या वेळीं होती असें दिसतें. 'महाभारत' याचा अर्थ 'मोठा भारत वीर' असा पाणिनीनें

सुमारें $\frac{1}{4}$ सूत्रें वैदिक व्याकरणाचीं असल्यामुळें त्यासही लागू पडते. याजबद्दल पुढें जास्त उल्लेख येईल.

'कुमारश्रमणादिभ्यः' असें एक पाणिनीचें सूत्र आहे. यांतील श्रमण हा शब्द बौद्धांच्या श्रमणांस उद्देशून आहे असें वाटण्याचा संभव आहे, पण हा शब्द बुद्धपूर्व वाङ्मयांतील असून बौद्धांनीं तो तेथून घेतला आहे. 'शूद्राणामनिरवसितानाम्' असें एक सूत्र आहे. यावरून कित्येक शूद्र त्यावेळीं बहिष्कृत नव्हते असें दिसतें. कांहीं नगरांची नांवें 'पुत्रान्त' आहेत असें एका ठिकाणीं म्हटलें आहे, पण तेथें स्पष्ट पाटलिपुत्राचा उल्लेख नाहीं. यामुळें त्यास पाटलिपुत्राच्या स्थापनेनंतरचा म्हणजे ( इ. स. पू. ४०० नंतरचा ) मानण्याची आवश्यकता नाहीं. पाणिनीच्या ग्रंथावरून त्यांच्या वेळीं हयात असलेलें बरेंचसें वाङ्मय आज नष्ट झालेलें आहे असें दिसतें. 'पाराशर्यशिलालिभ्यां भिक्षुनटसूत्रयोः' असें एक सूत्र आहे. यावरून ( पाराशरी हा शब्द संस्कृतात संन्यासी या अर्थी आहे. ) पाराशर्याचें भिक्षुसूत्र त्यावेळीं असावें, पण तें हल्लीं उपलब्ध नाहीं. वेदान्तसूत्रापूर्वी हें असावें. असा कांहींचा व माझा तर्क आहे. त्याच प्रमाणें शिलालीच्या नटसूत्राचें नांव देखील हल्लीं ठाऊक नाहीं. हल्लीं नाट्यशास्त्राचा पहिला कर्ता भरत अशी समजूत आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्या सूत्रांत उल्लेखित असलेलीं कर्मन्दाचें भिक्षुसूत्र व कृशाश्वाचें नटसूत्र हीं देखील हल्लीं उपलब्ध नाहींत.

देशांतील लोकांच्या नांवावरून त्या देशाच्या राजाचें नांव साधण्याची पध्दत पाणिनीनें सांगितली आहे. येथें सांगितलेलीं कित्येक नांवें महाभारतांत देखील नाहींत.* यावरून महाभारतापूर्वी बराच पाणिनि झाला असावा असें दिसतें.

---

* प्रात्यग्रथिः कालकूटि सौरमस वगैरे.

भाषेच्या दृष्टीनें प्राच्य व उदीच्य असे दोन भेद पाणीनी-कालीं झाले होते. तो तक्षशिला नगरीचा म्हणजे मध्यभागांतील असल्यामुळें दोन्ही प्रकार त्याला अवगत होते. दक्षिणेकडील लोकांच्या नांवांची सिद्धि पाणिनीनें केलेली नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांचा उल्लेखही त्यानें केला नाहीं, व कात्यायनानें तो केला आहे यावरून डॉ. भांडारकर यांनीं पाणिनीच्या वेळीं दक्षिणेंत आर्य लोकांची वसति नव्हती, व कात्यायनाच्या वेळीं ती झाली होती असें अनुमान काढलें आहे, तें बरोबर आहे कात्यायनाचे वेळीं ( इ. स पू. ३०० हिंदुस्थानावर अलेक्झँडरची स्वारी याच सुमारास झाली ) दक्षिणेची माहिती संपूर्ण होती. अलेक्झँडर हा विद्वान असून त्यानें आपल्या बरोबर सर्व प्रकारचे विद्वान लोक आणले होते, त्यांत इरॅटॉस्थॅनीस हा भूगोलशास्त्रज्ञही होता. त्यानें हिंदुस्थानच्या किनाऱ्याची लांबी दिली आहे; तींत व हल्लीं ज्ञात असलेल्या लांबींत २५।३० मैलांचेंच अंतर असेल. ही माहिती त्यास पंजाबांतच मिळाली. यावरून सर्व हिंदुस्थानचें किती सूक्ष्मज्ञान त्या वेळीं होतें हें आपणांस दिसून येईल. ही गोष्ट फार महत्वाची आहे. यावरून पाणिनीस अलेक्झँडरच्या बराच पुर्वीः म्हणजे ५०० वर्षे घालण्यास मुळींच हरकत नाहीं. बुध्दाच्या वेळीं ( इ. स. पू. ५०० ) अपरान्त, राष्ट्रिक हे दक्षिणेंतील देश माहीत होते व पाणिनि त्यांचा उल्लेख करीत नाहीं, यावरून तो बुद्धाच्या पूर्वींचा असला पाहिजे. 'हैहेपूर्वं प्राचान्' असें एक सूत्र आहे. प्राच्य लोक हांक मारतांना 'हैहे' या संबोधनाचा उपयोग करतात असा त्याचा अर्थ आहे. यावरून सामान्य जनसमूहाच्या बोलण्यांत संस्कृत भाषा पाणिनीच्या वेळीं होती असें दिसतें. 'महाभारत' याचा अर्थ 'मोठा भारत वीर' असा पाणिनीनें

दिला आहे. हल्लींचा ग्रंथदर्शक दिला नाहीं. यावरून महाभारत ग्रंथ त्याच्यानंतर निर्माण झाला असें दिसतें. पाणिनीनें कलिंग देशाचा उल्लेख केला आहे, यावरून आर्यलोक पूर्वकिनाऱ्यानें वाढत कलिंगदेशापर्यंत आले होते असें दिसतें.

पाणिनीच्या कालासंबंधानें विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, यांनीं बराच विचार केला असून त्याविषयीं आपलें मत भारत इतिहाससंशोधक मंडळाच्या १८३२ च्या अहवालांत प्रसिद्ध केलें आहे. त्यांच्या मतेंही पाणिनीचा काल इ. स. पू. १०००—८०० हा ठरला आहे. त्यांनीं त्यांची अधिक प्रमाणें दिलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:—

'कंबोजाल्लुक्' हें सूत्र पाणिनीचें आहे त्यावर कात्यायनानें 'कंबोजादिभ्यो लुक्' अशी दुरुस्ती केली आहे, व त्याचा विस्तार 'चोलयवनशक कंबोजेभ्यो लुक्' असा असून चोलराजा, यवनराजा, शकराजा किंवा कंबोजराजा या अर्थी नुसता चोल यवनशककंबोज असा शब्द येतो असें कात्यायनानें सांगितलेलें आहे. चोल, यवन व शक यांच्या राजांसंबधानें पाणिनीनें विसरपणानें उल्लेख केला नाहीं असें म्हणणें योग्य होत नाहीं, तर कात्यायनाचें वेळीं हे शब्द राजा या अर्थी प्रचलित होते व पाणिनीच्या वेळीं नव्हते असें म्हणतां येईल. अर्थात पाणिनीच्या वेळीं यवन राजांची माहिती नव्हती. यावरून पाणिनी अलेक्झँडरच्या पूर्वी झाला असला पाहिजे हें उघड आहे.

दुसरें शक शब्दावरून राजवाडे असें अनुमान काढतात कीं, शकांचें राज्य पाणिनीस माहीत नव्हतें. शकलोक माहीत असले तरी शकांचे राजे पाणिनीस माहीत नसावे. शकांचें राज्य हिंदुस्थान देशाला लागूनच इ. स. पू. ७०० पासून ५५० पर्यंत

होतें, व तें कुरुस, किंवा कायरस् या पारशी राजानें जिंकलें, हें प्रसिद्ध आहे. अर्थात् पाणिनि इ. स. पू. ७०० च्या पूर्वी झाला असावा. याशिवाय प्राकृत भाषा उत्पन्न होण्यापूर्वी व बुद्धापूर्वी तो झाला असावा हेंही राजवाड्यांनीं लिहिलें आहे. तात्पर्य, राजवाड्यांच्या लेखांत आलेल्या प्रमाणांवरून पाणिनीचा काल इ. स. पू. ८०० च्या सुमाराचा ठरतो.

पाणिनीच्या कालासंबंधानें पाश्चात्य लोकांचा मतभेद महत्वाचा असून एकंदर वैदिक वाङ्मयाच्या दृष्टीनें पाणिनीचा काल निश्चित ठरणें अतिशय महत्वाचें आहे. कारण वैदिक वाङ्मयाच्या शेवटीं शेवटीं पाणिनि झाला हें निश्चित आहे व त्याच्या कालानुरोधानें इतर वैदिक वाङ्मयाचे काल निदान मुख्य मुख्य ग्रंथांसंबंधानें ठरविले पाहिजेत. मुख्य ब्राह्मणें व काव्यग्रंथ हे पाणिनीच्या वेळीं प्राचीन झाले होते हें त्याच्या सूत्रांवरून निश्चित होतें. आतां कित्येक ब्राह्मण किंवा सूत्र या संज्ञेचें किंवा उपनिषद या संज्ञेचें वैदिक वाङ्मय पाणिनीच्या सुमारास किंवा पाणिनीनंतरहि झालें याबद्दल वाद नाहीं. पण मुख्य मुख्य वैदिक ग्रंथ पाणिनीच्या पूर्वींचे बरेच प्राचीन आहेत हें निर्विवाद आहे.

छन्दःशास्त्राचा कर्ता पिंगल यास त्यानें लौकिक भाषेंतील छंदांकरितां आपल्या ग्रंथाचा बराच भाग खर्च केल्यामुळें वेदांग कर्त्यांतून बाहेर काढावेंसें वाटतें, कारण त्याच्या ग्रंथाच्या प्रारंभींच त्यानें वैदिक पद्यांत मुळींच नसलेले गण सांगितले आहेत, पण पाणिनीनें जरी वैदिक भाषेच्या व्याकरणाबरोबर लौकिक संस्कृत भाषेचें व्याकरण सांगितलेलें असलें तरी, त्याच्या ग्रंथास वेदांगांतून बाहेर काढतां येणार नाहीं. वैदिक वाङ्मयाचे देखील स्वरयुक्त अशी पद्यमय संहितांची भाषा, व स्वररहित अशी गद्य

उपनिषदें वगैरेंची भाषा असे दोन भेद होतात. पहिल्या वैदिक भाषेचा उल्लेख पाणिनि 'छन्दसि' असाच करतो. आणि या प्राचीन वैदिक भाषेबरोबरच त्यानें अलीकडील वैदिक व लौकिक संस्कृत भाषेचोंहि व्याकरण सांगितलें आहे. यासाठीं पाणिनीचें व्याकरण म्हणजे वैदिक वाङ्मयाचा एक भाग–महत्वाचा पण शेवटचा–आहे. असो, पाणिनीचा व्याकरण ग्रंथ इतका महत्त्वाचा आहे कीं, तो सर्व जगांतील परकीय विद्वानांसही मान्य झाला आहे, आणि त्यामुळें संस्कृत वाङ्मयाबद्दल व पर्यायानें हिंदी लोकांबद्दलही परकीयांस आदर वाटतो.

## –समारोप–

मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, पूर्वीचें बरेंच वैदिक वाङ्मय हल्लीं नष्ट झालें आहे. अतिप्राचीनकाळीं लेखनकला नव्हती. धार्मिक बुध्दीनें जेवढें पाठांतरानें शिल्लक राहणें शक्य होतें तेवढें शिल्लक राहणें साहजिक आहे. धार्मिक विषय खेरीज करून इतर विषयांवरही पूर्वी बरेंच वाङ्मय असावें पण तें धार्मिक नसल्यामुळें लोकांनीं पाठ केलें नाहीं व म्हणून शिल्लक राहिलें नाहीं, असें म्हणतां येतें. चरणव्यूहांत ऋग्वेदाच्या २१ व सामवेदाच्या १००० शाखा सांगितल्या आहेत. यावरून या वेदांच्या इतक्या संहिता भिन्नभिन्न स्वरूपांच्या व निरनिराळ्या सूक्तांच्या होत्या कीं काय हा एक प्रश्न आहे. माझ्या मतें त्या इतक्या नसाव्या. व्यासांनीं वेदग्रथन करतांना तत्कालीन भारतीय आर्य लोकांत जेवढीं सूक्तें होतीं तेवढीं सगळीं संहितेंत समाविष्ट केलीं. कांहीं चुकून राहिलेलीं असणें शक्य आहे. मध्वाचार्यांनीं आपल्या भाष्यांत कित्येक ऋचा 'इति श्रुतिः' म्हणून दिल्या आहेत व त्या हल्लींच्या संहितांतून सांपडत नाहींत. यावरून कांहीं वैदिक वाङ्मय नष्ट झालें आहे असें कांहीं चांगले

आचार्य देखील मानतात. हें उघड आहे. संहितांपेक्षां ब्राम्हणें, कल्पसूत्रें या तऱ्हेच्या वाङ्मयाचा भाग जास्त नष्ट झाला असावा असें वाटतें. 'पुराणप्रोक्तेषु ब्राह्मणकल्पेषु' या पाणिनीच्या सूत्रावरून असे जुने नवे ग्रंथच तयार होतच होते. कांहीं अप्रसिद्ध कल्पसूत्रें हल्लीं प्रयत्नांनीं सांपडतही आहेत. आर्यसमाजाचे लोक वैदिक वाङ्मय शोधून काढण्याचा प्रयत्न करीत आहेत.

आपल्या श्रावणीच्या संस्कारांतील तर्पणक्रियेवरूनहि याबद्दल हेंच अनुमान निघतें. उदाहरणार्थ ऋग्वेदी लोकांचीच श्रावणी घेऊं. ऋषि तर्पणांत ( मंत्र व ब्राह्मण यांचे कर्ते ते ऋषि आणि कल्पसूत्रें वगैरेंचे कर्ते ते आचार्य ) शतर्चिनः वगैरे ऋषींचीं नांवें आहेत. त्यांत गृत्स-मद, विश्वामित्र वगैरे एकेक मंडलकर्ते आहेत. दहाव्या मंडलांत निरनिराळ्या ऋषींचीं सूक्तें आहेत. त्यांपैकीं कांहींनीं थोडीं व कांहींनीं जास्त सूक्तें केलीं आहेत, त्यांस उद्देशून क्षुद्रसूक्त व महासूक्त अशीं नांवें दिलीं आहेत.

आचार्यतर्पणांत 'सुमंतुजैमिनिवैशंपायन पैलसूत्रभाष्यभारतमहाभारत धर्माचार्याः' असें आहे. पहिलीं चार नांवें व्यासांच्या शिष्यांचीं आहेत. त्या प्रत्येकास व्यासांनीं ४ वेद व भारत शिकविलें असें महाभारतांत म्हटलें आहे, व त्या प्रत्येकानें भारताची निरनिराळी आवृत्ति काढली असेंही वर्णन आहे. ( संहितास्तैः पृथक्त्वेन भारत स्य प्रकाशिताः ) मग प्रत्येकाचें भारत जर निरनिराळें होतें, तर प्रत्येकाचें सूत्र व भाष्य देखील निरनिराळें असावें असें वाटतें. पण हल्लीं ते ग्रंथ मुळींच उपलब्ध नाहींत. दुसरें, श्रावणींत जेथें आपण प्रत्येक ग्रंथाचें आदिम वाक्य म्हणत असतों त्यांत ' अथातो धर्मं व्याख्यास्यामः ' असें वाक्य आहे व तें कणादाच्या वैशिषिकांतील आहे असें सांगण्यांत येतें. पण न्याय, सांख्य, योग व वैशेषिक

वेदांस मानीत नाहींत व पहिल्या तिहींचा आदि आपण घेत नाहीं; मग वैशेषिक सूत्रांचाच आदि वैदिक संस्कारांत कां यावा? जर यावयाचा असेल, तर वैशेषिकाबरोबरच सांख्य, योग, न्याय यांचाही कां येऊं नये? कारण षड्दर्शनांपैकीं पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा हीं दोनच वैदिक धर्मास धरून आहेत. यावरून वरील वाक्य हें वैशेषिकाशिवाय दुसऱ्या कोणत्या तरी धर्माचार्यांच्या लुप्त झालेल्या धर्मग्रंथाचें आदिमवाक्य असावें असें वाटतें.

वरील सर्व प्रकार आश्वलायन शाखेचा सांगितला. दुसरा सूत्रकार सांख्यायन याच्या शाखेकडे पाहिलें तर वरील आचार्यसमूहाच्या वाक्यांत तो 'भारतमहाभारतधर्माचार्याः' हे शब्द घालीत नाहीं. तो 'सूत्रभाष्य' हे शब्द मात्र घेतो. हा सूत्रकार आश्वलायनाच्या पूर्वीचा आहे. त्याच्या वेळीं देखील बरींच सूत्रें व भाष्ये व तीं (विशेषतः भाष्यें) हल्ली अनुपलब्ध आहेत, असें दिसतें. तसेंच तर्पणांत ज्या कित्येक आचार्यांचीं नांवें आहेत, तीं नांवें व त्यांचे ग्रंथ यांचा हल्लीं बिलकूल पत्ता नाहीं. यावरून ते ग्रंथ हल्लीं नष्ट झाले आहेत असेंच म्हणावें लागतें. कित्येक नांवें, ऐतरेय कौषीतकी वगैरे आपल्या ओळखीचीं वाटतात, व त्यांचे ग्रंथही हल्लीं उपलब्ध आहेत. पण कहोळ, औदवाहि, पैंग्य वगैरे नांवाच्या आचार्यांचे ग्रंथ कोणते? शिवाय ऐतरेय, महैतरेय, पैंग्य, महापैंग्य, औदवाहि, महौदवाहि अशा जोड्या येतात. आणि भारत, महाभारत यांची आठवण येते. अलीकडे मनु, बृहन्मनु अशीं नांवें देण्याचा सांप्रदाय पडला. असो. हे ग्रंथकर्ते आचार्य फार जुने आहेत. कारण कहोळाचें नांव बृहदारण्यांत आलें आहे. यास कौषीतकेय म्हटलें आहे. म्हणजे हा कौषीतकी नसून कौषीतकीचा पुत्र होता असें दिसतें. असे अनेक जुने आचार्य होऊन गेले असून त्यांचे ग्रंथ लुप्त

झाले आहेत. अर्थात संहितांनंतरचा वैदिक वाङ्मयाचा भाग बराच मोठा असला पाहिजे.

वरील विवेचनावरून ब्राम्हणें व कल्पसूत्रें यांचा बराच भाग लुप्त झाला असावा, संहिताभाग मात्र तितका लुप्त झाला नसावा असें वाटतें. सूत्रग्रंथांचा उल्लेख बृहदारण्यकांत (सूत्राण्यनुव्याख्यानानि व्याख्यानानि) आहे. यांत सूत्रें आणि व्याख्यानें म्हटलीं आहेत; व्याख्यानें हल्लीं उपलब्ध नाहींत. सूत्रग्रंथ फार प्राचीन काळापासून आहेत परंतु त्यांतील फारच थोडे हल्लीं उपलब्ध आहेत. आश्वलायनगृह्यसूत्र वगैरे ग्रंथ अलीकडचे आहेत. अर्थात ते श्रुतिकालाच्या म्हणजे इ. स. पू. ५०० च्याही अलीकडचे आहेत.

# भाग दुसरा.

## स्मृतिकाल.

संस्कृत वाङ्मयकालाचा पहिला भाग इ. स. पू. ५००० ते इ. स. पू. ५००पर्यंतचा होय. या भागांत ऋग्वेदादि संहितांपासून वेदांगांपर्यंत निर्माण झालीं. पाणिनि इ. स. पू. ८०० च्या सुमारास झाला. यापुढील काल म्हणजे स्मृतिकाल (इ. स. पू. ५०० ते इ. स. ८००) या कालांत सर्व लोक संस्कृत भाषा बोलत नव्हते. संस्कृत नाटकांतील प्रतिष्ठित स्त्रीपात्रें देखील प्राकृत बोलतात त्यावरून त्या कालीं बायका संस्कृत बोलत नव्हत्या हें स्पष्ट आहे. आणि जी भाषा स्त्रिया बोलत नाहींत ती बोलण्यांत नाहीं असें मानतां येतें. यामुळेंच बुद्धानें इ. स. पू. ५०० च्या सुमारास उपदेश पालींत केला. पंडित लोक मात्र या काळांत संस्कृत बोलत असत. या काळांत तयार झालेलें वाङ्मय सन्मान्य (Classical)आहे. तिच्या पूर्वींची वैदिक भाषा ईस संस्कृत न म्हटलें तरी चालेल. कारण त्यावेळीं प्राकृत उत्पन्न झाल्या नव्हत्या. त्यांतही स्मृतिकालांत तयार झालेले जे ग्रंथ त्यांतील भाषा प्रौढ संस्कृत होय. वैदिक कालांतील हल्लींचें उपलब्ध वाङ्मय म्हणजे धर्मविषयक अभर वेदांवरील टीका या स्वरूपाचें आहे. स्मृति कालांतील वाङ्मय सर्व तऱ्हेचें आहे. छान्दोग्योपनिषदांतील सनत्कुमार व नारद यांच्या संवादावरून सर्व तऱ्हेचें शास्त्रीय वाङ्मयही वैदिककाळीं अस्तित्वांत होतेंसें दिसतें पण तें सर्व हल्लीं अनुपलब्ध

आहे. त्या वेळचें वाङ्मय लिहून काढलेलें नसल्यामुळें जेवढें लोकांच्या पाठांत राहिलें तेवढेंच आज उपलब्ध आहे. श्रुतिकाळचें वैदिक वाङ्मय धार्मिक असून पाठ केलें असल्यानें राहिलें. स्मृतिकालांतील सर्व वाङ्मय बहुधा लिहिलेलें असून तें कांहीं पाठही होत असावें.पण महाभारतासारखे प्रचंड ग्रंथ पाठ होणें शक्य नाहीं. कांहीं वाङ्मय पाठान्तरानेंहि राहिलें असावें. या प्रकारांत न्याय इत्यादि दर्शनांचीं सूत्रें येतात. कोणी हीं सूत्रें पाठही करीत असतील. असो, ताडपत्र, भूर्जपत्र वगैरेवर लिहून ठेविल्यामुळें स्मृतिकालांतील सर्व प्रकारचें वाङ्मय आपणांस हल्लीं उपलब्ध आहे.

वैदिक वाङ्मयास सुरवात पद्यापासून होऊन पुढें गद्य झालें, त्यांत जवळजवळे $\frac{?}{8}$ भाग पद्यमय असून $\frac{1}{3}$ गद्यमय आहे व तें बहुतेक अनुष्टुप् छंदांत आहे. शास्त्रीय व इतर पुष्कळ वाङ्मयही श्लोकमय आहे गद्याचा कांहीं थोडासा भाग आहे हें खरें. याचें प्रसिद्ध उदाहरण म्हणजे बाणभट्टाची कादंबरी होय. पण गद्य लिहिण्याचा मूळ हेतु जो समजण्यास सोपें पडणें तो या गद्यांत बिलकूल सिद्धीस न जातां ज्यांत लांब लांब समास असतील तेंच गद्य भारदस्त अशी समजूत होऊन हें गद्य क्लिष्ट बनलें. पूर्वीचें वैदिक गद्य मात्र तेजस्वी,ओजस्वी व वक्तृत्व पूर्ण असून, तसें गद्य पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही नाहीं हें पूर्वी सांगितलेंच आहे. स्मृतिकालांतील गद्य मात्र तसें चांगलें नसून वर सांगितल्याप्रमाणें तें पद्यमय मानलें तरी बरेंच क्लिष्ट आहे.

स्मृतिकालांत जसे निरनिराळ्या विषयांवर ग्रंथ झाले, तसे वैदिक कालांत देखील झाले असावे. बृहदारण्यकोपनिष्पांत उल्लेखिलेले इतिहास वगैरे त्यावेळचे ग्रंथ असावे व ते गद्यांत असावे. महाभारतांत देखील कांहीं गद्य आहे. महाभारतांत आरंभींच आलेलें गद्य

पुराणगद्य असून वैदिक उपनिषदांच्या गद्याइतकें सुंदर नसलें तरी पुढील गद्याइतकें क्लिष्ट नाहीं, ही गोष्ट येथें नमूद केली पाहिजे.

दुसऱ्या बाजूनें सूत्रें गद्यांत निर्माण झालीं पण तीं थोडक्यांत सांगावयाची पद्धत अमलांत आल्यानें बरींच क्लिष्ट आहेत. किंबहुना कित्येक सूत्रें भाष्याशिवाय मुळींच समजत नाहींत. एवंच स्मृतिकाळांतील गद्य विशेष प्रशंसनीय नाहीं.'

## —महाभारत—

महाभारत हा स्मृतिकालांतील आद्यग्रंथ होय. पूर्वींचे सर्व इतिहास व पुराणें एकत्र करून हा ग्रंथ बनविला आहे असें दिसतें. या कालास स्मृतिकाल नांव देण्याचें कारण, या कालांतील पहिला ग्रंथ महाभारत स्मृति म्हणून मानला आहे, हेंच होय. महाभारताएवढा प्रचंड ग्रंथ स्मृतिकालांत दुसरा झाला नाहीं. महाभारत हा ग्रंथ इतिहास म्हणून प्रारंभीं लिहिला गेला व पुढें स्मृति ग्रंथ म्हणून त्याचा उपयोग करण्यांत आला. बादरायण वगैरे सूत्रांत जेव्हां महाभारतांतील एकादें वाक्य आधारार्थ उध्दृत केलें जातें तेव्हां त्याचा उल्लेख ' इति स्मर्यते ' अशा शब्दांत केला जातो. वेदांतील एकादें वाक्य देतांना त्याप्रमाणें ' इति श्रुतिः '' इति श्रूयते ' असें म्हणतात, त्याचप्रमाणें 'इति स्मृतिः' अथवा 'इति स्मर्यते' याचा अर्थ महाभारतादि ग्रंथांत म्हटलें आहे असा असतो. रामायणांतील वाक्य याप्रमाणें शास्त्राधाराकरितां घेतलें जात नाहीं. असो. ज्याप्रमाणें वैदिक कालांतील मुख्य ग्रंथ ऋग्वेद व यजुर्वेद, त्याचप्रमाणें स्मृतिकालांतील मुख्य व आद्य ग्रंथ महाभारत व रामायण हे होत. पैकीं महाभारत हा ग्रंथ इतिहास, काव्य व स्मृति ( अथवा धर्मशास्त्र ) या तिन्हीही स्वरूपांचा आहे.

हल्लींचें महाभारत हा एक लक्षात्मक ग्रंथ आहे. हिंदुस्तानचें हें आद्य ‘ एपिक ’ ( आर्ष काव्य—लो. टिळक ) असून पृथ्वीवर इतका मोठा ग्रंथ दुसरीकडे कोठेंही नाहीं. ग्रीक भाषेंतील होमरचें ‘ इलियड ’ व ‘ ऑडेसी ’ या दोन्ही काव्यांच्या मिळून आठपट हा ग्रंथ आहे. ही इलियड व ओडेसी हीं दोनही काव्यें त्याच सुमारार्ची (इ. स. पू. ४००) आहेत. पाश्चात्य विद्वांनाचा कल आमचे ग्रंथ फार प्राचीन नाहींत असें दाखविण्याकडे असल्यामुळें त्यांच्या मतें महाभारत मुळांत इ. स. पू. ४०० च्या सुमारास मुळांत झालें असून त्यास हल्लींचें स्वरूप इ. स. पू. ३०० च्या सुमारास आलें. आणि यास आधार ह्मणून इ. स. ४४२ मधील शिलालेखांत आलेल्या ‘ शतसाहस्र्यां संहितायां वेदव्यासेन व्यासेन उक्तम् ’ असा उल्लेख ते दाखवितात. पण इ. स. पू. ५०० च्या सुमारास हिंदुस्तानांत डायॉनक्रायसोस्टोम (*Dioncrysostom*) या नांवाचा ग्रीक लेखक येऊन गेला; त्यानें हिंदुस्तानांत १ लक्ष श्लोकांचें एक ‘ इलियड’ आहे असें लिहून ठेविलें आहे. यावरून हल्लींच्या महाभारताचा काल निदान इ. स. पू. एक शतकापूर्वींचा असला पाहिजे हें सिद्ध होतें. महाभारतांत ‘ यवन ’ लोकांचा ‘ शूराश्च कृतविद्याश्च ’ असा उल्लेख आहे. यवनांच्या शौर्याची व विद्वत्तेची माहिती आह्मांस शिकंदराच्या वेळीं झाली यावरून त्याचा काल इ. स. पू. ३०० च्या नंतरचा आहे हें सिद्ध आहे. महाभारताचें मूळ जें व्यासांनीं लिहिलें तें इतिहासस्वरूपाचें असावें. त्याला पुराणाचें स्वरूप वैशंपायनानें दिलें व धार्मिक ग्रंथाचें स्वरूप सौतीनें दिलें. त्याचें काव्याचें स्वरूप मुळापासूनचेंच आहे. बौद्धधर्म ज्यावेळीं विशेष प्रचारांत आला, त्यावेळीं तद्धर्मीयांनीं आमच्या रामादि पूज्य विभूति बुद्धाचे पूर्वजन्म होते असें दाखविण्याचा प्रयत्न केला तेव्हां वैदिक आर्य

लोकांस सर्व उत्तम गोष्टी व व्यक्ति आपल्या धर्मांत आहेत असें दाखविणें भाग पडून त्यांनीं जुने सर्व इतिहास एके ठिकाणीं करून, महाभारतास हल्लींचें धर्मग्रंथाचें स्वरूप दिलें. अशा रीतीनें महाभारताच्या द्वारें आर्यधर्मतत्वें लोकांपुढें मांडण्याचा सौतीनें इ. स. पू. २५० च्या सुमारास प्रयत्न केला. असें माझें मत आहे व तें लोकमान्य टिळकांस संमत आहे. ( गीतारहस्य पान ५२० )

महाभारत हा ग्रंथ व्यासांनीं केला नाहीं, 'व्यास' नांवावरून महाभारताचा संग्रह व्यासांनीं केला असें कित्येक लोक ह्मणतात. तें चुकीचें आहे. 'वेदान् विव्यास यस्मात्सः' इत्यादि वाक्यांवरून त्यानें वेदांचा संग्रह केला—महाभारताचा नव्हे. कृष्णद्वैपायन व वेदव्यास हे एकच होत, बादरायणव्यास हा निराळा आहे असें माझें मत आहे. मूळचा व्यासाचा ग्रंथ किती असावा हें नक्की सांगतां येत नाहीं. कूट श्लोकांसंबंधानें

अष्टौ श्लोकसहस्राणि अष्टौ श्लोकशतानि च ।
अहं वेद्मि शुको वेत्ति संजयो वेत्ति वा न वा ॥

असा जो श्लोक महाभारतांत आला आहे, त्यांत दिलेली संख्या ८८०० इतकाच मूळ ग्रंथ व्यासाचा असावा असें पाश्चात्य विद्वान ह्मणतात, पण तें चूक आहे. व्यासांनीं तीन वर्षें रात्रंदिवस मेहनत घेऊन हा ग्रंथ लिहिला असें ग्रंथांतच ह्मटलें आहे. यावरून तो ८८०० पेक्षां जास्त असावा. 'विना उपाख्यानैः' २४००० ग्रंथ भारताचा आहे. असेंही येथेंच म्हटलें आहे. म्हणजे वैशंपायनाचा ग्रंथ २४००० म्हटलें असून पुढें सौतीनें याचा १ लक्ष वाढविला आहे. भगवद्गीता सौतीची नाहीं ती व्यासाची अथवा वैशंपायनाची असावी. सौतीनें कोणकोणत्या उपाख्यानांची भर

घातली हें पुष्कळ अंशीं नक्की ठरवितां येतें. असा प्रयत्न Mahabharata-a criticism या इंग्रजी ग्रंथांत मी केला आहे.

व्यासांनीं लिहिलेल्या महाभारताचा काल ठरावितांना भारतीय युद्धाचा काल आणि त्याच्या इतिहासलेखनाचा काल कोणता हे दोन प्रश्न अगदीं निराळे आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. लो. टिळकांच्या मतें भारतीय युद्धाचा काळ इ.स. पू. १४००–१५०० हा असून माझ्या मतानें तो इ. स. पू. ३००० वर्षेपर्यंत मागें जातो. प्राचीन आर्यग्रंथांचा कालनिर्णय करतांना आपणांस ज्योतिषाची मदत फार उपयोगी पडते. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, शतपथ ब्राम्हणांत 'एता वै कृतिकाः प्राच्यै दिशो न च्यवन्ते' असें वचन आहे. म्हणजे त्यावेळीं कृतिका प्राचीःदिशा सोडून जात नव्हत्या. पण हल्लीं त्या या बिन्दूपासून चळल्या आहेत; या वाक्यावरून शं. बा. दीक्षित यांनीं शतपथ ब्राम्हणाचा काल इ. स. पू. ३००० सुमाराचा ठरविला आहे. त्याचप्रमाणें वेदांग ज्योतिषाचा काल इ. स. पू. १४०० हा दीक्षितांनींच ठरविला आहे. त्यांत 'प्रपद्येते श्रविष्ठादौ सूर्याचन्द्रमसावुदक्' असें वचन आहे. यावरून त्यावेळीं उदगयन धनिष्ठांत होत असे असें स्पष्ट होतें पण हल्लीं तें 'अयनचलन (Precession of the Equinoxes) या गतीस अनुसरून उत्तरापाढांत होत आहे परंतु पाश्चात्यांना हें मत अडल्यानें ते (Reminiscence Theory) म्हणजे असें स्मरणानें म्हणत असावे असा तर्क करून हा काल अनुक्रमें इ.स.पू.१००० व ३००असा समजतात. महाभारतान्तर्गत अनुगीतेंत 'श्रवणादीनि ऋक्षाणि ऋतवः शिशिरादयः' असें म्हटलें आहे. जवळजवळ दर हजार वर्षांनीं संपात बिन्दु एक नक्षत्र मागें सरतो ही गोष्ट लक्ष्यांत घेतली असतां अनुगीतेचा काल इ. स. पू.४००च्या सुमाराचा ठरतो (दीक्षितांचा

इतिहास ) हल्लींची आश्विन्यादि नक्षत्रगणना इ. स. १५०च्या सुमारास सुरू झाली. खरोखर पाहिलें असतां आज गणना उत्तरा-भाद्रपदांपासून व्हावयास पाहिजे. महाभारतांत कृत्तिकादि नक्षत्र-गणना शतपथ ब्राम्हणापासून आहे. त्याचप्रमाणें अनुगतिंत श्रवणादि नक्षत्रगणना सांगितली असल्यामुळें ती इ. स. पू. ४०० ची अर्थात सौतीनें घातलेली दिसते.

आतां या तीन कालांच्या अचल स्तंभानुरोधानें भगवद्गीतेचा काल आपण पाहूं. या कालनिर्णयाच्या बाबतींत भगवद्गीतेंत आपणांस जो जोतिर्विषयक आधार मिळतो तो 'मासानां मार्गशी-र्षोऽहं ऋतूनांकुसुमाकरः' हें वाक्य होय. हें वचन आपाततः विरोधी दिसतें. कारण मासगणना जर मार्गशीर्षापासून केली तर ऋतुगणना वसंत ऋतूपासून न होतां ती हेमंतऋतूपासून झाली पाहिजे. अमर कोशांत ती अशीच आहे.

आतां ही महत्वाची गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, वैदिक ग्रंथांत मार्गशीर्षादि महिन्यांची नांवें नाहींत. त्यांत मासांचीं नांवें मधु, माधव इत्यादि आहेत.मार्गशीर्ष वगैरे नांवें अर्थात या पुढील कालांत पडलीं. ज्या महिन्याची पौर्णिमा मृगनक्षत्रयुक्त असेल तो मार्गशीर्ष मास होय. यावरून ज्योतिषाचें बरेंचसें ज्ञान झाल्यावर ही गणना सुरू झाली असली पाहिजे. मार्गशीर्षादि नांवें सुरू होण्याचा काल शं. बा. दीक्षित यांनीं इ. स. २००० हा ठरविला आहे. अर्थात भगवद्गीता इ. स. पू. २००० नंतरची ठरते. आतां 'ऋतूनां कुसुमाकरः' हा वैदिक कालचा अनुवाद होय. यावरून या रचनेचा काल वैदिक काला जवळ जवळ आहे.या दोन्ही मर्यादा लक्ष्यांत ठेविल्या असतां भगवद्गीतेचा काल इ. स. पू. १५००वर्षांच्या सुमाराचा ठरतो.वेदांग ज्योतिषांत माघ महिन्यां-

पासून वर्षारंभ आहे. यापूर्वींची भगवद्गीता आसावी म्हणजे इ. स. पू. १४०० च्या पूर्वींची असावी.

भगवद्गीतेंत आणखी दोन ज्योतिर्विषयक उल्लेख आहेत. 'सहस्रयुगपर्यंतमहर्यब्द्रह्मणो विदुः'' कल्पादौ विसृजाम्यहम्' या वरून कल्प म्हणजे हजार युगांचा ही कल्पना भगवद्गीता कालीं होती. वेदांत कल्प म्हणजे १००० युगें ही कल्पना सांपडत नाहीं. एक कल्पांत वर्षे किती याची गणना ही केलेली नाहीं. कल्पाची कल्पना ऋग्वेदांतील 'धाता यथापूर्वमकल्पयत्' या वाक्यावरून झालेली दिसते. यावरून सृष्टीच्या उत्पत्ती पासुन लयापर्यंतचा काल म्हणजे कल्प असें ठरविलें. कल्पांत १४ मनु असतात ही कल्पना अगदीं अलीकडची आहे. वेदांत तीन मनूंचाच उल्लेख आहे; आणि स्वायंभुव मनूचें नांव वेदांगांत सांपडतें. भगवद्गितेंत चार मनूंचा उल्लेख आहे. यावरून भगवद्गीता वेदांनंतर व वेदांगांपूर्वी झाली असावी असें अनुमान निघतें. महाभारतांत जरी १४ मनूंचा उल्लेख नाहीं तरी त्या कालीं ती कल्पना अस्तित्वांत होती. १४ मनूंत १००० युगें ही संख्या कशी धरली गेली याचें आश्चर्य वाटेल; कारण १००० या संख्येस १४ या संख्येनें भाग जात नाहीं, पण दोन मनूंमधील संधिकाल म्हणून कांहीं काल मानतात तो लक्ष्यांत धरला असतां ही अडचण दूर होत्ये व हजार युगांत १४ च मनु संध्यासंध्यांशासह बसतात कमी अधिक बसत नाहींत.

कांहीं लोक गीता पाणिनीच्या नंतरच झाली असें मानतात व आधाराकरता 'अक्षराणामकारोऽस्मि द्वंद्वः सामासिकस्य च' हें वचन दाखवून त्यावरून पाणिनीच्या व्याकरणाचा उल्लेख गीतेंत आहे असें दाखवितात. पण व्याकरणाचा ग्रंथ पाणिनीनें एकट्यानें एकदम तयार केला असेल असें दिसत नाहीं. पाणिनि हा वेदांग

कालांतील अगदीं शेवटचा व्याकरणकार असून वेदांगकाळीं व्याकरणाचा चांगला अभ्यास होत होता यावरून गीता पाणिनीच्या नंतरचीच असें सांगता येत नाहीं. शिवाय गीतेंतील कित्येक शब्दांत पाणिनीच्या व्याकरण नियमांचा भंग झालेला दिसतो. यावरून गीता कालीं पाणिनीचीं व्याकरण बंधनें नव्हतीं असें म्हणतां येतें. व म्हणूनच गीता पाणिनीच्या पूर्वीची आहे.

आतां महाभारताच्या भाषेसंबंधानें विचार करूं. संस्कृत भाषा बोलण्यांतून गेल्यानंतरचें स्वरूप महाभारतांतील शेवटच्या भाषेचें आहे. परंतु त्यांत निरनिराळ्या तऱ्हेच्या तीन भाषा सांपडतात, आणि त्या अनुक्रमें व्यास, वैशंपायन व सौति यांच्या असाव्या असें म्हणण्यास हरकत नाहीं. भगवद्गीतेची भाषा संस्कृत भाषा बोलण्यांतून नाहींशी झाली नव्हती त्या वेळची आहे. त्यांत समास बेताचेच असून क्रियापदांचीं निरनिराळीं रूपें योजिलेलीं आढळतात. संस्कृत भाषा जेव्हां बोलण्यांतून नष्ट झाली तेव्हां क्रियापदांचें काम भूत व वर्तमानकाळीं धातुसाधितांवरच भागवून घेण्यांत येऊं लागलें. ज्या वेळीं संस्कृत भाषा बोलण्यांत होती त्यावेळीं क्रियापदांचीं शुध्द रूपें त्यांत घालण्यांत येत असत. ऋग्वेदकालीन शब्द मात्र गीतेंत नाहींत. गीतेंत जवळजवळ पाणिनीचींच रूपें दिसतात.

वर सांगितल्याप्रमाणें महाभारतांतील निरनिराळ्या तीन स्वरूपांची संस्कृत भाषा पाश्चात्य पंडितांसही दिसत असून असा भाषेंत फरक पडण्यास लागणारा २०० वर्षांचा काल आधारास घेऊन त्यांनीं सर्व महाभारत ग्रंथाचा काल ६०० वर्षांचा म्हणजे इ. स. पू. ४०० पासून इ. स. २०० पर्यंतचा ठोकून दिला आहे. पण या म्हणण्यांतच चूक आहे. कारण भाषेचें स्वरूप २०० वर्षांनीं

बदलतें हा सिध्दांत सर्व काळीं सारखा लागू पडत नाहीं. भाषा जिवंत असतांना व तिचें व्याकरण व कोश तयार झाला नसल्यास हा नियम लागू पडतो. ज्ञानेश्वरकालीन, एकनाथकालीन व मोरोपंतकालीन मराठींत असा फरक आपणांस दिसतो. पण भाषेचें व्याकरण व कोश तयार झाल्यानंतर हा काल फार मोठा होतो. व ती भाषा मृत झाल्यानंतर तर तिचें स्वरूप स्थिरच होतें. मिल्टन व मूळ रोमन कवि व्हर्जिल यांची लॅटिन भाषा जरी सारखी असली तरी त्यांतील अंतर १६०० वर्षांचें आहे. हल्लीं संस्कृत भाषा मृत असून हल्लींची संस्कृत भाषा व्याकरण व कोश यांच्या जोरावर चालते. जिवंत भाषेवर व्याकरण सत्ता चालवीत नसून तिच्यावरून व्याकरण तयार केलें जातें हें उघड आहे. महाभारतकालीं संस्कृत भाषा मृत होती. यामुळें तो ग्रंथ अलीकडे ओढतां येत नाहीं. ब्राम्हणकालींच व्याकरण व कोश तयार झाल्यामुळें पुढें संस्कृत भाषेचें स्वरूप फारसें बदललें नाहीं. भगवद्गीतेची भाषा मात्र जिवंत संस्कृत आहे, इतक्या खोल अर्थाची व सरळ स्वरूपाची आणि इतकें गहन तत्त्वज्ञान सोप्या शब्दांत सांगणारी भाषा जगांतील कोणत्याही ग्रंथांत नाहीं. गीतेची भाषा गोड, तेजस्वी, भारदस्त व गहन असून गीतेंतील शब्द यामुळें खरोखरच सुवर्णासारखे आहेत असें म्हणतां येतें.

महाभारतांतील कूट श्लोकांचे निरनिराळे भाग पाडतां येतात:—
( १ ) शब्दार्थ सरळ व सोपा असून एकंदर अर्थ बरोबर लक्षांत येत नाहीं. यामुळें शब्दाचा अर्थ निराळा घ्यावा लागतो. उ. 'नागैरिवसरस्वती' ( येथें सरस्वती म्हणजे सरोयुक्त भूमि असा अर्थ घ्यावा लागतो. )

( २ )ज्याचा उत्तानार्थ फार सरळ आहे असा एकादा शब्द मध्यें येतो पण तो अर्थ वाक्यांत बरोबर लावतां येत नाहीं, यामुळें निराळा पदच्छेद करावा लागतो.

उ० नदीजलंकेशवनारिकेतुः ।
जित्वावयंनेष्यतिचाद्यगावः ॥
नदीज लंकेशवनारि-केतुः ।
जित्वा अव यं नेष्यति च अद्य गाः वः ॥

या प्रकारचीं कूटें अनेक गीतेंत फारशीं आढळत नाहींत.

( ३ ) एकच शब्द अनेक अर्थांनीं वापरणें उ०—

गोकर्णासुमुखीकृतेन इषुणा गोपुत्र संप्रेषिता
गोशब्दात्मज भूषणं सुविहितं सुव्यक्तगोसुप्रभम् ।
दृष्ट्वा गोगतकं जहार मुकुटं गोशब्द गोपूरि वै
गोकर्णासनमर्दनश्च नयनावप्राप्य मृत्योर्वशम् ॥ *
( कर्णपर्व ९०–४२ )

( ४ ) कांहीं शब्द अप्रासिद्धार्थी योजणें उ०

अट्टशूला जनपदा शिवशूला चतुष्पथाः ।
केशशूला स्त्रियो राजन्भविष्यान्ति कलौ युगे ॥

हीं कूटें चित्रकाव्याचें स्वरूप देण्याकरितां सौतीनें घातलीं आहेत

भाषेच्या तीन स्वरूपांपैकीं गीतेची भाषा जुनी असून अनुगीतेची भाषा सर्वांत नवीन आहे. यावरून अनुगीता अगदीं अलीकडील ठरते.

आतां महाभारतांतील छंदांविषयीं विचार करूं Hopkins या अमेरिकन पंडितानें या विषयाचा फार कसून अभ्यास केला

* हा श्लोक सौतीच्याही मागुनचा केवळ प्रक्षिप्त असावा.

आहे. * सबंध महाभारतांत शार्दुल विक्रीडित वृत्तांत फक्त एक श्लोक आहे तो वर दिलाच आहे. कर्णपर्वात अर्धसमवृत्तें वरींच आहेत एकंदरींत कर्णपर्व, द्रोणपर्व * व आदिपर्व या तीन पर्वांत निरनिराळ्या तऱ्हेचीं वृत्तें आहेत. इतर पर्वांत बहुतेक सर्व श्लोक अनुष्टुप छंदांत व वैदिक त्रिष्टुप छंदापासून निघालेलीं इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा या वृत्तांत आहेत. हीं दोन वृत्तें (इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा) लिहितांना कविशक्तीला फार स्फुरण आलेलें दिसतें. तीं वृत्तें इतकीं जोरदार, ओघानें आलेलीं व सुंदर दिसतात. या वृत्तांना अलीकडच्या इतकीं गणबंधनें मात्र नाहींत. यावरून त्यांचा रचनाकाल फार प्राचीन असावा हें सिद्ध होतें.

वरील वृत्तांच्या हकीगतीवरून पाश्चात्य पंडित जें अनुमान काढतात तें चुकीचें आहे. त्यांच्या मतें निरनिराळ्या वृत्तांतलें श्लोक पिंगलाचा ग्रंथ झाल्यानंतरचे (इ. स. ३०० पिंगलाचा काल तरी पाश्चात्यांचे मतें कोठें निश्चित आहे ? आहेत.) पण पिंगलानें ग्रंथ केला तो त्यानें आपल्याच डोक्यांतून काढला नाहीं. त्याच्या पूर्वींच्या कवींच्या ज्या पद्यरचना होत्या त्यांवरून त्यानें तो ग्रंथ केला असें म्हणतां येईल. यावरून महाभारतांतील हे निरनिराळ्या वृत्तांतील श्लोक पिंगलानंतरचे आहेत हें म्हणणें कसें फोल आहे हें दिसून येईल. शिवाय

---

* याचा ग्रंथ The Great Empic. of India म्हणून प्रसिद्ध आहे.

* द्रोणपर्वात २ द्रुतविलंबित, ९ रुचिर, १ प्रहर्षिणी, १ मालिनी, ८ अर्धमस मिळून २१; आदिपर्वात २२ रुचिर, ४ प्रहर्षिणी, ३ वसंततिलका, २ अर्धसमवृत्त मिळून ३१ श्लोक आहेत.—Hopkins,

महाभारतांत २ आर्यवृत्ताचीं पद्यें आहेत.* रामायणांत आर्यावृत्त मुळींच नाहीं व हें मात्रावृत्त मूळचें वैदिक नसून पाली भाषेंतून आलें आहे. म्हणून महाभारताचा हा भाग रामायण व बुद्ध यानंतरचा असावा असा पाश्चात्यांचा तर्क आहे. पण रामायणांत आर्यावृत्त नाहीं यावरून त्या कालीं आर्यावृत्त नव्हतें असें म्हणतां येत नाहीं व पालीभाषेंतून तें आलें यावरून महाभारत बुद्धानंतरचें असेंही म्हणतां येत नाहीं. कारण बुद्धानें आपला उपदेश सर्व लोकांस समजण्याकरितां पाली भाषेंतून केला या वरून पाली भाषा त्याच्यापूर्वीं चांगलीच आस्तित्वांत होती हें उघड आहे.

महाभारतांत बहुतेक अनुष्टुप छंदच आहे हें वर सांगितलें आहे. अनुष्टुप छंदास गणांचें व मात्रांचें बंधन नसलें तरी स्वरसौष्ठवाकरतां त्यांत कांहीं तरी नियम आहेतच, व त्यांचें उलंघन झालें असतां त्यांत तें सौष्ठव रहात नाहीं. शिवाय दुसऱ्या व चौथ्या चरणाचें सातवें अक्षर नेहमीं ऱ्हस्व असावें लागतें. याच छंदोपद्धतीस इंग्रजींत Iambic metre म्हणतात. त्याचप्रमाणें पहिल्या व तिसऱ्या चरणांचें पांचवें अक्षर ऱ्हस्व असावें लागतें. 'कैलिङ्गैस्त्रीन्गुणानेतान्' यांतील सर्वच अक्षरें दीर्घ असतील तर स्वरसौष्ठव नष्ट होईल. इतर देखील कांहीं गोष्टी स्वरसौष्ठवाकरितां अवश्य आहेत. उ० विपुला व चपला या दोन स्वर रचनेच्या पद्धतींपैकीं सुंदर जी विपुला, तिची संख्या महाभारतांत विपुल आहे उ० 'कार्य कारण कर्तृत्वे' हें अधिक मधुर आहे.

महाभारतांतील जरी अनुष्टुप छंद घेतला तरी त्याच्या निरनिराळ्या तऱ्हेच्या तीन रचना त्या ग्रंथांत दिसतात. व त्यावरून देखील महाभारत तिघांच्या हातून रचलें गेलें या म्हणण्यास पुष्टि

---

* शांतिपर्व अध्याय ३४७–१८–२२ अनुशासनपर्व अध्याय १४

मिळते. ही गोष्ट हॉपकिन्सनें विस्तारपूर्वक सांगितली आहे. भगवद्गीतेंतील श्लोकांचें स्वरसौष्ठव अत्युत्तम आहे. तथापि कवितेच्या रचनेवरून कवीचा काल ठरवितां येत नाहीं. कारण हल्लींचा देखील एकादा चांगला कवि वैदिक छंदाप्रमाणें जोरदार छंदांत कविता करून दाखवील. ' यदा श्रौषं ' या शब्दांनीं आरंभ केलेले सुमारें १०० श्लोक आदिपर्वांत आरंभीं आहेत. त्यांची रचना इतकी उत्तम आहे कीं, ते व्यासांचे असावेसें वाटतें. परंतु ते सौतीचेच आहेत हें मी ' महाभारताच्या उपसंहारांत ' दाखविलें आहे. तथापि सुंदर अनुष्टुप श्लोक बनविणें हें महाकवीसच साधतें. कालिदासाचे अनुष्टुप श्लोक या तऱ्हेचे आहेत. हॉपकिन्सनें अनुष्टुपपद्यरचनेचे तीन प्रकार दाखविले आहेत ते मान्य करण्यासारखे आहेत.

पाश्चात्य लोक महाभारतास अलीकडे ओढतांना आणखी अशीं कारणें पुढें आणतात कीं, ( मॅकडोनेलकृत संस्कृत वाङ्मय ) महाभारतांत ब्रह्मा या देवतेस पुष्कळ ठिकाणीं प्राधान्य दिलें आहे आणि पाली भाषेंतील वाङ्गमयांत देखील ब्रह्मा हीच देवता मुख्य म्हणून सांगितलें आहे, शिव व विष्णु या देवतांस फार प्राधान्य नाहीं, आणि पाली भाषेचा विशेष प्रसार तर इ. स. पू. ५०० च्या सुमारास होता, त्याचप्रमाणें मेगॅस्थॅनीस हा हिंदुस्थानांत आला होता त्यावेळीं ( इ. स. पू. ३०० ) त्यानें हिंदुस्थानांत शैव व वैष्णव असे दोन तट होते असें लिहून ठेवलें आहे, महाभारतांत ग्रीक लोकांचा ( यवन ) उल्लेख आहे. बुद्धांच्या अस्थींवर रचलेल्या वर्तुळाकार इमारतींचा—ज्यांस इंग्रजींत Lagoba म्हणतात—' एडूक ' म्हणून उल्लेख आहे, आश्वलायन गृह्यसूत्रांत—पाश्चात्यांच्या मतें यांचा काल इ. स. पू. ३००

च्या सुमाराचा आहे--भारत व महाभारत या ग्रंथांचा उल्लेख आहे. तीं याच्या फार पूर्वींचीं आहेत आणि बाकीचीं जीं कारणें आहेत त्यावरून हल्लींचा महाभारत ग्रंथ बुद्धकालीं लिहिला गेला असें म्हणतां येईल. शिवाय बुद्धानें आपल्या धर्मांत ब्रह्मा या देवतेस प्राधान्य दिलें तें हिंदुधर्मांत त्या देवतेस विशेष प्राधान्य नसून शिव व विष्णु या देवतांस होतें म्हणूनच विरोध बुद्धीनें दिलें असलें पाहिजे. सौतीनें वैष्णव व शैव यांमधील तंटा मिटवून दोन्ही देवतांस मोठेपणा देण्याचा व धर्मैक्य घडवून आणण्याचा महाभारतद्वारा प्रयत्न केला. या वरून सौतीचा म्हणजे हल्लींचा ग्रंथ या वेळेस उत्पन्न झाला हीच गोष्ट सिद्ध होते.

## —पुराणें—

महाभारतानंतर पुढें झालेला उत्तम ग्रंथ म्हणजे रामायण होय. हा देखील पूर्वींच्या स्वरूपांत भारताप्रमाणें लहान होता, व पुढें विस्तार पावला. पण याला महाभारताप्रमाणें धर्मग्रंथाचें स्वरूप न येतां एक उत्तम काव्याचें स्वरूप आलें आहे. वाल्मीकि हा सर्व जगांत अत्युत्तम कवि असून रामायण ( मूळचें ) हें आदिकाव्य आहे. महाभारत हा ग्रंथ तत्वज्ञान, धर्मशास्त्र, व्यवहार इत्यादिकांचा विचार करणारा असल्यानें त्याला स्मृतीचें स्वरूप प्राप्त झालें; रामायण हा ग्रंथ काव्य राहून स्मृतिरूप झाला नाहीं. रामायण हा ग्रंथ काव्यदृष्ट्या उत्तम आहे व पुढील महाकाव्यें रामायणाच्याच धर्तीवर झालीं. ज्याप्रमाणें रामायणाच्या अनुकरणानें महाकाव्यें झालीं, त्याचप्रमाणें महाभारताच्या अनुकरणानें पुराणें विस्तार पावलीं. पण जरी हल्लींच्या पुराणांचा उद्देश ‘ पुराणे धर्मनिश्चयः ’ असा असला, तरी तीं अतिशय वेडसरपणानें बनलीं असें म्हणावें लागतें. महाभारत हा जरी अत्युत्कृष्ट ग्रंथ आहे,

तरी त्याच्या अनुकरणानें बनलेलीं पुराणें तशीं तेजस्वी व जोरदार न राहतां त्यांत भोळेपणा व वेडसरपणा भरला आहे, आणि अशा ग्रंथांचा धर्मशास्त्रनिर्णयाकरितां उपयोग होऊं लागल्यामुळें तर धार्मिकदृष्ट्या फार नुकसान झालें आहे. 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त फलप्राप्त्यर्थं' असा आमचा संकल्प होऊन बसल्यानें आमच्या धर्मांत पुष्कळ वेडसरपणा आला आहे. इतिहास व पुराणें हीं उपनिषत्कालांत होतीं. रामायण व महाभारत ( मूळचीं ) हे त्या वेळचे इतिहास होते. मूळ पुराण एकच असलें पाहिजे अशी माझी समजूत आहे व यास पुराणवाद्यांचाही आधार आहे.

'पुराण' या शब्दाचा 'वंशावळ' असा मूळ अर्थ आहे. 'सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशविस्तार एव च' अशी पुराणाची व्याख्या केली आहे. सूत लोक पूर्वी इतिहास पाठ करीत असत. महाभारताच्या आरंभीं भृगूंची वंशावळ सूतानें सांगितली आहे. यावरून केवळ राजांच्याच नव्हे, तर ब्राह्मणांच्या देखील वंशावळी सूत ठेवीत असत हें उघड आहे. क्षत्रिय स्त्री व ब्राह्मण पुरुष यांच्यापासून झालेल्या संततीस सूत असें म्हणत. ज्याप्रमाणें ब्राह्मणांनीं वेदांचें रक्षण केलें, त्याचप्रमाणें सूतांनीं इतिहासपुराणांचें रक्षण केलें.

पहिलें पुराण एकच होतें, व पुढें त्याचे १८ भाग होऊन महाभारताच्या विस्ताराचें अनुकरण करण्याकरतां त्या प्रत्येकाचा त्याही पुढें मोठा विस्तार झाला. महाभारताला जसें स्मृतिग्रंथाचें स्वरूप आलें, तसें पुराणांनाही यावें अशा हेतूनें हा प्रकार इसवी सनानंतर झाला. कांहीं राजांच्या मूळ कथा घेऊन त्यांत आपल्या कल्पनेची भर घालून व कांहीं केवळ स्वकपोलकल्पित कथा घेऊन हल्लींचीं पुराणें स्मृतिकालांत इ. स. ३०० पासून ८०० पर्यंत वाढविलीं

गेलीं. त्या सर्वांत वायुपुराण व मत्स्यपुराण हीं जुनीं आहे-तशीं दिसतात.

बहुतेक पुराणांतून भविष्यकथा सांगितल्या आहेत. त्यांत ज्या भविष्य राजांचा उल्लेख आहे, त्याच्या नंतरच्या कालांत तें पुराण झालें असें म्हणावें लागलें. 'गुप्ता भोक्ष्यन्ति मेदिनीम्' असें ज्या पुराणांत म्हटलें आहे, तें पुराण गुप्तराजांच्या नंतर झालें असलें पाहिजे. सर्वांत आंध्रभृत्यांची हकीकत असून त्या वंशांतील अमुक राजा अमुक वर्षे राज्य करील असे नक्की उल्लेखही आहेत. यावरून पुराणांची रचना गुप्तकालांत सुरू झाली असावी. (इ. स. ३००) आंध्रांनंतर हेच सार्वभौम राजे झाले. यावेळीं बौद्धधर्माचा पाडाव होऊन हिंदुधर्माचा विजय झाल्यामुळें पुराणाची पुनर्रचना झाली. याच न्यायानें कांहीं पुराणें इ. स. ८०० पर्यंत कैलकिल यवनांच्या उल्लेखावरून झालींसें दिसतें. भविष्यपुराणांतील ज्या अध्यायांत व्हिक्टोरिया राणीचा उल्लेख आहे तो प्रक्षिप्त म्हणून सोडून दिला तरी बाकीच्या भागाच्या रचनेचा काल इ. स. ७००–८०० च्या सुमाराचा आहे. निरनिराळ्या मतांचें समर्थन निरनिराळीं पुराणें करतात त्यांपैकीं १० शिव, ४ विष्णु, २ शक्ति व २ गणपति यांच्या स्तुतिपर आहेत. (अष्टादश पुराणेषु दशभिर्गीयते शिवः। चतुर्भिर्गीयते विष्णुर्द्वाभ्यां शक्तिश्च विघ्नपः॥) यांतील बऱ्याचशा कथा काल्पनिक आहेत. मी स्कंद पुराण सर्व वाचलें आहे. या पुराणकर्त्याची महत्वाकांक्षा महाभारताप्रमाणें एक लक्ष संहिता करण्याची होती असें दिसतें. पण त्याचे हातून ८१००० श्लोक पार पडले. त्याचा 'एकाशीतिसाहस्त्र्यां संहितायाम्' असा संकल्प त्यांत येतो. ज्यांचा संबंध कोठें लागत नाहीं, तें 'स्कंदपुराणे रेवाखण्डे' आहे असें म्हटलें म्हणजे भागतें. कारण सर्व पुराणांत तें

मोठें आहे. महाभारतांतील कित्येक कथांवर मखलाशी चढवून त्यांना ह्या पुराणांत गोंवलें आहे. प्रत्येक पुराणांत महाभारताच्याच अनुकरणानें गीता घातली असून विशेष आश्चर्य हें कीं, त्यांत विश्वरूपदर्शनही घुसडून दिलें आहे. स्कंदपुराणांत तीर्थयात्रांच्या गोष्टी बऱ्याच असून काशीखंड, रेवाखंड, अवंतिखंड, अर्बुदखंड अशीं निरनिराळीं खंडें दिलीं आहेत. प्रत्येक क्षेत्राची उत्पत्ति कशी झाली, तेथें कोणी कशी तपश्चर्या करून त्याला काय फलप्राप्ति झाली वगैरे कथांनीं हीं खंडें भरून काढलीं आहेत. महाभारताप्रमाणें उत्तम चारित्र्याचीं उदाहरणें या पुराणांत थोडीं आढळतात. महाभारतांत जसें सांख्यज्ञान, वेदांतज्ञान, कर्मज्ञान वगैरे सर्व प्रकारचें ज्ञान आलें आहे, तसें पुराणांतही असावें या अभिमानानें त्यांत हें सर्व असून ज्योतिःशास्त्र, वैद्यकशास्त्र, इत्यादिकांचा अंतर्भाव त्यांत अस्वाभाविकपणें केला आहे. जगाची उत्पत्ति, स्थिति, लय वगैरे तर त्यांतून कित्येक वेळां आलीं आहेत. या सर्व प्रकारामुळें पुराणांनीं आमचें ज्ञानदृष्ट्या अतिशय नुकसान झालें आहे. पुराणांना सर्वज्ञपणाची घमेंड असल्यानें त्यांतील सर्व वंशावळी देखील विश्वसनीय नाहींत. चंद्रसूर्यवंशांच्या वंशावळी भारतीय युद्धकालापर्यंत खऱ्या आहेत पण त्यानंतर इ. स. पू. ५०० पर्यंतच्या सर्व वंशावळी केवळ काल्पनिक आहेत. मधील २००० वर्षांच्या काळाचा पत्ता कोणाला नाहीं. कालगणनाही चुकीची केली आहे. सर्वांत साम्य असेल तर तें ' यावत्परीक्षितो जन्म यावन्नन्दाभिषेचनम्। एतद्वर्षसहस्रं च ज्ञेयं पञ्चदशोत्तरम्।। ' म्हणजे युधिष्ठिरापासून नंदापर्यंत १०१५ वर्षें धरलीं आहेत. यानंतर पुढील काळाच्या वंशावळी मात्र इतिहासदृष्ट्या विश्वसनीय आहेत. एकंदरींत पुराणांचा हेतु जरी महाभारताचें अनुकरण करण्याचा असला तरी

त्यांनीं समाजाची चुकवणूक केली आहे व एकंदर घोंटाळा करून ठेवला आहे.

पुराणांतून चतुर्युगांची व मन्वंतरांची कल्पना गीतेंतल्याप्रमाणें आहे. प्रत्येक मन्वंतराचे निरनिराळे सप्तर्षि आहेत. चौदा मनु सांगून प्रत्येकाचे दहा पुत्र दिले आहेत. आणि विशेष हें कीं, पुढें होणाऱ्या मनूंचीं निराळीं नांवें सांगून प्रत्येक मनूच्या दशपुत्रांचीं नांवें निरनिराळीं सांगितलीं आहेत. अर्थात् तीं सर्व काल्पनिक आहेत. महाभारतांत शिवसहस्रनाम व विष्णुसहस्रनाम सांगितलें आहे तसें प्रत्येक पुराणांतून सांगितलें आहे. स्कंदपुराणांतील अवंति खंडांत उज्जनीच्या भोंवतालच्या ८४ लिंगांचीं नांवें, व त्या प्रत्येकाची उत्पति वगैरेचें वर्णन आहे. गरुडपुराणांत मनुष्य मेल्यावर त्याच्या आत्म्याची स्थिति कशी होते याचें वर्णन असून घरांतील एकादें मनुष्य मृत झाल्यानंतर घरांतील मंडळींनीं मृताशौचांत या पुराणाचें श्रवण करावें अशी समजूत आहे. वायुपुराणाचा उल्लेख महाभारतांत असल्यामुळें मूळ पुराण त्याच्यापेक्षां जुनें असावें असें ठरतें. 'सप्तद्वीपा वसुन्धरा' ही कल्पना कूर्मपुराणांतील असून तिचा उल्लेख महाभारतांत आहे, पण निराळ्या तऱ्हेचा आहे. पद्म पुराण हें वैष्णव असून त्यांतील रघुवंशाची व शकुन्तलेची कथा या रामायण व महाभारत यांतील कथांशीं जुळत्या नसून त्यांचें कालिदासाचा रघुवंश व आभिज्ञान शाकुंतल यांतील कथांशीं साम्य आहे व यामुळें हें पुराण कालिदासानंतर झालें असलें पाहिजे असें म्हणण्यास चांगलाच पुरावा आहे. कारण महाभारतांतील शकुन्तला बदलून निराळी शकुन्तला आपल्या नाटकाच्या सोयीकरितां कालिदासानें बदलली तशी पद्मपुराणास बदलण्याची आवश्यकता नव्हती. यावरून पद्मपुराण कालिदासाच्या बदललेल्या कथेनंतर झालें असें

अनुमान निघतें व हेंच अनुमान पुढील अन्य प्रमाणांवरून दृढ होतें, पुराणांचा मूळ उद्देश वंशावळी सांगण्याचा होता. दक्षिण हिंदुस्थानांत जरी वंशावळींचा फार प्रघात नसला तरी उत्तर हिंदुस्थानांत भाट हे सर्वांच्या वंशावळी आपल्याजवळ अजून ठेवीत असतात, व लग्नसमयीं त्या सांगाव्या लागतात. पण पुढें जेव्हां 'पुराणे धर्मनिश्चय' हें तत्व अमलांत आलें त्या वेळीं हा सर्व घोंटाळा होऊन धर्माच्या भ्रांत कल्पनांनीं भरल्याच गोष्टी लोकांत प्रचलित होऊं लागल्या. मासल्यादाखल राधेचें उदाहरण घ्या. पद्मपुराणांत राधेचें नांव प्रथम येतें, व ब्रम्हवैवर्तपुराणांतही तिचा उल्लेख आहे. महाभारत व हरिवंश यांत राधेचा उल्लेख नाहींच, पण कृष्णलीला ज्यांत भरपूर आहे, त्या भागवतांतही तिचा उल्लेख नाहीं. एका गृहस्थांनीं मला 'राधेला संस्कृत ग्रंथांचा आधार आहे काय?' असा प्रश्न विचारिला असतां मी त्यांस 'राधा निराधार आहे' असें उत्तर दिलें. महाभारत व हरिवंश यांत गोपी ह्या भगवान श्रीकृष्णांच्या निर्हेतुक भक्त होत्या असें वर्णन असून, पुराणांनीं या गोष्टीचा विपर्यास करून तिला चालू अप्रयोजक स्वरूप दिलें.

मूळ पुराणें फार जुनीं आहेत. आपस्तंब सूत्रांत भविष्य पुराणाचा उल्लेख आहे. रा. काळे यांनीं पुराणांसंबंधीं माहितीचें एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत ते म्हणतात, 'मूळ एक पुराणग्रंथ असून व्यासांनीं त्याचे १८ भाग केले (निदान या विभक्तीकरणाचा काल त्यांच्या इतका तरी जुना असावा.) पुढें त्यांचा विस्तार विक्रमानंतर झाला असावा.' हल्लींचीं पुराणें इ. स. ३०० नंतरचीं आहेत असे माझें मत आहे. कैलकिल्ल यवनांचा उल्लेख भागवतादि पुराणांत असून त्यांचा काल इ. स. ७००–८०८ च्या सुमारास

असल्यानें तीं पुराणें वेदार्थास उपबृंहक आहेत, म्हणजे राजर्षिचरितांनीं आहेत; धर्मदृष्ट्या नव्हे.

इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् ।
बिभेत्यल्पश्रुताद्वेदो मामयं प्रहरिष्यति ॥

असा एक श्लोक महाभारतांत आहे. याचा अर्थ 'इतिहास व पुराणें यांवरून वेदाचा अर्थ स्पष्ट होतो. अल्पश्रुत मनुष्य माझ्या अर्थांत फिरवाफिरव करील म्हणून वेद त्याला भितो असा आहे. इतिहास व पुराण यांत भेद आहे. पुराण म्हणजे ज्यांत वंशावळी सांगितलेल्या असतात तें; व इतिहास म्हणजे एका राजाचें वर्णन त्यांत असून त्यांत नुकतीच घडलेली गोष्ट सांगितलेली असते. या इतिहासांतील व पुराणांतील गोष्टींवरून वेदांचा अर्थ लावावयाचा आहे.

आख्यान, उपाख्यान, गाथा व कल्पशुद्धि इत्यादि शब्दांचा निराळा अर्थ ध्यानांत ठेवला पाहिजे. आख्यान म्हणजे स्वतः पाहून लिहिलेली गोष्ट. उपाख्यान म्हणजे ऐकून लिहिलेली गोष्ट. (मराठींतील बखरीप्रमाणें) एकादी गोष्ट झाली म्हणजे तिची थोडक्यांत आठवण पद्य रूपानें लिहून (गा—गाणें या धातूवरून) ठेवलेली असते त्यास गाथा म्हणतात. (इंग्रजींत यांस mnemonic Verses असें म्हणतात.) ज्यावेळीं लेखनकला नव्हती त्या वेळीं अशीं पद्यें करण्याची आवश्यकता भासत असे. अशा गाथा वेदांत, पुराणांत, महाभारतांत दिलेल्या आहेत. अवेस्तांतही एक भाग गाथांचा आहे.

सर्व पुराणें मिळून ४ लक्ष ग्रंथ आहे. सर्वांत मोठें जें स्कंदपुराण त्याची श्लोक संख्या ८१००० आहे. महा पुराणांशिवाय आणखी १८ पुराणें झालीं आहेत. मूळचीं १८ पुराणें प्रत्येकीं

१२००० चीं होतीं, असा एके ठिकाणीं उल्लेख आहे. या पुराणांच्या विस्तारामुळें निरनिराळ्या देवतांच्या उपासना अस्तित्वांत आल्या, आणि भिन्न मतांच्या प्रतिपादनानें पुराणें भरलीं आहेत.

पुराणांची भाषा महाभारताप्रमाणें ओजस्वी व सुंदर नाहीं. त्यांत कित्येक अपप्रयोग आहेत त्यांचें 'आर्षत्वात्साधु' म्हणून समर्थन करण्यांत येतें. वाङ्मयाच्या दृष्टीनें पुराणास फार किंमत देतां येत नाहीं. भागवत पुराणाचा कर्ता मात्र फार विद्वान पंडित असावा असें दिसतें. यांतील श्लोक ऐकतांना मनास एक प्रकारचा आनंद होतो. भागवत हें १८ महापुराणांत येतें अगर उपपुराणांत येतें आणि देवी भागवत हें १८ महापुराणांत येतें कीं काय याचा वाद करणारे अनेक (१००) ग्रंथ निर्माण झाले आहेत! भागवत याचा अर्थ 'भगवत इदम्' अगर 'भगवत्या इदम्' असा दोन्ही तऱ्हेचा होतो. कोणी देवीभागवतास महापुराण मानितात तर कोणी वैष्णव-भागवतास महापुराण मानितात. वैष्णव भागवत, देवी भागवत, कालिकापुराण व आणखी एक पुराण अशीं चार भागवतें मानितात. माझे मतें देवीभागवत महापुराणांत येतें असें आहे. वैष्णव भागवताचा कर्ता कोण या विषयीं बराच वाद आहे. रामचंद्रराव जाधवाच्या पदरीं असलेला हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत (इ. स. १३००) याचा समकालीन पंडित बोपदेव हा त्याचा कर्ता असावा असें पुष्कळांचें मत आहे. पण बोपदेवानें भागवतावर केलेली टीका उपलब्ध असल्यामुळें, स्वतः ग्रंथकारच आपल्या ग्रंथावर टीका करील हें संभवत नाहीं, यामुळें हें म्हणणें खरें नसावें असें दिसतें.

पुराणांनीं समाजांत घोंटाळा कसा उपस्थित केला हें समजण्यास आणखी एक दोन गोष्टी पुराव्यादाखल सांगतां येतील. १०००

चतुर्युगांचें एक कल्प अशीं ३३ कल्पें पुराणांनीं सांगितलीं आहेत, व अमुक गोष्ट अमुक कल्पांतील आहे असे उल्लेख आहेत. एवढें भविष्य अगर भूतज्ञान कल्पनातीत आहे. अर्थात् या गोष्टी काल्पनिकच होत. दुसरें निरनिराळ्या देवतांचे उपासक व त्यांमधील तंटे पुराणांमुळेंच उपस्थित झाले, निदान वाढले असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिव व विष्णु यांमधील तंटा उपनिषत्कालापासून आहे व तो महाभारतकालीं अतिशय तीव्र होता. पण महाभारतानें दोघांची एकवाक्यता करून दिली. महाभारतकारांनीं शिवाकडून विष्णूची व विष्णूकडून शिवाची स्तुति करविली असून विष्णु व शिव या दोहोंचीं सहस्र नामें सांगितलीं आहेत, आणि दोघांमध्यें जो भेद करतो तो दोघांचा द्रोही होय असेंही सांगितलें आहे. पण पुराणांनीं हा तंटा विकोपास नेला असून या कामांत पद्मपुराणाचा नंबर पहिला लागतो. शंकराचार्यांचा अवतार लोकांस खोटी उपासना लावण्याकरितां झाला; शंकरांनीं तामस शास्त्रें निर्माण केलीं वगैरे गोष्टी पद्मपुराणांत खुद्द शंकराच्या तोंडून वदविल्या आहेत. अमुक पुराणें ( अर्थात् वैष्णवेतर ) तामस असून तीं नरक प्राप्त करून देतात असें त्यांत सांगितलें आहे. हीं व अशा तऱ्हेचीं वाक्यें माध्वमतानंतर आंत घुसडलीं असावीं असें वाटतें.

पार्गिटरसाहेब पुराणांतील पिढ्यांवरून प्राचीन इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करीत आहेत, पण तो सिद्धीस जाईलसें वाटत नाहीं. वैवस्वत मनूपासून श्रीरामचंद्रांची पिढी रामायणांत ३९ वी सांगितली आहे, पण प्रत्येक निरनिराळ्या पुराणांतून ती निरनिराळी दिली आहे. मेगॅस्थिनीसनें पिढ्यांची संख्या निराळीच दिली आहे आणि वर्षेंही निराळीं सांगितलीं आहेत.

पुराणें काव्यदृष्ट्या कमी किंमतीचीं आहेत हें वर सांगितलेंच आहे. शिवाय धर्मशास्त्राच्या व इतर दृष्टीनेंही तीं पोकळ आहेत, परंतु भागवताची गोष्ट तशी नाहीं. तें काव्यदृष्ट्या सुंदर असून त्यांत वेदांत व तत्त्वज्ञान भरपूर आहे आणि त्यांत भक्तीचाही पूर्ण विकास आहे. भागवताबद्दल लोकांच्या मनांत अतिशय आदर आहे हें त्यावर झालेल्या अनेक टीकांवरून दृष्टोत्पत्तीस येतें.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें वैष्णव भागवत व देवीभागवत या दोहोंपैकीं १८ महापुराणांतील कोणतें व १८ उपपुराणांपैकीं कोणतें हा मोठा वादग्रस्त प्रश्न आहे. रा. कोल्हटकर यांचा 'भागवताचा उपसंहार' नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या मतें वैष्णव भागवत हें महापुराणांपैकीं आहे, आणि महाभारत किंवा इतर ग्रंथ यांत जसे मागाहून कांहीं भाग घुसडले गेले असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. त्याचप्रमाणें भागवतांत महाभारताचा 'भारत' असा उल्लेख असल्यामुळें व भारताचें महाभारतांत रूपांतर इ. स. पूर्वीं ३०० च्या सुमारास झाल्यामुळें भागवताचा मुख्य काल ते इ. स. पू. ५०० चा मानितात. भागवतांत केलकिल यवनांचा उल्लेख घुसडलेला असून तसेच भागवतांतही घुसडले गेले असावे यांचा काल इ. स. ७०० च्या सुमाराचा आहे म्हणून या प्रक्षिप्त भागाचा काल इ. स. ८०० च्या सुमाराचा होय असें ते कबूल करतात.

माझ्या मतानें भागवत एकंदरीनें इ. स. ८०० च्या सुमारास निर्माण झालें; व तें मूळ स्वरूपांतच हल्लीं असून त्यात प्रक्षेप वगैरे नाहींत. महाभारताचा भारत या नांवानें उल्लेख करण्यांत विशेष बिघडतें असें नाहीं. या शिवाय भागवतास इतकें मागें ढकलण्यास भागवतांतीलच 'व्यासांनीं महाभारत व पुराणें लिहिल्यानंतर त्यांत त्यांना भगवद्भक्तीचें महात्म्य पुरतें वर्णिलें गेलें नाहीं असें वाटल्या-

चतुर्युगांचें एक कल्प अशीं ३३ कल्पें पुराणांनीं सांगितलीं आहेत, व अमुक गोष्ट अमुक कल्पांतील आहे असे उल्लेख आहेत. एवढें भविष्य अगर भूतज्ञान कल्पनातीत आहे. अर्थात् या गोष्टी काल्पनिकच होत. दुसरें निरनिराळ्या देवतांचे उपासक व त्यांमधील तंटे पुराणांमुळेंच उपस्थित झाले, निदान वाढले असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिव व विष्णु यांमधील तंटा उपनिषत्कालापासून आहे व तो महाभारतकालीं अतिशय तीव्र होता. पण महाभारतानें दोघांची एकवाक्यता करून दिली. महाभारतकारांनीं शिवाकडून विष्णूची व विष्णूकडून शिवाची स्तुति करविली असून विष्णु व शिव या दोहोंचीं सहस्र नामें सांगितलीं आहेत, आणि दोघांमध्यें जो भेद करतो तो दोघांचा द्रोही होय असेंही सांगितलें आहे. पण पुराणांनीं हा तंटा विकोपास नेला असून या कामांत पद्मपुराणाचा नंबर पहिला लागतो. शंकराचार्यांचा अवतार लोकांस खोटी उपासना लावण्याकरितां झाला; शंकरांनीं तामस शास्त्रें निर्माण केलीं वगैरे गोष्टी पद्मपुराणांत खुद्द शंकराच्या तोंडून वदविल्या आहेत. अमुक पुराणें ( अर्थात् वैष्णवेतर ) तामस असून तीं नरक प्राप्त करून देतात असें त्यांत सांगितलें आहे. हीं व अशा तऱ्हेचीं वाक्यें माध्वमतानंतर आंत घुसडलीं असावीं असें वाटतें.

पार्गिटरसाहेब पुराणांतील पिढ्यांवरून प्राचीन इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करीत आहेत, पण तो सिद्धीस जाईलसें वाटत नाहीं. वैवस्वत मनूपासून श्रीरामचंद्रांची पिढी रामायणांत ३९ वी सांगितली आहे, पण प्रत्येक निरनिराळ्या पुराणांतून ती निरनिराळी दिली आहे. मेगॅस्थिनीसनें पिढ्यांची संख्या निराळीच दिली आहे आणि वर्षेंही निराळीं सांगितलीं आहेत.

पुराणें काव्यदृष्ट्या कमी किंमतीचीं आहेत हें वर सांगितलेंच आहे. शिवाय धर्मशास्त्राच्या व इतर दृष्टीनेंही तीं पोकळ आहेत, परंतु भागवताची गोष्ट तशी नाहीं. तें काव्यदृष्ट्या सुंदर असून त्यांत वेदांत व तत्त्वज्ञान भरपूर आहे आणि त्यांत भक्तीचाही पूर्ण विकास आहे. भागवताबद्दल लोकांच्या मनांत अतिशय आदर आहे हें त्यावर झालेल्या अनेक टीकांवरून दृष्टोत्पत्तीस येतें.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें वैष्णव भागवत व देवीभागवत या दोहों-पैकीं १८ महापुराणांतील कोणतें व १८ उपपुराणापैकीं कोणतें हा मोठा वादग्रस्त प्रश्न आहे. रा. कोल्हटकर यांचा 'भागवताचा उपसंहार' नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या मतें वैष्णव भागवत हें महापुराणांपैकीं आहे, आणि महाभारत किंवा इतर ग्रंथ यांत जसे मागाहून कांहीं भाग घुसडले गेले असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. त्याचप्रमाणें भागवतांत महाभारताचा 'भारत' असा उल्लेख असल्यामुळें व भारताचें महाभारतांत रूपांतर इ. स. पूर्वीं ३०० च्या सुमारास झाल्यामुळें भागवताचा मुख्य काल ते इ. स. पू. ५०० चा मानितात. भागवतांत केलकिल यवनांचा उल्लेख घुसडलेला असून तसेच भागवतांतही घुसडले गेले असावे यांचा काल इ. स. ७०० च्या सुमाराचा आहे म्हणून या प्रक्षिप्त भागाचा काल इ. स. ८०० च्या सुमाराचा होय असें ते कबूल करतात.

माझ्या मतानें भागवत एकंदरीनें इ. स. ८०० च्या सुमारास निर्माण झालें; व तें मूळ स्वरूपांतच हल्लीं असून त्यात प्रक्षेप वगैरे नाहींत. महाभारताचा भारत या नांवानें उल्लेख करण्यांत विशेष बिघडतें असें नाहीं. या शिवाय भागवतास इतकें मागें ढकलण्यास भागवतांतीलच 'व्यासांनीं महाभारत व पुराणें लिहिल्यानंतर त्यांत त्यांना भगवद्भक्तीचें महात्म्य पुरतें वर्णिलें गेलें नाहीं असें वाटल्या-

वरून त्यांनीं भागवत लिहिलें' अशा उल्लेखाचा ते आधार घेतात. पण यामुळें भागवत हें महापुराणांतील नसून तें उपपुराणांपैकीं आहे व त्यास इतकें मागें लोटण्याची जरूरी नाहीं, या माझ्या म्हणण्यासच पुष्टि येते. वरील उल्लेखावरून भागवत हें महाभारतानंतरचें आहे हें सिद्ध होतें. महाभारतांत १८ पुराणांचा उल्लेख आहे यावरून पुराणांनंतर महाभारत झालें हेंही स्पष्ट होतें. यावरून १८ पुराणानंतर भागवत झालें व तें अर्थात् १८ पुराणांच्या बाहेरचें आहे ही गोष्ट तितक्याच स्पष्टपणें नजरेस येते.

१८ महापुराणांचीं नांवें सांगण्याकरितां एक मजेचा आटपशीर श्लोक आहे तो असा—

मद्वयं भद्वयं चैव ब्रत्रयं वचतुष्टयम् ।
अनापलिंगकूस्कानि पुराणानि प्रचक्षते ॥

'म' दोन-(१) मत्स्य (२) मार्कण्डेय; 'भ' दोन (३) भागवत (४) भविष्य; 'ब्र' तीन-(५) ब्रह्माण्ड (६) ब्रह्मवैवर्त (७) ब्राह्म 'व' चार-(८) वामन (९) वाराह (१०) विष्णु (११) वायु अ-(१२) अग्नि; ना-(१३) नारद; प-(१४) पद्म; लिं-(१५) लिंग; ग-(१६) गरुड-कू कूर्म व स्क (१७) स्कंद. हीं (१८) महापुराणें होत.

## —रामायण—

हा ग्रंथ मूळ वाल्मीकीनें लिहिला असून भारताचें महाभारत झाल्यानंतर इ. स. पू. १०० च्या सुमारास त्यास हल्लींचें स्वरूप प्राप्त झालें. यानंतर त्यांत प्रक्षेप फारच थोडे झाले आहेत. त्या वेळेपासून रामायणांत फार झाले तर अगदी थोडेसे श्लोक घुसडले गेले असतील. रामायणावरील 'कतक' हा टीकाकार फार जुना असून त्यानें त्याच्या वेळीं चार अध्याय प्रक्षिप्त म्हणून मानलें आहेत

याच वेळीं त्यांत उत्तरकांड होतें असें माझें मत आहे. रामायणाची श्लोकसंख्या २४००० आहे. वाल्मीकि हा वैदिक ऋषि असल्यामुळें मूळ रामायण हा ग्रंथ वेदकालीन आहे व तो 'जय' (महाभारताचें मूळचें रूप) ग्रंथापूर्वीचा आहे. महाभारतांत 'रामोपाख्यान' असून तें एकाद्या ग्रंथाचें संक्षिप्त रूप असावें असें दिसतें. व ते वाल्मीकीच्या मूळ रामायणाचेंच संक्षिप्त रूप असावें. यावरून मूळ रामायणाचा काल इ. स. पू. ३०० च्या पूर्वीचा आहे एवढेंच सांगतां येईल. दिवसेंदिवस मूळ सरळ गोष्टींत अद्भुताची कल्पना व भर कशी वाढत जाते हें वाल्मीकि रामायणानंतर झालेल्या हल्लींच्या शेंकडों रामायणावरून दिसून येईल. मूळ रामायणांत रामानें रावणास ब्रह्मास्त्र सोडून मारलें असें होतें, पण हल्लींच्या रामायणांत रामानें त्याचें एक शिर तोडलें पण तें लगेच नवीन उत्पन्न झालें व तें त्याच्या कंठांत असलेल्या अमृताच्या कुपीमुळें झाल्यावरून रामानें पहिल्यानें ती कुपी फोडली व मग रावणवध केला अशी कथा आहे.

रामायण हा ऐतिहासिक ग्रंथ असून त्याचें उत्तर स्वरूप काव्य झालें. महाभारत हा स्मृतिग्रंथ आहे व दोघांतही हा फरक मूळपासून आहे. रामायण हें सर्व जगांत अतिसुंदर काव्य असून त्यांतील चरित्रें अतिशय उदात्त आहेत व त्यांतील वर्णनेंहि अतिशय सुंदर आहेत. युरोपांत ज्याप्रमाणें 'एपिक'ची (महाकाव्याची) कल्पना होमर कवीच्या 'इलियड' काव्यावर बसविली आहे त्याचप्रमाणें आपल्याकडेही महाकाव्याची कल्पना रामायणावरून बनविली आहे. महाभारताचे अनुकरणानें जसें पुराणांचें हल्लींचें स्वरूप भलतेंच झालें तशी स्थिति मात्र रामायणाच्या अनुयायांची न होता रामायणाचे अनुयायी जे कालिदास भारवि वगैरे महा

कवि झाले ते प्रशंसेस पात्र आहेत. हिंदुस्थानांतील पंचमहाकाव्यें रामायणाच्याच धर्तीवर बनविलीं आहेत. चरित्रनायकनायिका कवीनें कल्पिलेलीं आहेत असें मानलें तरी रामायणाचा नायक व नायिका हीं भारतभूमीसच काय पण सर्व जगास आदर्शभूत होऊन राहिलेलीं असून जगांतील दुसऱ्या कोणत्याही काव्यांत त्यांस तोड नाहीं. बौद्धधर्मांत देखील राम घेतला आहे, त्याचें कारण हेंच होय. हिंदुस्थानांतीलसुद्धां दुसऱ्या कोणत्याही कवीच्या काव्यांत अशीं उदात्त चरित्राचीं नायक नायिका नाहींत. व यामुळेंच वाल्मीकीस दिली गेलेली 'आद्यकवि' ही पदवी अतिशय सार्थ आहे.

रामायण चरित्रदृष्टया व काव्यदृष्टया अतिशय उत्तम प्रतीचा ग्रंथ आहे. राम हा काव्यनायक वेदकालीन आहे व रामचरित्र हीं मूळांत काल्पनिक नसून ऐतिहासिक आहे, असें माझें मत आहे. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलांतील ९३ व्या सूक्तांत रामाचें नांव आलें आहे व तें याच रामाचें असें निश्चयानें म्हणण्याचें कारण म्हणजे राम हे नांव दुसऱ्या कोणत्याही क्षत्रिय राजाचें पुराणांत अगर वेदांत आढळत नाहीं. ऋषीचें राम हें नांव आढळतें. महाभारतांतर्गत रामोपाख्यान हें हलींच्या रामायणापूर्वीचें आहे. महाभारत वाढविणारा सौति हा जसा विद्वान होता तसा मूळ वाल्मीकिरामायण वाढविणारा नव्हता. महाभारतांत बुद्धाचा प्रत्यक्ष नांव घेऊन नाहीं तरी मतरूपानें उल्लेख आहे व तो निंदापूर्वक नाहीं पण रामायणांत त्याचा निंदात्मक प्रत्यक्ष उल्लेख आहे. 'यथा हि चोरस्तथा हि बुद्धः' असें रामायणांत स्पष्ट म्हटलें आहे. यावरून हलीं उपलब्ध असलेल्या रामायणाची रचना बुद्ध धर्माचा पाडाव झाल्यानंतर, अग्निमित्र, पुष्पमित्र इत्यादि राजांनीं हिंदुधर्माचा पुनरुत्कर्ष केल्यानंतर–जैमिनीसूत्र व बादरायणसूत्र

यांच्या पाठोपाठ—इ. स. पू. १०० च्या सुमारास झाली असावी असें दिसतें. या रामायणानंतरही कांहीं आख्यानें, उपाख्यानें, कल्पित गोष्टी—अहिरावण व महिरावण यांच्या आख्यानासारख्या—त्याही पुढच्या काळांत मराठी व इतर वाङमयांत राम कथेंत घुसडल्या गेल्या आहेत यांत आश्चर्य नाहीं.

महाभारत व रामायण हें मूळांत जरी इतिहासग्रंथ ह्मणून असले तरी पुढें त्यांचा वाढावा झाल्यानंतर रामायणास काव्यस्वरूप व महाभारतास धर्मग्रंथस्वरूप प्राप्त झालें. त्यांत महाकाव्याचीं लक्षणें या रामायणावरूनच संस्कृत काव्यग्रंथकारांनीं ठरविलीं असें दिसतें, महाकाव्यांत 'सर्ग' असावे. उदात्त राजांचीं व महापुरुषांचीं ऋतूंचीं, युद्धप्रसंगाचीं, शहरांचीं वगैरे वर्णनें असावींत वगैरे गुण पुढें ठरविले गेले, व हा क्रम कालिदासादि महाकवींनीं उचलला. रामायणांत अतिसुंदर भाग अयोध्याकांडांत आहेत. राम वनवासास निघाला त्या वेळचीं सर्वांचीं भाषणें, त्याचप्रमाणें राम, लक्ष्मण, सीता हीं त्रिवर्ग जाण्यास निघालीं असतां त्या प्रसंगाचें वर्णन वगैरे भाग अत्यंय हृदयस्पर्शी असून तो कितीहि वेळां वाचला तरी डोळ्यांस पाणी आल्यावांचुन राहात नाहीं. यानंतरचें उदात्त वर्णन ह्मटलें म्हणजे उत्तर कांडांत सीतेचा वनांत त्याग केला असतांना तिचे उद्गार होत. हा प्रसंग व त्याचें वर्णन इतकीं उत्तम आहेत कीं, कालिदासानें या प्रसंगाचें वर्णन करितांना खुद्द रामायणांतील शब्दांचाच उपयोग केला आहे. यापुढें सीता वाल्मीकीकडून रामाकडे परत आल्यानंतर तिनें भूमातेची आपणांस उदरांत घेण्याकरितां स्तुति करितांना जे शब्द वापरले आहेत, तेही अत्यंत उत्तम आहेत. ( वाङ्मनःकर्मभिः पत्युर्व्यभिचारो यथा न मे ) हे शब्द कालिदासानेंही उचललें आहेत. उत्तरकांड वाल्मीकीचें

आहे हें ह्मणण्यास हा देखील एक पुरावा आहे. कारण असे शब्द व अशी कल्पना किंवा कथा वाल्मीकीशिवाय दुसऱ्या कोणासही रंगवितां येणें अथवा कल्पिणें शक्य नाहीं अशी माझी समजूत आहे.

यावर असा एक आक्षेप येत असतो कीं वाल्मकीनें ५ व्या कांडाच्या शेवटींच काव्य संपतांना ज्या गोष्टी सांगावयाच्या त्या सांगून टाकल्या आहेत. व यावरून वाल्मीकि रामायण एवढेंच असून पुढील भाग त्यानंतरचा आहे. यावर असें उत्तर देतां येईल कीं, वाल्मीकीनें रामायण काव्य रचून तें कुश व लव या दोघांस शिकविलें व त्यांनीं तें रामास गाऊन दाखविलें असें वर्णन आहे. त्याअर्थीं रामायण येथेंच थांबविलें असल्याचा येथें भास आहे. पुढील कथा आधीं सांगणें शक्य नाहीं. तात्पर्य मूळ रामायणावरून पुनरचनाकारानें हे दोन्ही भाग दाखविले आहेत. असो, रामायणाच्या दोन आवृत्या आहेत. एक बंगाली व दुसरी दक्षिणेंतील बंगालमधील रामायणाच्या प्रतींत (मुळ कथानकांत नव्हे तर इतर) थोडा भेद आहे व तो इ. स. च्या १० व्या शतकांत पडला असावा. मॅकडोनेलच्या म्हणण्याप्रमाणें रामायणांत ब्राह्मणांनीं मागून सुधारणा केली असें दिसत नाहीं. गंगेपर्यंत अयोध्येचें राज्य होतें. वाल्मीकीनें गंगेच्या दक्षिणतीरीं राहूनच हा ग्रंथ लिहिला असावा असें दिसतें. उत्तर हिंदुस्थानचें वर्णन रामायणांत फार उत्तम आहे. दूतांनीं भरताकडे केकय देशांत जातांना निरनिराळ्या प्रांताचें केलेलें वर्णन फार उत्तम व विस्तृत आहे. उज्जिहान शहराजवळ एक उद्यान होतें असा उल्लेख करून या स्थळाचें वर्णन फार उत्तम केलें आहे. केकय देश म्हणजे लाहोरच्या पलीकडचा प्रांत असावा असें एकंदर वर्णनावरून स्पष्ट दिसतें. परंतु ज्यानें रामायण वाढविलें

त्यानें भूगोलाची एक मोठी चूक केली आहे त्यामुळें त्याचा प्रक्षेप दिसून येतो. सुग्रीवानें सर्व दिशांस सीताशुद्ध्यर्थ वानर पाठविले तेथें केलेलें देशाचें वर्णन चूक आहे. सुग्रीव व राम हे दोघे किष्किंधा नगरींत म्हणजे नर्मदेच्या दक्षिण बाजूस असून नर्मदा त्यांच्या दक्षिणेस होती असें यांत वर्णन आहे. एकंदर या भौगोलिक वर्णना-वरून पाहिलें असतां कुरुक्षेत्र हा मध्य कल्पून सर्व वर्णन केलें आहे हें स्पष्ट दिसतें. पण अर्थात्च ही चूक आहे, त्याचप्रमाणें दक्षिणेंत वनवासास येतांना नर्मदा नदी उतरल्याचा उल्लेख कोठेंही नाहीं, हे आश्चर्य होय.

वेदकालांत रामाच्या वेळीं दक्षिण हिंदुस्थानची माहिती फार नव्हती व तेथें दाट अरण्य होतें म्हणून दक्षिणेंत राक्षस राहत असत असें वर्णन आहे. ज्याप्रमाणें रशियन कैद्यांना हद्दपारीकरितां सैबीरियांत पाठवीत त्याचप्रमाणें त्या वेळीं दंडकारण्यांत राजपुत्रांस पाठविणें म्हणजे हद्दपारीची शिक्षा होती. आर्थात् दंडकारण्यांत रामास वनवासास पाठविल्याची गोष्ट ऐतिहासिक आहे.

बौद्ध लोकांचा ‘दशरथ जातक’ म्हणून एक ग्रंथ आहे, त्यांत जवळ जवळ रामायणांतीलच अर्धा कथाभाग असून सीताहरणाचा प्रसंग त्यांत नाहीं. यामुळें झालेल्या यूरोपीय पंडितांच्या रामायणा-च्या या भागासंबंधाच्या कल्पना अतिशय चुकांच्या आहेत. त्यांनीं सीताहरण व तिचें शोधनयांना फार निराळे स्वरूप दिलें आहे. सीता म्हणजे नांगराच्या फाळाने पडलेला चर व ती दक्षिणेंत आली आणि रामानें राक्षसांस जिंकलें याचा अर्थ ते असा करितात कीं, दक्षिणेंतील अडाणी लोकांस शेतकीची माहिती मुळींच नव्हती ती त्यांस उत्तरेकडील आर्य लोकांनीं नांगरण्याच्या वगैरे कृतीसह शिकविली. दुसऱ्या लोकांच्या मतें हें अलंकारिक वर्णन आहे पण.

वर सांगितल्याप्रमाणें सीता हरणाचाही कथा भाग ऐतिहासिक आहे व पाश्चात्यांचें हे म्हणणें रास्त नाही तें कसें हें पुढें सांगितलें आहे.

रामानें सीतेला लोकापवादामुळें कां टाकून दिली असा प्रश्न विचारण्यांत येतो. युद्धानंतर सीतेची शुद्धि अग्नींत झाली होती खरी; पण ती प्रजाजनांच्या देखत कोठें झाली होती ? त्यामुळें अयोध्येंतील लोकाच्या अपवादाकरितां रामाला सीतात्याग करावा लागला.

रामायणांतील प्रत्येक पात्रांत कांहीं तरी दोष दाखविला आहे. प्रत्यक्ष रामाच्या अंगीं देखील दोष आहे. व तो म्हणजे 'रामो वालिवधादिव.' परमेश्वरानें मनुष्यरूप अवतार घेतला म्हणजे मनुष्याप्रमाणें त्याचें वर्तन व्हावें लागतें, व रामाच्या अंगचा हा दोष यामुळेंच आहे. वालीनें रामास हा दोष दाखविला असतां त्यानें दिलेलीं उत्तरें अशीं आहेत:—( १ ) "मृगयेच्या नियमाप्रमाणें मी क्षत्रिय असल्यामुळें तुझा वध केला." पण हें समर्थन अगदीं पोकळ आहे. मृगयेच्या नियमाप्रमाणें वानराची शिकार करूं नये. ज्यांची सुधारणा कमी दर्ज्याची आहे अशा लोकांस सुद्धां राज्यकर्त्यांनीं असें उत्तर देणें केव्हांही रास्त नाहीं, ( २ ) दुसरें कारण असें सांगितलें आहे कीं, तूं आपल्या भावजयीच्या ठिकाणीं तिचा नवरा जिवंत असतां (तस्य त्वं धरमाणस्य) रममाण झालास व या दोषाबद्दल देहान्त शिक्षा करणें हा राजाचा धर्म आहे व म्हणून मी तुला मारलें. एक पति मेला असतां स्त्रीस दुसरा नवरा करणें असल्यास दिराशी विवाह करणें प्रशस्त मानलें जाईल खरें. यामुळें वाली मेल्यावर त्याची बायको तारा सुग्रिवानें केली यांत कांहीं दोष नाहीं. पण वालीकडे सुग्रीवाची बायको तो जिवंत असतां

घरांत घातल्याचा अपराध लागू होतो खरा. पण रामानें येथें कायद्याच्या दृष्टीनें चूक केली आहे. कारण आरोपीची जबानी घेतल्याशिवाय त्यास शिक्षा करितां येत नाहीं असा नियम आहे. वालीला मारण्यापूर्वीं त्याचा अपराध त्यास कळविणें जरूर होतें.

रामाच्या धनुर्भंगासंबंधानें व सीता स्वयंवरासंबंधानें हलींच्या रामायणांत अतिशय विपर्यास केला आहे. वाल्मीकिरामायणांत सीतास्वयंवर मुळींच नाहीं. शिवधनुष्यास प्रत्यंचा चढविल त्या क्षत्रिय वीरास सीता अर्पण करण्याचें जनकानें ठरविलें होतें. त्याप्रमाणें तो पण जिंकण्याकरितां अनेक राजे निराळ्या वेळीं येऊन गेले, पण सर्वांचे प्रयत्न निष्फळ झाले. शेवटीं विश्वामित्र रामलक्ष्मणांसह यज्ञार्थ जनकाकडे आले असतां रामानें तो पण जिंकला, व सीतेचा त्याच्या बरोबर विवाह झाला अशी मूळ कथा आहे. रावणाच्या उरावर पडलेलें धनुष्य रामानें उचललें वगैरे गोष्टी अलीकडे कल्पनेनें बनविलेल्या आहेत. जनकावर, ज्यांचे प्रयत्न निष्फळ झाले होते त्या सर्वांनीं स्वारी केली पण केवळ शिवप्रसादामुळें जनकास त्यांत यश आलें व यानंतर दीर्घ कालानंतर रामलक्ष्मण आले असे खुद्द जनकाचे उद्गार वाल्मीकिरामायणांत आहेत.

पाश्चात्य पंडितांच्या मताप्रमाणें अरण्यकांडापर्यंतची कथा ऐतिहासिक आहे व पुढची काल्पनिक आहे. ऋग्वेदाच्या १० मंडलांतील ९३ व्या सूक्तांत खालील ऋचा आहे:—

प्रतद्दुःशीमे पृथवाने वेने प्र रामे वोचमसुरे माघवासु ।

या ऋचेवरून व यांत रामाचा उल्लेख पृथु वेन वगैरे राजांबरोबर केल्यानें राम हा ऋग्वेदकालीन ऐतिहासिक राजा होता हें खास येथें राम एक मनुष्य होता एवढेंच मॅकडोनेल ह्मणतो पण तो राजा

होता हें वरील ऋचेवरून दिसतें आणि राजाचें राम नांव पुराणांत एकच आहे. त्याच्या मतें पुढील कथा काल्पनिक आहे. माझ्या मतें सर्व कथा ऐतिहासिक सत्य आहे; व ही कथा स्वाभाविकहि आहे.

दंडकारण्यांत राक्षस—नरमांसभक्षक लोक—राहत होते व रामास चौदा वर्षे वनवासास पाठविलें म्हणजे राक्षस त्यास खाऊन टाकतील अशीच कैकेयीची कल्पना होती. रावण हाही ऐतिहासिक राजा होता असा माझा निश्चय आहे. सीतेचें हरण रावणानें केलें याचें कारण असें कीं, राक्षसांमध्यें दुसऱ्यांच्या बायका जबरदस्तीनें नेण्याची चालच होती. आणि हल्लीं अष्टविवाहपद्धतींत 'राक्षस विवाह' ही जी एक पद्धत आहे, तिचेंही मूळ हेंच होय. असुर म्हणजे पारशी. महाभारतांत भीष्म जेव्हां माद्रीच्या बापाकडे तिची पंडूकरितां मागणी घालण्यास गेले, तेव्हां त्यानें उलट पैशाची मागणी घातली, व याचें कारण 'हा आमचा कुलाचारच आहे' असें सांगितलें, अशी कथा महाभारांत आहे. हा जसा आसुर विवाह त्याचप्रमाणें राक्षस विवाह म्हणजे राक्षसांत रूढ असलेला राक्षसविवाह. त्याचें स्वरूप स्त्री जबरदस्तीनें नेणें हें होय. रावणानें सीतेस अशोकवनांत ठेविल्यानंतर तिला तूं एक वर्षाच्या आंत वश न होशील तर प्रातरुपहारा करिता माझे स्वयंपाकी तुला कापून टाकतील अशी जी ताकीद दिली आहे, ती कल्पना नसून ऐतिहासिक सत्य आहे. तिचा पति वगैरे मंडळी योद्धे असल्यामुळें त्यांना हिंमत असल तर ते तिला सोडवून नेतील अशा दृष्टीनें त्यानें ही मुदत दिली. अशा प्रकारची मुदत द्यावी अशी राक्षस विवाहांतील अट असल्याबद्दल महाभारतांत एक वचन आहे.

Prescott's Spanish Conquest of Mexico या ग्रंथांतील हकीकतीचें व रामायणांतील या हकीकतीचें अत्यंत साम्य आहे. ज्या-

प्रमाणें लंका ही सुवर्णनगरी होती त्याचप्रमाणें मेक्सिको व पेरू शहरांतील देवळांस सोन्याचे पत्रे मारले होते. ही मेक्सिको नगरी एका तलावांत असून तिच्यांतून बाहेर पडण्यास बरेच सेतु असून प्रत्येक सेतूला मध्यें खंड पडलेला असे व तेथें ' ड्रॉब्रिज ' ( उचलतां ठेवता येण्यासारखा पूल ) असे या नगरीचा राजा मॉन्टेझुमा यानें १००० स्त्रिया सीतेप्रमाणेंच हरण करून आणल्या होत्या. याच्यावर स्वारी करणाऱ्या स्पॅनिश कार्टेझनें रामाप्रमाणेंच स्थानिक लोकांशीं सख्य करून मेक्सिकोवर हल्ला केला. ज्याप्रमाणें रामाजवळ धनुष्यबाणाचें हत्यार पाहून शास्त्र विद्येंत अनभिज्ञ असलेले वानर त्याला वश झाले, त्याचप्रमाणें स्पॅनिश लोकांजवळही दारूगोळा व तोफा हीं हत्यारें होतीं ज्यांची पद्धति तद्देशीय लोकांस नव्हती. स्पॅनिश लोकांनीं मेक्सिकन राजाला कैद केलेलें पहातांच सर्व लोक त्यांच्यावर उठले व स्पॅनिश लोकांस बाहेर कसें पडावें याची पंचाईत पडली. परंतु ते पळून गेले. तरी शेवटीं एक स्पॅनिश वीर ( Alvarado ) उभा राहिला.त्याला देवास बळी देण्याबद्दल ते लोक बोलू लागले तेव्हांतो जिवाच्या धास्तीनें पळत सुटला व त्यांनीं त्याचा पाठलाग केला. शेवटीं तो एका पुलाजवळ आला व पूल वर केलेला असतांनां देखील त्या त्वेषांत तितकी लांब—२२हात—उडी मारून खाडीं ओलांडून निघून गेला. ' Alvarado's Leap ' म्हणून ती जागा अद्याप प्रसिध्द आहे. यावरून मारुतीच्या उड्डाणाची गोष्ट अतिशयोक्ती खेरीज खरी आहे असें म्हणतां येईल. मेक्सिकोतील लोकांप्रमाणेंच लंकेतील राक्षस देखील रानटी (Uncivilised) होते ' होमरच्या इलियड ' वरून रामायणकथा घेतली असें वेबर म्हणतो तें अगदीं चूक आहे.

रामायणाच्या कालासंबंधानें प्रत्यक्ष रामायणांत 'प्रवृत्ताश्चतुरो मासाः वार्षिकाः श्रावणादयः असा एक उल्लेख सांपडतो. यावरून रामायणकालीं श्रावणमासांत वर्षाकाल सुरू होई असें दिसतें. कालिदासाच्या वेळीं आषाढ महिन्यांत वर्षाकाल सुरू होत असे असें त्याच्या मेघदुतांतील 'आषाढस्य प्रथमदिवसे' या उल्लेखावरून म्हणतां येतें. ३० दिवस पावसाळा मागें जाण्यास स्थूलमानानें २००० वर्षें लागतात. हल्लीं ज्येष्ठांत पावसाळा होतो तेव्हां कालिदास इ. स, पूर्वी पहिल्या शतकांत झाला असें मानतां येतें. मूळ रामायण इ.स.पूर्वी २१०० वर्षांपूर्वी झालें असावें असें स्थूल मानानें म्हणतां येतें. नक्की काल सांगतां येणें शक्य नाहीं.

रायायणाशीं साधारण साम्य असलेला बौद्धधर्मांतील 'दशरथजातक' या नावाच्या ग्रंथानंतरचें रामायण आहे असें कांहीं पाश्चिमात्य विद्वान म्हणतात. दशरथजातकांत खालील कथा आहे. दशरथास दोन पुत्र व एक कन्या अशीं तीन अपत्यें होता व त्यांचीं नावें अनुक्रमें राम, लक्ष्मण व सीता हीं होता. दशरथाची दुसरी बायको आवडती होती. हीं तिन्हीं सापत्न अपत्यें तुम्ही वनवासास पाठवा असा तिनें नवऱ्याशी हट्ट धरिला. दशरथानें ज्योतिषास बोलावून आणून आपल्याला आणखी १२ वर्षें आयुष्य आहे अशी आपली खात्री करून घेतली व नंतर तिघांस बोलावून आणून 'तुम्ही १२ वर्षे वनांत जाऊन परत या' असें सांगितलें. नंतर हीं तिघजण हिमालयांत गेलीं. पुढें दशरथ अपत्य शोकानें लवकरच मृत्यु पावला. रामानें वनांत आपल्या बहिणीशीं लग्न लाविलें. रामास पितृनिधनाची बातमी कांहीं दिवसांनीं समजल्यानंतर त्याला शोक झाला नाहीं. पण आपल्या स्त्रीस व बंधूस तो सहन करवणार नाहीं म्हणून त्या दोघांस नदी कांठीं नेऊन ती

शोकवार्ता त्यानें तेथें सांगितली. तीं दोघेंही शोकाविव्हल होऊन नदींत मूर्छित पडलीं. पण रामानें त्यांस पाणी लावून शुद्धींत आणलें असा प्रकार तीन वेळां झाल्यानंतर त्यानें जगाच्या नेश्वरत्वाविषयीं त्यांस बोध केला व त्यांस ताळ्यावर आणलें. नंतर पुढें तो आपल्या राज्याचा उपभोग घेऊं लागला. त्याप्रमाणें 'दशरथजातकां' तील कथाभाग आहे. राम हा बुद्धाचा पूर्वावतार होता असें त्यांत म्हटलें आहे. यावरून दशरथजातकच मूळ रामायणानंतरचें आहे असें सिद्ध होतें. कारण पितृनिधन ऐकून दुःख न होणें अस्वाभाविक आहे आणि रामाला पित्याचें मरण ऐकून दुःख झाल्याचें वर्णन रामायणांत आहे. दुःख करूं नये ही बुद्धाची शिकवणूक दाखविण्याकरितां ही बुद्धाची पूर्व आवृत्ति दाखविली आहे व रामास अगदीं अस्वाभाविक स्वरूप देऊन सीता व लक्ष्मण हीं तीनदां मूर्छित पडलीं हें ही अस्वाभाविकपणें दाखविलें आहे. "रामाची सीता कोण? बहीण कीं बायको?" या मराठी पृच्छेनें मूळ वरील गोष्टीवरून वाचकांच्या लक्षांत येईल.

मूळ रामायणाचा काल ठरविण्यास आणखी कांहीं गोष्टी उपयोगी पडतात. मगध देशाची राजधानी पाटलिपुत्र या शहराची स्थापना इ. स. पू. ४०० च्या सुमारास झाली. यापूर्वी मगधाची राजधानी राजगृह ही होती. रामायणांत पाटलिपुत्राचा उल्लेख नसून राजगृहाचा आहे यावरून इ. स. पू. ४०० च्या पूर्वी रामायण (मूळ ग्रंथ) झालें असावें असें निश्चयानें सांगतां येते. कोसल देशाची रामाच्या वेळची राजधानी अयोध्या ही रामानंतर दीर्घकालापर्यंत ओसाड होती, आणि तिचें पुनरुज्जीवन चंद्रगुप्त विक्रमादित्यानें केलें. यावरूनही वरील सिद्धांतास पुष्टि मिळते. अयोध्येचे ठिकाणीं

बौद्ध ग्रंथांत साकेताचें नांव येतें.साकेत व श्रावस्ति यांचा उल्लेख त्यांचे ग्रंथांत तेतो. पैकीं रामायणांत साकेत व श्रावस्ति यांचा उल्लेख नाहीं. पण कुशावती व श्रावस्ति ही दोन शहरें रामानें आपल्या दोन्ही मुलांस दिलीं असें वर्णन रामायणांत आहे. त्याचप्रमाणें मिथिला व विशाला या दोन शहरांचा उल्लेख आहे. यांपैकीं विशाला नगरी बुद्धकालीं अस्तित्वांत होती. यावरून मूळ रामायण बुद्धापूर्वी झालें असलें पाहिजे हें स्पष्ट आहे रामाला युवराजपद द्यावें. कीं नाहीं याबद्दल दशरथानें प्रजाजनांचा सल्ला घेतला असें रामायणांत वर्णन आहे. म्हणजे राज्यकारभार प्रजेच्या सल्ल्यानें चालत होता असें दिसतें. पण पुढें ही राज्यपद्धति नाहींशी होऊन पूर्ण राजसत्ताक पद्धति अमलांत आली. एकंदरींत मूळ रामायण ग्रंथ इ.पू. ५०० च्या पूर्वी केव्हां तरी झाला असून हल्लींचें रामायण इ.स. पू. १०० च्या सुमारास झालें असावें असें दिसतें. पाश्चिमात्य पंडित मॅकडोनेल यानें ही माहिती दिली असून त्यालाही हा सिद्धांत कबूल करणें भाग पडलें आहे. रामायणांतील भाषेवरून मात्र ते इतकें जुनें असेलसें वाटत नाहीं. कारण ती सोपी आहे. ती पाणिनीच्या नंतरच्या कालांतील भाषेसारखी दिसते असें मॅकडोनेल म्हणतो. विशेषतः अनुष्टुप छंदाची भाषा तर विशेष सोपी दिसते यावरून रामायणाच्या कालासंबंधानें नक्की अनुमान काढतां येणार नाहीं. ऋग्वेदांतीलही कांहीं ऋचांची--उ. पुरुषसूक्ताची—भाषा एकंदरींत सोपी दिसते.

रामायणापूर्वी लौकिक संस्कृत भाषेंत अनुष्टुप छंद नव्हता. तो वाल्मीकीनें ‘ मा निषाद० ’ या श्लोकाची रचना करून अमलांत आणला. ‘ शोकः श्लोकत्वमागतः ’ असें रामायणांत म्हटलें आहे. वैदिक अनुष्टुप छंदास ऱ्हस्व दीर्घ वगैरेचे नियम नाहींत. पण या

नंतरच्या संस्कृतांतील अनुष्टुप छंदास कांहीं मर्यादा घातल्या आहेत. एका गृहस्थानें मला ' गृह्णामि किं त्यजामि किं ' असा अनुष्टुप छंदाचा एक पाद म्हणून दाखविला. पण यांच्यापेक्षां ' किं गृह्णामि त्यजामि किं ' हें कानास गोड लागतें असें मी त्यास सांगितलें व पाठही तसाच सांपडला. महाभारतांतही चार प्रकारचे अनुष्टुप छंद आहेत असें एका अमेरिकन पंडितानें बारीक निरीक्षण करून ठरविलें आहे. रामायणाचे मूळ अनुष्टुप श्लोक अतिशय सुंदर आहेत. लवकुशांनीं ते गाऊन दाखविले असें रामायणांतच लिहिलें आहे; म्हणजे ते इतके सुरेल व तालबद्ध आहेत. या एकंदर श्लोक-रचनेवरून व अनुष्टुप छंदाचा संस्कृतांत प्रथमच प्रवेश केल्यामुळें वाल्मीकीस "आद्य कवि" व रामायणास "आदिकाव्य" म्हणतात. रामायणाच्या अध्यायास ' सर्ग ' असें म्हटलें आहे व यामुळें महाकाव्यांत सर्ग असावे असें पुढें ठरलें. ' अध्याय ' हा शब्द ' अध्ययन ' या शब्दावरून झाला आहे. विद्यार्थ्यांस एकाच वेळीं जितक्या भागाचें अध्ययन करितां येईल तो अध्याय. ऋग्वेदाचे सुद्धां अध्यायच केले आहेत. ' सर्ग ' या शब्दांतील कल्पना निराळी आहे. हा शब्द ' सृष्टि ' शब्दाशीं जुळता आहे. कवीनें एकाच वेळीं उत्पन्न केलेली सृष्टि तो सर्ग. एक सर्ग केला कीं कवीचें डोकें थकतें असें दिसतें. रामायणांतील सर्ग १००–११५ श्लोकांचे आहेत. पुढील काव्यांतून ही संख्या कमी कमी होत गेली यावरून वरील म्हणण्यास पुष्टि मिळते. हल्लींच्या महाकाव्यांचे सर्ग ७०–८० श्लोकांतच संपतात. सर्गाचा शेवटचा श्लोक सर्गांतील वृत्तापेक्षां भिन्न वृत्तांत असावा असा एक नियम आढळतो. या कल्पनेचें मूळ ऋग्वेदांतही आहे आणि रामायणांतही असेंच आहे; आणि यावरून महाकाव्याचें तें एक लक्षण मानलें गेलें आहे. त्याचप्रमाणें रामा-

यणाचे सर्व सर्ग अनुष्टुप छंदांत नसून प्रत्येक सर्गास भिन्न वृत्त अमलांत आणिलें आहे. महाभारतांत हा नियम इतका स्पष्टपणें नाहीं. हल्लीं अनुष्टुप छंदाचें महत्व जाऊन तें उपजातिवृत्तास आलें आहे. रामायणांत आर्यावृत्त नाहीं यावरून त्या कालीं आर्यावृत्त अस्तित्वांत नव्हतें असें म्हणतां येत नाहीं. अशीं नकारात्मक अनुमानें सहसा काढूं नयेत. बौद्ध लोकांनीं आर्यावृत्ताचा पुष्कळ उपयोग केला आहे.

रामायण काव्यदृष्ट्या अतिशय सुंदर आहे हें वर सांगितलेंच आहे. या दृष्टीनें थोडासा विचार करूं. त्यांत अलंकारांचीं फार उत्तम उदाहरणें अनेक सांपडतात. त्यांतही उत्तम अलंकार स्वभावोक्ति. पाश्चिमात्य लोकांच्या मतें हा अलंकार आम्हांस चांगला साधत नाहीं. रामायणाकडे नीट काळजीपूर्वक पाहिलें असतां या विधानाचा फोलपणा तेव्हांच सिद्ध होतो. सहाही ऋतूंचें वर्णन असणें हें एक महाकाव्याचें लक्षण समजलें जातें. ऋतूंचीं वर्णनें रामायणाइतकीं सुंदर दुसऱ्या कोठेंही नाहींत. तीं प्रसंगोपात्त सृष्टीला अगदीं धरून फारच सुंदर केलीं आहेत. वर्षाऋतूचें वर्णन वाचीत असतां आपण पावसांत उभे असून पावसाच्या धारा आपल्या अंगावर पडत आहेत कीं काय असा भास होतो त्याचप्रमाणें थंडीचें वर्णन करतांना " गोदावरीचें पाणी पिण्याकरितां जे हत्ती आले त्यांनीं सोंडेनें पाण्यास स्पर्श करतांच त्या मागें घतल्या " असें कवीनें जें म्हटलें आहे, त्यावरून कवीची अवलोकन शक्ति किती सूक्ष्म व दांडगी आहे याची कल्पना येते. दुसऱ्या कोणत्याही काव्यापेक्षां या बाबतींत रामायणाचा नंबर वर लागतो. कालिदासाच्या काव्यांतही हा अलंकार (स्वभावोक्ति) चांगला दृष्टीस पडतो. या नंतर दुसरा अलंकार म्हणजे उपमालंकार. हा अलंकार

रामायणांत इतका भरपूर व सुंदर आहे कीं, पाश्चिमात्य पंडितांस देखील "Valmiki is rich in the Cumulating of Similes" अशी कबुली द्यावी लागली आहे ! एकावर एक अशा उपमा देण्यांत वाल्मीकीक अगदीं हातखंडा आहे, रूपका, उत्प्रेक्षा या संबंधानेंही हीच स्थिति. या अलंकाराच्या रामायणांत उतरंडीच्या उतरंडी लावल्यासारख्या दिसतात. होमर कवीची दीर्घोपमांत ( Long tailed Similes ) फार प्रख्याति असल्याबद्दल स्तुति करितात. पण वाल्मीकीला त्याच्याही वर बसविणें भाग पडेल. मराठी भाषेंत उत्प्रेक्षांचीं उदाहरणें ज्ञानेश्वरींत फार आहेत. रामायणाइतके दुसऱ्या कोणत्याही काव्यांत भरगच्च अलंकार दिसत नाहींत. अशोक वनांतील कृश सीतेचें वर्णन करितांना अमूर्त कल्पनांच्या उपमा तिला दिल्या आहेत. या उपमा इतक्या सुंदर व तंतोतंत आहेत कीं, कवि कल्पना सृष्टींत इतक्या भराऱ्या कशा मारतो याचें आश्चर्य वाटतें. सर्व रामायणांत श्लेषालंकार फक्त एकाच चरणांत आहे. महाभारतांत तर तो मुळींच नाहीं. श्लेष हा अलंकार प्रारंभीं फार उपयोगांत आणीत नसत असें दिसतें. बाणाच्या ग्रंथांत मात्र श्लेषांचें दाट जंगलच आहे. पण बाणाचें काव्य उत्तम असल्यामुळें ते बरे लागतात. इतरांचीं श्लिष्ट काव्यें वांचतांना मनास बरें वाटत नाहीं. उत्तरेकडील कवींस श्लेषालंकार प्रिय फार असतो. ( श्लेषप्रायमुदीच्येषु ), दाक्षिणात्यांचा भर उत्प्रेक्षालंकारावर असतो ( उत्प्रेक्षा दाक्षिणात्यांचा ) आणि गौड काव्यांत अक्षरडंबर असतें ( गौडेष्वक्षरडम्बरम् ) असें बाणानेंच वर्णन केलें आहे.

रामायणाचीं निरनिराळ्या भाषांतून जीं रूपांतरें झालीं आहेत त्यांत हिंदी कवि तुलसीदास याचें ' रामचरित मानस ' हें रूपांतर सर्वोत्कृष्ट आहे. कांहीं ठिकाणीं तर वाल्मीकीपेक्षांही तुलसीदासानें

चरकडी केली आहे. म्हणूनच उत्तर हिंदुस्तानांत तें आबालवृद्धांस प्रिय झालें असून वेदतुल्य त्यास मान मिळत आहे.

## महाकाव्यें.

मागें सांगितलेंच आहे कीं महाभारताचें अनुकरण करणारे ग्रंथ म्हणजे पुराणें 'पुराणें धर्म निश्चयः' ही महत्वाकांक्षा धरल्यानें पुराणांची फारच गडबड झाली आहे, महाभारताचें उदात्तत्व त्यांस कायम ठेवतां आलें नाहीं. रामायणाचें अनुकरण करणारे काव्यग्रंथ-पंच महा काव्यें वगैरे-तसे वाईट झाले नाहींत, तरी देखील सदरहू काव्यग्रंथांत रामायणाचें काव्य व शैली हीं पूर्णपणें उतरलीं नाहींत व रामायणाचें अग्रस्थान गेलें नाहीं. हीं पंचमहाकाव्यें व तत्सम कालीन इतर काव्य ग्रंथ (दरबारी महाकाव्यें) यांस पाश्चात्य पंडितांनीं 'कोर्ट एपिक्स' अशी संज्ञा दिली आहे. या संज्ञेचा अर्थ काय तें बरोबर सांगतां येत नाहीं. तरी माझें मत असें आहे कीं, रामायण व महाभारत या ग्रंथांतील काव्य अयत्नसिद्ध असून व्यासवाल्मीकींची वृत्ति स्वैर व सहजस्फूर्तीनें चालणारी आहे, आणि या पुढील काव्यांत पुष्कळशी कृत्रिमता आहे. जसा दरबारी वागण्यांत, बोलण्यांत, चालण्यांत, पोषाकांत कृत्रिमपणा असतो, त्याप्रमाणें काव्य करांत असतांना हे कवि कांहीं विशिष्ट बंधनांनीं जखडलेले दिसतात. हीं काव्यें यत्नानें बनविलीं आहेत. कालिदासाच्या काव्यांत ही गोष्ट अतिशय थोड्या प्रमाणांत दृष्टीस पडते, पण पुढील काव्यांत हा कृत्रिमपणा उत्तरोत्तर वाढत गेलेला दिसतो.

उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम् ।  
दण्डिनः (नैषधे) पदलालित्यं माघे सन्ति त्रयो-गुणाः ॥

हा श्लोक याच गोष्टीचा द्योतक आहे.

'विभावरीभिर्विभरांबभूविरे' हें नैषधांतील पदलालित्याचें एक उदाहरण म्हणून देतां येईल. दरबारांत पुष्कळ गोष्टी जशा दिखाऊ अतएव कृत्रिम म्हणून कराव्या लागतात, त्याचप्रमाणें या काव्यांची स्थिति असल्यामुळेंच कदाचित पाश्चात्यांनीं या महाकाव्यांना 'कोर्ट एपिक अगर दरबारी महाकाव्य' असें म्हटलें असावें.

ही पध्दति सुरू केव्हां झाली याचा आतां विचार करूं. या कवींचा अगर अशा भाषेच्या किंवा काव्यांच्या पध्दतीचा काळ ठरविणें हें फार बिकट काम आहे. या कवींनीं आपले काल लिहून ठेविले नाहींत, त्यामुळें पंचाईत पडते. जिवंतपणीं लोकांस हंसवून मरतांना पाय उभे करून मेल्यामुळें मेल्यानंतरही लोकांस हंसविणाऱ्या विदूषकाची अशा वेळीं आठवण होते, कारण या कवींच्या पश्चात त्यांच्या कालनिर्णयासंबंधानें मोठमोठ्या पंडितांत नेहमीं वाद चालू असतात, व त्यांना पांडित्य चालवावें लागतें. म्हणजे आपला काल ठरवितांना जाड्या विद्वानांतही तंटे उपस्थित होऊन विद्वत्तापूर्ण चर्चा अशी योजना या कवींनीं करून ठेविल्यासारखी दिसते. असो. पाश्चात्य पंडित ज्याला 'स्टाइल्' म्हणतात, त्याला संस्कृतांत 'रीति' असा शब्द आहे. या रीतींचें वैदर्भी व गौडी असे दोन प्रकार संस्कृत ग्रंथकारांनीं केलेले आपणांस आढळून येतात. अक्षर रचना गोड असून लहानलहान समास असणें असें वैदर्भी रीतींचें थोडक्यांत लक्षण आहे. या रीतीचें चांगलें उदाहरण म्हणजे कालिदासच होय. गौडी रीतीचें लक्षण म्हटलें म्हणजे शब्दावडंबर होय. महाभारतांत देखील अशा दरबारी काव्यांचा उल्लेख आढळतो. पतंजलीच्या महाभाष्यांत तर आहेच. यावरून या कृत्रिम काव्यांचा जन्मकाल इसवी सनापूर्वींचा ठरतो.

अश्वघोषाचें बुद्धचरित म्हणून जें काव्य आहे, त्याचें चिनी भाषेंत इ. स. ४०० च्या सुमारास भाषांतर झालें आहे, यावरून त्याचा रचनाकाल निदान इ. स. ३०० च्या सुमाराचा असावा. अश्वघोषाची व कालिदासाची 'रीति' यांत पुष्कळ साम्य आहे. कालिदासास जे इ. स. च्या सहाव्या शतकांत ओढतात त्यांच्या मतें अर्थात अश्वघोषाचें अनुकरण कालिदासानें केलें आहे. पण माझ्या मतें उलट कालिदासाचें अनुकरण अश्वघोषानें केलें असून कालिदास इ. स. पूर्वी पहिल्या शतकांतील आहे. आपणांस हल्लीं पंचमहाकाव्येंच उपलब्ध आहेत, पण याशिवाय इतर महाकाव्यें त्या वेळीं पुष्कळ असावींत असा निश्चय आहे. हरिषेण कवीनें लिहिलेला समुद्रगुप्ताच्या स्तुतिपर (इ. स. ४०० ) असा जो शिलालेख अलाहाबाद येथें सांपडला आहे, त्यांतील काव्य कालिदासाशीं स्पर्धा करणारें आहे. हा लेख पद्यगद्यमिश्रित असला तरी एकंदरींत काव्यमयच आहे. कारण आपल्याकडे काव्य म्हणजे पद्यमयच असलें पाहिजे असा निर्बंध नाहीं. बाणाच्या कादंबरीची गणना काव्यांतच करितां येईल. इ. स. १५० च्या सुमाराच्या गिरनारच्या शिलालेखावरून त्या काळींहि काव्याची वैदर्भी रीति उपयोगांत होती असें दिसतें.

युरोपखंडांत ज्याप्रमाणें होमर, व्हर्जिल यांनंतर काव्यसृष्टींत कित्येक वर्षे खंड पडला होता, व नंतर कांहीं काळानें काव्यें निर्माण होऊं लागलीं, त्याप्रमाणें हिंदुस्थानांत देखील ख्रिस्ती सनाच्या आरंभीं काव्यें निर्माण झालीं, त्यानंतर कालिदासापर्यंत पांचसहाशें वर्षे खंड पडला असें मॅक्समुल्लर या पंडिताचें म्हणणें आहे. या नवीन अवताराला ते 'रिनायसन्स' ( यूरोपप्रमाणें ) म्हणतात. शक, यवन, पल्लव वगैरे लोकांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून

आपला अंमल बसविल्यानंतर बरेच दिवस काव्यें निर्माण झालीं नाहींत आणि नंतर विक्रमादित्य चंद्रगुप्त ( इ. स. ४०० ) यांच्यापासून पुढें कालिदासादि कवि निर्माण होऊन काव्योत्पत्ति होऊं लागली असें त्याचें म्हणणें आहे. परंतु या सिद्धांतानंतर अश्वघोषाचें बुद्धचरित सांपडल्यामुळें व तें या मधल्या म्हणजे कनिष्क राजांच्या वेळचें असल्यामुळें पाश्चात्य विद्वानांनीं सदरहू सिद्धांत सोडून दिला आहे. या कनिष्कानें बौद्ध धर्म स्वीकारला होता. यावरून काव्यग्रंथांची उत्पत्ति इ. स. पूर्वकाळापासून अव्याहतपणें चालू असून इ. स. १००० पर्यंत उत्तम उत्तम ग्रंथकार निर्माण झाले असें स्पष्ट ठरतें.

विक्रमाच्या गळ्यांतील नवरत्नहाराची कल्पना पुढील श्लोकांत दिलेली ऐतिहासिक सत्य नव्हे.

धन्वन्तरिः क्षपणकोऽमरसिंहशङ्कु— ।
वेतालभट्टघटखर्परकालिदासाः ॥
ख्यातो वराहमिहिरो नृपतेः सभायां
रत्नानि वै वररुचिर्नवविक्रमस्य ॥

अशीं या नवरत्नांचीं नावें आहेत. पण या नऊजणांचे काल इतके भिन्न आहेत कीं, या गोष्टीस निखालस असत्य म्हणावें लागतें. ही नवरत्नांची कल्पना अकबराच्या दरबारासही पुढें लावली गेली.

कालिदासाच्या काव्याला केवळ कृत्रिम काव्य म्हणतां येत नाहीं. पुढील कवींनीं मात्र ही रीति हळुहळू वाढविली आहे. चित्रकाव्य हा एक महाकाव्याचा भाग गणिला गेला आहे. संस्कृत भाषेची शक्ति; कोश व व्याकरण यांच्या साहाय्यामुळें विलक्षण झालेली आहे. उत्तर हिंदुस्थानांतील एका पंडितानें भागवतांतील पहिल्या श्लोकाचे निरनिराळे १०८ अर्थ लावून

दाखविले आहेत. मी तिकडे असतांना एक पंडित मजकडे येऊन '१०९ वा अर्थ होळकरसरकारला उद्देशून लावून दाखवितों' असें म्हणूं लागला, तेव्हां 'तूं विद्वान आहेस; पण हा अर्थ प्रसिद्ध न करतां मनांत ठेव' असें मी त्यास सांगितलें. प्रसिद्ध भारतीबुवा पुराणिक यांचें पुराण ऐकण्यास मी कुरुंदवाड येथें गेलों होतों तेव्हां 'परिमृष्टकुण्डलः' असें पद आलें असतां त्यांनीं तें दहाही अवतारांकडे लावून दाखवितों असें सांगितलें व कोश आणि व्याकरण यांच्या साहाय्यानें सप्रमाण लावूनही दाखविलें. किरातांत व माघांत 'दादा ददाददादादा' वगैरे एकाक्षराचे सबंध श्लोक करून दाखविले आहेत.

महाकाव्यांतील प्रत्येक श्लोकांत अलंकार पाहिजे असा नियम दिसतो. पण प्रत्येक अवयवावर चित्रविचित्र अलंकार घालून नटलेल्या स्त्रीप्रमाणें ते विशोभित दिसतात. माघासंबंधीं तर असें सांगतात कीं, अमुक अलंकाराचा उपयोग करतों असें सांगून तो श्लोक करीत असे. (इ. स. १०००) असो. एकंदरींत या कृत्रिम महाकाव्यांचा काल इ. स. पूर्वी १०० पासून इ. स. १००० पर्यंतचा आहे हें वरील विवेचनावरून दिसून येईल. किंबहुना महाभारतांत काव्याचा उल्लेख असल्यानें हा काल त्याच्याही २।३ शतकें मागें नेतां येईल.

## —कालिदास—

कालिदासाचा काल कोणता याविषयीं निरनिराळीं तीन मतें आहेत. माझें मत तो इ. स. पूर्वी ५७ च्या सुमारास झाला असावा असें आहे; मॅकडोनेल व त्याच्या बाजूचे इतर लोक तो गुप्तवंशांतील चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या वेळीं म्हणजे इ. स. ४००

च्या सुमारास झाला असें ह्मणतात; व तिसऱ्या मताच्या लोकांप्रमाणें तो इ. स. ५०० व ६०० च्या दरम्यान झाला असावा.

सुप्रसिद्ध संस्कृत कवि बाणभट्ट हा श्रीहर्षाचा समकालीन असून इ. स. ६२५ च्या सुमारास झाला ही गोष्ट निश्चित आहे. व ज्या अर्थीं बाणानें कालिदासाचा उल्लेख केला आहे, त्या अर्थीं तो इ. स. ६२५ च्या पूर्वीं झाला असला पाहिजे हें उघड आहे. पण वर सांगितलेले तिन्ही काल या मर्यादेंत येऊं शकतात, त्यांपैकीं नक्की कोणता हें आपणास पहावयाचें आहे.

इ. स. ५०० च्या सुमारास मंदसोरचा विष्णुवर्धन यशोधर्म या नांवाचा एक पराक्रमी राजा होता. त्यानें हूणांचा पराभव केला व हिंदुस्थानांत तो सार्वभौम राजा झाला. या राजाच्या दरबारीं मातृगुप्त या नांवाचा एक उत्तम कवि होता. काश्मीर देशचा राजा वारल्यानंतर गादीस वारस नसल्यामुळें या मातृगुप्तास तेथील राजा यशोधर्म्याकडून नेमण्यांत आलें होतें, पण पुढें ८।१० वर्षे राज्य केल्यानंतर यशोधर्मा वारला असें पाहून काश्मीरच्या गादीचा खरा वारस येऊन त्यानें याच्यापासून आपलें राज्य घेतलें व नंतर मातृगुप्त कवि काशीक्षेत्रीं जाऊन तेथें त्यानें आपला काळ घालविला. अशी ऐतिहासिक कथा असून ती 'राजतरंगिणी' या ग्रंथांत वर्णिली आहे. या कथेंतील मातृगुप्त म्हणजे कालिदास असें म्हणणारा एक पक्ष आहे. या विष्णुवर्धनास विक्रमादित्य ही संज्ञा असल्यामुळें कालिदास विक्रमाच्या दरबारीं होता या दंतकथेसही या पक्षाच्या मताप्रमाणें पुष्टि मिळते.

दुसऱ्या एका पक्षाचें असें म्हणणें आहे कीं, उज्जनी शहर शक लोकांकडून ज्या चंद्रगुप्तानें इ. स. ४०० च्या सुमारास घेतलें

त्यानें विक्रमादित्य ही पदवी घेतली होती व ह्या विक्रमाच्या पदरीं कालिदास होता.

माझ्या मतानें कालिदास इ. स. पूर्वी ५७ च्या सुमारास झाला असावा. पण पहिल्यानेंच एक गोष्ट सांगून ठेविली पाहिजे आणि ती ही कीं कालिदास विक्रमादित्याच्या पदरीं होता ही एक निव्वळ दंतकथा असून तिजवर विश्वास ठेवण्यासमुद्धां आधार सांपडला नाहीं; कारण 'धन्वन्तरिक्षपणको०' इत्यादि विक्रमाच्या दरबारांतील ९ रत्नें सांगणारा श्लोक फार मागूनचा ( सुमारें ११ व्या शतकांतला ) आहे. तेव्हां कालिदासास एखाद्या विक्रमाच्या मारून मुटकून माथीं बसविण्यांत कांहीं हंशील नाहीं.

कालिदासाचा काल ठरवितांना त्याच्या स्वतःशिवाय इतर लोकांचा आधार आपणांस मिळत नाहीं; व कालिदासानें स्वतः आपल्या ग्रंथांत कालाचा उल्लेख स्पष्टपणें केला नाहीं. यामुळें या बाबतींत त्याच्या ग्रंथांत असलेल्या कांहीं ऐतिहासिक उल्लेखांवरून व त्याचा काल आपणांस ठरविला पाहिजे. पहिल्यानें त्याचें उत्तम काव्य जें मेघदूत त्याचा विचार करूं.

मेघदूतांतील यक्ष हा रामगिरीवर रहात असून त्याची स्त्री अलका नगरींत होती व तिच्याकडे त्यानें मेघास दूत म्हणून पाठवून दिलें. त्या वेळीं त्यानें त्यास उत्तरेचा रस्ता दाखविला आहे. हा रामगिरी म्हणजे हल्लीं नागपुराजवळ असलेलें रामटेक होय. अलका नगरींत यक्षस्त्री होती या वर्णनावरून व इतरही गोष्टींवरून कालिदासाचा काश्मिराशीं संबंध असला पाहिजे ही गोष्ट मला मान्य आहे. हा उत्तरेचा मार्ग कालिदासानें चांगल्या रीतीनें व बरीच माहिती देऊन वर्णन केला आहे. उत्तरेकडे जातांना नर्मदा नदी लागणारच व तिचें वर्णन कालिदासानें केलें आहे.

नंतर विदिशा नगरीचें वर्णन आहे. ही विदिशा म्हणजे हल्लींचें भेलसा शहर होय. हल्लींचा जो इंडियन मिडलंड रेल्वे रस्ता तोच उत्तरेस जाण्यास सरळ व सोयीचा रस्ता प्राचीन काळापासून आहे. या रस्त्यापासून उज्जनी शहर दूर राहातें, तथापि कालिदासानें आपल्या यक्षास मेघाला तिकडून मार्ग आक्रमिण्यास लाविलें आहे. आणि असा हा वांकडा मार्ग आहे तरी तूं तिकडूनच जा असेंही बजावून सांगविलें आहे. ( वक्रः पन्था यदपि भवतः—मेघ० पू० २७ ) यावरून कालिदास हा उज्जनीस रहात होता असें दिसतें. उज्जनीच्या महाकालेश्वराचें माहात्म्य त्याच्या काळीं फार असलें पाहिजे. आणि हें वर्णन त्या कालास अनुसरून अतिशय उत्तम केलें आहे. त्या उज्जनी ऊर्फ विशाला नगरीचें वर्णन करीत असतांना त्या प्रांतांतील लोक 'उदयनकथाकोविद' आहेत असें म्हटलें आहे. ( प्राप्यावन्तीनुदयनकथाकोविदग्रामवृद्धान्—पू० मे० ३० ) आणि सदर श्लोकांतच उज्जनी 'दिवः कान्तिमत्खण्ड-मेकम्' असें म्हटलें आहे. तेथें 'हैमतालद्रुमवन' होतें असेंही वर्णिलें आहे. अशा रीतीनें उज्जनी शहराची भरभराट केव्हां होती हा एक प्रश्न आहे. इतिहासाकडे लक्ष्य दिलें असतां असा काल इ० स० पू० ५७ च्या सुमाराचा होता असें दिसेल.

सदरहू उदयन राजाची गोष्ट कथासरित्सागरांत आहे. हा वत्स-देशचा राजा असून अतिशय पराक्रमी व मृगयेचा शोकी होता. त्याच्या पदरीं यौगंधरायण हा अत्यंत मुत्सद्दी प्रधान होता. त्या वेळीं उज्जनीस प्रद्योत नांवाचा राजा राज्य करीत असून त्याला वासवदत्ता नांवाची कन्या होती. वत्सराज उज्जनीच्या आसपास शिकारीस गेला असतां प्रद्योतानें एक कृत्रिम हत्ती तयार करविला व त्याचे पोटांत सशस्त्र सैनिक लपवून ठेवून तो सोडून दिला.

दाखविले आहेत. मी तिकडे असतांना एक पंडित मजकडे येऊन '१०९ वा अर्थ होळकरसरकारला उद्देशून लावून दाखवितों' असें म्हणूं लागला, तेव्हां 'तूं विद्वान आहेस; पण हा अर्थ प्रसिद्ध न करतां मनांत ठेव' असें मी त्यास सांगितलें. प्रसिद्ध भारतीबुवा पुराणिक यांचें पुराण ऐकण्यास मी कुरुंदवाड येथें गेलों होतों तेव्हां 'परिमृष्टकुण्डलः' असें पद आलें असतां त्यांनीं तें दहाही अवतारांकडे लावून दाखवितों असें सांगितलें व कोश आणि व्याकरण यांच्या साहाय्यानें सप्रमाण लावूनही दाखविलें. किरातांत व माघांत 'दादा ददाद्दादादा' वगैरे एकाक्षराचे सबंध श्लोक करून दाखविले आहेत.

महाकाव्यांतील प्रत्येक श्लोकांत अलंकार पाहिजे असा नियम दिसतो. पण प्रत्येक अवयवावर चित्रविचित्र अलंकार घालून नटलेल्या स्त्रीप्रमाणें ते विशोभित दिसतात. माघासंबंधीं तर असें सांगतात कीं, अमुक अलंकाराचा उपयोग करतों असें सांगून तो श्लोक करीत असे. (इ. स. १०००) असो. एकंदरींत या कृत्रिम महाकाव्यांचा काल इ. स. पूर्वी १०० पासून इ. स. १००० पर्यंतचा आहे हें वरील विवेचनावरून दिसून येईल. किंबहुना महाभारतांत काव्याचा उल्लेख असल्यानें हा काल त्याच्याही २।३ शतकें मागें नेतां येईल.

## —कालिदास—

कालिदासाचा काल कोणता याविषयीं निरनिराळीं तीन मतें आहेत. माझें मत तो इ. स. पूर्वी ५७ च्या सुमारास झाला असावा असें आहे; मॅकडोनेल व त्याच्या बाजूचे इतर लोक तो गुप्तवंशांतील चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या वेळीं म्हणजे इ. स. ४००

च्या सुमारास झाला असें ह्मणतात; व तिसऱ्या मताच्या लोकांप्रमाणें तो इ. स. ५०० व ६०० च्या दरम्यान झाला असावा.

सुप्रसिद्ध संस्कृत कवि बाणभट्ट हा श्रीहर्षाचा समकालीन असून इ. स. ६२५ च्या सुमारास झाला ही गोष्ट निश्चित आहे. व ज्या अर्थीं बाणानें कालिदासाचा उल्लेख केला आहे, त्या अर्थीं तो इ. स. ६२५ च्या पूर्वीं झाला असला पाहिजे हें उघड आहे. पण वर सांगितलेले तिन्ही काल या मर्यादेंत येऊं शकतात, त्यांपैकीं नक्की कोणता हें आपणास पहावयाचें आहे.

इ. स. ५०० च्या सुमारास मंदसोरचा विष्णुवर्धन यशोधर्म या नांवाचा एक पराक्रमी राजा होता. त्यानें हूणांचा पराभव केला व हिंदुस्थानांत तो सार्वभौम राजा झाला. या राजाच्या दरबारीं मातृगुप्त या नांवाचा एक उत्तम कवि होता. काश्मीर देशचा राजा वारल्यानंतर गादीस वारस नसल्यामुळें या मातृगुप्तास तेथील राजा यशोधर्म्याकडून नेमण्यांत आलें होतें, पण पुढें ८।१० वर्षें राज्य केल्यानंतर यशोधर्मा वारला असें पाहून काश्मीरच्या गादीचा खरा वारस येऊन त्यानें याच्यापासून आपलें राज्य घेतलें व नंतर मातृगुप्त कवि काशीक्षेत्रीं जाऊन तेथें त्यानें आपला काळ घालविला. अशी ऐतिहासिक कथा असून ती 'राजतरंगिणी' या ग्रंथांत वर्णिली आहे. या कथेंतील मातृगुप्त म्हणजे कालिदास असें म्हणणारा एक पक्ष आहे. या विष्णुवर्धनास विक्रमादित्य ही संज्ञा असल्यामुळें कालिदास विक्रमाच्या दरबारीं होता या दंतकथेसही या पक्षाच्या मताप्रमाणें पुष्टि मिळते.

दुसऱ्या एका पक्षाचें असें म्हणणें आहे कीं, उज्जनी शहर शक लोकांकडून ज्या चंद्रगुप्तानें इ. स. ४०० च्या सुमारास घेतलें

त्यानें विक्रमादित्य ही पदवी घेतली होती व ह्या विक्रमाच्या पदरीं कालिदास होता.

माझ्या मतानें कालिदास इ. स. पूर्वी ५७ च्या सुमारास झाला असावा. पण पहिल्यानेंच एक गोष्ट सांगून ठेविली पाहिजे आणि ती ही कीं कालिदास विक्रमादित्याच्या पदरीं होता ही एक निव्वळ दंतकथा असून तिजवर विश्वास ठेवण्यासुद्धां आधार सांपडला नाहीं; कारण 'धन्वन्तरिक्षपणको०' इत्यादि विक्रमाच्या दरबारांतील ९ रत्नें सांगणारा श्लोक फार मागूनचा (सुमारें ११ व्या शतकांतला) आहे. तेव्हां कालिदासास एखाद्या विक्रमाच्या मारून मुटकून माथीं बसविण्यांत कांहीं हंशील नाहीं.

कालिदासाचा काल ठरवितांना त्याच्या स्वतःशिवाय इतर लोकांचा आधार आपणांस मिळत नाहीं; व कालिदासानें स्वतः आपल्या ग्रंथांत कालाचा उल्लेख स्पष्टपणें केला नाहीं. यामुळें या बाबतींत त्याच्या ग्रंथांत असलेल्या कांहीं ऐतिहासिक उल्लेखांवरून व त्याचा काल आपणांस ठरविला पाहिजे. पहिल्यानें त्याचें उत्तम काव्य जें मेघदूत त्याचा विचार करूं.

मेघदूतांतील यक्ष हा रामगिरीवर रहात असून त्याची स्त्री अलका नगरींत होती व तिच्याकडे त्यानें मेघास दूत म्हणून पाठवून दिलें. त्या वेळीं त्यानें त्यास उत्तरेचा रस्ता दाखविला आहे. हा रामगिरी म्हणजे हल्लीं नागपुराजवळ असलेलें रामटेक होय. अलका नगरींत यक्षस्त्री होती या वर्णनावरून व इतरही गोष्टींवरून कालिदासाचा काश्मिराशीं संबंध असला पाहिजे ही गोष्ट मला मान्य आहे. हा उत्तरेचा मार्ग कालिदासानें चांगल्या रीतीनें व बरीच माहिती देऊन वर्णन केला आहे. उत्तरेकडे जातांना नर्मदा नदी लागणारच व तिचें वर्णन कालिदासानें केलें आहे—

नंतर विदिशा नगरीचें वर्णन आहे. ही विदिशा म्हणजे हल्लींचें भेलसा शहर होय. हल्लींचा जो इंडियन मिडलंड रेल्वे रस्ता तोच उत्तरेस जाण्यास सरळ व सोयीचा रस्ता प्राचीन काळापासून आहे. या रस्त्यापासून उज्जनी शहर दूर राहातें, तथापि कालिदासानें आपल्या यक्षास मेघाला तिकडून मार्ग आक्रमिण्यास लाविलें आहे. आणि असा हा वांकडा मार्ग आहे तरी तूं तिकडूनच जा असेंही बजावून सांगविलें आहे. (वक्रः पन्था यदपि भवतः—मेघ० पू० २७) यावरून कालिदास हा उज्जनीस रहात होता असें दिसतें. उज्जनीच्या महाकालेश्वराचें माहात्म्य त्याच्या काळीं फार असलें पाहिजे. आणि हें वर्णन त्या कालास अनुसरून अतिशय उत्तम केलें आहे. त्या उज्जनी ऊर्फ विशाला नगरीचें वर्णन करीत असतांना त्या प्रांतांतील लोक 'उदयनकथाकोविद' आहेत असें म्हटलें आहे. (प्राप्यावन्तीनुदयनकथाकोविदग्रामवृद्धान्—पू० मे० ३०) आणि सदर श्लोकांतच उज्जनी 'दिवः कान्तिमत्खण्ड-मेकम्' असें म्हटलें आहे. तेथें 'हैमतालद्रुमवन' होतें असेंही वर्णिलें आहे. अशा रीतीनें उज्जनी शहराची भरभराट केव्हां होती हा एक प्रश्न आहे. इतिहासाकडे लक्ष्य दिलें असतां असा काल इ० स० पू० ५७ च्या सुमाराचा होता असें दिसेल.

सदरहू उदयन राजाची गोष्ट कथासरित्सागरांत आहे. हा वत्स-देशचा राजा असून अतिशय पराक्रमी व मृगयेचा शोकी होता. त्याच्या पदरीं यौगंधरायण हा अत्यंत मुत्सद्दी प्रधान होता. त्या वेळीं उज्जनीस प्रद्योत नांवाचा राजा राज्य करीत असून त्याला वासवदत्ता नांवाची कन्या होती. वत्सराज उज्जनीच्या आसपास शिकारीस गेला असतां प्रद्योतानें एक कृत्रिम हत्ती तयार करविला व त्याचे पोटांत सशस्त्र सैनिक लपवून ठेवून तो सोडून दिला.

त्यानें विक्रमादित्य ही पदवी घेतली होती व ह्या विक्रमाच्या पदरीं कालिदास होता.

माझ्या मतानें कालिदास इ. स. पूर्वी ५७ च्या सुमारास झाला असावा. पण पहिल्यानेंच एक गोष्ट सांगून ठेविली पाहिजे आणि ती ही कीं कालिदास विक्रमादित्याच्या पदरीं होता ही एक निव्वळ दंतकथा असून तिजवर विश्वास ठेवण्याससुद्धां आधार सांपडला नाहीं; कारण 'धन्वन्तरिक्षपणको०' इत्यादि विक्रमाच्या दरबारांतील ९ रत्नें सांगणारा श्लोक फार मागूनचा ( सुमारें ११ व्या शतकांतला ) आहे. तेव्हां कालिदासास एखाद्या विक्रमाच्या मारून मुटकून माथीं बसविण्यांत कांहीं हंशील नाहीं.

कालिदासाचा काल ठरवितांना त्याच्या स्वतःशिवाय इतर लोकांचा आधार आपणांस मिळत नाहीं; व कालिदासानें स्वतः आपल्या ग्रंथांत कालाचा उल्लेख स्पष्टपणें केला नाहीं. यामुळें या बाबतींत त्याच्या ग्रंथांत असलेल्या कांहीं ऐतिहासिक उल्लेखांवरून व त्याचा काल आपणांस ठरविला पाहिजे. पहिल्यानें त्याचें उत्तम काव्य जें मेघदूत त्याचा विचार करूं.

मेघदूतांतील यक्ष हा रामगिरीवर रहात असून त्याची स्त्री अलका नगरींत होती व तिच्याकडे त्यानें मेघास दूत म्हणून पाठवून दिलें. त्या वेळीं त्यानें त्यास उत्तरेचा रस्ता दाखविला आहे. हा रामागिरी म्हणजे हल्लीं नागपुराजवळ असलेलें रामटेक होय. अलका नगरींत यक्षस्त्री होती या वर्णनावरून व इतरही गोष्टींवरून कालिदासाचा काश्मिराशीं संबंध असला पाहिजे ही गोष्ट मला मान्य आहे. हा उत्तरेचा मार्ग कालिदासानें चांगल्या रीतीनें व बरीच माहिती देऊन वर्णन केला आहे. उत्तरेकडे जातांना नर्मदा नदी लागणारच व तिचें वर्णन कालिदासानें केलें आहे.

नंतर विदिशा नगरीचें वर्णन आहे. ही विदिशा म्हणजे हलींचें भेलसा शहर होय. हलींचा जो इंडियन मिडलंड रेल्वे रस्ता तोच उत्तरेस जाण्यास सरळ व सोयीचा रस्ता प्राचीन काळापासून आहे. या रस्त्यापासून उज्जनी शहर दूर राहातें, तथापि कालिदासानें आपल्या यक्षास मेघाला तिकडून मार्ग आक्रमिण्यास लाविलें आहे. आणि असा हा वांकडा मार्ग आहे तरी तूं तिकडूनच जा असेंही बजावून सांगविलें आहे. ( वक्रः पन्था यदपि भवतः—मेघ० पू० २७ ) यावरून कालिदास हा उज्जनीस रहात होता असें दिसतें. उज्जनीच्या महाकालेश्वराचें माहात्म्य त्याच्या काळीं फार असलें पाहिजे. आणि हें वर्णन त्या कालास अनुसरून अतिशय उत्तम केलें आहे. त्या उज्जनी ऊर्फ विशाला नगरीचें वर्णन करीत असतांना त्या प्रांतांतील लोक 'उदयनकथाकोविद' आहेत असें म्हटलें आहे. ( प्राप्यावन्तीनुदयनकथाकोविदग्रामवृद्धान्—पू० मे० ३० ) आणि सदर श्लोकांतच उज्जनी 'दिवः कान्तिमत्खण्डमेकम्' असें म्हटलें आहे. तेथें 'हैमतालद्रुमवन' होतें असेंही वर्णिलें आहे. अशा रीतीनें उज्जनी शहराची भरभराट केव्हां होती हा एक प्रश्न आहे. इतिहासाकडे लक्ष्य दिलें असतां असा काल इ० स० पू० ५७ च्या सुमाराचा होता असें दिसेल.

सदरहू उदयन राजाची गोष्ट कथासरित्सागरांत आहे. हा वत्सदेशचा राजा असून अतिशय पराक्रमी व मृगयेचा शोकी होता. त्याच्या पदरीं यौगंधरायण हा अत्यंत मुत्सद्दी प्रधान होता. त्या वेळीं उज्जनीस प्रद्योत नांवाचा राजा राज्य करीत असून त्याला वासवदत्ता नांवाची कन्या होती. वत्सराज उज्जनीच्या आसपास शिकारीस गेला असतां प्रद्योतानें एक कृत्रिम हत्ती तयार करविला व त्याचे पोटांत सशस्त्र सैनिक लपवून ठेवून तो सोडून दिला.

उदयन त्याच्या पाठीमागें लागला व पुढें लपविलेल्या सैनिकांनीं त्यास कैद करून राजाच्या हवालीं केलें. उदयनाचा प्रधान यौगन्धरायण हा नाना फडणिसाच्याच तोडीचा होता. त्यानें युक्तीनें राजास सोडविण्याचा बेत केला. मध्यंतरीं वासवदत्ता व उदयन यांची दृष्टादृष्ट होऊन दोघांचें एकमेकांवर प्रेम बसलें आणि यौगंधरायणाच्या युक्तीप्रमाणें तीं उभयतां पळून गेलीं. अशी ही कथा आहे. असो, इ. स. ७८ च्या सुमारास विक्रमादित्याच्या मागून झालेल्या राजाचा शकांनीं पराभव केला. पुढें २०० वर्षांनंतर पाटलिपुत्राचा राजा चंद्रगुप्त यानें शकांचा पराभव करून उज्जनी शहर काबीज केलें. या चंद्रगुप्तानें स्त्रीवेष घेऊन विषयलोलुप शकराजास मारलें वगैरे कथा मनोरंजक व कथनीय आहे. हल्लीं आपण उज्जनी नगरांत गेलों असतां आपणांस विक्रमाच्या निरनिराळ्या गोष्टी सांगण्यांत येतात. एखाद्या मनुष्याच्या गोष्टी प्रचालित असतां त्याच्या पाठीमागून दुसरा प्रसिद्ध पुरुष झाला म्हणजे पहिल्याच्या गोष्टींचा लोप होऊन दुसऱ्याच्या गोष्टी सांगण्यांत येतात हा नेहमींचाच अनुभव आहे. कालिदास ज्या वेळीं होता त्या वेळीं लोक उदयनाच्याच गोष्टी सांगत असत यावरून त्याच्या मागून ज्या विक्रमादित्य चंद्रगुप्त वगैरेंच्या गोष्टी प्रसिद्ध झाल्या त्या त्या वेळीं नव्हत्या ही गोष्ट स्पष्ट आहे. कालिदास जर चंद्रगुप्तानंतर झाला असता तर त्यानें 'उज्जनींतील लोक चंद्रगुप्ताच्या किंवा शक राजाच्या कथा सांगतात' असें वर्णन केलें असतें. पण ज्या अर्थीं त्यानें उदयनकथांसच महत्त्व दिलें आहे त्याअर्थीं तो वरील राजांच्या पूर्वीं झाला असला पाहिजे हें उघड आहे. या उदयनाचें पुढें दोन श्लोकांनंतर कालिदासानें वर्णन केलें आहे त्यावरून तोच हा उदयन असें निश्चयानें सांगतां येतें.

त्यानें मंदसार नगराचें थोडें वर्णन करून उज्जनीचें ज्याअर्थी वरेंच वर्णन केलें आहे, त्याअर्थी विष्णुगुप्ताच्या पदरीं असलेला मातृगुप्त म्हणजे कालिदास नव्हे हें उघड आहे.

आतां रघुवंशांतून आपणांस काय आधार मिळतो तें पाहूं.

रघुवंशाच्या ४ थ्या सर्गांत हूणांचा उल्लेख आहे. (र० ४–६८ प्रो. पाठक हे म्हणतात कीं, हूण लोकांची वस्ती काश्मिरच्या उत्तरेस इ. स. ५०० च्या सुमारास होती असें चिनी इतिहासांत आहे आणि कालिदास त्याच सुमारास झाला असावा. माझीं याला दोन उत्तरें आहेत.

( १ ) हूणांचा उल्लेख महाभारतांतही आहे आणि यावरून इ. स. पूर्वी २००–२५० च्या सुमारास दुसऱ्या कोणी जातीचे हूण उत्तर दिशेस असले पाहिजेत. ( हूणचीननिषेवितान् ) व्यासपुत्र शुक हा मेरुपर्वतावर तपश्चर्या करीत होता त्याला व्यासांनीं ‘ तूं आत्मज्ञानप्राप्तीकरितां जनकाकडे जा ’ असें सांगतलें तेव्हां मार्ग मेरुपर्वतावरून सांगितला आहे, हा मेरुपर्वत सैबीरियाच्या उत्तरेस होता असें दिसतें. मध्यंतरीं लागणाऱ्या वालुका मैदानाचा—ज्याला हल्लीं गोबीचें मैदान म्हणतात—त्याचाही उल्लेख त्यांत आहे यावरून उत्तरकडे हूण व चीन त्यावेळीं होते असें दिसतें. प्रो. पाठक म्हणतात त्याप्रमाणें कदाचित ते पांढरे हूण ( white Huns ) नसतील; पण दुसऱ्या प्रकारचे हूण हिंदुस्थानच्या उत्तरेस इ. स. पू. २५० च्या सुमारास होते.

(२) रघुवंशांत यवनांचा उल्लेख आहे. ( यवनीमुखपद्मानां रघु० ४–६१ ) सिंधु नदीच्या तीरावर पारशी लोकांचें राज्य होतें. यवन म्हणजे ग्रीक लोक. यांचें राज्य अफगाणिस्थानच्या सरहद्दीवर होतें. हें वर्णन अफगाणिस्थानचेंच असलें पाहिजे.

कारण कालिदासानें प्रत्येक देशाचें वर्णन त्या त्या देशांतील विशिष्ट गोष्ट नजरेसमोर आणून केलें आहे; व या देशांत द्राक्षमधु व द्राक्षांचे मंडप होते असें तो म्हणतो. (रघु० ४–६५) 'पाश्चात्यैरश्वसाधनैः' असेंही त्यानें म्हटलें आहे. अलेक्झँडर घोडदळाकरितांच प्रसिद्ध होता ही गोष्ट महशूर आहे. आणि यवन या शब्दाचें मूळ 'आयोनियन ग्रीक' या ग्रीकांच्या पोट-भेदांत आहे. (शक यवन हे बॅक्ट्रियन ग्रीक) आतां हे ग्रीक अफगाणिस्थानांत केव्हां होते? इतिहासावरून असें दिसतें कीं, ते तेथें इ. स. पू. होते. इ. स. ५० पर्यंतच ते तेथें होते. इ. स. ५०० च्या सुमारास तेथें ग्रीक मुळींच नसून ग्रीकांनंतर तेथें कनिष्कांचें राज्य होतें व यानंतर हूणांचेंही राज्य झालें. यावरूनही कालिदासाचा काल इ. स. पूर्वी ५७ च्या सुमारास होता असें दिसून येईल. तो इ. स. १५०० च्या सुमारास मानणें अनैतिहासिक होईल.

आतां आपण रघुवंशाच्या ६ व्या सर्गाकडे वळूं. ५९ ते ६५ श्लोकांपर्यंत त्यांत पांड्य राजांचें वर्णन आहे. ५९ व्याच श्लोकांत त्यास 'उरगपुराचा नाथ' असें म्हटलें आहे. (अथोरगाख्यस्य पुरस्य नाथं) यावरून कालिदासाच्या वेळीं पाड्यांची राजधानी 'उरगपुर' या नांवाची होती. मल्लिनाथाच्या टीकेंत त्यानें 'उरग-पुर म्हणजे नागपूर म्हटलें आहे. हें केवळ काल्पनिक होय. कारण अन्वर्थ शब्द योजून त्याचा तसा बोध होऊं शकेल. पण दक्षिणेंत नागपूर मुळींच नाहीं; शिवाय ६३ व्या श्लोकांत पांड्य एकंदर दक्षिणेचे राजे होते असें म्हटलें आहे. (दिशः सपत्नी भव दक्षिणस्याः) त्या देशांत मोतीं होतात असेंहि वर्णन आहे. एकंदरींत हें वर्णन मध्यप्रांतांतील नागपुरास मुळींच लागूं शकत नाहीं. इति-

हाससंशोधकांस उरगपुर या नांवाचें शहर होतें असा पत्ता लागला आहे. तामिळ कवींच्या काव्यांत त्याचा ' उरय्युर ' या नांवानें उल्लेख आहे. भाषाशास्त्राप्रमाणें ' उरगपुर याचें ' उरपुर ' असें रूप होईल. हें उरयुर हल्लींच्या त्रिचनापल्लीजवळ होतें असें समजलें आहे. यावरून उरगपुर म्हणजे उरयुर हें निश्चित. हें शहर कालिदासींच्या वेळीं पांड्यांचें राजधानीचें शहर होतें व कालिदासाच्या वर्णनावरून तें राज्य त्यावेळीं आतिशय भरभराटींत होतें एवढ्या गोष्टी आपणांस स्पष्ट दिसतात. इतिहासाकडे पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, पाण्ड्य राजांची इतकीं भरभराट इ. स १५० पर्यंत होती यानंतर त्यांचें राज्य कमी होऊन तें चोल व पल्लव यांनीं जिंकिलें आणि पांड्यांची राजधानी मदुरा येथें गेली. कालिदास ४ थ्या शतकांत झाला असें मानलें तर त्यानें चोल पल्लव वगैरे राजांचा उल्लेख न करतां पांड्यांचाच उल्लेख कसा केला असा प्रश्न निघतो. ज्याअर्थी त्यानें पांड्यांचाच उल्लेख केला आहे, त्याअर्थी तो इ. स. १५० पूर्वी झाला असला पाहिजे असें निश्चयानें म्हणतां येतें; मी कालिदासास इ. स. पू. ५७ च्या सुमारास झाला असें म्हणतों त्याला हें पांड्यवर्णन फारच उपोद्बलक आहे. इ स ५७ च्या सुमारास विक्रम असो अगर नसो, कालिदास त्यावेळीं होता हें खास.

इतिहाससंबंधानें आपल्या पूर्वींच्या लोकांस विशेष प्रेम नव्हतें. एकाद्या कवीचें काव्य वाचीत असतांना ते केवळ काव्यरसाचा आस्वाद घेत असत. तो कवि केव्हां झाला वगैरे प्रश्नांची चिकित्सा करीत बसत नसत. असा भलताच विचार करणारे लोक वेडे आहेत असें एकानें म्हटलें आहे. आंबरस खात असतां त्याची चव घेण्याचें सोडून त्या आंब्याच्या भावा वगैरे संबंधानें प्रश्न विचारण्यासारखेंच

हें आहे. हा केवळ पांडित्याचा प्रश्न आहे.पंडितांना प्रत्येक ग्रंथाच्या अंतरंगाचें व बहिरंगाचें परीक्षण करावयाचें असतें. असो. कालिदासाचा काल आपण ज्या पध्दतीनें ठरविला, त्या पद्धतीवर एक आक्षेप असा येतो कीं, त्यानें ज्या गोष्टींचें वर्णन केलें आहे त्या गोष्टी होण्यापूर्वी तो नव्हता इतकेंच फार तर म्हणतां येईल. त्या गोष्टी घडून आल्यानंतर तो कितीही कालानें झाला असला तरी त्याच्या त्या वर्णनास बाध येत नाहीं. उदाहरणार्थ, कालिदासानें पांड्यांचें वर्णन केलें आहे यावरून तो पांड्यांचा पूर्वी झाला नाहीं इतकेंच ह्मणतां येईल. पण त्यांच्यानंतर कितीहि काळानें तो तें वर्णन करूं शकेल. पण यावर असें उत्तर आहे कीं **इतिहास लेखकांच्या** बाबतींत ही गोष्ट खरी आहे. पण कवि आणि इतिहास लेखक यांच्या वृत्तींत फार अंतर असतें. कवि वर्णन करावयास लागला म्हणजे त्याला आपला स्वतःचा काल सोडून फार मागें जातां येत नाहीं व त्या भरांत तो जुन्या गोष्टींना त्याच्या समकालीन गोष्टींचा पेहराव चढवितो. या गोष्टींचें प्रत्यंतर रघुवंशाच्या ६ व्याच सर्गांतील ४९ वा श्लोक पाहिला असतां येईल. त्या ठिकाणीं कालिदास, शूरसेन म्हणजे मथुरा या देशचा राजा सुषेण याचें वर्णन इंदुमतीच्या दौवारिकीकडून करवीत आहे. इंदुमती ही अजाची पत्नी, अज हा रामाचा पूर्वज, व ऐतिहासिक दृष्ट्या रामाचा जन्म कृष्णाच्या कितितरी पूर्वी, असें असून देखील तो सुषेणाचें वर्णन 'सकौस्तुभं ह्रेपयतीव कृष्णम्'असें करतो.ऐतिहासिक दृष्ट्या कालिदासाची ही चूक ठरेल. प तो काव्य लिहीत आहे ही गोष्ट आपण लक्षांत ठेविली पाहिजे. याशिवाय पांड्यांची राजधानी उरगपुर नष्ट झाल्यावर व मदुरा ही भरभराटीस आल्यावर 'उरगपुरस्य नाथं असें वर्णन तो करणार नाहीं हें उघड आहे.

आपल्या प्राचीन ग्रंथांतून ज्योतिषविषयक उल्लेख नक्षत्रांच्या आधारें केलेला असतो, आणि प्राचीन काळीं आपल्या कालगणना नक्षत्रांच्याच आधारानें करीत. इ. स. पू. १५०च्या सुमारास हिंदुस्थानांत ग्रीक राज्यें पंजाबांत व उज्जनीस झालीं. त्यांच्यांत कालगणना राशींवरून करीत असत, आणि ते इकडे आल्यानंतर आमचे ज्योतिषग्रंथ राशींचें सहाय्य घेऊन बनूं लागले. नक्षत्रांची संख्या २७ व राशींची १२ आणि सर्वत्र वर्षाचे महिनेही बारा असल्यामुळें आपल्या ज्योतिष्यांस २७ पेक्षां १२ हा आंकडा सोपा वाटला. प्रत्येक राशीचे अंश ३० प्रत्येक अंशाच्या कला ६० व प्रत्येक कलेच्या विकला ६० अशी ही मोडणी सिद्धांतज्योतिषांत आहे. महिन्याचे दिवस ३० असल्यामुळें आम्हांस राशीच सोयस्कर वाटल्या, व त्या आम्ही ग्रीकांपासून उचलल्या. महाभारतांत राशी नाहींत म्हणून तो ग्रंथ जुना (इ. स.पू. १५० पूर्वीचा) ठरतो. वेदांग ज्योतिषांत नक्षत्रेंच आहेत. सिद्धांत ग्रंथांत नक्षत्रें सुटून राशि आल्या आहेत. पंचसिध्दांतिका, सूर्यसिध्दांत, ब्रह्मसिध्दांत वगैरे ग्रंथांत राशीच आहेत, आणि हे ग्रंथ इ. स. पू. १५० च्या नंतरचे आहेत. ‘भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास’ या पुस्तकाचे कर्ते कै. दीक्षित यांनीं पूर्वी आमच्यांत राशि नव्हत्या व नंतर त्या आल्या असेंच म्हटलें आहे. पण त्यांनीं त्या आम्हांसच सुचल्या असून, आम्ही त्या ग्रीकांपासून घेतल्या नाहींत असें म्हटलें आहे. पण असें असतें, तर ग्रीकाच्या व आमच्या राशींचीं नांवें एकच कां जमलीं असतीं ? ग्रीकांनीं आमच्याकडून राशींची कल्पना घेतली म्हणावें तर खाल्डियन लोकांत त्या इ. स. पू. ३००० पासून होत्या ! असो. ज्योतिषाचा रीतीनें विकास होत होत उज्जनींत शकराजांच्या पूर्वींच दोन्ही ज्योतिषशास्त्रांचें मिश्रण झालें

आणि पंचसिध्दांत ग्रंथ उत्पन्न झाले. त्यांचा काळ इ. स. पू. १५० च्या सुमाराचा आहे व त्यांत राशींचा उल्लेख आहे. शक राजांनीं विक्रमादित्याच्या वंशाचा पराभव इ. स. ७८ मध्यें केला, व तेव्हां पासून, इ. स. ४०० च्या सुमारास चंद्रगुप्त विक्रमादित्यानें त्यांचा पराभव केला तोंपर्यंत, शकांचें राज्य उज्जनीस होतें. कांहीं लोकांच्या मताप्रमाणें जर कालिदास इ. स. ४०० अथवा ५०० च्या सुमारास झाला असता तर त्यानें मेघदूतांत उज्जनींतील शकराजांचा उल्लेख करावयास हवा होता. पण त्यानें तो केला नाहीं त्याअर्थी तो त्यापूर्वींच झाला असला पाहिजे असें सिध्द होतें. कालिदासाच्या ग्रंथांत राशि वगैरेंचा उल्लेख आहे यावरून त्याचा काळ इ स. पू. १५० च्या नंतरचा असावा असें ठरतें. तात्पर्य कालिदासाचा काळ इ. स. पू. ५७ च्या सुमाराचा मानण्यास हरकत नाहीं.

कालिदासानें रघुवंश लिहिला तो कोणत्या रामायणाच्या आधारानें लिहिला हा एक प्रश्न आहे. माझ्या मतें त्याच्यापुढें मूळ रामायण ग्रंथ असावा; म्हणजे हल्लींचें रामायण नसावें. अज, रघु वगैरेंच्या गोष्टी कालिदासानें वर्णन केल्याप्रमाणें हल्लीं रामायणांत नाहींत इतकेंच नव्हे, तर रामायणांतील व रघुवंशांतील वंशावळ देखील जमत नाहीं. पद्मपुराण व रघुवंश यांतील या गोष्टी जुळत्या असल्यामुळें कालिदासानें त्या पद्मपुराणांतून घेतल्या आहेत असें पुष्कळ लोक म्हणतात, पण माझ्या मतें त्या कालिदासापासून हल्लींच्या पद्मपुराणांत आल्या असाव्या. खुद्द रामचरित्र मात्र कालिदासानें जुन्या रामायणांतून घेतलें असावें.

रामायणांत कित्येक ठिकाणीं रावणाचें वर्णन करितांना त्यास २ डोळे होते असें वर्णन आहे. किंबहुना कित्येक ठिकाणीं त्याचें एकच डोकें सांगितलें आहे. दशमुखांची कल्पना मुळांत 'दश ग्रीव'

या शब्दांत आहे. दशग्रीव म्हणजे गळेलठ्ठ, मोठी मान असलेला. दश म्हणजे दहा बरोबर पण दशमुख म्हणजे दहा तोंडाचा रावण असा पुढें अर्थ बनला व त्यामुळें २० हात, २० डोळे असें स्वरूप त्यास रामायणांतच प्राप्त झालें. तरी देखील वर सांगितल्याप्रमाणें त्याच्या २ डोळ्यांचें व १ डोक्याचें वर्णन मूळचें शिल्लक रामायणांत आहेच. पण रामायणांत त्यास पाय दोनच दिसतात तर कालिदास त्याचें वर्णन 'मूर्धबाहूरुबाहुल्यात्' (रघु० १२·८८) असें करितो. यावरून आपणांस कवींच्या कल्पनाशक्ति कसकशीं कामें करितात हें समजतें, पण यावरून हल्लींचें रामायण तयार झाल्यानंतर (इ. स. पू. १००) पांचसात शतकानंतर कालिदास झाला असावा (इ. स. ४००—५००) असेंच म्हटलें पाहिजे असें नाहीं. किंबहुना हल्लींच्या रामायणानंतर ५।५० वर्षांनीं कालिदास झाला व त्यानें २० संख्या उरूसंबंधानेंही वाढविली असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण हल्लींच्या रामायणाचा काल इ. स. पू. १०० च्या सुमाराचा धरला आहे. त्याच्यापुढें हल्लींचें रामायण नसून मूळचें रामायण असावें असेंच माझें मत आहे. त्यानें रामचरित्र मुळ रामायणांतून घेतलें व इतर सामग्री प्राचीन पुराणांतून मिळविली असें मला वाटतें.

ग्रंथ वाढवितांना वाढविणाऱ्यास मूळ ग्रंथांतील मजकूर आदरामुळें कमी करवत नाहीं व तो नवीन मजकूर मात्र घालतो. आणि अशा तऱ्हेनें परस्परविरोधी वचनें असलेला ग्रंथ टीकाकारापुढें आला म्हणजे तो त्याची 'कल्पभेदात्' व्यवस्था लावून टाकतो.

कालिदासाचीं नाटकें सर्वांत श्रेष्ठ आहेत आणि त्यांतल्या त्यांत शाकुंतल उत्तम आहे.

काव्येषु नाटकं रम्यं तत्रापि च शकुन्तला ।
तत्रापि च चतुर्थोङ्कस्तत्र श्लोकचतुष्टयम् ॥

असें एकानें केलेलें वर्णन यथायोग्य आहे. शकुन्तला जरी कालिदासानें महाभारतांतून घेतली असली, तरी तिचें चित्र त्यानें व्यावहारिक दृष्ट्या उत्तम रंगविलें आहे. शकुन्तला नाटक वाचून प्रख्यात जर्मन कवि गटे तर अगदीं बेहोष होऊन गेला. तो म्हणतो:—

Wouldst thou the young year's blossoms and the fruits of its decline.
And all by which the soul is charmed enraptured, feasted, fed,
Wouldst thou the earth and heaven itself in one sole name combine,
I name thee, O Sakuntala, and all else is said.

परदेशांतील व दुसऱ्या संस्कृतींतील उत्तम नाटककारानें कालिदासाची अशी स्तुति केली असल्यामुळें त्याबद्दल आपणांस योग्य अभिमान वाटला पाहिजे. शाकुन्तलाखालोखाल उत्तम नाटक म्हणजे विक्रमोर्वशीय. या नाटकाच्या नांवावरून कित्येक पंडित तो विक्रमाच्या दरबारीं असल्यामुळें त्यानें विक्रम हें नांव नाटकाच्या नांवांत घातलें असें ह्मणतात. माझ्या मतें 'विक्रमेण जिता उर्वशी यस्मिन्' असाच त्याचा विग्रह केला पाहिजे. आश्रयदात्या विक्रम राजाचा उल्लेख कालिदासास करावयाचा असता तर त्यानें तो असा लपून छपून न करितां राजरोसपणें केला असता. त्याला तसें करणें शक्य होतें. तो कदाचित विक्रमाच्या दरबारीं असेल अगर नसेलही. त्याचें तिसरें नाटक मालविकाग्निमित्र हें ऐतिहासिक आहे. विदिशा नगरी ह्मणजे हल्लींचे भेलसा वर हें सांगितलेंच आहे

या नाटकावरून कालिदासाचा काल कायम करतां येतो. ( इ. स. पू.५७)त्या नाटकांतील वर्णिलेल्या अग्निमित्र वगैरे राजांच्या पश्चात हें नाटक थोड्याच काळांत लिहिलें गेलें असावें असें दिसतें.कांहींच्या मताप्रमाणें तो जर इ. स. २०० अगर ५०० च्या सुमारास झाला असता तर ५००—६०० वर्षानंतर त्याला इतक्या बारीक गोष्टींचें वर्णन करितां आलें नसतें. तो अग्निमित्राच्या पाठोपाठ ५०—१०० वर्षानंतर ह्मणजे इ. स. पू. ५७ च्या सुमारासच झाला असला पाहिजे. कारण त्यावेळीं विस्तृत रीतीनें लिहिलेले इतिहास नव्हते. हें अनुमान प्रो. शिवरामपंत परांजपे यांसही मान्य आहे. मालविकाग्निमित्र नाटकावरून त्यावेळची पत्रें लिहिण्याची पद्धति आपणांस कळून येते.

कालिदासानें जे ग्रंथ लिहिले त्यांत रघुवंश त्यानें पहिल्यानें लिहिला असें दिसतें. ‘ मन्दः कवियशःप्रार्थी गामिष्याम्युपहास्य-ताम् ’ वगैरे श्लोकांत त्यानें जशी अतिशय नम्रता दाखविली आहे तशी एकाद्या पूर्ण प्रतिष्ठित कवीनें दाखाविणें शक्य नाहीं. त्याच-प्रमाणें शाकून्तल हा त्याचा शेवटचाच ग्रंथ असावा असें त्या नाटकावरूनच दिसतें. रघुवंशानंतर त्यानें कुमारसंभव लिहिलें असावें माझ्या मतें त्याचें हें काव्य अर्धवट राहिलें आहे. त्याचे हे शेवटचे सर्ग कालिदासाच्या हातचे नाहींत असा समज आहे आणि ते तितके सुंदर नाहींत.

कालिदास हा बंगाली होता असें कांहीं बंगाली लोक म्हणतात. नुक्ताच बंगाल्यांत त्याचा एक पुतळा सांपडला असून त्याचें त्यांनीं देऊळही बांधिलें आहे. उघडच आहे, असा मोठा कवि आपल्या प्रांतांतील असावा असें कोणास वाटणार नाहीं ? माझ्या मतें तो बंगाली नसून काश्मीरी असावा. त्यानें ठिकठिकाणीं केलेलें

हिमालयाचें वर्णन इतकें सुंदर व सूक्ष्म आहे कीं, तसें वर्णन त्या मुलखाची प्रत्यक्ष माहिती असल्याखेरीज कोणालाहि करितां येणार नाहीं, त्याच्या इतकें हिमालयाचें सुंदर वर्णन दुसऱ्या कोणत्याही कवीने केलेलें नाहीं. हिमालय इतका उंच आहे कीं, पाऊस पडूं लागला असता ढगांच्या वर जाऊन पावसाचा त्रास चुकवितां येतो असें कुमारसंभवांत वर्णन आहे. ( उद्वेजिता वृष्टिभिराश्रयन्ते शृंगाणि यस्यातपवन्ति सिद्धाः। ) कुमारसंभवांतील पहिल्या बऱ्याच श्लोकांत हिमालयाचें सुंदर वर्णन आहे. रघुवंशाच्या ४ थ्या सर्गांत ही हिमालयाचें सुंदर व अप्रतिम वर्णन आहे. मेघदूताच्या ५७ व्या श्लोकात क्रौंचरन्ध्र वर्णिलें आहे. अशासारखें बारीक वर्णन प्रत्यक्ष त्या मुळखांत राहिल्याशिवाय करितां यावयाचें नाहीं. या गोष्टींवरून तो मूळचा काश्मिरी पंडित असावा असें दिसतें. काश्मिरी लोकांत पूर्वीपासूनच पुष्कळ पंडित उत्पन्न होतात. कालिदास बंगाली होता असें म्हटलें तर 'गौडेष्वक्षरडम्बरम्' असें बाणानें केलेलें वर्णन ( जें अजूनही सार्थ आहे ) त्यास लागूं पडत नाहीं. तो पुढें उज्जनीस येऊन राहिला असावा असें त्यानें उज्जनीचें व महाकालेश्वराचें केलेलें वर्णन व मेघदूतांतील यक्षानें मेघास सांगितलेला उज्जनीवरून जाणारा वक्र मार्ग यांवरून स्पष्ट होतें.

रघुवंश शिकत असतां त्याचा पहिला सर्ग ( ज्यांत शापाची कथा आहे ) न ह्मणतां दुसऱ्या सर्गापासूनच सुरवात करितात. रघुवंशावर एकंदर २० टीका आहेत. त्यांपैकीं मल्लिनाथाची सुप्रसिध्दच आहे. दक्षिणावर्त व नाथ यांनीं केलेल्या टीकाही चांगल्या आहेत. दिनकर मिश्रानेंही ( इ. स. १३८५ ) त्यावर सुबोधिनी नांवाची टीका केली आहे. हें काव्य जैनांस फार प्रिय आहे.

कालिदासानें मेघदूतांत दिङ्नाग असा एक शब्द वापरला आहे. त्याचा अर्थ स्पष्टच आहे. पण सहाव्या शतकांत दिङ्नाग या नांवाचा जो एक बौध्द पंडित होऊन गेला तो कालिदासाचा समकालीन होता असें मानून त्यास कमीपणा आणण्याकरितां कालिदासानें तो शब्द श्लेषानें वापरला असें कित्येक लोक म्हणतात; पण येथें हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, कालिदासानें आपल्या काव्यांत श्लेषाचा उपयोग केलेला दिसत नाहीं. तर मग तो त्यानें या ठिकाणींच केला असेल हें संभवत नाहीं आणि शिवाय या ठिकाणचा श्लेषही तितका सुंदर नाहीं.

कालिदासाच्या कुमारसंभवावरही २० टीका आहेत. मल्लिनाथानें केलेली टीका ८ सर्गांवरच आहे. यावरून पुढील भाग कालिदासाचा नसून मागाहून दुसऱ्या कोणी तरी ग्रंथ पूर्ण केला असावा असें दिसतें. हा पुढील भाग शृंगारपर विशेष आहे ह्मणून ही अनादरणीय आहे.

## अन्य कवि.

सहाव्या शतकांतील वलभी राजांच्या आश्रयास असलेल्या भट्टि कवीनें भट्टिकाव्य या नांवाचें एक काव्य लिहिलें आहे. त्यांत रामचरित्र वर्णिलें असून त्यांतच व्याकरणाच्या निरनिराळ्या नियमांचा उपयोग करून दाखविला आहे. किरातार्जुनीय हें काव्य भारवीनें लिहिलें आहे. भारवी कवीचा उल्लेख इ. स. ६३४ च्या एका शिलालेखांत सांपडतो, यावरून तो यापूर्वी केव्हां तरी झाला असावा एवढेंच सांगतां येतें. माघाचें शिशुपालवध हें काव्य सुप्रसिद्धच आहे. पुढें पुढें प्रत्येक काव्यांत एकादा तरी सर्ग चित्रकाव्यमय असावा असा नियम झाला व शिशुपाल वधाचा १८

वा सर्ग चित्रकाव्यात्मक आहे. माघ कवि कवि ११ व्या शतकांत झाला असावा असें दिसतें.

उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम् ।
दण्डिनः पदलालित्यं माघे सन्ति त्रयो गुणाः ॥

या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें माघांत वरील तीनाहि गुण भरलेले दिसतात. त्याचप्रमाणें माघाचीं काव्यें म्हणजे भाषेचा कोशच होय, व म्हणूनच ' नवसर्ग कृते माघे नवशब्दो न विद्यते ' असें म्हणतात. याच वेळीं

अपशब्दशतं माघे भारवौ च शतत्रयम् ।
कालिदासे न गण्यन्ते कविरेको धनंजयः ॥

या धनंजय [ ? ] कवीच्या उक्तीची आठवण होते.

नैषध हें काव्य नवचरित्रात्मक असून तें श्रीहर्ष कवीचें आहे. हा कवि इ. स. च्या १२ व्या शतकांत झाला असावा. असें कांहीं ह्मणतात पण त्याच्या भाषेवरून जो इतका अलीकडचा असावा असें वाटत नाहीं. हा श्रीहर्ष कोण होता व तो केव्हां झाला हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. या काव्यांत पदलालित्य खरोखरच आढळून येतें. यांतील हरिणीवृत्ताचा एक सर्ग या दृष्टीनें पाहण्यासारखा आहे.

हिंदुस्थानांत महाकाव्यें बरींच झालीं असावीं, पण त्यांतील चांगलीं तेवढीं टिकून बाकीचीं लुप्त झालीं. अश्वघोषाचें बुद्धचरित हें काव्य सापडलें आहे तें इ. स. ३०० च्या सुमारास असावें. कुमारदासाचें जानकी परिणय हें काव्य अलीकडे सांपडलें आहे. तेंहि चांगलें आहे. तें इ. स. ९०० च्या सुमाराचें असावें. हा कवि सिंहलद्वीपचा राजा होता व त्यास कालिदासाविषयीं अतिशय आदर होता व कालिदासाचा शोध करतां करतां तो वारला अशी

आख्यायिका कल्पित आहे. संस्कृत काव्यांत यमकाचा उपयोग केलेला दिसत नाहीं. नलोदय या काव्यांत तेवढा दिसतो व तें कालिदासाचें म्हणून म्हणतात, पण त्याच्या कृत्रिमतेमुळें तें कालिदासाचें असेलसें वाटत नाहीं.

कविराजकृत ' राघवपांडवीय ' या नांवाचें एक काव्य आहे. त्याचा विशेष असा कीं, एकदोन श्लोकांतूनच नव्हे तर प्रत्येक श्लोकांतून रामायण व महाभारत अशा दोन्ही ग्रंथांतील कथाभागांचा अर्थ काढतां येतो. अकराव्या शतकांतील पद्मगुप्त या नांवाच्या कवीच्या ' नवसाहसांक चरित ' नाटक माळव्यांतील परमारवंशीय सिंधुराजवर्णनपर एक काव्य नुकतेंच सांपडलें आहे. विक्रमांकदेवचरित नांवाचें बिल्हणानें लिहिलेलें एक ऐतिहासिक महाकाव्य प्रसिद्ध आहे; तें कल्याणचा चालुक्य विक्रमदित्य ( इ. स० ११०० चा सु. ) याच्या वर्णनपर आहे.

## गद्य काव्यें.

इ. स. ६००–७०० च्या पुढें झालेलीं गद्यकाव्यें हल्लीं उपलब्ध आहेत. माझ्या मतें गद्यकाव्यांस इ. स. पू ३०० पासून सुरवात झाली असावी. कारण महाभारतांतही गद्य आख्यानांचा उल्लेख आहे. [ सभापर्व अध्याय ११ यांत ब्रह्मसभेंत चारी वेद, सर्व शास्त्रें, इतिहास, उपवेद, तर्कयुक्त मूर्तिमंत भाष्यकार, अनेक प्रकारचे नाटककार, काव्यकार, कथा व आख्यानें सांगणारे असतात असें वर्णन आहे. ] पुढें पुढें गद्यकवि लुप्त झाले. गुणवान तेवढेच शिल्लक राहिले आहेत. कालसमुद्रावर उत्तम असतील तेवढेच स्वतंत्र राहतात. पुढील ग्रंथांत सरळ गद्य कोणीं लिहिलें नाहीं. लांब लांब समास घालणें हेंच गद्य काव्याचें उत्तम लक्षण मानलें गेलें. उदाहरणार्थ, कादंबरींतील द्रविड ब्राम्हणाचें

वा सर्ग चित्रकाव्यात्मक आहे. माघ कवि कवि ११ व्या शतकांत झाला असावा असें दिसतें.

उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम् ।
दण्डिनः पदलालित्यं माघे सन्ति त्रयो गुणाः ॥

या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें माघांत वरील तीनहि गुण भरलेले दिसतात. त्याचप्रमाणें माघाची काव्यें म्हणजे भाषेचा कोशच होय, व म्हणूनच ' नवसर्ग कृते माघे नवशब्दो न विद्यते ' असें म्हणतात. याच वेळीं

अपशब्दशतं माघे भारवौ च शतत्रयम् ।
कालिदासे न गण्यन्ते कविरेको धनंजयः ॥

या धनंजय [ ? ] कवीच्या उक्तीची आठवण होते.

नैषध हें काव्य नवचरित्रात्मक असून तें श्रीहर्ष कवीचें आहे. हा कवि इ. स. च्या १२ व्या शतकांत झाला असावा. असें कांहीं ह्मणतात पण त्याच्या भाषेवरून जो इतका अलीकडचा असावा असें वाटत नाहीं. हा श्रीहर्ष कोण होता व तो केव्हां झाला हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. या काव्यांत पदलालित्य खरोखरच आढळून येतें. यांतील हरिणीवृत्ताचा एक सर्ग या दृष्टीनें पाहण्यासारखा आहे.

हिंदुस्थानांत महाकाव्यें वरींच झालीं असावीं, पण त्यांतील चांगलीं तेवढीं टिकून बाकीचीं लुप्त झालीं. अश्वघोषाचें बुद्धचरित हें काव्य सांपडलें आहे तें इ. स. ३०० च्या सुमारास असावें. कुमारदासाचें जानकी परिणय हें काव्य अलीकडे सांपडलें आहे. तेंहि चांगलें आहे. तें इ. स. ९०० च्या सुमाराचें असावें. हा कवि सिंहलद्वीपचा राजा होता व त्यास कालिदासाविषयीं अतिशय आदर होता व कालिदासाचा शोध करतां करतां तो वारला अशी

आख्यायिका कल्पित आहे. संस्कृत काव्यांत यमकाचा उपयोग केलेला दिसत नाहीं. नलोदय या काव्यांत तेवढा दिसतो व तें कालिदासाचें म्हणून म्हणतात, पण त्याच्या कृत्रिमतेमुळें तें कालिदासाचें असेलसें वाटत नाहीं.

कविराजकृत ' राघवपांडवीय ' या नांवाचें एक काव्य आहे. त्याचा विशेष असा कीं, एकदोन श्लोकांतूनच नव्हे तर प्रत्येक श्लोकांतून रामायण व महाभारत अशा दोन्ही ग्रंथांतील कथाभागांचा अर्थ काढतां येतो. अकराव्या शतकांतील पद्मगुप्त या नांवाच्या कवीच्या ' नवसाहसांक चरित ' नाटक माळव्यांतील परमारवंशीय सिंधुराजवर्णनपर एक काव्य नुकतेंच सांपडलें आहे. विक्रमांकदेवचरित नांवाचें बिल्हणानें लिहिलेलें एक ऐतिहासिक महाकाव्य प्रसिद्ध आहे; तें कल्याणचा चालुक्य विक्रमादित्य ( इ. स० ११०० चा सु. ) याच्या वर्णनपर आहे.

## गद्य काव्यें.

इ. स. ६००–७०० च्या पुढें झालेलीं गद्यकाव्यें हल्लीं उपलब्ध आहेत. माझ्या मतें गद्यकाव्यांस इ. स. पू ३०० पासून सुरवात झाली असावी. कारण महाभारतांतही गद्य आख्यानांचा उल्लेख आहे. [ सभापर्व अध्याय ११ यांत ब्रह्मसभेंत चारी वेद, सर्व शास्त्र, इतिहास, उपवेद, तर्कयुक्त मूर्तिमंत भाष्यकार, अनेक प्रकारचे नाटककार, काव्यकार, कथा व आख्यानें सांगणारे असतात असें वर्णन आहे. ] पुढें पुढें गद्यकवि लुप्त झाले. गुणवान तेवढेच शिलक राहिले आहेत. कालसमुद्रावर उत्तम असतील तेवढेच स्वतंत्र राहतात. पुढील ग्रंथांत सरळ गद्य कोणीं लिहिलें नाहीं. लांब लांब समास घालणें हेंच गद्य काव्याचें उत्तम लक्षण मानलें गेलें. उदाहरणार्थ, कादंबरींतील द्रविड ब्राम्हणाचें

लांब व लांब केलेलें वर्णन पाहण्यालायक आहे. एक पदार्थ पाहिला असतां सदृश पदार्थाची आठवण होणें हें उपमेचें लक्षण होय; पण श्लेषांत उपमेचें सौंदर्य राहात नाहीं. संस्कृत भाषा बोलण्यांतून नाहींशी झाली आणि तिचा पडता काल आला तेव्हां अशी दृष्टि आली.

गद्यकाव्याचें उत्तम उदाहरण म्हणजे बाणभट्टाची कादंबरी होय. स्वतः बाणाच्या हातून हा ग्रंथ पार पडला नाहीं. तो मध्यंतरींच वारला व अपुरा राहिलेला ग्रंथ त्याच्या पुत्रानें बिलकूल कमीपणा येऊं न देतां पार पाडला. गंगानदीस निरनिराळे ओढे नाले येऊन मिळाले म्हणजे त्यांस जसें गंगेचेंच रूप प्राप्त होतें त्याचप्रमाणें बाणभट्टानें आरंभिलेलें जें कार्य त्यांत पडून तें शेवटास नेऊन पोहोंचविल्यानें त्यानें स्वतःकडे ओढ्याची व बाणाच्या काव्यप्रवाहास गंगानदीची उपमा दिली आहे.

गंगां प्रविश्य भुवि तन्मयतामुपेत्य ।
स्फीताः समुद्रमितरा अपि यान्ति नद्यः ॥

अशा तऱ्हेनें बापाचें काम तितक्याच उत्तम रीतीनें नेणारे पुत्र फारच थोडे सांपडतात. कादंबरींतील समास लांब लांब आहेत व एकाद्या गोष्टीचें कवि वर्णन करावयास लागला म्हणजे त्याचें वर्णन अतिशय लांबलचक होतें. केयूरक हा चंद्रापीडाजवळ कादंबरीविरहाचें वर्णन करीत आहे, आणि तें इतकें लांबलें आहे कीं, कवीला त्याची समाप्ति, कवि थकला म्हणून नव्हे, तर तें ऐकून चंद्रापीड मूर्च्छित झाल्याकारणानें, करावी लागली, असें खुबीनें बाणपुत्रानें वर्णिलें आहे. बाणाचें गद्य क्लिष्ट तरी सुद्धां त्यांतील काव्य सर्वोत्कृष्ट असल्याबद्दल पाश्चात्य संस्कृतज्ञही कबुली देतात.

## —स्फुट काव्यें—

इंग्रजींत 'लिरिक्स' म्हणून गेय काव्यांचा एक प्रकार आहे, त्यांस आपण 'गीतें' म्हणूं. यांस स्फुट काव्यें अशीही संज्ञा देतां येईल. कांहीं पाश्चात्य पंडित मेघदूतास लिरिक म्हणतात पण मला तसें वाटत नाहीं; कारण तें गेय नाहीं. लिरिक म्हणजे लहान काव्य असून त्यांत रसपरिपोष—विशेषतः शृंगाररसाचा चांगला केलेला असतो. जर्मन कवि गटे यास मेघदूत अतिशय प्रिय झालें आहे. पाश्चात्य लोकांस सृष्टिवर्णन प्रिय असल्यानें त्यांस कालिदासाचें ऋतुसंहारही आवडतें.

घटखर्पराचें २२ श्लोकांचें एक काव्य आहे. त्याचप्रमाणें बिल्हण या काश्मिरी कवीनें "चोरपंचाशिका" म्हणून एक काव्य लिहिलें आहे. प्रख्यात भर्तृहरि कवीचीं नीति—वैराग्य—शृंगार अशीं ३ शतकें आहेत, त्यांसही पाश्चात्य विद्वान् लिरिक काव्यांत घालतात. विक्रम राजाचा बंधु भर्तृहरि तो हा नव्हे. हा वैय्याकरण व कवि असून इ. स. च्या ६ व्या अगर ७ व्या शतकांत झाला असावा. कदाचित् वैय्याकरण व कवि असे दोन निराळे भर्तृहरि मानतां येतील, व वैयाकरण भर्तृहरि हा ७ व्या शतकांतच झाला.

श्रीमद्भागवतांत गोपीगीत आहे तें गाण्यासारखें आहे. प्राकृतांत देखील 'गीतें' आहेत. इ. स. च्या ११ व्या शतकांत बंगाल्यांत लक्ष्मणसेन म्हणून जो राजा होता, त्याचा समकालीन जयदेव या नांवाचा कवि होता त्यानें 'गीतगोविन्द' या नांवाचें सुंदर गेय काव्य लिहिलें आहे तें चांगल्या गवयास वाटेल त्या रागदारींत म्हणतां येतें. त्यांत प्रास फार असून ते क्लिष्ट नाहींत. इंग्रजी भाषेंत त्याचें भाषांतर होऊं शकत नाहीं. जर्मन कवि रुकार्ट (Rucaert) यानें त्याचें जर्मन भाषांतर केलें आहे तें बऱ्याच अंशीं मुळासारखें

आहे असें म्हणतात. इंग्रजी भाषेंतील 'ट' हा वर्ण सुरेल काव्याच्या नेहमीं आड येतो. जर्मन भाषेंत संस्कृतांतल्याप्रमाणें समास बनवितां येतात. अमो. हें जरी शृंगारसयुक्त काव्य आहे, तरी आपल्याकडील नेहमींच्या परिपाठाप्रमाणें त्यावरील पुष्कळ टीकांतून तें जीवशिवविरहवर्णनपर आहे असें दाखविलें आहे. अकबराचा समकालीन जगन्नाथपंडित यानेंहि 'गंगालहरी' या नांवाचें केलेलें काव्य सुप्रसिद्ध आहे.

## —नाटक—

ऋग्वेदांतील यम-यमी-संवाद व पुरूरवा—उर्वशी-संवाद असे दोन संवाद सुप्रसिद्ध आहेत. हा हिंदुस्थानांतील नाटकांच्या कल्पनेचा पाया होय असें पाश्चात्य विद्वानांचें मत आहे. कांहीं पाश्चात्यांच्या मतें 'नट्' हा शब्द मूळचा संस्कृतांतील नसून, 'नृत्' याचा प्राकृतांत 'नट्' असा अपभ्रंश झाला, व त्यावरून तो शब्द संस्कृतांत येऊन त्यापासून नाटक हा शब्द झाला. पण 'नट्' धातु पाणिनीनें पठित केला आहे. आणि नाचणाऱ्या लोकांपासून नाटक झालें ही कल्पनाही चुकीची आहे. भरत हा नाट्यशास्त्राचा उत्पादक होय हें सर्वांस अलीकडे मान्य झालें आहे. इ. स. पू. १५० च्या सुमारास झालेल्या महाभाष्यांत 'कंसवध' वगैरे नाटकांचा उल्लेख आहे इतकेंच नव्हे, तर इ. स. पू. ३०० च्या सुमारास झालेल्या महाभारतांत नाटककार कोणत्या लोकीं जातात या वर्णनाच्या अनुषंगानें नाटकांचा उल्लेख आला आहे. नाटक कसें असावें वगैरेसंबंधाचे बारीकसारीक नियम नाटक शास्त्रकारांनीं दिले आहेत. नाटकांचे मुख्य दोन प्रकार कल्पिले आहेत. (१) रूपक व (२) उपरूपक. मृच्छकटिकाप्रमाणें १० अंकांच्या नाटकास रूपक म्हणतात. पाश्चात्य रंगभूमीवर जसे

अश्लील प्रकार चालतात तसे करण्यास आमच्या शास्त्रकारांनीं बंदी केली आहे. अतिशोक, मरण, भोजन, सर्पदंश, वगैरे प्रकार रंग-भूमीवर निषिद्ध आहेत. मुख्यतः चुंबन, निद्रा भोजन यास बंदी आहे. कालिदासानें चातुर्यानें आपल्या शाकुन्तल नाटकांत चुंबन प्रसंग आणून टाळला आहे. नाटकांतलि गद्यपद्यासंबंधानें व इतरही बाबतींत शेक्सपिअरचीं व आमचीं नाटकें यांत बरेंच साम्य आहे, तसें संस्कृत व ग्रीक नाटकांत नाहीं. अर्थात नाटकें आम्हीं ग्रीक लोकांपासून घेतलीं नाहींत.

संस्कृत नाटकांतून बायका व कनिष्ठ दर्जाचीं पात्रें यांच्या तोंडीं संस्कृत भाषा नसते. पाणिनीच्या वेळीं सर्वांच्या तोंडीं जशी संस्कृत भाषा होती तशी पुढें इ० स० पू० ४०० च्या सुमारास राहिली नाहीं असें दिसतें. हिंदुस्थानांतील मूळच्या अनार्य लोकांस समाजांत घेतल्यावर ते जेव्हां संस्कृत भाषा बोलूं लागले तेव्हां तिचे उच्चार नरम झाले. हीच अपभ्रष्ट झालेली संस्कृत भाषा म्हणजे प्राकृत होय. प्राकृत भाषांचे चार मुख्य प्रकार प्रांत भेदानें पडले (१) शौरसेनी, (२) मागधी (३) महाराष्ट्री व (४) पैशाची. स्त्रियांच्या तोंडीं पद्यांत महाराष्ट्री घातलेली असतें व इतर वेळीं त्यांच्या, मुलांच्या व शूद्रांच्या तोंडीं शौरसेनी घातलेली असते. हल्लींची हिंदी ही शौरसेनीपासून निघालेली असल्यामुळें व बहुतेक कवि उत्तर हिंदुस्तानांतील असल्यामुळें, नाटकांत या शौर-सेनीचा बराच प्रचार आहे. नौकरपेषाच्या लोकांच्या तोंडीं मागधी जिच्यापासून बंगाली निघाली ती—घालतात. (अजूनही बंगाल्यांत नोकर वर्गाचेच लोक फार आहेत.) मृच्छकटिक या नाटकावरून अवंति नगरींत देखील नगरसंरक्षक (policeman) महाराष्ट्रीय (दाक्षिणात्य) होता असें दिसतें. जंगली लोकांच्या तोंडीं पैशाची

लांबच लांब केलेलें वर्णन पाहण्यालायक आहे. एक पदार्थ पाहिला असतां सदृश पदार्थाची आठवण होणें हें उपमेचें लक्षण होय; पण श्लेषांत उपमेचें सौंदर्य राहात नाहीं. संस्कृत भाषा बोलण्यांतून नाहींशी झाली आणि तिचा पडता काल आला तेव्हां अशी दृष्टि आली.

गद्यकाव्याचें उत्तम उदाहरण म्हणजे बाणभट्टाची कादंबरी होय. स्वतः बाणाच्या हातून हा ग्रंथ पार पडला नाहीं. तो मध्यंतरींच वारला व अपुरा राहिलेला ग्रंथ त्याच्या पुत्रानें बिलकूल कमीपणा येऊं न देतां पार पाडला. गंगानदीस निरनिराळे ओढे नाले येऊन मिळाले म्हणजे त्यांस जसें गंगेचेंच रूप प्राप्त होतें त्याचप्रमाणें बाणभट्टानें आरंभिलेलें जें कार्य त्यांत पडून तें शेवटास नेऊन पोहोंचविल्यानें त्यानें स्वतःकडे ओढ्याची व बाणाच्या काव्यप्रवाहास गंगानदीची उपमा दिली आहे.

> गंगां प्रविश्य भुवि तन्मयतामुपेत्य ।
> स्फीताः समुद्रमितरा अपि यान्ति नद्यः ॥

अशा तऱ्हेनें बापाचें काम तितक्याच उत्तम रीतीनें नेणारे पुत्र फारच थोडे सांपडतात. कादंबरींतील समास लांब लांब आहेत व एकाद्या गोष्टीचें कवि वर्णन करावयास लागला म्हणजे त्याचें वर्णन अतिशय लांबलचक होतें. केयूरक हा चंद्रापीडाजवळ कादंबरीविरहाचें वर्णन करीत आहे, आणि तें इतकें लांबलें आहे कीं, कवीला त्याची समाप्ति, कवि थकला म्हणून नव्हे, तर तें ऐकून चंद्रापीड मूर्च्छित झाल्याकारणानें, करावी लागली, असें खुबीनें बाणपुत्रानें वर्णिलें आहे. बाणाचें गद्य क्लिष्ट तरी सुद्धां त्यांतील काव्य सर्वोत्कृष्ट असल्याबद्दल पाश्चात्य संस्कृतज्ञही कबुली देतात.

## —स्फुट काव्य—

इंग्रजींत 'लिरिक्स' म्हणून गेय काव्यांचा एक प्रकार आहे, त्यांस आपण 'गीतें' म्हणूं. यांस स्फुट काव्यें अशीही संज्ञा देतां येईल. कांहीं पाश्चात्य पंडित मेघदूतास लिरिक म्हणतात पण मला तसें वाटत नाहीं; कारण तें गेय नाहीं. लिरिक म्हणजे लहान काव्य असून त्यांत रसपरिपोष—विशेषतः शृंगाररसाचा चांगला केलेला असतो. जर्मन कवि गटे यास मेघदूत अतिशय प्रिय झालें आहे. पाश्चात्य लोकांस सृष्टिवर्णन प्रिय असल्यानें त्यांस कालिदासाचें ऋतुसंहारही आवडतें.

घटखर्पराचें २२ श्लोकांचें एक काव्य आहे. त्याचप्रमाणें बिल्हण या काश्मिरी कवीनें "चोरपंचाशिका" म्हणून एक काव्य लिहिलें आहे. प्रख्यात भर्तृहरि कवीचीं नीति–वैराग्य–शृंगार अशीं ३ शतकें आहेत, त्यांसही पाश्चात्य विद्वान् लिरिक काव्यांत घालतात. विक्रम राजाचा बंधु भर्तृहरि तो हा नव्हे. हा वैय्याकरण व कवि असून इ. स. च्या ६ व्या अगर ७ व्या शतकांत झाला असावा. कदाचित् वैय्याकरण व कवि असे दोन निराळे भर्तृहरि मानतां येतील, व वैयाकरण भर्तृहरि हा ७ व्या शतकांतच झाला.

श्रीमद्भागवतांत गोपीगीत आहे तें गाण्यासारखें आहे. प्राकृतांत देखील 'गीतें' आहेत. इ. स. च्या ११ व्या शतकांत बंगाल्यांत लक्ष्मणसेन म्हणून जो राजा होता, त्याचा समकालीन जयदेव या नांवाचा कवि होता त्यानें 'गीतगोविन्द' या नांवाचें सुंदर गेय काव्य लिहिलें आहे तें चांगल्या गवयास वाटेल त्या रागदारींत म्हणतां येतें. त्यांत प्रास फार असून ते क्लिष्ट नाहींत. इंग्रजी भाषेंत त्याचें भाषांतर होऊं शकत नाहीं. जर्मन कवि रुकार्ट (Rucaert) यानें त्याचें जर्मन भाषांतर केलें आहे तें बऱ्याच अंशीं मुळासारखें

आहे असें म्हणतात. इंग्रजी भाषेंतील 'ट' हा वर्ण सुरेल काव्याच्या नेहमीं आड येतो. जर्मन भाषेंत संस्कृतांतल्याप्रमाणें समास बनवितां येतात. असो. हें जरी शृंगारसयुक्त काव्य आहे, तरी आपल्याकडील नेहमींच्या परिपाठाप्रमाणें त्यावरील पुष्कळ टीकांतून तें जीवशिवविरहवर्णनपर आहे असें दाखविलें आहे. अकबराचा समकालीन जगन्नाथपंडित यानेंहि 'गंगालहरी' या नांवाचें केलेलें काव्य सुप्रसिद्ध आहे.

## —नाटक—

ऋग्वेदांतील यम-यमी-संवाद व पुरूरवा—उर्वशी-संवाद असे दोन संवाद सुप्रसिद्ध आहेत. हा हिंदुस्थानांतील नाटकांच्या कल्पनेचा पाया होय असें पाश्चात्य विद्वानांचें मत आहे. कांहीं पाश्चात्यांच्या मतें 'नट्' हा शब्द मूळचा संस्कृतांतील नसून, 'नृत्' याचा प्राकृतांत 'नट' असा अपभ्रंश झाला, व त्यावरून तो शब्द संस्कृतांत येऊन त्यापासून नाटक हा शब्द झाला. पण 'नट्' धातु पाणिनीनें पठित केला आहे, आणि नाचणाऱ्या लोकांपासून नाटक झालें ही कल्पनाही चुकीची आहे. भरत हा नाट्यशास्त्राचा उत्पादक होय हें सर्वांस अलीकडे मान्य झालें आहे. इ. स. पू. १५० च्या सुमारास झालेल्या महाभाष्यांत 'कंसवध' वगैरे नाटकांचा उल्लेख आहे इतकेंच नव्हे, तर इ. स. पू. ३०० च्या सुमारास झालेल्या महाभारतांत नाटककार कोणत्या लोकीं जातात या वर्णनाच्या अनुषंगानें नाटकांचा उल्लेख आला आहे. नाटक कसें असावें वगैरेसंबंधाचे बारीकसारीक नियम नाटक शास्त्रकारांनीं दिले आहेत. नाटकांचे मुख्य दोन प्रकार कल्पिले आहेत. (१) रूपक व (२) उपरूपक. मृच्छकटिकाप्रमाणें १० अंकांच्या नाटकास रूपक म्हणतात. पाश्चात्य रंगभूमीवर जसे

अश्लील प्रकार चालतात तसे करण्यास आमच्या शास्त्रकारांनीं बंदी केला आहे. अतिशोक, मरण, भोजन, सर्पदंश, वगैरे प्रकार रंगभूमीवर निषिद्ध आहेत. मुख्यतः चुंबन, निद्रा भोजन यास बंदी आहे. कालिदासानें चातुर्यानें आपल्या शाकुन्तल नाटकांत चुंबन प्रसंग आणून टाळला आहे. नाटकांतलि गद्यपद्यासंबंधानें व इतरही बाबतींत शेक्सपिअरचीं व आमचीं नाटकें यांत बरेंच साम्य आहे, तसें संस्कृत व ग्रीक नाटकांत नाहीं. अर्थात नाटकें आम्हीं ग्रीक लोकांपासून घेतलीं नाहींत.

संस्कृत नाटकांतून बायका व कनिष्ठ दर्जाचीं पात्रें यांच्या तोंडीं संस्कृत भाषा नसते. पाणिनीच्या वेळीं सर्वांच्या तोंडीं जशी संस्कृत भाषा होती तशी पुढें इ० स० पू० ४०० च्या सुमारास राहिली नाहीं असें दिसतें. हिंदुस्थानांतील मूळच्या अनार्य लोकांस समाजांत घेतल्यावर ते जेव्हां संस्कृत भाषा बोलूं लागले तेव्हां तिचे उच्चार नरम झाले. हीच अपभ्रष्ट झालेली संस्कृत भाषा म्हणजे प्राकृत होय. प्राकृत भाषांचे चार मुख्य प्रकार प्रांत भेदानें पडले (१) शौरसेनी, (२) मागधी (३) महाराष्ट्री व (४) पैशाची. स्त्रियांच्या तोंडीं पद्यांत महाराष्ट्री घातलेली असते व इतर वेळीं त्यांच्या, मुलांच्या व शूद्रांच्या तोंडीं शौरसेनी घातलेली असते. हल्लींची हिंदी ही शौरसेनीपासून निघालेली असल्यामुळें व बहुतेक कवि उत्तर हिंदुस्तानांतील असल्यामुळें, नाटकांत या शौरसेनीचा बराच प्रचार आहे. नौकरपेषाच्या लोकांच्या तोंडीं मागधी जिच्यापासून बंगाली निघाली ती–घालतात. (अजूनही बंगाल्यांत नोकर वर्गाचेच लोक फार आहेत.) मृच्छकटिक या नाटकावरून अवंति नगरींत देखील नगरसंरक्षक (policeman) महाराष्ट्रीय (दाक्षिणात्य) होता असें दिसतें. जंगली लोकांच्या तोंडीं पैशाची

भाषा आढळते. एकंदरींत हे सर्व नियम त्या काळच्या परिस्थितीस अनुसरून केले आहेत असें दिसतें.

नाट्यरचनेचे पात्रें व संविधानक असे दोन मुख्य प्रकार आहेत. माझ्या मतें मृच्छकटिकांतील संविधानक अतिशय उत्कृष्ट आहे. प्रत्येक संस्कृत नाटकांत विदूषक हें पात्र हटकून असतें. या बाबतींत शेक्सपीअरशीं संस्कृत नाटकांचें साम्य आहे. या गोष्टी दोन ठिकाणीं सारख्याच वठल्या आहेत यावरून चांगल्या बुद्धीचा भिन्न स्थळीं देखील सारखाच विकास होत जातो असें आपणांस दिसतें. यावरूनही आम्ही नाटकें ग्रीक लोकांपासून घेतलीं नाहींत हें स्पष्ट दिसतें. शिवाय ग्रीक नाटकांत स्थल व काल यांची एकता ( unity ) असते तीही आमच्यांत नाहीं. शेक्सपिअरनें देखील हें तत्त्व पाळलें नाहीं. विदूषक हें पात्र प्रत्येक नाटकांत खादाड ब्राम्हणाचें दाखविलें आहे. विदूषकाच्या तोंडीं बुद्धिमत्तानिदर्शक वाक्यें घालावयाचीं असल्यानें तो ब्राह्मण असतो असें वाटतें, आणि ब्राह्मण म्हटलें म्हणजे तो खाणारा असावयाचाच. किंवा राजाला एक ब्राम्हण खुषमस्कऱ्या असण्याचा पूर्वी खरोखरीच परिपाठ असावा. प्रत्येक नाटकांत सूत्रधार, नटी वगैरे घालण्याची पद्धत आहे. नाटकाच्या संविधानकाचा प्रारंभ यांच्यामुळें सुलभ रीतीनें करितां येतो. पूर्वीचीं एकंदर नाटकें पाहिलीं असतां तेव्हां रंगभूमीवर हल्लींप्रमाणें सोयी नव्हत्या असें दिसतें. 'इति नाट्येन रथादवतरति' वगैरे वाक्यांवरून प्रत्यक्ष रथ रंगभूमीवर न आणतां त्या गोष्टी अभिनयाच्या द्वारें सुचवीत असें दिसतें. सर्व नाटककारांत कालिदास व भवभूति हे उत्तम नाटककार गणिले जातात. त्यांतही कालिदास उत्तम असून त्याच्या नाटकांत शाकुन्तलाचा नंबर पहिला लागतो, हें पूर्वी सांगितलेंच आहे.

एकांकी नाटक व प्रहसन हेंही उल्लेखिण्यासारखें आहे. यांत पात्र एकच असतें. केवळ भिन्न अभिनय करून भिन्न पात्रांची भूमिका एकानेंच करून दाखविण्याची कला आपल्याकडे बरीच वाढली होती असें दिसतें. या नटांस अजूनही भांड असें म्हणतात. हा शब्द भाण या संस्कृत एक पात्रनाटकवाची शब्दावरून निघाला आहे.

शूद्रकाचें मृच्छकटिक नाटक उत्तम आहे. त्या नाटकावरून त्या वेळची परिस्थिति आपणांस दिसते. नाटकांतीस विनोदही उत्तम आहे. त्या वेळचे द्यूत खेळणारे लोकही चांगल्या दर्जाचे आहेत. या नाटकावरून त्या वेळीं हिंदुस्थानांत बौद्ध धर्माचा प्रसार नुकताच सुरू झाला होता असें दिसतें. कारण बुद्ध भिक्षूसंबंधानें त्यांत तिरस्कार दर्शविला आहे. यावरून तें इ० सनापूर्वी झालें असावें. महाभारताच्या उपसंहारांत त्यावेळीं विधवांचें केशवपन करीत नसत असें मी लिहिलें आहे. पण मृच्छकटिकांत विवाहित तरुणींच्या केशकर्तनाचा उल्लेख आहे. या दोन प्रकारांची सांगड कशी घालावयाची तें समजत नाहीं कनोजचा राजा यशोवर्मा ( इ. स. ७०० ) याच्या दरबारीं भवभूति होता. त्याचीं महावीरचरित, मालतीमाधव व उत्तररामचरित हीं नाटकें आहेत. विशेषतः उत्तररामचरित हें उत्कृष्ट नाटकांत मोडतें. श्री हर्षाचें रत्नावली हें नाटक उल्लेखण्यासारखें आहे, विशाखदत्तानें मुद्राराक्षस हें नाटक लिहिलें आहे. यांतील कथानक ऐतिहासिक आहे. हें इ० सनाच्या १३ व्या शतकांत लिहिलें असें म्हणतात, पण माझ्या मतें तें इ० स० ८०० च्या सुमाराचें असावें. भट्टनारायणानें महाभारतांतील कथानक घेऊन वेणीसंहार नाटक लिहिलें आहे. याचा उल्लेख इ० स० ८४० च्या सुमाराचा सांपडतो,

इ. स. ९०० च्या सुमारास महेंद्रपाल या नांवाचा कनोजचा राजा होता; त्याचा गुरु राजशेखर यानें कर्पूरमंजरी, प्रचंडपांडव किंवा बाणभारत व विद्धशालभंजका अशीं नाटकें लिहिली आहेत. इ. स. १००० च्या सुमारास धारा नगरींत भोज राजाच्या पदरीं असलेल्या दामोदरमिश्र नामक कवीनें हनुमन्नाटक लिहिलें आहे. इ.स. ११ व्या शतकांतील कृष्णमिश्र नांवाच्या कवीनें प्रबोधचंद्रोदय नांवाचें नाटक लिहिलें आहे. हें बहुतेक वेदांतविषयक आहे. १२ व्या शतकापासून पुढें बरींच नाटकें झालीं आहेत; पण तीं विचार करण्यासारखीं नाहींत.

## काल्पित कथा वगैरे.

या भागांत येणारा पहिला व महत्वाचा ग्रंथ म्हणजे पंचतंत्र हा होय. कित्येक लोक त्याची ' अरेबियन नाइट्स ' शीं तुलना करितात. पण त्यांत केवळ मौज नसून नीतिशास्त्राचीं सुंदर व महत्वाचीं तत्वें ग्रथित केलीं आहेत, विष्णुशर्मा नांवाच्या ब्राम्हणाजवळ कांहीं राजपुत्रांस राजनीति शिकण्यांस ठेविलें असतां त्यानें त्यांस केलेला उपदेश यांत आहे. राजनीति म्हणजे पाशवी वृत्तीचेच तंटे होत. व त्यामुळें यांतील गोष्टी पशुपक्ष्यादिकांच्या आहेत हेंही ठीकच आहे. कारण हे तंटे आध्यात्मिक पद्धतीचे नव्हत. याची कल्पना बौद्ध लोकांपासून घेतली असे पाश्चात्य म्हणतात. पण तें त्यांच्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून असलें तरी खरें नाहीं. इसापनीतीचा व पंचतंत्राचा कांहीं संबंध नाहीं. पर्शियन भाषेंत पंचतंत्राचें भाषांतर झालें आहे. महाभारतांत देखील पशुपक्ष्यांच्या गोष्टी नाहींत असें नाहीं. हंसकाकीय कथानक प्रसिद्धच आहे. हितोपदेशांत पंचतंत्रांतील बहुतेक गोष्टी आल्या आहेत. यानंतर वेताल पंचविंशति व सिंहासन द्वात्रिंशति (हें अगदीं अलीकडचें आहे.) हीं

याच सदरांत येतात. यानंतरचा नांव घेण्यासारखा ग्रंथ म्हटला म्हणजे कथासरित्सागर हा होय. यांत अनेक गोष्टींचा संग्रह आहे. याचें मूळ काश्मिरांतील गुणाढ्य—याचा उल्लेख दण्डीनें केला आहे-कवीनें ' बृहत्कथा ' या नांवाचें पैशाची भाषेंत लिहिलें आहे. हा मूळ ग्रंथ फार जुना म्हणजे इ. स. १०० च्या सुमारास लिहिलेला असावा. तो हल्लीं उपलब्ध नाहीं. हल्लींचा कथासरित्सागर सोमदेव नांवाच्या कवीनें इ. स. १०७० च्या सुमारास लिहिला आहे. त्यानें गुणाढ्य कवीच्या ग्रंथाचा विपर्यास केला आहे. हा ( ग्रंथ पिशाचांच्या ' पैशाचिक ' भाषेंत रक्तानें लिहिलेला होता, तो गुणाढ्यानें पैठणास असलेल्या शातवाहन राजास दाखविला एवढीच गोष्ट खरी आहे ) पण त्यास तो पसंत न पडल्यामुळें नदींत बुडविला, त्यांतील फक्त १० वा भाग शिल्लक राहिला, व त्याच्या आधारें आपण हा ग्रंथ लिहिला " असें सोमदेव म्हणतो. पण पैशाची ह्मणजे पिशाचांची भाषा नसून काश्मीर, पंजाब वगैरे प्रांतांत प्रचलित असणारी प्राकृत भाषा होय.

यापुढील भाग म्हणजे नीतिशास्त्रविषयक ग्रंथ. भर्तृहरीचीं नीति वैराग्य व शृंगार हीं शतकें याच सदराखालीं येतात. याच प्रकारचा दुसरा ग्रंथ म्हणजे सुभाषितावलि हा होय. हिंदुस्थानांतील लोक अध्यात्मप्रधान असल्यानें अशा प्रकारच्या ग्रंथांत वैराग्यासच विशेष महत्त्व दिलें जातें, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. आपल्याकडे इतिहासाचे ग्रंथ नाहींत असें पुष्कळ लोक म्हणतात.पण हें चुकीचें आहे. कल्हण कवीनें जुन्या निरनिराळ्या लोकांनीं लिहिलेल्या ग्रंथांवरून ' राजतरंगिणी ' हें इतिहासात्मक काव्य लिहिलें आहे. यांत काश्मीर देशाचा इतिहास आहे. हा ग्रंथ काव्य व इतिहास या दोन्हीं दृष्टींनीं बहुमोल असून तो इ. सनाच्या ११ व्या शत-

कांत लिहिला आहे. इतिहास लिहिण्याची पद्धत आपल्याकडे फार प्राचीन काळापासून होती असें दिसतें. दक्षिणेंत कल्याण नगरींत राहणाऱ्या बिल्हण कवीनें ' विक्रमांकदेवचरित ' लिहिलें आहे. यांत काव्याचा भाग जास्त असला तरी इतिहासही आहे व तो इ. स. ११०० च्या सुमारास लिहिला आहे.

इतिहासग्रंथांतच प्रबंध या नांवाचा पोटविभाग आपल्याकडे आहे या प्रकाराचें अलीकडच्या बखरींशीं साम्य आहे. यांत एकाद्याच वंशाची अगर राजाची हकीकत असते, ही पद्धत पूर्वीपासून अमलांत आहे. राजशेखरानें ' चतुर्विंशतिप्रबंध लिहिला आहे. मेरूतुंग या जैन कवीनें ' प्रबंध चिंतामणि ' लिहिला आहे. इ. सनाच्या १३ व्या शतकांत हेमचंद्र यानेंहि कांहीं प्रबंध लिहिले आहेत. यांनें पाणिनीशीं स्पर्धा करून वैदिक कालापासून त्याच्या कालापर्यंतच्या संस्कृत भाषेचें व्याकरण लिहिलें आहे. हा ग्रंथ दाखवितांच राजानें त्याची व त्यांच्या ग्रंथाची हत्तीवर मिरवणूक काढली होती.

पहिल्यापहिल्यानें पांडित्याचा मक्ता जणूं काय उतर हिंदुस्थानासच दिला होता. पुढें तें तिकडे कमी होऊन महाराष्ट्र व तामिलप्रांत इकडे जास्त पंडित निपजूं लागले. ब्राह्मणांपेक्षांही उत्तम असे जैन पंडित पुढें निपजूं लागले असें दिसतें. असो. दण्डीचें दशकुमारचरित, सुबन्धूची वासवदत्ता, बाणाचें हर्षचरित्र ( कादंबरी ही एक कल्पित कथा आहे ) या ग्रंथांचा उल्लेख ऐतिहासिक काव्यमय ग्रंथांत केल्यास हरकत नाहीं.

## —तत्वज्ञान—

हिंदुस्थानांत तत्त्वज्ञानाचा विचार वेदापासून केलेला आढळतो. उपनिषत्कालांत तर तो इतक्या उत्तम स्थितीस पोंचला होता कीं, त्या वेळचे तत्त्वज्ञानी हल्लींपेक्षां पुष्कळ पुढें गेले होते. देशांत

सुबत्ता असली म्हणजे स्वस्थपणें बसून तत्त्वज्ञानाचा विचार करितां येतो. हिंदुस्थानची त्या वेळची स्थिति अशीच सुखाची होती. उपनिषत्कालीं सांख्य, योग, व नास्तिक हीं तीन तत्त्वज्ञानें प्रचलित होतीं. पतंजलीचीं योग—सूत्रें जरी इ. स. पू. १५० च्या सुमाराचीं असलीं, तरी योग हें तत्त्वज्ञान फार प्राचीन आहे. नास्तिक तत्त्वज्ञान देखील त्याचप्रमाणें प्राचीन आहे. वेदांत सुद्धां नास्तिकांचा उल्लेख आहे. नास्तिकसूत्रें बृहस्पतीनें केलीं असें म्हणतात पण हल्लीं तीं उपलब्ध नाहींत. चार्वाक हा बृहस्पतीचा शिष्य होय. असुरांस खोटें तत्त्वज्ञान शिकविण्याकरितां देवांनीं बृहस्पतीस त्यांच्याकडे पाठविलें अशी कथा मैत्रायणीय उपनिषदांत आहे. ( ७।९ ) पण नास्तिक सूत्रकर्ता बृहस्पति म्हणजे देवगुरु नसून दुसरा कोणीतरी असावा अशी माझी समजूत आहे. ' ललितविस्तार ' या ग्रंथांत, बुद्धानें वाचलेल्या ग्रंथांत बार्हस्पत्यशास्त्र वाचलें असा उल्लेख आहे. जैन व्याकरणकार हेमचंद्र याच्या म्हणण्या प्रमाणें बृहस्पति व चार्वाक यांच्या तत्त्वज्ञानांत थोडा फरक आहे. बृहस्पतीचा ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळें हा फरक काय हें आपणांस आज सांगतां येत नाहीं. ' सर्वदर्शनसंग्रहांत ' नास्तिकांचीं म्हणून जीं मतें दिलीं आहेत तीं बृहस्पतीचीं नसून तीं चार्वाकाचीं आहेत असें दिसतें.

नास्तिकांस वेद प्रमाण नसून ते प्रत्यक्षाशिवाय दुसरें प्रमाण मानीत नाहींत. आत्मा नाहींच, परमेश्वरही नाहीं, पृथ्वी, आप, तेज, वायु हीं चार मुख्य तत्त्वें आहेत, ( पांचवें आकाश नाहीं ) आणि या चारांच्या संयोगानें जग चाललें आहे, व जीव त्या संयोगाचें फल आहे, अशीं त्यांचीं मतें आहेत.

नास्तिक प्रत्यक्ष हें एकच प्रमाण मानतात, वैशेषिक प्रत्यक्ष व

अनुमान अशीं दोन मानतात. सांख्य प्रत्यक्ष, अनुमान व आप्त-वाक्य अशीं तीन मानतात, न्यायमताचे लोक प्रत्यक्ष, अनुमान, अपमान व शब्द अशीं चार मानतात, आणि मीमांसकांनीं प्रत्यक्ष, अनुमान, आप्तवाक्य, उपमान, अर्थापत्ति व अभाव अशीं सहा प्रमाणें मानलीं आहेत.

नास्तिक मत असुरांचें आहे. पाश्चात्य लोक 'मटीरिअल् फिलॉसफी' चे भक्त असल्यामुळें त्यांची गणना असुरांत होते. पारशी लोकही त्यांच्याच पंक्तीस बसतात. हिंदुस्थानच्या लोकांचें तत्त्वज्ञान आध्यात्मिक ( spiritual ) असल्यामुळें त्यांना उलट 'सुर' म्हणतां येईल. पाश्चात्य लोक म्हणजे असुर नास्तिक मताचे आहेत याविषयीं कथा छांदोग्योपनिषदाच्या द्वादशखंडांतील आठ-व्या प्रपाठकांत पुढीलप्रमाणें सांगितली आहे. प्रजापतीकडे देव व असुर असे दोघे गेले. प्रजापतीचा 'आत्म्याचा विचार करावा' असा उपदेश ऐकून देवांपैकीं इंद्र व असुरांपैकीं विरोचन असे दोघे त्याच्याकडे शिष्यत्वानें जाऊन 'तुम्ही आत्माचा विचार करावा म्हणतां तर आत्मा म्हणजे काय हें समजून घेण्याकरतां आम्ही आलों आहोंत' असें त्यांनीं त्यास सांगितलें. नंतर प्रजापतीनें त्यांस 'डोळ्यांत जो पुरुष दिसतो तोच आत्मा, पाण्यांत व आर-शांत दिसतो तोच आत्मा; अंगावर पुष्कळ अलंकार घालून पहा, ज्यांना मी सांगितलेलें कळलें असेल ते संतोष पावतील, व दुसरे पराभव पावतील, असें सांगून प्रजापतीनें त्यांस निरोप दिला. शरीर हाच आत्मा असें विरोचनानें लक्ष्यांत ठेवून तो निघून गेला. " यावरून असुर लोक आपली संपत्ति दुसऱ्यास न देतां, यज्ञ न करतां, स्वतःच तिचा उपभोग घेतात. ते प्रेतावरही अलंकार घालतात. पाश्चात्य लोकांत अजून ही चाल आहे आणि वरील वाक्यांतील

आद्याप शब्दावरून असुर म्हणजे पाश्चात्यलोक अशी कल्पना दिसते.

विरोचनाचें जसें समाधान झालें तसें इंद्राचें झालें नाहीं. शरीर म्हणजेच जर आत्मा, तर शरीर रोगानें वगैरे बिघडलें अगर मेलें तर आत्माही बिघडला अगर मेला असा त्याचा अर्थ होईल. हें असें कसें होईल अशी इंद्राच्या मनांत शंका आली व तो अर्ध्या रस्त्यांतून परत फिरला. त्यानें एकंदर १०१ वर्षें ब्रह्मचर्य व्रताचें कडकडीत पालन केल्यावर त्याला प्रजापतीनें खऱ्या तत्त्वज्ञानाचा ( मघवन्मर्त्यं वा इद० शरीरम् वगैरे ) उपदेश केला. सामान्यतः एकंदर ६ तत्त्वज्ञानें मुख्य मानतात. एकंदर तत्त्वज्ञानें बुद्धाच्या वेळेपर्यंत बरींच होतीं. बुद्धाच्या तोंडचें 'ब्रह्मजालसुत्त म्हणून एक सूत्र आहे त्यांत जगांत एकंदर ६२ तत्त्वज्ञानें आहेत असें सांगितलें आहे. परमेश्वर व आत्मा यांसंबधानें विचार करीत असतां, विचारी लोकांत निरनिराळ्या तऱ्हेचीं ६२ मतें उद्भवलीं होतीं असा याचा अर्थ आहे. कांहीं लोक आत्मा मुळींच मानीत नाहींत, कांहींच्या मतें आत्मा आहे, पण तो देहाबरोबर मरतो अतएव नाशवंत आहे. कांहीं लोक आत्मा निरनिराळ्या शरिरांत जात असतो अगर त्याचें संसरण होतें असें म्हणतात. अशा प्रकारें भिन्न भिन्न लोक आत्म्याची भिन्न भिन्न उपपत्ति लावतात,व त्याचप्रमाणें परमेश्वराची व जगाची निरानिराळी कल्पना करतात. या अनेक तत्त्वज्ञानांची माहिती विशेष नसल्यानें मुख्य मानलेल्या तत्वज्ञानाच्या ग्रंथांची माहिती पुढीलप्रमाणें आहे.

## पूर्वमीमांसा

सर्वांत जुनें तत्त्वज्ञान पूर्वमीमांसा. ज्याप्रमाणें बार्हस्पत्य अगर चार्वाकाचें, त्याचप्रमाणें अगदीं शेवटचें तत्वज्ञान पूर्वमीमांसा हें होय;मूळ तत्वज्ञान वेदांत व उपनिषदांत सांगितलें आहे. चार्वा

काच्या तत्त्वज्ञानामुळें बौद्ध व जैन यांची वेदांवरील श्रद्धा उडाली त्यामुळें पूर्व मीमासांकारांस पहिली गोष्ट करावी लागली ती ही कीं, त्यांस वेदाचें प्रामाण्य प्रस्थापित करावें लागलें अशोक राजाचे वेळीं उत्तेजन मिळून बौद्ध मताला जोर मिळाला आणि जिकडे-तिकडे वेदाविषयीं अश्रद्धा झाली; पुढें जेव्हां अग्निमित्रादि राजांच्या वेळीं वैदिक धर्माला जोर आला तेव्हां जैमिनीनें पूर्वमीमांसेचीं सूत्रें इ. स. पू. १५० च्या सुमारास लिहिलीं आहेत, हा जैमिनि व व्यासशिष्य जैमिनि एक नव्हेत. बादरामायणाची सूत्रें ( उत्तर मीमसां ) हींही या वेळेस लिहिलीं गेलीं असें म्हणावें लागतें. कारण दोघांचाही एकमेकांत उल्लेख आहे. ' अथातो धर्मजिज्ञासा ' हें पूर्व मीमांसेचें आदिसूत्र असून ' अथातो ब्रह्मजिज्ञासा ' हें उत्तरमीसेचें आहे. वेदानें सांगितलेला तो धर्म अशी धर्माची व्याख्या पूर्वमीमांसेंत केली आहे. वेद हे अनादि, नित्य, अपौरुषेय अतएव धर्मशास्त्राचें नियम सांगण्यास अधिकारी, असें पूर्वमीमांसेंत प्रतिपादन केलें आहे पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा यास अनुक्रमें कर्मकांड व ज्ञानकांड अशाही संज्ञा आहेत, व हे दोन्ही ग्रंथ आस्तिक मताचे आहेत.

सूत्रांचा मूळ उद्देश म्हणजे कोणतीही गोष्ट अगदीं थोडक्यांत सांगणें पण याचा परिणाम असा झाला आहे कीं, कित्येक सूत्रांचा मुळींच अर्थ कळत नाहीं, अशी जैमिनी व बादरायण याच्या सूत्रांची स्थिति झाली आहे. भाष्य व टीका यांची मदत घेतल्याशिवाय तीं समजत नाहींत. प्रत्येक तत्वज्ञानानें एकेक विषय उत्तम रंगविला आहे. ज्याप्रमाणें न्यायशास्त्रानें तर्कविषय हातीं घेतला आहे त्याचप्रमाणें पूर्वमीमांसेंत शब्दप्रमाणावर भर दिला आहे. शब्दप्रकशा कोट्या कराव्या वादविवादांत दुसऱ्यास कसें चीत करावें वगैरे

ही सूत्रें पाहिलीं असतां चांगल्या समजणार असल्यामुळें वकील लोकांनीं (कारण त्यांना तरी शब्दाचेच खेळ करावयाचे असतात) नीट अभ्यास करावा. असे पुष्कळ पंडित एके ठिकाणीं जमून वादविवाद करीत असावे आणि शेवटीं जो निर्णय ठरला तो सूत्रांत सांगितला असावा असें दिसतें. यामुळें सूत्रें इतकीं दुर्बोध झालीं आहेत, कारण पाठीमागचा संदर्भ कांहींच समजत नाहीं. कित्येक वेळां पूर्वपक्षाचीं वगैरे वाक्येंही त्यांत घातलीं असल्यानें बराच घोटाळा आहे.

मीमांसान्यायाच्या साधारणतः ५ पायऱ्या असतात, ( १ ) विषयवाक्य ( २ ) संशय ( ३ ) पूर्वपक्ष ( ४ ) उत्तरपक्ष ( ५ ) सिद्धांत ( केव्हांकेव्हां उत्तरपक्ष व सिद्धांत एकच असतो. ) पूर्वमीमांसेंत यज्ञयाग वगैरेच्या तयारीसंबंधानें बरीच माहिती असल्याकारणानें हीं सूत्रें अग्निमित्रादि राजांच्या वेळीं झालीं असावीं असें वर अनुमान काढलें आहे. या सूत्रांवर शबरस्वामींचें भाष्य आहे. त्याचा नक्की कालनिर्णय करितां येत नाहीं; पण गुप्तांच्या वेळीं हें झालें असावें. ( इ. स. पू. ४०० सुमारें ) कारण यज्ञयागादि क्रियेस त्यांचे वेळीं पुन्हां: मान मिळूं लागला. या शबरभाष्यावर कुमारिलभट्टांनीं वार्तिक केलें आहे. ( भाष्य, वार्तिक व टीका यांतील फरक असा कीं, टीकेंत पदांचा अर्थ व संबंध सांगितलेला असतो, वार्तिक अनुक्त व उक्त दोन्ही गोष्टी सांगतें, आणि भाष्यांत एकादा सिद्धांत पुढें मांडलेला असतो ) सदर वार्तिकांत पहिल्या अध्यायाच्या पहिल्या पादावर लिहिलेल्या भागास श्लोकवार्तिक, पुढें तिसऱ्या अध्यायाच्या अखेरपर्यंत तन्त्रवार्तिक व चौथ्यापासून तों बाराव्या म्हणजे शेवटपर्यंतच्या भागावरील टीकेत टुप्टीका ( थोडकी टीका) अशीं नांवें आहेत. या कुमारिलभट्टांचा पराभव श्रीशंकराचार्यांनीं

केला अशी दंतकथा आहे. त्यांनीं त्यांच्या मतांचें खंडन केलें आहे, त्यावरून त्यांचा पराभव केला असा अर्थ होत नाहीं. श्लोकवार्तिकापुढील भागांत यज्ञासंबधाची माहिती दिली आहे. कुमारिलभट्टांचा काल पाश्चात्यांच्या मतें इ. स. ७०० हा आहे. पण यशोवर्म्यांच्या वेळचा कवि वाक्पति ( इ. स. ७०० ) हा भवभूतीचा शिष्य, व भवभूति हा कुमारिलभट्टाचा शिष्य असल्यामुळें, शंकर्पंडितांच्या मतें कुमारिलभट्टाचा काल इ. स. ६५० हा आहे. कुमारिलाचा मृत्युकाल इ. स. ७५० सुमाराचा मानल्यास कुमारिल भट्टाचे पट्टशिष्य मंडनमिश्र हे कदाचित् शंकराचार्यांचे ( इ. स. ८०० ) समकालोन असूं शकतील. कुमारिलभट्टाच्या वार्तिकावर पार्थसारथि याची टीका आहे. तिचा काल इ० स० १२०० चा मानला आहे. कुमारिलाच्या मताहून थोडें भिन्न मत प्रभाकर या टीकाकारांचें आहे. तो शंकराचार्यांच्या पूर्वींचाच होय. भाट्टमत व प्राभाकरमत अशीं दोन मतें मीमांसाशास्त्रावर प्रसिद्ध आहेत.

वर उल्लेख केलेले न्याय अगर अधिकरणें एकंदर ९०७ आहेत. " जैमिनीन्यायमाला ' या नांवाचा ग्रंथ माधवाचार्य ( विद्यारण्यस्वामी ) यांनीं लिहिला असून त्यांत एकापुढें एक दिलीं आहेत, कर्म केलें असतां त्याचें फल मिळालेंच पाहिजे; हा पूर्वमीमांसाकारांचा सिद्धांत असल्यामुळें त्यांस वारंवार ईश्वराची जरूर भासत नाहीं. म्हणून ते निरीश्वरवादी आहेत असा त्यांच्यावर एक आरोप आहे. परंतु वेद अपौरुषेय आहेत हा सिद्धांत त्यांनीं प्रस्थापित केला असल्यामुळें हा आरोप अगदीं फोल आहे. पण परमेश्वरानें घालून दिलेल्या नियमांप्रमाणें जग चालत असल्यानें, मध्यंतरीं ईश्वराची जरूर नाहीं, म्हणजे प्रत्येक कर्माचें फल देण्यास ईश्वर लागत

नाहीं. असा त्यांच्या मताचा आशय होय. बादरायणास या प्रसंगींहीं ईश्वराची जरूर भासते.

## उत्तरमीमांसा.

'अथातो ब्रम्हजिज्ञासा' हे उत्तरमीमांसेचें आदिसूत्र असल्याचें वर सांगितलेंच आहे. तत्त्वज्ञानाचा विचार संहितांपेक्षां उपनिषदांत जास्त, आणि तसाच भगवद्गीतेंत आहे. बुद्धधर्मामुळें धर्मसमजुतींत जेव्हां घोटाळे माजले, त्यावेळीं बादरायणाचार्यांनीं वेदांतसूत्रें लिहिलीं यांसच ब्रह्मसूत्रें अगर उत्तरमीमांसा असें म्हणतात या तिहींस मिळून 'प्रस्थानत्रयीं' असें नांव दिलेलें आहे. बादरायणाचार्यांनीं सांख्य योग, वैशेषिक, बौद्धिक, जैन, पाशुपत, पांचरात्र या तत्वज्ञानाचें खंडन केलें असल्यानें हीं सूत्रें इ. स. पू. १५० च्या सुमारास लिहिलीं असावीं असें दिसतें जैमिनी व बादरायण या दोहोंनीं एकमेकांचा उल्लेख केला असल्यामुळें ते समकालीन ठरतात हें वर सांगितलेंच आहे.

ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिर्विविधैः पृथक्।
ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥

—भगवद्गीता १३.४

या श्लोकांत ब्रम्हसूत्रांचा उल्लेख केला आहे; आणि उलटपक्षीं उत्तरमीमांसेंत 'इति स्मृतेः' असा स्मृतिवचनाचा आधार असतां महाभारत आणि भगवद्गीता यांतील वचनांचा आधार घेतला जातो यामुळें हल्लींचे महाभारत व बादरायणाचीं वेदांतसूत्रें हीं समकालीन असावींत असें कित्येकांचें मत आहे. कै. लो. टिळकही याच मताचे होते. माझ्या मतें मूळ व्यासांच्या भारतास हल्लींचें महाभारताचें स्वरूप सौतीनें दिलें. या महाभारताचा काळ सुमारें इ. स. पू. १५०० हा आहे, अर्थात बादरायणाचीं सूत्रें हीं गीतेच्या

व महाभारताच्या पश्चात् बऱ्याच काळानें झाली, व ब्रह्मसूत्रें या शब्दानें हल्लीं ज्यांस आपण ब्रम्हसूत्रें म्हणतों तीं विवक्षित नसून शांकरभाष्यामध्यें 'ब्रह्मसूत्रपदैः' याचा अर्थ श्रुतीमधील किंवा उपनिषदांतील ब्रम्हविवरग करणारीं वाक्यें ' असा जो अर्थ केला आहे तोच मला मान्य आहे. असें म्हणण्यास आणखी दोन कारणें आहेत. [ १ ] 'ऋषिभिः' [ कर्तरि तृतीया ] हा शब्द ब्रम्हसूत्रपदैः ........गीत [ करणे तृतीया ] इकडेही अन्वित केला पाहिजे आणि ऋषि याचा अर्थ ' यस्य वाक्यं स ऋषिः ' अगर वैदिक सूक्तें व उपनिषदें यांचे कर्ते असा असल्यामुळें 'ब्रम्हसूत्रपदैः' याचा अर्थ 'उपनिद्वाक्यैः' असाच घेतला पाहिजे. [ २ ] या श्लोकानंतर पुढें भगवद्गीतेंत जे वर्णन ज्ञेयाचें आहे, तें बादारायणसूत्रांस धरून नाहीं, या कारणामुळें गीतेंतील ब्रम्हसूत्रें म्हणजे बादरायणसूत्रें नव्हत असें माझें मत आहे.

पाणिनीनें ( इ. स. पू. ८०० ) भिक्षुसूत्रांचा उल्लेख केला आहे, व तीं व्यासांचीं म्हणून म्हटलें आहे. ( पाराशर्य ) हल्लीं हीं सूत्रें उपलब्ध नाहींत. अरण्यांत जाऊन संन्यास घेण्याचा मार्ग उपनिषत्कालापासून आहे, त्या मार्गाचा उपदेश सदर सूत्रांत केला असावा. 'संन्यासी' याला 'पराशरी' असा पर्याय प्रसिद्ध आहे. तात्पर्य बादरायण सूत्रांपूर्वी कित्येक ब्रम्हसूत्रें असूं शकतील. असो, वर सांगितल्याप्रमाणें बादरायणानें पुष्कळ तत्वज्ञानांचें खंडण केलें आहे व त्यानें जें खंडण अगर मंडण केलें आहे तें केवळ शब्दप्रमाणानें न करतां ( तसें त्यांनीं स्पष्ट म्हटलेंही आहे ) युक्तिवादानेंही ( अध्याय २ पाद १ तर्कपाद यांत ) केलें आहे.

कृष्णद्वैपायन व्यास व सदर सूत्रांचे कर्ते बादरायण व्यास हे दोन्ही एकच असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण महाभारतकार

व्यास इ. स. पू. ३००० इतके जुने असून 'वेदान्विव्यास यस्मास:' असें त्याचें वर्णन केलें आहे. बादरायण हे व्यासकुलांतले असावे. या वादाचें निरसन आपल्याकडे अवताराच्या कल्पनेनें करीत असतात. 'शंकरं शंकराचार्य केशवं बादरायणम्' असें एके ठिकाणीं आहे. त्याचप्रमाणें कृष्णद्वैपायन व्यास देखील विष्णूचाच अवतार असें कित्येक मानतात. महाभारतांत वेदान्तशास्त्राच्या मूळ कर्त्याचें नांव अपान्तरतमा अगर प्राचीनगर्भ असें दिलें आहे. अपान्तरतमा याचा उल्लेख वेदांत आहे. सदर अपान्तरतमा, कृष्ण॰ द्वैपायनव्यास व बादरायण व्यास हे सर्व विष्णूचेच अवतार आहेत असें मानतात.

पूर्वमीमांसेप्रमाणेंच यांतील कांहीं सूत्रें पूर्वपक्ष, उत्तरपक्ष, सिद्धांत वगैरेचीं वाक्यें आहेत. तीं कशाविषयीं आहेत हें तात्काळ समजत नाहीं, हीं इतकीं दुर्बोध आहेत कीं, भाष्यावांचून त्यांस हातही लावतां येत नाहीं. श्री शंकराचार्यांनीं (इ. स. ८००) यांवर भाष्य लिहिलें असून तें अतिशय उत्तम आहे, असा पाश्चात्यांचा देखील अभिप्राय आहे. त्यांत शक्य तितक्या शंका घेऊन त्यांचें उत्तम प्रकारानें निरसन केलें आहे. भाषेच्या दृष्टीनेंही शांकर-भाष्य अत्युतम आहे.

अद्वैत, द्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत, हीं चारही मतें प्रस्थान-त्रयीच्याच पायावर उभारलीं असल्यामुळें ब्रह्मसूत्रांत त्यांपैकीं कोणतें मत प्रतिपादिलें आहे, याचें उत्तर प्रत्येकजण आपापल्या मतास अनुकूल असेंच देत असतो आणि या दृष्टीनेंही शंकराचार्यांचें भाष्यच उत्तम समजतात. तें सूत्रांतील मूळ तात्पर्यास धरून आहे अशी पाश्चात्य लोक देखील कबुली देतात. रामानुजाचार्य (इ. स. ११०० त्यांचें भाष्य ख्रिस्ती तत्वज्ञानाच्या जवळ असलें तरी

तें मूळ सूत्रांस धरून नाहीं अशी पाश्चात्यांनीं कबुली दिली आहे. माध्वाचार्य ( इ. स. १२०० ) वल्लभाचार्य ( इ. स. १४८० ) यांनीं या सूत्रांवर आपापल्या मतानुसार भाष्यें लिहिलीं आहेत. हीं सूत्रें दुर्बोध असल्यानें शंकराचार्यांच्या भाष्यापूर्वी कसें होत असेल अशी शंका साहजिक उत्पन्न होते. शंकरापूर्वी ' बौधायन-वृत्ति ' असावी असें कित्येकांचें त्यास उत्तर आहे. पण बौधायन-वृत्ति म्हणजे अज्ञात अर्थात असेलच असें म्हणतां येत नाहीं. आपल्या भाष्यांत शंकराचार्यांनीं उपवर्षाचा उल्लेख केला आहे. हे फार विद्वान होते. नंदराजाच्या वेळचे उपवर्ष मात्र निराळें. शंकराचार्यांनीं केलेला उल्लेख ' इति वृत्तिकारा ' अगर ' इति भगवानुपवर्षः ' असा आहे. शंकराचार्यांनीं भाष्य प्रारंभीचा बराचसा भाग अध्यास ( भ्रम ) समजून देण्याकरितां खर्च केला आहे.

आपल्यांतील प्रत्येक तत्वज्ञानावर शेंकडों ग्रंथ लिहिले गेले आहेत. मी बडोद्यास गेलों असतां तेथें एकानें शहाजहान बादशहाचे वेळीं बनारस येथें असलेल्या एका दाक्षिणात्य पंडिताच्या ग्रंथसंग्रहांत असलेल्या ग्रंथांचीं छापील सूचि मला दाखविली होती सदर प्रत्यक्ष ग्रंथांचा पत्ता नसला तरी त्यांची सूचि सांपडली आहे. तिच्यांतच अनेक ग्रंथांचीं नांवें आहेत. पुष्कळांची ' चतुःसूत्री ' वर ग्रंथरचना आहे. त्या ग्रंथाचें महत्व वेदांत तत्वज्ञानाचा दृष्टीनें अतिशय आहे. शंकराचार्यानंतर ' वेदांतसार ' या नांवाचा ग्रंथ लिहिला गेला आहे. तो सदानंदाचा आहे. त्याच्यानंतरची विद्यारण्याची पंचदशी ( ई. सं. १४०० ) आपल्याकडे प्रसिद्धच आहे.

## पांचरात्र व पाशुपत

पांचरात्र व पाशुपत हीं दोन्ही तत्वज्ञानें बरींच जुनीं आहेत. महाभारतांतही त्यांचा उल्लेख आहे. यावरून तीं त्याच्यापेक्षांही जुनीं आहेत हें सिद्ध होतें. पांचरात्रांत विष्णु ही देवता श्रेष्ठ मानिली असून पाशुपतांत शंकरास प्राधान्य दिलें आहे. उपनिषदांतून विष्णु ही मोक्षाची देवता प्रथम मानिली असावी 'तद्विष्णोः परमं पदम्' हें श्रुतिवाक्य प्रसिद्धच आहे. ऋग्वेदांत सर्वांपेक्षां इंद्रास अधिक महत्व दिलें आहे, पण पुढें उपनिषत्कालांत तें विष्णूस मिळालें. कालाच्या ओघाबरोबर मतभेद उत्पन्न झालाच पाहिजे. नंतर श्वेताश्वतरोपनिषदांत शिव ही मोक्षाची देवता सांगितली आहे. (मायिनं तु महेश्वरम्) काशींत मृत्यु प्राप्त झाला असतां त्यासमयीं प्रत्यक्ष शिव येऊन मनुष्यास ज्ञानाचा उपदेश करितो, (कारण ज्ञानाशिवाय मोक्ष नाहीं) व म्हणून त्यास मोक्ष हा मिळालाच पाहिजे अशी दृढ समजूत आहे. पाशुपत तत्वज्ञानांत 'पशुपति' याचा अर्थ 'जगाचें शासन करणारा' असा केला आहे. (पशु=जगत्; पति=ईश्वर) पांचरात्र याचा मात्र विष्णुपर अर्थ कसा लावावयाचा याचें नीटसें समाधान होत नाहीं. महाभारतांतर्गत नारायणीयोपाख्यानांत पांचरात्र मताचें बरेंच विवेचन आहे. पाशुपत मताचा मात्र महाभारतांत केवळ उल्लेख आहे. पांचरात्राचा मूळ ग्रंथ नारदीय आहे. हें तत्वज्ञान चतुर्व्यूहात्मक आहे (वासुदेव=परमेश्वर, संकर्षण=जीव, प्रद्युम्न=मन, अनिरुद्ध=अहंकार) नारदीय पांचरात्र हा ग्रंथ महाभारतांपेक्षां जुना आहे. याचा काल इ. स. पू. ५०० हा असावा. महाभारतांत या तत्वज्ञानाचे एकलक्ष श्लोकात्मक ग्रंथ असल्याबद्दल उल्लेख आहे पण आज तितके उपलब्ध नाहींत. वैष्णवांचे आचार्य रामानुजाचार्य (इ. स. ११०० ) आणि

मध्वाचार्य ( इ. स. १४०० ) यांनीं हेंच मत पुढें चालविलें आहे. मध्वाचार्यांनीं कांहीं निराळीं मतें दाखवून त्यांत थोडा भेद केला आहे.

पाशुपत तत्वज्ञानाचा मूळ ग्रंथ कोणता हें आज सांगतां येणार नाहीं. महाभारतानंतर या मताचा नकुलीश नांवाचा आचार्य होऊन गेला. यानें एकादा ग्रंथ लिहिला असावा, पण मी त्याच्या शोधांत असून अद्याप तो मला मिळाला नाहीं याचें नांव मात्र निरनिराळ्या ग्रंथांतून व शिलालेखांतून ही आढळतें. या तत्वज्ञानाचा परिचय आपणांस फक्त माधवाचार्यांच्या 'सर्वदर्शनसंग्रहा' मार्फतच होतो. याचें आदिवाक्य 'अर्थात पशुपतेः पाशपत योगविधिं व्याख्यास्यामः' असें असलेलें माधवानें दिलें आहे. नंतर थोड्याशा फरकानें 'महेश्वर शैवदर्शन नांवाचें एक मत प्रस्थापित झालेलें आढळतें. पांचरात्र व पाशुपत या दोन्ही मतांत मोक्षाची कल्पना म्हणजे अनुक्रमें वैकुंठलोकांत विष्णूजवळ वस्ती व कैलासलोकांत शिवाजवळ वस्ती अशी आहे. मात्र वैकुंठलोकांत विष्णूच्या म्हणजे परमेश्वराच्या दास्याची भावना असून कैलासांत पारमेश्वर्य म्हणजे शिवस्वरूप प्राप्त होतें असें मानलें आहे.

या दोन्ही तत्वज्ञानांस तत्वज्ञानाच्या दृष्टीनें फार किंमत नाहीं, पण संस्कृत वाङ्मयाच्या दृष्टीनें देखील त्यास फारशी किंमत नाहीं या दोन्ही मतांचें खंडण बादरायणाचार्यांनीं आपल्या वेदांत-सूत्रांत केलें आहे.

## बौद्ध व जैन तत्वज्ञानें.

बौद्ध व जैन हीं तत्वज्ञानें नास्तिक मताचीं आहेत. बुद्धाचा मृत्यु इ. स. पू. ४७५ च्या सुमारास झाला. या नंतर २।३ शें वर्षेपर्यंत 'हीनयान' पंथ असून त्याचे ग्रंथ पाली भाषेंत आहेत.

हा पंथ सीलोन, ब्रह्मदेश वगैरे ठिकाणीं आहे. या नंतर इ. स. २०० च्या सुमारास 'महायान' पंथ निघून त्यांचे ग्रंथ संस्कृत भाषेंत झाले. हा पंथ तिबेट, चीन, जपान वगैरे देशांत आहे, यांतील ग्रंथ इ. स. ७०० पर्यंत होत राहिले. एवढ्या ५०० वर्षांच्या आवधींत अश्वघोष, नागार्जुन, वसुबंधु, असंग, दिङ्नाग, वगैरे ठळक ग्रंथकार होऊन गेले,

जैन मताचा शेवटचा प्रस्थापक महावीर हा बुद्धाचा समकालीन होता, जैनांचें तत्वज्ञान संस्कृतांतून व विशेषतः महाराष्ट्री व मागधी या प्राकृत भाषांतून लिहिलें आहे; जैन लोकांत हेमचंद्र या नांवाचा पंडित होऊन गेला. ( इ. स. ११०० ) यानें संस्कृतांत ग्रंथरचना करून 'सिद्धहेम' या नांवाचा पाणिनीप्रमाणें व्याकरण ग्रंथही लिहिला आहे, त्यानें प्राकृताचेंही व्याकरण तयार केलें आहे; देशी नाममाला या त्याच्या ग्रंथांत प्राकृत भाषेंत संस्कृतोत्पन्न नसून देशी भाषांतून घेतलेले शब्द त्यानें दिले आहेत.

बौद्ध व जैन तत्वज्ञान यांस मूळ आधार सांख्याचाच आहे. असें मॅकडोनेल म्हणतो, पण तसें दिसत नाहीं. बौद्ध व जैन निरीश्वरवादी खरे पण बौद्ध आत्म्याचेंही अस्तित्व मानीत नाहींत. आत्मा म्हणजे वास आहे असें ते मानतात, बौद्ध क्षणिकवादीही आहेत, ह्मणजे सर्व गोष्टी क्षणिक आहेत, नित्य कांहींच नाहीं असेंही मानतात. मोक्षाला त्यांचा पारिभाषिक शब्द कैवल्य असा नसून निर्वाण असा आहे. हा शब्द त्यांनीं नवीन बनविलेला नसून तो भगवद्गीतेंत आहें. बौद्ध व जैन यांनीं आचारावर फार ज़ोर दिला असून नीत्याचरण पसरविण्याचा त्यांनीं उत्तम प्रयत्न केला आहे. हें मान्य केलें पाहिजे.

बौद्धधर्म इ. स. पू. ५०० च्या सुमारास स्थापन झाला असून अशोकाच्या वेळीं (इ. स. पू. २५०) त्याचा भरभराटीचा काल होता. यानंतर पाटलिपुत्रांत अग्निमित्र, पुष्पमित्र वगैरे आर्यधर्मी राजे होऊन बौद्धधर्मास उतरती कळा लागली. त्यानंतर परदेशातून कनिष्क राजा येऊन त्यानें बौद्धधर्म स्वीकारल्यामुळें पुन्हां त्यास ऊर्जितदशा आली. (इ. स. १००–३००) कनिष्काच्या वेळीं नागार्जुन हा विद्वान पंडित होता. प्रत्येक धर्मांत मागाहून निरनिराळे निदान दोन पंथ उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहींत. महंमदीय धर्मांत शिया व सुन्नी, जैन धर्मांत दिगंबर व सितंबर, ख्रिस्ती धर्मांत रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट, वेदांत धर्मांत अद्वैत, शुध्दाद्वैत, विशिष्टाद्वैत व द्वैत, त्याचप्रमाणें, कनिष्काच्या वेळीं महायान हा बौध्दधर्मांत नवीन पंथ उपस्थित झाला, व त्यास महायान आणि जुन्या पंथास हीनयान अशी संज्ञा प्राप्त झाली. इतका वेळपर्यंत बौध्दधर्माचे ग्रंथ पाली भाषेंत असत. पण यानंतर निरनिराळ्या पंडितांशीं वादविवाद करावा लागल्यामुळें महायानपंथाचे ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिले जाऊं लागले व पुढील संस्कृत वाङ्मयांत बौध्द ग्रंथकारांचे देखील चांगले नांव घेण्यासारखे ग्रंथ आहेत. यावेळीं बौध्दांनीं वेदांताचींही कांहीं मतें उचललीं. त्यांचे एकंदर १८ पंथ आहेत. येथपर्यंत बौध्द लोकांत बुध्दशेषगर्भ स्तूपांचें माहात्म्य होतें, तों महायानपंथानें मूर्तिपूजेवर विशेष भर दिला आणि त्याचा दृश्य परिणाम म्हणजे आज हिंदुस्थानांतील प्रत्येक डोंगरांत कोठें ना कोठें बुध्दाची उभी अगर बसलेलीमूर्ति आपणांस दिसते. या बुध्दास निरनिराळीं नांवें देऊन व प्रत्येकास बायकोही ठरवून त्यांचीं नांवेंही नवीन कल्पिलीं. या वेळेपासून बौध्दधर्मास उतरती कळा लागली असें म्हणण्यास हरकत नाहीं. यानंतरही

त्यांच्यांत असंग, वसुबन्धु वगैरे अनेक विद्वान पंडित निर्माण झाले. ही परंपरा श्रीहर्षराजाच्या वेळेपर्यंत ( इ. स. ६५० ) चालू होती. यानंतर मीमांसकांनीं त्यांचा चांगला समाचार घेतल्यामुळें बौध्द-धर्माचा हिंदुस्थानांत नायनाट झाला. कुमारिलभट्टानें त्यांच्या तत्त्व ज्ञानाचा चांगला अभ्यास करून त्यांचें पूर्ण खंडण केलें, व वेदाचें अपौरुषेयत्व सिध्द करून आर्यधर्माचा पाया दृढ केला.

## सांख्य.

आतां सांख्य तत्वज्ञानाचा विचार करूं. हें तत्वज्ञान फार जुनें आहे. मात्र ऋग्वेद व उपनिषिदें यांच्या वेळीं हें अस्तित्वांत होतें कीं काय या विषयीं निश्चितपणें कांहीं सांगतां येत नाहीं. 'सांख्यस्य कपिलो वक्ता' असें महाभारतांत वचन आहे; त्यावरून हें तत्वज्ञान मूळ कपिलानें प्रवर्तित केलें असें दिसतें. कित्येकांच्या मतें कापिल हें कल्पित व्यक्तीचें नांव आहे, पण मला तसें वाटत नाहीं; भगव-द्गीतेंत याचा उल्लेख ' सिद्धानां कपिलो मुनिः ' असा आहे. मात्र तो ऋषींत ( मंत्रद्रष्टा ) श्रेष्ठ सांगितला नाहीं, ऋषिश्रेष्ठ भृगु असें आहे, . ( महर्षीणां भृगुरहं ) एकंदरींत हा भगवद्गीतेच्या पूर्वी व उपनिषदानंतर म्हणजे इ. स. पु. २००० ते १५०० च्या दरम्यान झाला असावा. याचा एकही ग्रंथ आज उपलब्ध नाहीं. कोणी एकानें कपिलसूत्रें म्हणून त्याच्या नांवावर इ. स. १४०० च्या सुमारास सूत्रें लिहिलीं आहेत. असो. प्रत्येक तत्त्वज्ञानांत एकादा भाग विशेष चांगला असतो व त्याचें सर्वत्र ग्रहण केलें जातें, हें पूर्वी सांगितलें आहे. त्याप्रमाणें सांख्य तत्त्व-ज्ञानांतून ३ गुणांची व २४ तत्त्वांची कल्पना भगवद्गीतेनें देखील घेतली आहे. त्रिगुणांची कल्पना वेद व उपनिषदें यांत नाहीं. चांगलें व वाईट, ईश्वर व सैतान, अशा तऱ्हेचे २ तत्त्वभेद बहुतेक

ठिकाणीं दिसतात; पण तीन गुणांची कल्पना मूळ कपिल मुनीची होय यांत शंका नाहीं. भगवद्गीतेला सांख्य मताबद्दल फार आदर होता. 'सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि (कृतः अन्तः निश्चयः यस्मिन् प्रत्येक गोष्टीचा निश्चय ज्यांत केला आहे) असें वचन गीतेंत आहे. सांख्य तत्त्वज्ञानाचें मूळ स्वरूप आपणांस गीता व महाभारत यांतच पाहण्यास सांपडतें.

सांख्य निरीश्वरवादी आहेत. मूळांत १ प्रकृति व अनंत पुरुष अशी त्यांची कल्पना आहे. त्यांच्या मताप्रमाणें मी व प्रकृति निराळी अशी खूण पटली म्हणजे तोच मोक्ष होय. यासच 'प्रकृति पुरुषविवेक' असें म्हणतात. वेदांतमताप्रमाणें 'नित्यानित्यविवेक' झाला म्हणजे मोक्ष मिळतो. मोक्ष याअर्थी सांख्यांनीं कैवल्य शब्द वापरला आहे. असें निरनिराळ्या तत्त्वज्ञानांचें पारिभाषिक शब्द असतात. असो, महाभारतांतील शांतिपर्वांत सांख्य तत्त्वज्ञान विस्तारानें वर्णिलें आहे. कपिलानंतर सांख्यांत पंचशिख या नांवाचा विद्वान् आचार्य होऊन गेला तो बुद्धाचा समकालीन (इ. स. पू. ५००) असावा यानंतर ब्रह्मसूत्रांत सांख्य तत्त्वज्ञानाचें खंडन केलें आहे. ते निरीश्वरवादी असल्यानें त्या वेळीं तें आस्तिक लोकांस पटत नसावें असें दिसतें. वेदांतसूत्रांत परमतखंडनाचा जो अध्याय आहे त्यांत मुख्य खंडण सांख्यांचेंच आहे व तें प्रधानमल्लनिबर्हण न्यायानें आहे सांख्याचा भर संन्यास मार्गावर आहे. वेदांत मार्गाचीहि तीच दृष्टि आहे. म्हणून सांख्यमार्ग व संख्यामार्ग कधीं कधीं एकच म्हणून वर्णिलेले असतात. ज्ञानमार्ग व सांख्यमार्ग एक असेहि शब्द वापरले जातात. यानंतर ईश्वरकृष्णाच्या सांख्य-कारिका येतात. ईश्वरकृष्णानें तें तत्त्वज्ञान ७० आर्यांत सांठविलें. यांचें चिनी भाषेंत इ. स. ५०० सुमारास भाषांतर झालें आहे;

त्यावरून ईश्वरकृष्णाच्या कारिका इ. स. ४०० च्या सुमारास झाल्या असाव्या. गौडपादानें त्यांवर भाष्य लिहिलें आहे ( इ. स. ७०० ). हे गौडपाद शंकराचार्यांचे गुरु होते अशी समजूत आहे. त्यावर वाचस्पतिमिश्राची टीका आहे ( इ. स. ११०० ). इ. स. १४०० च्या सुमारास मद्रासकडील एका पंडितानें सूत्रें तयार करून त्यांस कपिलसूत्रें असें नांव देऊन ठेविलें आहे. सांख्यमत सेश्वरवादी आहे असें दाखविण्याचा व निरनिराळ्या तत्त्वज्ञानांची एकवाक्यता करण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे. या सूत्रांवर अनिरुद्धाची इ. स. १५०० च्या सुमाराची टीका आणि विज्ञान भिक्षूचें १६०० शतकाच्या उत्तरार्धांत लिहिलेलें भाष्य उपलब्ध आहे. विज्ञानभिक्षु हा सरवाश्वदी असल्यानें त्यानें सूत्रांस तसें स्वरूप दिलें आहे.सांख्य लोक वेदांत्यांप्रमाणें जग खोटें मानीत नाहींत.

## —योग—

योगाचा उल्लेख उपनिषदांतून आहे असें माझें मत आहे. तप आणि योग यांत थोडा फरक आहे. तप म्हणजे शारीरिक कष्ट व योग म्हणजे मानसिक निग्रह होय. हें तत्त्वज्ञान सांख्याइतकेंच, किंबहुना अधिक जुनें आहे. योग शब्दाचा उपयोग भगवद्गीतेंत निरनिराळ्या अर्थांनीं केला आहे, त्यांत योग म्हणजे मनोनिग्रह असाही एक अर्थ आहे. महाभारतांत सांख्याप्रमाणेंच या तत्वज्ञानाचेंही बरेंच वर्णन आहे. योगाचा मूळ उत्पादक पतंजालि असें जें मत आहे तें चूक आहे. पतंजलीनें इ. स. पू. १५० च्या सुमारास त्यास व्यवस्थित स्वरूप देऊन त्यावर सूत्ररचना केली. महाभारतांत योगाचा वक्ता हिरण्यगर्भ असें म्हटलें आहे, म्हणजे तें मत फार प्राचीन, एवढाच आशय आहे. योग आणि सांख्य यांचा नेहमीं एके ठिकाणीं उल्लेख महाभारतांत येतो.

पतंजलीच्या योगसूत्रांवर व्यासभाष्य आहे हें इ. स. च्या सातव्या शतकांतील आहे. हा व्यास अर्थातच बादरायण किंवा द्वैपायन व्यास नव्हे. व्यासभाष्यांवर भोजाची टीका आहे. हा भोज धारेचा भोजराजच होय. याचा काल इ. स. १०१० हा प्रसिद्ध आहे. वाचस्पतिमिश्र याचें याच्यावर वार्तिक आहे. सांख्यकारिकांवर टीका लिहिणारा हाच होय. तत्त्वज्ञानाचा संबंध क्रियेशीं विशेष आहे, आणि त्यांत योगक्रियेनें सिद्धि मिळतात असें मानलें आहे. पतंजलीच्या सूत्राचे चार अध्याय असून ते अनुक्रमें समाधि, साधन, विभूति आणि शेवटीं कैवल्या अशा विषयांवर आहेत. सांख्यांचा व योगाचा कैवल्य शब्द एकच आहे. योगाचे दोन भेद राजयोग व हठयोग असे झाले, आणि अलीकडील ग्रंथकारांनीं हठयोगाची ८४ आसनें व मुद्रा वगैरे वर्णन बरेंच दिलें आहे. खेचरी मुद्रा म्हणजे जीभ मागें वळवून टाळूस लावणें आणि दृष्टि भ्रूमध्यावर जमविणें अशा प्रकारची असून अनेक सिद्धि देणारी अशी प्रसिद्धि आहे. या सिद्धींविषयीं पुष्कळांचा बेभरंवसा आहे. तथापि हरिदास नांवाचा एक योगी लाहोरास रणजितसिंगाचे वेळीं असून त्यानें कित्येक दिवस आपणांस गाडून घेतलें होतें ही ऐतिहासिक गोष्ट प्रसिद्ध आहे. सांख्यांचीं २४ तत्वें योगास मान्य आहेत, परंतु ईश्वर हें २६ वें तत्त्व योगांत आधिक मानतात.

## न्याय व वैशषिक.

षड्दर्शनांपैकीं शेवटचीं २ दर्शनें न्याय व वैशेषिक हीं होत. या दोहोंचा बहुतेक मेळ आहे, व जगताची उत्पत्ति दोन्ही अणूपासून मानतात. यांपैकीं पुराणें मत वैशेषिकांचें दिसतें व त्याचें ब्रह्मसूत्रांत तर्कपादांत खंडण आहे, विशेष या विशिष्ट पदार्थापासून यांचें नांव

वैशेषिक असें पडलें आहे. या मताचा संस्थापक कणाद किंवा कणभक हा असून तें नांव अणुवादावरून पडलें आहे असें मॅकडोनेलनें म्हटले आहे, पण तसें वाटत नाहीं. सर्व जगतांतील वस्तूंचे सहा पदार्थ मानले आहेत. याच्यानंतर अभाव हा सातवा पदार्थ मानला गेला. सर्व सृष्टि अणूपासून झाली असें द्रव्याचें वर्णन करतांना यांत विस्तारपूर्वक सांगितलें आहे. या दर्शनांत आत्मा निराळा मानून ईश्वर निराळा मानतात. कणाद केव्हां झाला हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. गौतमाचीं ( अक्षपादाचीं *न्यायसूत्रें यांच्यानंतर झालीं असें दिसतें. न्यायसूत्रांत अनुमानादि प्रमाणांचें फारच विस्तृत विवेचन आहे. आणि यामुळें न्यायशास्त्र हिंदुस्थानांत यापुढें फारच प्रसिद्धीस येऊन प्रत्येक तत्वज्ञानांत त्याचा उपयोग होऊं लागला. ग्रीक लोकांप्रमाणें न्यायशास्त्रांतलें Sylloagism( अनुमान ) मानण्याची पद्धति आहे; व ती हिंदुस्थानांत स्वतंत्र रीत्या उद्भवली आहे असें पाश्चात्य लोकहि कबूल करतात. गौतम हा बुद्धपूर्व असावा, असें वाटतें. अर्थात: महाभारतांत ' पंचावयववाक्यस्य प्रोक्ता असें नारदाचें वर्णन आहे. तें कालदृष्ट्या योग्य आहे. हेत्वाभासाचें ( Fallacy ) विवेचनांत न्यायशास्त्रांत पुष्कळ आहे. वैशेषिक व न्याय हीं दोन्हीं तत्त्वज्ञानें प्रारंभीं ईश्वरास्तित्ववादी नसावीं. आणि ईश्वर आहे असें जरी त्यांनीं शेवटीं मानलें तथापि परमाणूंचा कर्ता ईश्वर आहे असें ते मानीत नाहींत. उदयनाचार्याची कुसुमांजलि ( इ. स. सुमारें १२०० ) यांत या दोन्हीं शास्त्रांचा एकत्र विचार असून परमात्मा हा स्वतंत्र मानला आहे व तो जीवात्माहून भिन्न अनंतशक्ति व सृष्टीचा चालविणारा असें मानलें आहे. न्याय व वैशेषिक या दोन्हीं सूत्रांवर वात्स्यायनांचें भाष्य आहे.

---

* अक्षपाद हें नांव असेल व गौतम हें गोत्रनाम असेल.

न्यायशास्त्राचा अभ्यास प्राचीन व अर्वाचीन काळीं हिंदुस्थानांत फारच झाला आहे, व न्यायशास्त्रावरील ग्रंथही अनेक झाले आहेत गदाधरभट्टाची गदाधरी हा ग्रंथ अलंकारशास्त्रावरील जगन्नाथ पंडिताच्या रसगंगाधराप्रमाणें न्यायशास्त्रावरील शेवटचा मानतात. गदाधराचाही काल त्याच सुमारास ( इ. स. १६०० ) असावा. गदाधराला मरतां मरतां ' जगत्कारण स्मर ' असें लोकांनीं सांगितलें तेव्हां तो ' पीलवः पीलवः ' असे म्हणाला अशी आख्यायिका आहे. अर्थात् गदाधर हा पक्का नैय्यायिक परमाणुवादी होता. न्याय शास्त्राचा अभ्यास विशेषतः बंगाल्यांत व त्याच्या खालोखाल महाराष्ट्रांत फार होत असे. बंगाल्यांतील व महाराष्ट्रांतील नैय्यायिक प्रसिद्ध आहेत.

सतीशचंद्र विद्याभूषण यांनीं लिहिलेल्या History of mediaeval school of Indian Logic या पुस्तकांत न्यायशास्त्राच्या प्रगतीचा व वाङ्मयाचा विस्तृत इतिहास लिहिला आहे. त्यांतील कांहीं महत्त्वाची माहिती येणेंप्रमाणें १ न्यायशास्त्राच्या इतिहासाचे तीन मुख्य विभाग पडतात १ प्राचीन तर्कशास्त्र इ. स. पू. ३०० पा. इ. ६०० पर्यंतचा २ मध्ययुगीन तर्कशास्त्र इ. स. ४०० पासून १२०० पर्यंत ३ अर्वाचीन तर्कपद्धति इ. स. १२०० च्या अलीकडील. पहिल्या काळांतील मुख्य ग्रंथ म्हणजे अक्षपाद गौतम याची सूत्रें व त्याच्या वरील भाष्ये दुसऱ्या काळातील मुख्य ग्रंथ म्हटला म्हणजे दिङ्नागचा प्रमाण समुच्चय व त्यावरील ग्रंथ तिसऱ्या काळांतील ग्रंथ म्हणजे गंगेश उपाध्यायाचा तत्व चिन्तामणि व त्या ग्रंथाची टीका गदाधाराची तत्व दीधिती टीका। २ जैन व बौद्ध या दोघानी मध्ययुगांत या शास्त्राचा फार अभ्यास केला कारण हे प्रमाण शास्त्र असल्यानें सर्वांस उपयोगी

पडत असे. जैनांचे ग्रंथकार येणेंप्रमाणें. प्रथम जैन मतें. संस्थापक महावीर ( इ. स. पू. ५२७ ) त्याचा शिष्य इंद्रभूति गौतम (इ. स. पू. ५१५) त्याच्या पुढें भद्रबाहु (इ. स. पू. ४३३–३५) न्यायघटित वाक्यांत दहा अवयव यानें मानले. दशावयव वाक्यें पंचावयवाचे पुढचें आहे स्याद्वादहि यानें प्रथम मांडला हा वाद सात प्रकारचा दाखवितो. उमस्वाती ( इ. स. ८५ ) सिद्धसेन दिवाकर ( इ. स. ५३३ ) समन्तभद्र ( इ. स. ६०० ) अकलंक देव ( इ. स. ७५० ) विद्यानंद ( इ० स० ८०० ) माणिक्य-नंदि ( इ. स. ८०० ) आणि प्रभचन्द (इ. स. ८२५)—या पुढें आणखी कांहीं श्वेतांबर जैन पंडित तर्क ग्रंथकार झाले आहेत.

३ न्यायाचे बौद्ध ग्रंथकार. बुद्धानें ब्रह्मजालसुत्तामध्यें तार्किकाचा उल्लेख केला आहे (इ. स. पू. ५४३ ) मिलिंद ( इ. स. पू. १०० ) कनिष्काच्या वेळीं संस्कृत निर्माण होऊं लागले. त्याच्या वेळीं हा महायान पंथ स्थापन झाला, एकंदर बौद्धांत १८ असून त्याचे ४ प्रस्थान भेद आहेत ते १ वैभाषिक २ सौत्रान्त ३ माध्यमिक ४ योगाचार. नागार्जुन हा वैदर्भ महाकोसलांतला होता. याचा काल ( इ. सु. ३०० ( किंवा १५० ) अगर पू. ३० यानंतर आर्यदेव ( इ. स. ३२० ) मैत्रेय ( ४०० ) असंग ( ४५० ) हे नालंदा मठांत होते. वसुबंधु [ ४८० ] मनोरथ आणि संग भद्र यांच्या समकालीन. बौध्द नैय्यायिकांमधील मुख्य ग्रंथकार यानंतर झाला तो दिङ्नाग [ ५०० ] शंकरस्वामी ( ५५० ) धर्म पाळ [ ६०० ] धर्मकीर्ति [ ६५० ] विनीतदेव (७ ०० ) हा नालंदा येथील विद्यापीठांत रहात असे चंद्रगोमि [ ७०० ] चंद्र व्याकरण आणि जिनेंद्रबोधि [ ७४० ] यानंतर ही बरेच बौद्ध

ग्रंथकार झाले. बौद्धांचीं दोन विद्यापीठें नाळंदा व विक्रमशिला हीं प्रसिध्द आहेत.

एकंदर न्यायशास्त्रावरील मुख्य मुख्य तीन्ही कालेंचे ग्रंथ सतीशचंद्रानें आपल्या ग्रंथाच्या उपोद्घातांत दिले आहेत. तें येणेंप्रमाणें;

### प्राचीन काळ.

मुख्य ग्रंथ—न्यायसूत्र ( अक्षपाद गौतम ) भाष्य-वात्स्यायन ४ न्याय वार्तिक ( उद्योत्कर ) ३ तात्पर्य टीका ( वाचस्पति मिश्र ) ४ तात्पर्य टीका परिशुद्धि ( उदयनाचार्य ) ५ न्यायालंकार ( श्रीकण्ठ ) ६ न्यायवृत्ति ( विश्वनाथ ).

### मध्ययुगीन.

मुख्य ग्रन्थ—प्रमाण समुच्चय ( दिङ्नाग ) टीका ग्रंथ १ वृत्ति (दिङ्नाग) २ प्रमाण वार्तिक कारिका ( धर्मकीर्ति ) ३ प्रमाण समुच्चय वृत्ति ( जिनेन्द्र बोद्धा ) वगैरे.

### अर्वाचिन काल.

मुख्य ग्रंथ—तत्वचिन्तामणि गंगेशउपाध्याय टीका १ प्रकाश ( सचिदत्त ) २ तत्वावलोक ( जयदेवमिश्र ) ३ तत्वदीधिति ( रघुनाथ शिरोमणि ) ४ तत्व टीका ( तर्कवागीश ) ५ तत्वलोक दर्पण ( महेश ठक्कुर ) ६ तत्वदीधिति टिप्पणी ( जगदीश ) ७ तवत्दीधिति टीका ( गदाधर ) ...वगैरे.

# भाग तिसरा.

## भाष्यकाळ.

हा काल इ. स. ८०० पासून पुढचा आहे, असें आम्ही पूर्वी सांगितलें आहे. या काळांत बुद्धिमत्तेचा ओघ प्राचीन ग्रंथांवर भाष्यात्मक किंवा टीकात्मक ग्रंथ लिहून त्याद्वारें आपलीं मतें प्रचलित करण्याचा प्रयत्न पंडितांनीं निरनिराळ्या ग्रंथांत केला. हे ग्रंथकार कमी बुद्धीचे होते असें नाहीं; परंतु प्राचीन धर्मसूत्रें व षड्दर्शनें इत्यादिकांचा साहजिकच लोकांच्या ठिकाणीं आदर असल्यानें त्या ग्रंथांस सोडून नवीन ग्रंथ किंवा सूत्रें निर्माण करण्याकडे पंडितांची साहजिक प्रवृत्ति झाली नाहीं. पूर्वींचे मान्य ग्रंथ घेऊन त्यांच्यावरील भाष्य व टीका यांच्या द्वारें त्याच विषयांचें जास्त उद्घाटन व नवीन मत प्रतिपादन करण्याचा प्रयत्न यापुढें झाला. कालानुरोधानें मागील विवेचनांत भाष्यग्रंथांचाही उल्लेख आहे हें त्या त्या विषयाच्या पूर्णतेसाठीं अवश्य झालें. उदाहरणार्थ भाष्यकालास प्रारंभ श्रीमच्छंकराचार्यांच्या शारीरभाष्यापासून झाला असें मानण्यास हरकत नाहीं. ब्रह्मसूत्रांवर हें भाष्य असून त्यांत वेदांत तत्त्वज्ञान शंकराचार्यांनीं बरेंच पुढें नेलें. आणि त्यांच्याहून भिन्न मत प्रतिपादन करणारे यांनीं आपलीं मतें त्याच वेदांतसूत्रांवर भाष्य करून प्रतिपादन केलीं. त्यांचा उल्लेख जरी मागें आला आहे, तथापि ते ग्रंथ भाष्यकालांतले आहेत हें वाचकांच्या लक्षांत येईलच. यापुढें जे विषय दिले आहेत, ते भाष्यकालांतच जास्त प्रगल्भ दशेस आले. परंतु त्या त्या विषयाच्या वर्णनांत प्राचीन ग्रंथांचाही उल्लेख करणें जरूर पडलें आहे. एवढें सांगून त्या विषयांकडे वळतों.

## —धर्मशास्त्र अथवा कायदा.—

संस्कृत वाङ्मयांत धर्मशास्त्राचे नियम घालून देण्यास सुरवात सूत्रांपासून झाली आहे. पूर्वीच्या वैदिक सूत्रांत 'मानवधर्मसूत्र' होतें पण सर्वांत जुनें सूत्र म्हणजे वैष्णवधर्मसूत्र होय. यापासूनच पुढें विष्णुस्मृति निर्माण झाली. पुढें गौतमसूत्रें झालीं. या सूत्रांचा काल इ. स. पू. ५०० च्या पूर्वीचा असून त्यांच्यापासून पुढें स्मृतिग्रंथ निर्माण झाले. मागें स्मतिकालाची मर्यादा इ. स. पू. २०० ते इ. स. ९०० ही सांगितलीच आहे. स र्वात जुनी स्मृति म्हणजे मनुस्मृति होय. ती इ. स. पू ३०० ते १०० पर्यंत लिहिली गेली असून तिचा महाभारताशीं अत्यंत निकट संबंध आहे. मनुस्मृतीच्या १२८४ श्लोकांपैकीं २६० श्लोक महाभारतांत उद्धृत आहेत. मनुस्मृतीनंतर याज्ञवल्क्य स्मति निर्माण झाली. हे दोन्ही ग्रंथ वाङ्मयाच्या दृष्टीनें अतिशय उत्तम आहेत. उत्तम वाङ्मयाचा जो मुख्य गुण थोडक्या शब्दांत पुष्कळ अर्थ व्यक्त करणें हा या दोहोंत भरपूर आहे. यांत उगीच वायफळ शब्द नसून प्रत्येक शब्द किंमतवान आहे. आणि इतकें असूनही ते ग्रंथ सूत्रांप्रमाणें क्लिष्ट नाहींत. मनुस्मृतींत विषयांची चांगलीशी व्यवस्था लावलेली नाहीं, ती याज्ञवल्क्यस्मृतींत आहे. तिच्यांत आचार, व्यवहार व प्रायश्चित्त असे निरनिराळे तीन भाग पाडले आहेत. पूर्वीच्या गृह्यसूत्रांतून व्यवहाराचा भाग नाहीं. एकंदर मुख्य स्मृति १८ असून त्या सर्व उपलब्ध आहेत त्यांची यादी पुढील श्लोकांत आहे.

मन्वत्रिविष्णुहारीत याज्ञवल्क्योऽशनोऽङ्गिरः ।
यमापस्तंबसंवर्ताः कात्यायनबृहस्पती ॥
पराशरव्यासशंखलिखिता गौतमस्तथा ।
शातातपो वसिष्ठश्च स्मृतयोऽष्टादश अमी ॥

वर सांगितलेंच आहे कीं, मनु व याज्ञवल्क्य या भाषेच्या दृष्टीनें उत्तम आहेत. इतर कायद्याच्या भाषेच्या दृष्टीनें चांगल्या आहेत. पराशरस्मृति ही सर्वांत अलीकडची आहे, असें दिसतें. व म्हणूनच ती कलियुगांत मानावी असें सांगितलें आहे.

स्मृतीसंबंधानें विचार करतांना एका गोष्टीकडे अवश्य लक्ष्य दिलें पाहिजे. दोन ग्रंथांतून विरोधी वचनें आलीं तर काय करावयाचें हा एक हा बिकट प्रश्न आहे. दोन श्रुतींत अशी स्थिति झाल्यास तिचा निकाल 'श्रुतिश्रुति विरोधे विकल्पः' या वाक्या अन्वयें विकल्पानें लावण्यांत येतो; पण स्मृति ग्रंथांत हें विकल्प शास्त्र लावीत नाहींत. तेथें एकवाक्यतेचें शास्त्र आहे. म्हणजे विरोधी वचनांची एकवाक्यता करून एकाद्या प्रश्नाचा निकाल लावावा लागतो आणि यामुळें हा भाग अतिशय कठीण होऊन बसला आहे तरी देखील स्मृतींवरील टीकाकारांनीं हें काम उरकून टाकलें आहे.

या स्मृतींवर वरील कारणामुळें अनेक टीका झाल्या आहेत. मनुस्मृतीवरील सर्वांत जुनी व उत्तम टीका म्हणजे मेधातिथीची होय. ही इ. स. ९०० च्या सुमारास झाली आहे. दुसरी कुल्लूक भट्टाची इ. स. १४०० च्या सुमारास झाली आहे. याज्ञवल्क्यस्मृतीवरील सर्वांत उत्तम टीका म्हणजे मिताक्षरा ही होय. ही कल्याणच्या विक्रमादित्य चालुक्याचा दिवाण विज्ञानेश्वर यानें इ स. ११०० च्या सुमारास लिहिली आहे. हल्लींचा कायदा ( हिंदु लॉ) या टीकेचा बराच आधार घेऊन चालतो इतकी ती सर्वमान्य आहे.

स्मृतींच्या आधारें पुढें स्वतंत्र असे निबंध ग्रंथ निर्माण झाले. यांत निरनिराळ्या स्मृतींच्या आधारानें कायद्याच्या एकेक प्रश्नाचा विस्तृत ऊहापोह केलेला असतो. देवगिरीच्या यादवांचा दिवाण

वर सांगितलेंच आहे कीं, मनु व याज्ञवल्क्य या भाषेच्या दृष्टीनें उत्तम आहेत. इतर कायद्याच्या भाषेच्या दृष्टीनें चांगल्या आहेत. पराशरस्मृति ही सर्वांत अलीकडची आहे, असें दिसतें. व म्हणूनच ती कलियुगांत मानावी असें सांगितलें आहे.

स्मृतीसंबंधानें विचार करतांना एका गोष्टीकडे अवश्य लक्ष्य दिलें पाहिजे. दोन ग्रंथांतून विरोधी वचनें आलीं तर काय करावयाचें हा एक हा बिकट प्रश्न आहे. दोन श्रुतींत अशी स्थिति झाल्यास तिचा निकाल 'श्रुतिश्रुति विरोधे विकल्पः' या वाक्यान्वयें विकल्पानें लावण्यांत येतो; पण स्मृति ग्रंथांत हें विकल्प शास्त्र लावीत नाहींत. तेथें एकवाक्यतेचें शास्त्र आहे. म्हणजे विरोधी वचनांची एकवाक्यता करून एकाद्या प्रश्नाचा निकाल लावावा लागतो आणि यामुळें हा भाग अतिशय कठीण होऊन बसला आहे तरी देखील स्मृतींवरील टीकाकारांनीं हें काम उरकून टाकलें आहे.

या स्मृतींवर वरील कारणामुळें अनेक टीका झाल्या आहेत. मनुस्मृतीवरील सर्वांत जुनी व उत्तम टीका म्हणजे मेधातिथीची होय. ही इ. स. ९०० च्या सुमारास झाली आहे. दुसरी कुल्लूक भट्टाची इ. स. १४०० च्या सुमारास झाली आहे. याज्ञवल्क्यस्मृतीवरील सर्वांत उत्तम टीका म्हणजे मिताक्षरा ही होय. ही कल्याणच्या विक्रमादित्य चालुक्याचा दिवाण विज्ञानेश्वर यानें इ स. ११०० च्या सुमारास लिहिली आहे. हल्लींचा कायदा ( हिंदु लॉ) या टीकेचा बराच आधार घेऊन चालतो इतकी ती सर्वमान्य आहे.

स्मृतींच्या आधारें पुढें स्वतंत्र असे निबंध ग्रंथ निर्माण झाले. यांत निरनिराळ्या स्मृतींच्या आधारानें कायद्याच्या एकेक प्रश्नाचा विस्तृत ऊहापोह केलेला असतो. देवगिरीच्या यादवांचा दिवाण

हेमाद्रि ( इ. स. १३०० ) याचा चतुर्वर्गचिंतामणि हा ग्रंथ प्रसिध्द आहे. जीमूतवाहन नांवाच्या बंगाली पंडितानें धर्मरत्न नांवाचा ग्रंथ लिहिला असून त्यापैकीं दायभागाचा भाग बंगालयांत सर्व ठिकाणीं मानला जातो. [ इ. स. १४००।१५०८ ] देशावर आणि उत्तर हिंदुस्थानांत मिताक्षरा मानली जाते. कोंकणप्रांतांत नीलकंठकृत व्यवहारमयूख मानतात. बनारसच्या एका पंडितानें लिहिलेला वीरमित्रोदय हा ग्रंथ बनारस व मिथिला प्रांतांत चालतो. वरील दोन्ही ग्रंथ इ. स. १३०८।१४०७ च्या सुमाराचे आहेत. कोंकणांत राज्य करीत असलेल्या शिलाहार वंशांतील एका राजानें अपरार्क हा ग्रंथ लिहिला असून तो काश्मीर प्रांतांत मानला जातो.

श्रुतीप्रमाणें स्मृतीदेखील ईश्वरप्रणीत मानल्या असल्यामुळें त्यांत ढवळाढवळ करण्याचा अधिकार कोणासही नाहीं आणि नवीन स्मृति तर कोणासच बनवितां येणार नाहीं असें हिंदुधर्माचें मत आहे.

## --इतिहास--

पाश्चात्य लोकांच्या मतें संस्कृतांत इतिहासग्रंथच नाहींत, मात्र कल्हण कवीनें लिहिलेला ‘ राजतरंगिणी ’ ग्रंथ एवढाच काय तो अपवाद. हा इ. स. ११४८ सालीं लिहिला असून त्यांत काश्मीरचा इतिहास आहे पण हें मत चुकीचें आहे. आपल्याकडे प्राचीन काळापासून इतिहास लिहिण्याची पध्दत होती. याचीं ठळक उदाहरणें म्हणजे महाभारत व रामायण हे ग्रंथ महाभारतांत तर ‘ जयो नामेतिहासोऽयम् ’ असें स्पष्ट वर्णन आहे. इतिहास हा शब्द उपनिषदांत देखील ‘ इतिहासपुराणम् ’ असा आला आहे. पुराण व इतिहास असे दोन प्रकार होते. पुराणें म्हणजे प्राचीन दंतकथा आणि इतिहास म्हणजे प्रत्यक्ष घडलेली हकीकत. पुढें

पुराणांत व इतिहासांत अनेक गोष्टींची भर पडल्यानें त्यांचें मूळ स्वरूप नाहींसें झालें, आणि म्हणून इतिहास व पुराण यांत फारसा भेद नाहीं. इतिहासांत आख्यानें व उपाख्यानें असतात, त्यांचीं लक्षणें मागें सांगितलींच आहेत. चिनी प्रवासी हुएनत्सांग यानें सरकारी रीतीनें इतिहास नीलपीठांत लिहून ठेवीत असत असें लिहिलें आहे. बाणाचें श्रीहर्षचरित्र ( इ. स. ६२५ ) देखील इतिहासग्रंथच होय; यानंतरचे ऐतिहासिक ग्रंथ प्रबंध या नांवानें प्रसिध्द आहेत. कनोज येथें राहणारा दक्षिणी पंडित राजशेखर यानें इ. स. ९५७ च्या सुमारास 'चतुर्विंशतिप्रबंध' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. हेमचंद्राचा 'प्रबंधचिंतामणि' ( इ. स १९०० आणि बिल्हण कवीचें [ इ स. ११५० ] विक्रमांकदेवचारित्र वगैरे पुष्कळ सुकत संकीर्तनादि ग्रंथ आहेत वरील सर्व ग्रंथ काव्य पध्दतीचे असल्यानें कांहीं लोक त्यांची गणना इतिहासांत न करतां काव्यांत करतात. पण त्यामुळें ते इतिहास नव्हत असें मुळींच म्हणतां येणार नाहीं.

## ––व्याकरण––

हल्लीं उपलब्ध असलेल्यांत सर्वांत जुना व सर्वमान्य व्याकरण ग्रंथ म्हणजे पाणिनीची 'अष्टाध्यायी' पण त्याच्यापूर्वी ६४ व्याकरणकार असल्याचा उल्लेख त्यानेंच केला आहे. हा गांधर देशांत राहणारा असून याच्या गांवाचें नांव शलातुर असल्यामुळें याच्या ग्रंथास 'शालातरीय' असेंही नांव दिलेलें आढळतें. पाणिनीस वाघानें खाल्लें अशी एक दतकथा संस्कृत वाङ्मयांत प्रचलित आहे. आपल्याकडे व्याकरणाचा विचार वैदिक कालापासूनच केला गेला असून उपनिषदांत व भगवद्गीतेंत ही गोष्ट स्पष्टपणें नजरेस येते. भगवद्गीतेंत 'द्वन्द्वः सामासिकस्य च' असा उल्लेख आहे. हिंदुस्थाना-

तील लोकांइतका व्याकरणाचा अभ्यास कोणीही केला नाहीं. पाश्चात्यांनीं आपलें नवीन भाषाशास्त्र ( Philology ) पाणिनीच्या ग्रंथावरून तयार केलें आहे. पाणिनीनें व्याकरण लिहिलें त्याची तयारी त्याच्या पूर्वींच्या वैयाकरणांनीं करून ठेविली होती. पाणिनीनें एकंदर २२०० धातूंचा विचार केलेला आहे, त्यांपैकीं सध्या वाङ्मयांत ८०० च हजर आहेत. आणि खुद्द पाणिनीनें वैदिक धातूंपैकीं सुमारें ५० गाळले आहेत असें मॅकडोनेल म्हणतो. पाणिनीचा काल पाश्चात्य लोक इ. स. पू. ३०० हा म्हणतात, पण तो इ. स. पू. ८०० आहे, असें वरील गोष्टीवरूनच ठरत आहे. व तें पूर्वीं इतर प्रमाणांनीं सिद्ध केलेंच आहे. पाणिनीच्या सूत्रांवर कात्यायनानें इ. स. पू. ३०० च्या सुमारास लिहिलेलें वार्तिक सुप्रसिद्ध आहे. पाणिनीच्या ग्रंथावर व कात्यायनाच्या वार्तिकावर पतंजलीचें महाभाष्य आहे. इतर पुष्कळ भाष्यें असलीं तरी महाभाष्य ही संज्ञा यालाच लावतात यावरून याची योग्यता व्यक्त होते. पाणिनीच्या १७१३ सूत्रांवर हें भाष्य आहे. गणपाठावर वर्धमानानें ( इ. स. ११४० ) गणरत्नमहोदधि हा ग्रंथ लिहिला आहे. पाणिनीच्या ग्रंथांतील सूत्रांवरून ज्या परिभाषा उत्पन्न होतात त्याचें एकीकरण नागोजी भट्टानें 'परिभाषेन्दुशेखर' या ग्रंथांत केलें आहे. पतंजलीच्या महाभाष्यांतील 'अरुणद्यवनः साकेतम्' या ऐतिहासिक उल्लेखावरून व यांतील भूतकाळच्या प्रयोगावरून याचा काल इ. स. पू. १५० हा नक्की ठरला आहे. यावर भर्तृहरीची इ. स. ७ व्या शतकांत लिहिलेली वाक्यपदीय नांवाची व कय्यटाची इ. स. १३०० च्या सुमारास लिहिलेली अशा टीका आहेत. जयादित्य व वामन यांनीं लिहिलेला काशिकावृत्ति ( इ. स. ६५० ) व भट्टोजी दीक्षितानें १७ व्या शतकांत

लिहिलेली सुप्रसिध्द सिध्दांतकौमुदी हेही पाणिनीवरील चांगले ग्रंथ आहेत. सिध्दांतकौमुदीची वरदरायानें १८ व्या शतकांत ' लघु-कौमुदी ' केली आहे. हा सगळा पाणिनीच्या ग्रंथाचा विस्तार आहे.

चंद्रानें लिहिलेलें चंद्रव्याकरण ( इ. स. ६०० ) शाकटायनानें काशिकावत्तीनंतर लिहिलेलें व्याकरण ( हा शाकटायन नूतन आहे,) हेमचंद्राचें शब्दानुशासन व्याकरण, सर्ववर्मन् याचें कातंत्र हे अन्य व्याकरणग्रंथ आहेत. शेवटीं निर्दिष्ट केलेलें व्याकरण सोपें आहे. एकंदर संस्कृत भाषेचे ८ व्याकरणग्रंथ आहेत अशी समजूत आहे.

## —कोश—

संस्कृताचे कोश श्लोकबध्द आहेत. ते वर्णानुक्रमानें केलेले नाहींत. सर्वांत प्रसिध्द असा अमरसिंहानें लिहिलेला अमरकोश ( इ. स. ५०० ) संस्कृत अध्ययनास अवश्य समजला जातो. याचीं तीन कांडें आहेत. याचें पूरण म्हणून पुरुषोत्तमदेवानें त्रिकांडशेष नांवाचा ग्रंथ लिहिला आहे ( इ. स. १३०० ) शाश्वतानें लिहिलेला अनेकार्थसमुच्चय अमरकोशापूर्वींचा असावा. या दोघांची रचना परस्परभिन्न आहे. अमरकोशांत एका अर्थाचे अनेक शब्द(Synonyms ) एके ठिकाणीं दिले आहेत, तर शाश्वतानें एका शब्दाचे अनेक अर्थ ( Homonyms ) एके ठिकाणीं दिले आहेत. यानंतर महेश्वराचा विश्वप्रकाश ( इ. स. ११११ ) हलायुधाची अभिधानरत्नमाला ( इ. स. ९५० ) यादवप्रकाशाची वैजयंती ( इ. स. १०५० ) मंखाचा ( हा काश्मिरी पंडित होता ) मंखकोश ( इ. स. ११५० ) आणि हेमचंद्राचे अभिधानचिंतामणि व अनेकार्थसंग्रह या नांवांचे कोश आहेत.

## --अलंकारशास्त्र--

या शाखेंतील आदिग्रंथ भरतमुनींचें नाट्यशास्त्र हा होय. हा ग्रंथ इ. स. च्या ६ व्या शतकांत लिहिला गेला असें पाश्चात्य पंडितांचें मत आहे, पण भरतमुनीचें नांव याच्या पूर्वींच्या–कालिदासाच्या नाटकांत वगैरे–ग्रंथांत आहे. कदाचित् नाट्यशास्त्र खुद्द भरतमुनींनीं लिहिलें नसेल, त्यासंबंधीं नक्की सांगतां येत नाहीं. यानंतर दंडीचा काव्यादर्श (इ. स. चें ६ वें शतक) वामनाचा काव्यालंकारवृत्ति (८ वें शतक) रुद्रभटाचा शृंगारतिलक (९ वें शतक) रुद्रटाचा काव्यालंकार (९ वें शतक) धनंजयाचा दशरूपक (१० वें शतक–यांत नाटकाचे १० प्रकार वर्णिले आहेत) मम्मट व अल्लट यांनीं लिहिलेला काव्यप्रकाश (इ. स. ११००) बंगालीं पंडित विश्वनाथ याचा साहित्यदर्पण (इ. स. १४५०) जगन्नाथपंडिताचा रसगंगाधर (इ. स. १६००) जयदेवकृत चंद्रालोक (इ. स. १३००) अप्पय्या दीक्षितकृत कुवलयानंद वगैरे अलंकारशास्त्रावरील प्रसिध्द ग्रंथ आहेत.

## --गणित व ज्योतिष--

हिंदुस्थानांत उपनिषत्कालापूर्वींपासून गणित विषयाचा अभ्यास केला जात होता, छांदोग्यांत 'राशि' या नांवानें गणिताचा उल्लेख आहे, (त्याचा उच्चार त्रैराशिक या शब्दांत आहे.) अंक गणित व बीजगणित हीं दोन्ही येथें फार परिणत झालीं होतीं. दशकपध्दति (Decimal System) मूळ हिंदुस्थानची व नऊ अंकही मूळ हिंदुस्थानचे आहेत, आणि येथून ते सर्व पृथ्वीवर पसरले आहेत. दुर्दैवानें गणित विषयावरील जुने ग्रंथ हल्लीं उपलब्ध नाहींत. भास्कराचार्यांच्या ग्रंथावरून काय बोध होईल तेवढाच. रेखागणित (Geometry) मात्र ग्रीक लोकांइतकें आमच्याकडे परिणत झालें

नव्हतें. तरी देखील तें आपल्याकडे नव्हते असें नाहीं. कारण यज्ञप्रसंगीं स्थंडिल, वेदी वगैरे बांधण्यांत त्यांच्याशिवाय चालणें शक्य नाहीं. पूर्वी जरी आम्ही गणितांत इतकी प्रगति केली होती, तरी आज आम्ही पाश्चात्यांच्या पुष्कळ मागें आहोंत, हें कबूल केलें पाहिजे.

ज्योतिष आमच्याकडे वैदिक कालापासून होतें. पण त्या वेळीं राशिगणित नसून नक्षत्रगणित प्रचलित होतें. ग्रीक लोकांची हिंदुस्तानावर इ. स. पू. ३२० च्या सुमारास स्वारी झाल्यानंतर त्यांच्याकडील राशिगणित आमच्यांत आलें. यावरून ज्या ग्रंथांत राशींचा उल्लेख आहे तो ग्रंथ इ. स. पू ३२० नंतरचा, निदान इ. स. पू. १५० नंतरचा असला पाहिजे असें निश्चयानें सांगतां येतें. कारण इ. स. पू. १५० च्या सुमारास ग्रीकांची हिंदुस्थानावर दुसरी स्वारी होऊन यानंतर कांहीं वर्षे राज्यही करीत होते. यानंतर भारतीय व ग्रीक ज्योतिषी उज्जनी येथें एके ठिकाणीं जमून त्यांनीं नवीन सिद्धांत ग्रंथ तयार केले व त्यावरून इ. स. पू. पहिल्या शतकांत वराहामिहिरानें पंचसिध्दांतिका हा राशिगणितात्मक ग्रंथ लिहिला. ‘ भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास ’ या पुस्तकाचे कर्ते शं. बा. दीक्षित यांचें असेंच मत अहे. यानंतर इ. स. ४७६ या वर्षी पाटलिपुत्राच्या आर्यभट्टानें आपला आर्यसिद्धांत ग्रंथ लिहिला. पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते ही गोष्ट त्यांस माहीत होती. त्याचप्रमाणें सूर्यग्रहण व चंद्रग्रहण वर्तविण्याचें जें अति कठिण गणित, तेंही यांच्या वेळेपासून प्रचारांत आलें. या ग्रंथाच्या तिसऱ्या अध्यायांत गणितासंबंधीं सामान्य माहिती त्यानें दिली आहे. यानंतरचा ग्रंथकार म्हणजे उज्जनीचा वराहामिहिर यानें आपल्या अभ्यासास इ. स. ५०५ मध्यें सुरवात केली व हा इ.

स. ५८७ त वारला असें टीकाकारानें लिहिलें आहे. याचा फल-ज्योतिषावरचाही ग्रंथ प्रसिद्ध आहे. ब्रम्हगुप्त ( याला जिष्णुज असेंही नांव आहे.) यानें आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी इ. स. ५९८–ब्रम्हस्फुटसिध्दांत हा ग्रंथ लिहिला आहे. या सर्व ग्रंथांवर मोठमोठे टीकाकार पुष्कळ आहेत. याशिवाय सूर्यसिध्दांत हा ग्रंथ प्रसिध्द आहे. यानंतरचा सुप्रसिद्ध ग्रंथ म्हणजे भास्कराचार्यांचा सिध्दांत-शिरोमणि हा होय. ( इ. स. ११९५ ) एकंदर ज्योतिष्यांत या ग्रंथाचा अतिशय आदर केला जातो. भास्कराचार्य हा वऱ्हाडांतला राहणारा असून याच्याविषयीं बरीच माहिती उपलब्ध आहे. गणितावरील याच्या ग्रंथास याच्या मुलीच्या नांवावरून लीलावती असें नांव दिलें आहे. गोलाध्याय ( sphericle Trignometry ) हा सिध्दांतशिरोमणीचा एक भाग आहे. यानंतर सर्वांत शेवटचा सांगण्यासारखा ग्रंथ म्हणजे ग्रहलाघव. हा गणेश दैवज्ञ यानें १४४४ त लिहिला आहे. यानें अरबस्तानांत जाऊन बरीच विद्या संपादन करून नंतर हा ग्रंथ लिहिला आहे. अलीकडील सर्व ज्योतिषी ग्रहलाघवाच्याच आधारानें गणित करतात. हल्लींच्या पद्धतीशीं ताडून पाहतां पूर्वीचें गणित एकंदरींत बरेंच स्थूल ठरतें. तरीपण त्या वेळच्या मानानें हिंदुस्थानांतील लोकांनीं या विषयांत फार प्रगति केली होती. युरोपखंडांत गॅलिलिओ वगैरे जे ज्योतिषी झाले ते यानंतरच झाले. अरब लोकांनीं हिंदुस्तानांतून आपल्या देशांत ग्रंथ नेऊन या विषयाचा बराच अभ्यास केला. आमच्याकडे भूमध्य रेषा उज्जनींतून गेली असें गृहीत धरून त्यावर सर्व ग्रहगणित केलें जातें. यावरून उज्जनी येथें ज्योतिषाचा बराच अभ्यास झाला होता हें सिध्द होतें. कल्पगणिताची कल्पना आपलीच आहे. पाश्चात्य लोक कल्प मानीत नाहींत. ही कल्पना अशी आहे कीं, कल्पाच्या

आरंभीं सर्व ग्रह एकसूत्रग्रथित होते व कल्पांतीं ते त्याच स्थितींत येणार आहेत. प्रत्येक कल्पाचीं ४३२०००००० वर्षें मानतात. हा केवळ कल्पनेनें ठरविला असें माझें मत आहे.

## वैद्यक

या शास्त्रावरील सर्वांत जुना ग्रंथ म्हणजे चरक हा असून तो इ. सनापूर्वी लिहिला आहे. त्यानंतरचा ग्रंथ म्हणजे सुश्रुतसंहिता. Bower Mannscript म्हणून जो प्राचीन लेख नुकताच सांपडला आहे त्यांत यांतील पुष्कळ वचनें आलीं आहेत; त्यावरून हा इ. स. ४०० च्या सुमारास तयार झाला असावा असें अनुमान करावें लागतें. त्याचप्रमाणें वाग्भटाचा अष्टांगहृदय व माधवनिदान हे वैद्यशास्त्रावरील सुप्रसिध्द ग्रंथ आहेत.

वैद्यशास्त्र हें बहुतेक आपल्याकडीलच आहे. हिंदुस्थानांतून तें आरबांनीं नेलें व त्यांच्याकडून तें इटालींत व इतर पाश्चात्य राष्टांत गेलें. इ स १००० पर्यंत आपलें वैद्यशास्त्र चरक सुश्रुतावरच चालत असे, पण पुढें त्यांत रसायनाची भर पडली. या सुमारास रसग्रंथ निर्माण झाले असें वाटतें. किमया ही मूळ आरबांची आहे आपली नव्हे. किमयेच्या अभ्यासामुळें रसायनशास्त्राची प्रगति होत गेली, व त्यामुळें वैद्यशास्त्राची बरीच मदत झाली, पण रसायनशास्त्र पहिल्यानें आपल्याकडे अगदींच नव्हतें असें नाहीं. इ. सनापूर्वी पहिल्या शतकांत वररुचि यास मुख्य रस ( elixir of life ) मिळाला होता व त्याच्या योगानें तो पुष्कळ अद्भुत गोष्टी करून दाखवीत असे अशी दंतकथा आहे.

रस, नाडीपरीक्षा व त्रिदोष हीं आयुर्वेदाचीं मुख्य अंगें आहेत, या तिन्ही कल्पना आणि विशेषतः त्रिदोषांची कल्पना, खोट्या

असें पाश्चात्यांचें म्हणणें आहे. रसायनांवरही पुष्कळ लोकांचा विश्वास बसत नाहीं पण पुष्कळ रसायनांचा अनुभव लोकांस येतो.

## --संगीत व शिल्प वगैरे कला--

गायनवादनकलाही आपल्याकडे बरीच जुनी आहे. शार्ङ्गदेवाचा संगीत रत्नाकर व सोमनाथाचा रागविबोध हे या कलेचे संस्कृतांतील ग्रंथ आहेत, वराह मिहिरानें आपल्या ग्रंथांत देवतांच्या मूर्ति कशा घडाव्या याची फार माहिती दिली आहे, या विषयावरहि ( Sculpture ) आपल्याकडे पूर्वी बरेंच ग्रंथ असावे अशी माझी समजूत आहे. अजिंठ्याचीं लेणीं ज्यांनीं पाहिलीं असतील त्यांना आपल्याकडे पूर्वी रंगविण्याची कला किती ऊर्जितावस्थेस पोचली होती याची साक्ष पटेल. सदर लेण्यांतील रंग अजूनहि इतके ताजे दिसतात कीं, पाश्चात्य कारागीर देखील त्यांच्याकडे पाहून तोंडांत बोटें घालतात. पूर्वीचे रंग रासायनिक [ chemical ] नसून वनस्पतिज [ vegetable ] असावे असा समज आहे. हस्तिशास्त्र (पालक ) व अश्वशास्त्र [ शालिहोत्र ] या शास्त्रांवर देखील पूर्वी आपल्याकडे ग्रंथ होते असें दिसतें; मात्र ते हल्लीं उपलब्ध नाहींत. त्याच प्रमाणें रथांचें शास्त्र, सैन्यव्यवस्थेचें शास्त्र वगैरे निरनिराळीं शास्त्रें आपल्याकडे पूर्वी बरीच ऊर्जित दशेस पावलीं असून त्यांवर तेव्हां चांगले ग्रंथ उपलब्ध होते असें आपणांस महाभारतावरून दिसतें.

क्र. २७३३

REFBK-0002132